# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

## // महासभा बैठकीचे कार्यवृत्त //

**सभा क्रं. - ३८** **दि. ३०/०५/२०२२**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.३०/०५/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता सरदार वल्लभभाई पटेल टॉवर इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर. सौ.महाजन जयश्री सुनिल यांचे अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष उपस्थितीने झालेल्या महासभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करून खालील मा.सभासद सभेस उपस्थित होते.

**मा.सौ.महाजन जयश्री सुनिल, महापौर तथा पिठासिन अधिकारी**

| | | |
|---|---|---|
| पाटील कुलभुषण विरभान, उपमहापौर | देशमुख प्रतिभा गजानन | नाईक प्रशांत सुरेश |
| नेरकर सरीता अनंत | पाटील विजय पुंडलिक | बालाणी भगतराम रावलमल |
| पोकळे दिलीप बबनराव | सोनवणे सुरेश माणिक | अत्तरदे रजनी प्रकाश |
| सोनवणे कांचन विकास | बारी शोभा दिनकर | आहुजा मनोज नारायणदास |
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | शेख हसीनाबी शरिफ | पाटील मिनाक्षी गोकुळ |
| बाविस्कर किशोर रमेश | भिल पार्वताबाई दामु | सोनार रंजना विजय |
| कोळी दत्तात्रय देवराम | पाटील उषा संतोष | खडके सुनिल वामनराव |
| सनकत चेतन गणेश | कोल्हे सिंधु विजय | खडके विश्वनाथ सुरेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | कोल्हे ललीत विजय | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |
| सोनवणे राखी शामकांत | बरडे नितीन मनोहर | देशमुख सुन्नाबी राजु |
| तायडे ज्योती शरद | बेंडाळे उज्वला मोहन | पटेल इब्राहिम मुसा |
| लढ्ढा नितीन बालमुकुंद | राणे गायत्री इंद्रजित | सोनवणे निता मंगलसिंग |
| सोनवणे धीरज मुरलीधर | जोशी अनंत हरिश्चंद्र | सोनवणे विक्रम किसन |
| भोळे सिमा सुरेश | सोनवणे अंजनाबाई प्रभाकर | **स्विकृत सदस्य** |
| सोनवणे अश्विन शांताराम | पाटील रेखा चुडामण | कैलास नारायण सोनवणे |
| चौधरी मनोज सुरेश | सोनवणे सुरेखा सुदाम | विशाल राधेशाम त्रिपाठी |
| भोईटे लताबाई रणजीत | ढेकळे सदाशिव गणपत | राजेंद्र नारायण मराठे |
| पाटील चंद्रशेखर शिवाजी | पाटील राजेंद्र झिपरु | महेश रतन चौधरी |
| कापसे मयुर चंद्रकांत | महाजन सुनिल सुपडु | |
| कापसे प्रतिभा चंद्रकांत | शेख शबानाबी सादीक | |

सदर सभेस मा.आयुक्त, डॉ.विद्या गायकवाड, मा.अतिरीक्त आयुक्त श्री.शाम गोसावी, नगरसचिव, श्री.सुनिल गोराणे, मा.उपायुक्त श्री.प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.चंद्रकांत वानखेडे, नगररचनाकार, श्री.अशोक करवंदे, सहा.आयुक्त श्री.अभिजीत बाविस्कर, शहर अभियंता श्री.व्ही.ओ.सोनवणी तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**सभेस गणपूर्ती असल्याने मा.पिठासिन अधिकारी यांनी सभा सुरू करण्याचे निर्देश दिले.**

**सभेच्या सुरूवातीस वंदेमातरम ने सुरूवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेकरीता सन्मा.सदस्य कोल्हे प्रविण रामदास, काळे अमित पांडुरंग, पाटील सचिन भिमराव, मराठे जितेंद्र भगवान तसेच सन्मा.सदस्या सपकाळे रंजना भरत, सोनवणे भारती कैलास, चौधरी मंगला संजय, ॲड.हाडा शुचिता अतुलसिंह, काळे दिपमाला मनोज, पाटील प्रतिभा सुधीर, तायडे सुरेखा नितीन, चव्हाण ज्योती बाळासाहेब, शेख सैईदा युसुफ यांचे रजेचे अर्ज आलेले असुन ते मा. पिठासिन अधिकारी महोदया यांनी मंजूर केलेले आहेत.

**(नगरसचिव यांनी श्रध्दांजलीच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**नगरसचिव :-** सर्व सभागृहाला विनंती करतो की, सर्वांनी दोन मिनीट श्रध्दांजलीसाठी उभे राहायचे आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८०२ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे श्रध्दाजंलीचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | श्रध्दांजलीचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | १. महाजन जयश्री सुनिल, मा.महापौर<br>२. कोल्हे ललित विजय<br>३. भोळे सिमा सुरेश<br>४. खडके विश्वनाथ सुरेश | भारताचे ०६ वीर जवान हे संरक्षण सेवेत लडाख येथे कार्यरत असतांना दरीत वाहन कोसळून दुर्देवाने त्यांचे अपघाती दु:खद निधनाबद्दल. |
| २. | १. महाजन जयश्री सुनिल, मा.महापौर<br>२. भोळे सिमा सुरेश<br>३. पाटील राजेंद्र झिपरु<br>४. बालाणी भगतराम रावलमल | माजी महापौर सौ.भारतीताई कैलास सोनवणे यांच्या मातोश्री तसेच जेष्ठ नगरसेवक श्री.कैलास (आप्पा) सोनवणे यांच्या सासू कै.वत्सला एकनाथ बाविस्कर यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ३. | भोळे सिमा सुरेश | १.रिटायर्ड डीप्युटी कमिशनर श्री.कै.रामदास संपत पाटील, २) जळगांव जनता सहकारी बँक अध्यक्ष श्री.अनिल राव सर यांच्या मातोश्री कै.सुमित्रा गोविंद राव, ३) श्री.रमेश हिरामण पाटील यांचे वडील कै.हिरामण जंगू पाटील, ४) नूतन मराठा महाविदयालयातील प्रा.भगतसिंग निकम सर यांच्या मातोश्री कै.प्रमिला गंभीरराव निकम, ५) गणेश कॉलनी येथील रहिवासी रेमंड येथे कार्यरत असलेले श्री.दिपक पाटील यांचे वडील कै.निवृत्ती जगन्नाथ पाटील, ६) रिंग रोड येथील रहिवासी कै.डॉ.भागवत महाजन, ७) जुने जळगांव येथील रहिवासी कै.वत्सला बाबुराव खडके, ८) रामानंद नगर येथील रहिवासी कै.सुधाकर पाटील यांचे दु:खद निधनाबद्दल. |
| ४. | खडके विश्वनाथ सुरेश | १) जुने जळगांव येथील रहिवासी कै.वत्सला बाबुराव खडके, २) रिटायर्ड डीप्युटी कमिशनर श्री.कै.रामदास संपत पाटील, ३) नूतन मराठा महाविदयालयातील प्रा.भगतसिंग निकम सर यांच्या मातोश्री कै.प्रमिला गंभीरराव निकम यांचे दु:खद निधनाबद्दल. |

श्रध्दांजली बाबत आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने उपरोक्त दु:खद घटनेबाबत सभागृहाला अत्यंत दु:ख होत आहे. परमेश्वर इहलोक सोडून गेलेल्या मृतात्म्यास चिरशांती प्रदान करो, त्यांच्या समस्त कुटूंबियांचे दु:खात सभागृह सहभागी असून त्यांचे कुटूंबियांना, मित्र परिवारास दु:ख सहन करण्याची शक्ती प्रदान करो या भावनेसह सभागृहाने दोन मिनीटे शांत उभे राहून दिवगंत आत्म्यांना श्रध्दांजली अर्पण केली.

**(नगरसचिव यांनी अभिनंदनाच्या प्रस्तावांना वाचायला सुरुवात केली.)**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८०३ पारित करण्यात आला.**

सभा कामकाजाच्या सुरुवातीस सन्मा.सदस्यांनी खालील प्रमाणे अभिनंदनाचे प्रस्ताव मांडले.

| अ.क्र. | सन्मा.सदस्यांचे नांव | अभिनंदनाचे प्रस्ताव |
|---|---|---|
| १. | १.महाजन जयश्री सुनिल मा.महापौर<br>२.महाजन सुनिल सुपडू मा.विरोधी पक्षनेता | नुकत्याच संपन्न झालेल्या ग.स.सोसायटीच्या निवडणूकीमध्ये मनपा अभियंता श्री.उदय मधुकर पाटील यांचे सहकार पॅनलने घवघवीत यश संपादित केलेबद्दल तसेच ग.स.सोसायटीच्या अध्यक्षपदी मनपा अभियंता श्री.उदय मधुकर पाटील यांची निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |
| २. | कोल्हे ललित विजय | १) ग.स.सोसायटीच्या अध्यक्षपदी मनपा अभियंता श्री.उदय मधुकर पाटील यांची निवड झाल्याबद्दल, २) ग.स.सोसायटीच्या स्विकृत संचालक पदी मा.महापौर सौ.जयश्रीताई सुनिल महाजन व मनपा कर्मचारी श्री.राम पवार यांची निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |

| | | |
|---|---|---|
| ३. | १.लढ्ढा नितीन बालमुकुंद<br>२.सोनवणे कैलास नारायण<br>३.पाटील राजेंद्र झिपरु | १) ग.स.सोसायटीच्या तज्ञ संचालक पदी मा.महापौर सौ.जयश्रीताई सुनिल महाजन यांची निवड झाल्याबद्दल २) माननीय आयुक्त श्रीमती डॉ.विदया गायकवाड यांची जळगांव शहर महानगरपालिका जळगांव येथे पहिल्या महिला आयुक्त पदी नियुक्ती झाल्याबद्दल ३) ग.स.सोसायटीच्या अध्यक्षपदी मनपा अभियंता श्री.उदय मधुकर पाटील यांची निवड झाल्याबद्दल हार्दीक अभिनंदन. |

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने वरील सर्व पदाधिकारी, खेळाडू यांचे हे सभागृह अभिनंदन करीत असुन उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देत आहोत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सौ.सरितातार्इ नेरकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करण्यात येत आहे. जयश्रीतार्इची ग.स.सोसायटीमध्ये स्विकृत सदस्यपदी निवड झाल्याबद्दल त्यांचेही मनापासुन अभिनंदन करण्यात येत आहे. उदय बापुचेंही अभिनंदन करण्यात येत आहे. आणि नुकताच पदभार स्विकारलेल्या आयुक्त विद्यातार्इ गायकवाड यांचा सुध्दा मनापासुन अभिनंदन करतो की, जळगांव महानगरपालिकेच्या इतिहासामध्ये पहिली आयुक्त महिला असल्याचा बहुमान त्यांनी मिळविलेला आहे. जरी हा बहुमान त्यांना मिळाला असेल तर ही काटेची खुर्ची आहे. आणि काटेत फुल असल्या कारणाने जळगांवकरांच्या अपेक्षाही आपल्याकडुन खुप उंचावलेल्या आहे. आणि त्या गरजु फुलांना आपण आता पदभार स्विकारुन जे काही कार्यकाळ झालेला आहे. त्याच्यामध्ये आपल्या कार्याची चमकगीरी दिसुन आलेली आहे. निश्चितपणे ती कार्यपध्दती तश्या पध्दतीने शेवटपर्यंत राहिल अशी जळगांव वासीयांची आपल्याकडुन अपेक्षा आहे. आणि मनापासुन सगळयांचे अभिनंदन करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**श्री.कैलास सोनवणे :-** आयुक्तपदी गाकवाड मॅडमांची निवड झाली मी त्यांचे अभिनंदन करतो. आपले कर्मचारी श्री.उदय पाटील हे ग.स.चे चेअरमन झाले, आपले राम मामांची तेथे सदस्य म्हणुन आणि महापौरतार्इ यांची निवड झाली. यांचाही मी अभिनंदन करतो. महापौर मॅडम नशिबवान आहे, याच्यात दुमतच नाही. बँकेचे चेअरमन पण होवु शकता ते पुढे काही सांगता येत नाही. महापौर आहे, ग.स.वरती आहे अजुन काय ? फेडरेशन बाकी आहे. सुनिलभाऊ तयारी करतील. मी आमच्या पक्षातर्फे तुम्हाला पुढील भावी शुभेच्छा देतो.

**श्री.सुनिल महाजन :-** ॲडव्हान्स मध्ये.

**मा.उपमहापौर :-** आदरणीय जयश्रीतार्इ महाजन यांची ग.स.च्या स्विकृत सदस्यपदी निवड झाली त्यांचे अभिनंदन, जळगांव शहरामध्ये नगरपालिकेपासुन ते महानगरपालिकेपर्यंतच्या इतिहासात प्रथमच महिला आयुक्त म्हणुन विद्यातार्इ गायकवाड यांची आयुक्त पदी नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन, ग.स.सोसायटी येथे उदयबापु पाटील महानगरपालिका अभियंता तसेच राम पवार महानगरपालिका कर्मचारी अनुक्रमे अध्यक्षपदी व संचालक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचे देखील याठिकाणी अभिनंदनाचे प्रस्ताव मांडतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, मला काही प्रश्न उपस्थित करायचे आहे तर विषय संपल्यावर बोलायचे की, आता बोलायचे.

**मा.महापौर :-** पहिले आपण विषयपत्रिकेवरचे विषय घेऊ या.

**श्री.कैलास सोनवणे :-** ते विषयनंतर त्यांचा पण काही इन्ट्रेस्ट राहत नाही. महत्वाचे विषय आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अधिकारी थांबत नाही अधिकारी चालले जातात.

**मा.महापौर :-** एक मिनीट आपल्या महानगरपालिकेमध्ये काही नविन अधिकारी नियुक्त झालेले आहे. सर्व प्रथम आपण त्यांचे ओळख परिचय करुन घेणार आहोत. त्यानंतर आपण सुरुवात करु या.

**नगरसचिव :-** नमस्कार, जळगांव शहर महानगरपालिकेत महाराष्ट्र शासनाने श्री.चंद्रकांत पुंडलिक वानखेडे यांची पदोन्नतीने मुख्यलेखा अधिकारी या पदावर जळगांव शहर महानगरपालिकेत नियुक्ती झालेली आहे. त्यांची ३१ वर्ष सेवा झालेली आहे. त्यांनी वेगवेगळया डिपार्टमेंटला सर्व्हीस केलेली आहे तर त्यांचा सर्व सभागृहाच्या वतीने मुख्यलेखा अधिकारी म्हणुन स्वागत आहे. तद्नंतर श्री.अभिषेक, सहा.आयुक्त म्हणुन नागपुर महानगरपालिकेत यांची नियुक्ती होती. त्यांची आता सहा.आयुक्त म्हणुन जळगांव महापालिकेत नियुक्ती झालेली आहे. त्यांचा सुध्दा सर्व सभागृहाच्या वतीने स्वागत आहे. अति.आयुक्त पदावर कार्यरत मा.विद्या गायकवाड मॅडम यांची सुध्दा जळगांव शहर महानगरपालिकेतच आयुक्त म्हणुन कायमस्वरुपी नियुक्ती झालेली आहे. त्यांचे सुध्दा सभागृहामार्फत स्वागत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कायमस्वरुपी म्हणजे रिटायर होईपावेतो.

**मा.आयुक्त :-** बस झालं.

**श्री.कैलास सोनवणे :-** जे काही क्रायटेरीयाज असतात. ते फुलफिल केल्यानंतर आपल्याला काही ग्रँटस मिळत असतात. परंतु त्यामध्ये जे या शहरातील १६५० संडाशींचा साफसफाईचा जो मक्ता आहे. १६५५ संडाशींच्या सिट्सचा रु.३७३/- प्रति महा पर सिट, तर हा जो मक्ता आहे त्याचे बिल रु.६ लाख होते मॅडम दर महिन्याच. आणि याची साफसफाई काही व्यवस्थित होत नाही. म्हणजे त्यामध्ये मॅझीमम एस.आय. लोकांनी असमाधानकारक साफसफाई असे दिलेले आहे. आणि त्या मक्त्यामुळे त्या साफसफाईमुळे आपल्या त्या सर्व्हेक्षणावर फरक पडलेला आहे त्यामध्ये आपल्याला झिरो मार्क मिळालेले आहे. त्यावरती आपल्या ग्रँडवरती परिणाम होणार आहे. आणि अश्या प्रकारे जर कधी महिन्याचे ६ लाख रुपये मक्तेदार फुकटचे घेत असेल जनतेचे पैसे, तर माझी विनंती आहे साहेब चौकशी करुन त्या मक्तेदाराचा सोक्षमोक्ष लावावा लगेच. म्हणजे रद्दच करावा लागेल ते. तीन एस.आय. लोकांनी त्याच्या फोरमध्ये दिलेले आहे. एक एस.आय. तर माझ्या वार्डाचाच आहे. मी त्याला विचारले, आपल्या भागात समाधानकारक आहे का? कारण मी रोज मॉर्निंग वॉकला जातो. मला महिला सांगतात की, साफसफाई झालेली नाही संडाशींची. सकाळी रोज ६.०० ला फोन लावतो मी रोज. त्याला फोन लावुन विचारले तर म्हणे, नाही, काही समाधानकारक नाही. आणि रिपोर्ट पाठवितो, समाधानकारक आहे तर ह्या चुकीच्या गोष्टी आहे. म्हणजे ६ लाख रुपये आपल्याकडुन घ्यायचे आणि आपली ग्रँडमध्ये बाधा आणायच्या. आणि आपल्या शहराचा नाव खराब होत आहे त्या ठिकाणी, जे मार्क कमी पडतात. हा एक विषय होता. दुसरा विषय होता रस्त्यांचा.आता हे जे रस्ते चालु आहे आपले सोनवणी साहेब, राष्ट्रवादी कॉंग्रेसचा अधिकृत उमेदवार, अभिषेक शांताराम पाटील,त्यांनी मक्ता घेतलेला आहे आणि मी त्यांच्या मागे लागुन लागुन आता जुन महिना आला, आणि रस्त्याचे कामे पहा, तोडुन तोडुन रस्त्याचे कामे करतो आहे. सल्लग काम केल्याने रस्त्याची मजबुती राहते की, तोडल्याने राहते. ते मोजा, आम्हाला हे पण समजले आहे की, तुम्ही जो पर्यंत आहे तोपर्यंत ते बिल तुमच्याकडे येणार नाही. परंतु याच्यानंतरही आपल्याला असाच अधिकारी या ठिकाणी बसवावा लागणार आहे. म्हणजे मुद्दाम येऊ द्यायच नाही आणि ६ इंच पेक्षा कमी त्या ठिकाणी टाकायचा. मला वाटत आपला स्वातंत्र चौकाचा जो रोड आहे त्याची क्वॉलिटी पहा. सारखच इस्टीमेट, ते लोकं कसे हे लोकं कसे. असा प्रकार जर होत असेल आणि वारंवार सांगितल्यानंतर जर कधी त्या लोकांना जर वैठीस धरले जात नसेल तर ते सहन होणार नाही. तुम्ही व्यवस्थितपणे तुम्ही रिमार्क मारुन द्या. त्या ठिकाणी मोजमाप कस करायचा आणि काय. तिसरा विषय ७ व्या वेतन आयोगाचा आहे मॅडम, आता ७ व्या वेतन आयोगाचे साहेबांनी १९/०४/२०२२ रोजी मंजुरी दिली. आपला ठराव तर आगोदरच केलेला होता. आणि १२/०५/२०२२ ला त्याच्यावरती समित्या नेमल्या गेल्या आहे. डिपार्टमेंट वाईस, त्या डिपार्टमेंटनी अजुनही काही कामाची सुरुवात केलेली नाही. म्हणजे आरोग्यचे डिपार्टमेंट असेल, बांधकामचे कर्मचारी असतील. असे प्रत्येकाची समिती आहे नेमलेली तर त्यांना कामे सुरु करायला लावा. जमल तर सगळयांना वेतन आयोग लागु करा. जर प्रशासनाला शक्य होत नसेल तर जे पात्र आहे. त्यांना लागु करुन मोकळे व्हा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, आता शिवाजी नगर उड्डाणपुल हा सार्वजनिक बांधकाम अकत्यारीत येतो पण महानगरपालिका म्हणुन त्याच्यावर आपली जबाबदारी काय ? हे शहर अभियंत्यांनी मला सांगाव. त्याच्यात काय झालेले आहे आता वेळोवेळी नागरीक म्हणुन किंवा सामाजिक कार्यकर्ते हा रोड चालु करा तो रोड चालु करा. वेळोवेळी पत्र व्यवहार करतात कलेक्टरला. आता शिवाजी नगर उड्डाणपुलाच्या खालचा भाग चालु केला, त्याचा पाईप लाईनचे काम बाकी होते. वापस खोदुन ठेवला, जसे पतरे हनुमानचा जो रोड चालु केला तो परत खोदणे पडला. म्हणजे वेळोवेळी खोदायचे वेळोवेळी नागरीकांना त्रास व्हायचा त्या बद्दल. आणि तो उड्डाणपुल ३ वर्ष झाले होतो आहे. मग अजुन ६ महिने का होत नाही पण व्यवस्थित काम, त्याच्या मध्ये स्क्रुटनी आहे मॅडम, अजुन पुलावर चढण्यासाठी जिना निघाला नाही,पुलावर लाईट व्यवस्था नाही. पुल ज्या ठिकाणी शिवाजीनगरला उतरतो, जो आव्हाणे कडुन येतो आणि शिवाजी नगर पुलाला जातो. ती वायरींग केलेला नाही. दोन्ही जड वाहने समोरासमोर आले तर तेथे ॲक्सीडंन्ट होण्याची संभावना आहे. आणि वरती पाऊसाचे सांडपाणी गळायला त्याला खाली जागा केलेली नाही. दुसरे जेव्हा ते रोड करणार खाली, शिवाजी नगर व इकडच्या पट्टयामध्ये तर सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन अजुन त्यांनी ठेकेदाराला पत्र दिलेले नाही की, तुम्ही रोड लवकरात लवकर चालु करा. वेळोवेळी खोदत राहता, त्याच्यावर लक्ष कोण देणार. म्हणजे प्रोसिजर कोण

करणार. मग आपले काय त्याच्यावर क्यॉपीसीटीवर आपण काय लक्ष ठेवणार. फक्त सार्वजनिक बांधकामवर डकलुन द्यायचे. पुल तयार झाला त्याच्यात काही त्रुट्या राहिल्या. त्याचे जबाबदार कोण राहणार. बरं पुल झाल्यावर त्याच्या दोन्ही साईडला पुलाच्या खालच्या बाजु पुर्ण रिकाम्या आहे. तेथे रिकामे लोकं बसतील रिकामे धंदे चालतील. त्याच पण तुम्ही काय करणार भविष्यात, त्याच्यावर प्रशासनाने उत्तर द्यावे बांधकाम विभागाने.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सदरचा विषय मुख्य तर आहे. त्याच्यातला आपला महत्वाचा रोल जो आहे. त्याच्यामध्ये ईलेक्ट्रीफिकेशनची जी जबाबदारी दिलेली आहे. विद्युत व्यवस्था करण्याची जबाबदारी ही महानगरपालिकेची आहे. त्या संदर्भात मला वाटते मनपा प्रशासनाने साधारणता ३०-३२ लाख रूपयाचे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. परंतु कुठल्या निधी मधुन ते काम करावे. त्याच्या संदर्भातला निर्णय अजुन झालेला नाही. त्याच्यावर निर्णय होणे तातडीने अपेक्षित आहे. साधारणता एक महिन्याच्या किंवा एक ते दिड महिन्याच्या कालावधीमध्ये तो पुल वाहतुकीसाठी सुरु होऊ शकेल. जर कधी त्याच्यावरती विद्युत व्यवस्था व्यवस्थित नसली,तर कदाचित मग त्याच्यातुन अपघात घडण्याच्या शक्यता सुध्दा वाढतील. त्या दृष्टीकोणातुन कुठल्या निधी मधुन ते काम प्रस्तावित करायचे. तो निर्णय लवकर होणे अपेक्षित आहे. तेवढी प्रशासनाने काळजीपुर्वक काळजी घ्यावी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आयुक्त महोदया, आता दिड कोटी रूपये महापालिकेने आता आपल्याला पत्र आलेला आहे. टी मार्गासाठी तेथील अतिक्रमण काढण्याचा पोल काढण्याचा व्यवस्था महापालिकेने करावी. आता ऑलरेडी दिड कोटी रूपये आपण दिलेलेच आहे. मग तेथील पोल शिफ्टींगचा आपला काय संबंध आला. एम.एस.ई.बी.ने टाकायचे ना.आता त्यांनी उत्तर काय दिले मला, शिवाजी नगरची जी शिव सॉ मिल आहे. त्या बाजुने आम्ही अंडरग्राऊंड टाकली, आमचे दिड कोटी तेथेच संपुन गेले, मग आता टी मार्गाचा जो प्रश्न उपस्थित होईल तेथे कोण पोल टाकीन. अंडरग्राऊंड लाईन कोण टाकीन हे प्रश्न मी आज रोजी एस.एस. पाटील साहेबांना विचारु ईच्छीतो, त्याच्यावर काय केले सांगा, कारण देखरेख त्यांची आहे, ते दिड कोटी आपले आहे मॅडम.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** या विषयाला मला म्हणायचे आहे. माझ्या वार्डामध्ये साफसफाई व्यवस्थीत होत नाही शौचालयाची, म्युनसिपल कॉलनी तेथे पण असच होत आहे. तेथे पण स्वच्छता होत नाही. मी पण त्याच्याशी सहमत आहे. दुसरा विषय मला, मध्यंतरी आपला दौरा झाला माझ्या प्रभागामध्ये, काव्यरत्नावली ते गिरणा टाकीच्या रस्ता येथे, तर जे खड्डे बुजविलेले आहे. आपण ठेकेदाराला काम दिलेले आहे, मंजुर झाले, वर्कऑर्डर मिळालेली आहे. पण काम का सुरु होत नाही. हा पहिला प्रश्न आणि जी डागडुगी केलेली आहे तुमच्या सुचनेप्रमाणे ती अत्यंत निकुष्ट दर्ज्याची आहे. म्हणजे तेथे असे वाटत पण नाही की, तेथे डागडुगी केलेली आहे. तर त्याच्यावर पण साहेबांना सांगुन ते व्यवस्थीत करावे. आणि आस्वाद चौक ते गिरणा टाकी, आज काल शाळा वगैरे पण सुरु होतील. त्याच्या अगोदर जर रस्ते बनले, तो पण रस्ता मंजुर झाला आहे पण तो ठेकेदार का करत नाही म्हणजे कारण जर कळले तर आम्हाला पुढच बोलता येईल. मंजुर झालेले काम का होत नाही, काय अडचणी आहेत. आणि तिसरा एक प्रश्न आहे की, दिलेले जे पत्र असतात त्याचे उत्तरे मिळत नाही. महिना महिना दिड दिड महिना होऊन गेलेला आहे. पत्रांचे उत्तरे अजुन पण मिळालेले नाही.

**श्री.चंद्रशेखर पाटील :-** महापौर महोदया, आपण दर तिसऱ्या दिवशी माझ्या प्रभागात असतात. आपण जात असतांना खोटे नगर असो, चंदु अण्णा नगर असो की, कचरा फॅक्टरी त्या ठिकाणी जातो. ४२ कोटीतुन आपली वर्क ऑर्डर निघाली, आपले पैसे देणे झाले, प्रमुख्याने प्रत्येक कामांमध्ये आपण सांगतो शहरातील मुख्य रस्ते होतील शहरातील मुख्य रस्ते होतील.पण अख्या जळगांवचा कचरा माझ्या प्रभागातुन जातो. तो पण मुख्य रस्ता आहे. आपण जाता, रोज बघत आहे अत्यंत वाईट परिस्थिती त्या ठिकाणी आहे. माझी एक विनंती आहे, सगळे रस्ते साईटला ठेवा पण तो रस्ता सुरु करा. जर तो रस्ता नाही झाला तर आम्ही त्या रस्त्यावर कचरा येणे-जाणे बंद करु. कारण अत्यंत वाईट परिस्थिती त्या ठिकाणी आहे. म्हणुन आपणास विनंती आहे ताई की, आपण ते खोटेनगरचा रस्ता पहिले घेतला पाहिजे. दुसरा विषय असा आहे की, मागच्या तिन महिन्यापासुन दुषीत पाणी पुरवठा होत आहे. आणि पाणी पुरवठा होत असतांना कधी काळया रंगाचे पाणी येते कधी हिरव्या रंगाचा पाणी येते. कधी पिवळया रंगाचे पाणी येते. मी पत्र ही दिले, त्याच्यावर कुठलीही ॲक्शन झाली नाही. आज लोकं म्हणायला लागले, पाणी रे पाणी तेरा रंग कैसा महानगरपालिकेने भेजा वैसा. अत्यंत वाईट परिस्थिती आहे महापौरताई आपण काही निर्णय घेतला पाहिजे. आता आपण उन्हाळा पास करत आहे. परवा येणारा पाऊसाळा आहे. अत्यंत वाईट परिस्थिती राहणार आहे रोगराई वाढणार आहे. इतके नियंत्रण आज आपल्या प्रशासनाकडे नाही. त्यामुळे आपल्याला विनंती असेल की, महासभेच्या माध्यमातुन आपण तातडीने निर्णय घेणे गरजेचे आहे.

तिसरा विषय असा आहे की, बांधकाम विभागाकडुन मागच्या डिसेंबरपासुन माझ्या प्रभागाचे टेन्डर चालु आहे. डिसेंबर झाला, जानेवारी झाला, फेब्रुवारी मार्च झाला, सहा सहा महिने जर टेन्डर प्रोसेसला लागत असतील. तरी कामे कसे काय होतील. आपण एकमेकांचे, आमदारांचे पाया पडतो, निधी आणतो, पालकमंत्र्यांचे पाया पडतो, निधी आणतो, निधी आपण सगळे लोकप्रतिनिधी आणत असतांना जर प्रशासनाच्या छोटया छोटया चुकांमुळे जर सहा सहा महिने वेळ लागत असेल. मला वाटते तुमच्यासोबत माझे दुरदैव आणि सगळया सभागृहाचे दुरदैव आहे. आपण सगळे सभागृहाने हा निर्णय घेतला पाहिजे की, एक कुठलीतरी सिस्टीम ठरविली पाहिजे की, एक महिन्यात दोन महिन्यात वर्कऑर्डर निघाली पाहिजे. वर्कऑर्डर आपण काढतो आज आणि एक महिन्यात काम झाले पाहिजे. ते काम एक महिन्यात कुठपर्यंत शक्य होईल.तुम्ही डिसेंबर पासुन वर्कऑर्डर काढत नाही. एप्रिल मध्ये वर्कऑर्डर काढता आणि म्हणता मे मध्ये काम पुर्ण करा, त्या कामाची क्वालिटी काय राहिन. तरी आपल्याला विनंती असेल की, या संदर्भात सुध्दा महासभेने काही तरी धोरण ठरविले पाहिजे. आपण जर आजच हे धोरण ठरविले तर पुढच्या एक वर्षाने इलेक्शन समोर येत आहे. तर लोकांना आपल्याकडे जायला त्या वेळेस खुप अडचणी येतील. तर प्रशासनामुळे आपले नुकसान होईल. कृपया आपण याच्याकडे लक्ष दिले पाहिजे. धन्यवाद.

**सौ.कांचन सोनवणे :-** माझ्या प्रभागात अन्याय होत आहे. तसे काम होत नसेल आमच्या प्रभागात तर आमच्या प्रभागाला ग्रामीण भाग घोषित करुन द्यावा. आमच्या प्रभागाला निधी मिळत नाही ताई. आम्हाला का मिळत नाही ताई. आमचा हक्काचा ठक्कर आप्पा याजनेचा निधीही आम्हाला मिळत नाही. आमच्या इतर नगरसेवकांना मिळतो आणि आम्हालाच का मिळत नाही. असा दुजाभाव का केला जात आहे.

**मा.महापौर :-** प्रभाग क्र.२ ला मंजुर आहेत ना कामे.

**सौ.कांचन सोनवणे :-** हो. पण आमच्या प्रभागाला काहीच नाही ना ताई. आमच्या आदिवासी समाज प्रभागाला नाही ताई. किती कामे चालु आहे १० कोटीचे सद्या ते, योगेश बोरोले साहेब असतील तर बोलवा त्यांना,

**श्री.विश्वनाथ खडके :-** ताई थोडे प्रायरीटीने करायला सांगा.

**मा.महापौर :-** बरं, ठिक आहे.

**सौ.सरिता नेरकर :-** मी गेली, तर त्या घरामध्ये पाणी गेलेला आहे. आणि ते पाणी बंद केले. तर इकडे शेतकरी मधुकर पंडीत चौधरी त्यांनी माझ्या घरी येऊन सांगितले की, जर माझ्या शेतामध्ये हे पाणी उतरविले गेले असेल तर मी सुध्दा जे.सी.बी. आणुन तुमच्या घरामध्ये पाणी उतरवेल. अशी मला धमकी दिलेली आहे. काल पण आम्ही झगडले आजही, अक्षरश: ते गटारी बंद झालेल्या आहेत. आणि मी जेव्हा फोन केले एस.आय.ला की, हे करा. तर त्यांनी सांगितले, नाला स्केलेटर मशिन काय असतो ते तिन महिन्यापासुन बंद आहे. ते चालुच नाही. ते येत नाही. बंद आहे बंद आहे असे सांगतात. अक्षरश: मी खाजगी लोकं लावुन मी तो नाला साफसफाई केलेली आहे. तीन महिन्यापासुन ते मशीन बंद आहे.

**ॲड.दिलीप पोकळे :-** त्या विषयाला धरुनच माझी मागणी आहे की, मागच्या महासभेमध्ये लाईट विभाग १४ व्या मजल्यावर आणायचा आपला ठराव पारित झालेला होता. त्याच्यावर प्रशासनाने काय कार्यवाही केली. कारण ते लाईट विभाग तिकडे असुन १०-२० कि.मी. दुर. त्यांना असे वाटते की, आम्ही स्वतंत्र आहे. आम्ही कोणाचे ऐकुन नाही घ्यायचे. जर ते मुख्य ईमारतीमध्ये येथे आले तर त्या लोकांकडुन आपल्याला इफेक्टीव्हली काम करता येईल. आणखी प्रशासनाने हे ही सांगायचे की, लाईट विभागाला १७ मजली मध्ये आणण्यासाठी काय कार्यवाही केली.

**श्री.मयुर कापसे :-** आपण बघतो आहे की, जवळ जवळ साधारण एक ते दिड महिन्या आगोदर भोईटे रेल्वे गेट जवळ उड्डाणपुल होत आहे. त्याचे भुमिपुजन त्या ठिकाणी झालेला आहे आणि फक्त भुमिपुजन होऊन नाही. तुम्ही फेडरेशनकडे सुध्दा आणि भोईटे नगरकडुन सुध्दा उड्डाणपुलाचे काम चालु झालेले आहे. पण त्याच्यामध्ये जो सगळयात पार्टचा विषय आहे पिंप्राळा आर्मचा, त्या आर्मसाठी ताई आम्ही इतके भांडण केलेले आहे. जेव्हा ते पहिले रेल्वे अधिकाऱ्यांनी जी डिझाईन बनविलेली होती. त्या रेल्वे अधिकारीने त्यात आर्म टाकला नव्हता. आम्ही भुसावळला मिटींग घेवुन सुधारीत आराखडा बनवुन तेथे आर्म दाखविलेला आहे. पण सगळयात महत्वाच्या मुद्दयाचा विषय हा आहे की, आपण जे भुसंपादन करायचे आहे त्यांनी ते नगरपालिकेवर सोपविलेली आहे. ताई जवळजवळ पिंप्राळा उपनगर आज दिड ते दोन लाख नागरीकांचा महत्वाचा विषय आहे. महापालिका प्रशासनाने आतापर्यंत त्याच्यावर काय कार्यवाही केली.एकदा जर ताई काम झालं, कॉन्ट्रॅक्टर बाहेरगावाचा आहे असे मला माझ्या माहितीनुसार मला वाटते, तो जर बाहेर निघुन गेला काम करून तर ते आर्म बनवायला आपल्याला खुप

अडचण येईल. आणि पाणी पाऊसाचे आपण बघतो की, दोन पुल आहे. एक बजरंग बोगद्याच्या बाजुला आपण जे नविन तयार केलेला आहे. पाणी पाऊसात जवळ जवळ पुर्ण माणुस बुडुन जाईन अशी परिस्थिती असते. अश्या वेळेस पिंप्राळा उपनगरचे त्या नागरीकांनी वापरायचे कुठुन. हा मोठा प्रश्न या ठिकाणी उपस्थित होत आहे. माझी आपल्याला इतकीच कडकडीची विनंती आहे की, लवकरात लवकर हा विषय लक्ष घालुन तुम्ही मार्गी लावा. आयुक्त मॅडम व महापौर मॅडमांनी दोघांनी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परिस्थिती काय आहे. ती थोडीशी मा.आयुक्त महोदयांनी सभागृहाला अवगत करावी. कारण तो तातडीने भुसंपादनाचा विषय मार्गी लागणे अत्यंत गरजेचे आहे. नेमके त्यात काय स्टेटस आहे त्याच्या संदर्भातली सभागृहाला माहिती द्यावी.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** आपल्या प्रभागाला आणि माझ्या प्रभागाला ईच्छा देवी ते डि-मार्ट पर्यंतचा रस्ता त्याला आपण काही तरी स्टेटमेंट दिलेले की ते केंद्र शासनाकडुन बनेल, मग तो पर्यंत काय, आज तर त्याच्यावर माणसाला सुध्दा चालता येत नाही वाहनाची गोष्ट तर वेगळीच राहिल.त्याचा खुलासा केला तर बरं होईल.केंद्र शासनाने जरी करायचे म्हटले तर किती दिवस लागतील.या प्रोसिजरला वर्षभर लागेल तो पर्यंत तो रस्ता तसाच राहिल का ? महापालिकेचे काही कर्तव्य आहे की नाही त्या ठिकाणी डागडुगी करायचे वगैरे.

**मा.महापौर :-** ईच्छा देवी ते डि-मार्ट पर्यंत त्यांच्याकडे वर्ग केल्यामुळे ती त्यांची जबाबदारी आहे. परंतु त्यावर आपल्याला मान्यतेची ही जी प्रोसेस आहे ती लाँग प्रोसेस आहे.पण त्याच्या आधी महापालिकेने त्याची डागडुगी किंवा पॅचींग करावा कारण भरपुर खराब झालेला आहे तो रस्ता. आपण घ्यायचा आणि डागडुगी करायची.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** धन्यवाद दुसरा आता प्रशासनानेच डिक्लेअर केले की, २५ हजार कनेक्शन बाकी आहे द्यायचे. त्याचे काय ? कधी होणार ४ वर्ष झाले अमृतचे काम सुरु व्हायला, कधी होणार ते कनेक्शन कधी देणार.

**मा.महापौर :-** सद्या कनेक्शन देण्याचे काम सुरु आहे पण ४२ कोटीतले मनपाचे जे मुख्य रस्ते मंजुर झालेले आहे. त्या रस्त्यांना प्राधान्य देऊन पहिले अमृतचे कनेक्शन आपण करुन घेत आहोत. पण बऱ्यापैकी कनेक्शन हे झालेले आहे. काही ऐरिया असे असतील, जसे आपला तांबापुरचा भाग असेल, काही हुडकोचा भाग असेल असे काही ठराविक भाग सोडले, काही वाढीव भाग सोडले तर मला वाटते, ८०% काम हे पुर्ण झालेले आहे.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** चुकीची माहिती आहे मॅडम आपली, माझ्या घराच्या मागचा भाग, पुर्ण हे झाले, ड्रेनेज, सर्व झाले, अजुन त्याला कनेक्शन दिले नाही. अजुनपर्यंत तिन इंजिनिअर बदल झाले, मी त्यांना सांगुन थकलो, ते काम घेणारे अमृतचे जे काम घेतात. जैन ब्रदर्सवाले त्यांना सुध्दा मी चार वेळा बोललो, परंतु अद्यापपर्यंत ते काम झाले नाही. काय कारण आहे, सुधार होते आहे का ? असे मला वाटत आहे. तेथे अजुन टी.पी.एस. सुध्दा नाही.

**मा.महापौर :-** जे काही शहरातील ऐरिया बाकी असेल त्याचा अहवाल सादर करा आणि ते लवकर होतील या बाबतचे निर्देश अमृतवाल्यांना तात्काळ द्या आणि कामे लवकर होतील या दृष्टीने बघा.

**श्री.सदाशिव ढेकळे :-** तिसरा विषय आपण परवानगी देतो लोकांना, शहरातील लोकांना बांधकाम करण्यासाठी बांधकाम परवानगी देतो. त्याचे जे चार्जेस असतात. डेव्हलप्मेंट चार्ज जे काही चार्ज असतील. ते घेतो. कालंतराने एखाद्याने आपली बिल्डींग पाडुन पुन्हा आपल्याला बांधण्याची परवानगी मागीतली, त्याला पुन्हा बेटरमेंट, डेव्हलप्मेंट चार्ज घेता का ? असे परत परत घेऊ नये असे माझे मत आहे. मला प्रशासनाने असे उत्तर दिले आहे पध्दतशीर पण ते योग्य वाटत नाही. आपण याचा खुलासा परत करावा. कायदा आणि हे असे माझ्या माहिती प्रमाणे एक वेळा बेटरमेंट डेव्हलप्मेंट चार्ज दिला तर परत परत घेऊ नये असा माझा समज आहे. याच्यावर खुलासा करावा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, प्रभाग क्र.१४ मध्ये डि-मार्ट पासुन ते आदित्य चौक पर्यंतचा जो रस्ता आहे. आपले २५ कोटी जो निधी शिल्लक होता, २५ कोटी पैकी ५ कोटी जो शिल्लक निधी होता. त्यातुन हा रस्ता बनविण्याचा ठराव मंजुर झालेला आहे. परंतु तो रस्ता फक्त डि-मार्ट पासुन ते मेहरुणच्या स्मशानभुमीपर्यंत करण्यात आलेला आहे. त्याच्या पुढचे काम अजुन ही करण्यात आलेला नाही. आणि हा रस्ता जळगांव शहरातुन म्हणजे ग्रामीण मधुन जे लोकं येतात. मार्केटमध्ये जाणारे लोक, औद्यगीक वसाहत मध्ये जाणारे लोक यांच्यासाठी खुप महत्वाचा रस्ता आहे. या रस्त्यावर खुप वरदळ असते, मागच्या वर्षी पाऊसाळयात खुप अपघात झाले. परंतु त्या रस्त्यावरची जी कामे होतील, अमृतच्या माध्यमातुन अंडरग्राऊंडचे असेल, पिण्याच्या पाण्याच्या पाईप

लाईनचे असेल, मी वेळोवेळी कर्मचाऱ्यांच्या अधिकाऱ्यांच्या मागे लागुन ती कामे पुर्ण करुन घेतलेली आहे. परंतु अजुन ही अर्ध रस्ता बाकी आहे. त्याचे कारण काय ? स्मशानभुमी ते आदित्य चौक.

**मा.महापौर :-** ते तर मंजुर झालेला आहे ना.

**श्री.राजेंद्र पाटील :-** पण काम नाही झाले आहे ना.

**मा.महापौर :-** काम बाकी आहे.

**श्री.राजेंद्र पाटील :-** ते मंजुर तर आपण ५ कोटीच्या निधीतुन केलेले होते.

**श्री.सुनिल महाजन :-** प्रोसेस मध्ये आहे ते, स्मशानभुमी ते अदित्य चौक,

**श्री.राजेंद्र पाटील :-** भाऊ, आता पाऊसाळा लागुन जाईन काम होणार नाही.

**श्री.सुनिल महाजन :-** पाऊसाळयानंतरच होईल ते,

**श्री.राजेंद्र पाटील :-** पाऊसाळयात इतके अपघात होता तेथे, सगळयात वाईट परिस्थिती आमच्या प्रभागातल्या त्या रस्त्याची आहे. आणि तसे दादाने जो विषय मांडला, आपले ईच्छादेवी ते डि-मार्ट, आपले समांतर रस्त्यांची जी अवस्था झालेली आहे. महापालिका सार्वजनिक बांधकाम, तशी अवस्था या रस्त्याची होऊ नये. जळगांव शहरातील सर्वात खराब रस्ता मला वाटतो हाच डि-मार्ट ते ईच्छादेवी चौक आहे. तो आपल्या ही प्रभागाला लागुन आहे माझ्याही प्रभागाला लागुन आहे. तो लवकरात लवकर झाला पाहिजे. त्याच्यासाठी आपल्याकडुन काही तरी महापालिकेने आता, शासनाकडे जरी आपण बी ॲण्ड सी कडे वर्ग केला, तरी त्याचे काम ताबडतोप होणार नाही. त्याची प्रक्रिया आता आपणच सांगितली की, त्याला बराच वेळ लागणार आहे. त्यासाठी आपण त्याला डागडुगी तरी केली पाहिजे.

**मा.महापौर :-** डागडुगीचे निर्देश दिले मी त्यासंदर्भात.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** महापौरताई, आपले अभिनंदन आपली नियुक्ती महापालिकेमध्ये आयुक्त म्हणुन झाली आणि आपण ग.स.सोसायटी मध्ये स्विकृत सदस्य म्हणुन गेले, महापौरताई आपण एम.ए.सी.बी.ला लेटर दिले होते माझ्या वार्डात, स्थलांतरीत तेथे पोल आहे, म्हणजे अमृत वाल्यांना ४ महिने झाले कामे सुरु व्हायला, ४ महिन्यानंतर त्यांना जाग येते की, आम्हाला टेस्टींग करायची आणि आपल्याला काम थांबवावे लागले. आता कामे थांबविली. आपण त्यांना लेटरपण दिले. आयुक्त साहेबांनी पण दिले तुम्ही पण दिले परंतु तो जो पोल आहे न परवानगी घेता आपली महापालिकेची संमतीने आपला जो वार्ड आहे. त्याच्यामध्ये त्यानी टाकलेले आहे. आता ते एकच व्हालमुळे आपले सर्व वार्ड क्र.१८ ची कामे रखडलेली आहे. आता १ तारखेपासुन आपण कामे बंद करणार आहे. आता ते रस्ते आर्धवट पडतील. अमृतची जी टेस्टींग आहे ती पण बाकी आहे. आता जे आर्धे रस्ते झालेले आहे, ४ महिन्यानंतर ठेकेदाराला दिले तर मला परवडणार नाही आणि नविन जर मागीतले, तर याची भरपाई कोण करणार आहे. अमृतवाल्यांना काम सुरु झाल्याच्या ४ महिनेनंतर जाग येते. आपण का त्यांना वर्कऑर्डर दिलेली आहे. काम लवकर करायला पाहिजे. म्हणजे ३-४ कोटी आपले वाया जातील. नविन आपण जर दर मागीतले, ४२ कोटीमध्ये ज्यांचे झाले, ठेकेदार आपल्याला नविन दर मागत आहे, ३ कोटी आपण त्याला नविन दराने देण्याच्या येच्यात आहे. म्हणजे ऐवढच नाही संपुर्ण शहरात अशीच परिस्थिती आहे. आपण त्याच्या थांबविलेली कामे आहे त्याची भरपाई कोणाकडुन घेणार. ठेकेदाराकडुन वसुल करणार आहेत का ? आपले पत्र देऊन सुध्दा एम.ई.सी.बी. ऐकत नाही म्हणजे मी स्वत: फॉलोअप घेतला, दोघी अभियंत्यांना फोन लावले, उद्या करतो परवा करतो, त्यानी तारीख पण दिली की, सोमवारी करतो, सोमवारी त्याला फोन लावले तर असे करतो तसे करतो चालु आहे. ठेकेदाराने तेथे पाठविले, पोल नाही, ठेकेदाराचे माणसे परत गेले, म्हणजे ऐवढी मनमानी चालु आहे. पाटील साहेब काही फॉलोअप घेतला का ? मुंडया हलावुन चालणार नाही ना. एक कामामुळे माझे दिड कोटीचे कामे अटकलेले आहे. अर्धवट रस्ते झाले आहे मॅडम.आपणच उटघाटन केलेले आहे ते. तुम्ही ठेकेदारावर कार्यवाही करणार आहे की, एम.ए.सी.बी.वर कार्यवाही करणार आहे. हे सांगा मला, नुकसान झाल्यावर कोण करणार आहे. फक्त दोन पोलसाठी माझे सगळे कामे अडकलेले आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** पाटील साहेब, काय विषय आहे.

**सौ. रंजना सोनार :-** माझ्या प्रभागात ताई, हनुमान नगर, रोहित नगर, सदगुरु नगर या मध्ये खुप घाण पाणी येत आहे. त्या पाण्यामध्ये अगदी शेवाळ दिसत आहे. सगळे १०-१०, १५-१५ बायका माझ्या घरी सॅम्पल घेऊन येतात आणि दाखविता आपल्याला ते. मग ते सांगत आहे की, पुन्हा पाऊसाळा चालु होत आहे. आताच जर असे पाणी आहे तर पाऊसाळयात कसे येईल. ताई ते बघा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, सन्मा.सदस्य, त्यावेळेला महानगरपालिकेच्या कुठल्याच बाबीचा विचार करत नाही. पाईप लाईन झालेली आहे त्या पाईपलाईनवर व्हॉल आहे आणि त्या व्हॉलवरती ईलेक्ट्रीकचा ११ के.व्ही. लाईनींगच कनेक्शन करण्यात आले आहे. आता मला सांगा त्याची टेस्टींग करायची आहे. मक्तेदार तेथे खोदकाम करु शकत नाही कारण ईलेक्टीक पोल तेथे आलेला आहे. आणि ज्या वेळेला अशी परिस्थिती येते. आणि हे विद्युत पोल पुन्हा स्थलांतरीत करायचे आहे तर महावितरण म्हणते की, महानगरपालिकेने त्याची रितसर डिमांड नोट भरावी. म्हणजे नियोजन करतांना महावितरण कंपनी महानगरपालिकेला कुठेच विश्वासात घेत नाही. आणि त्याचा कालांतराने भुर्दंड जो आहे तो महानगरपालिकेवर पडत असतो. या संदर्भात महावितरण कंपनीला अनेक वेळा सुचना देऊन पत्र व्यवहार सुध्दा झालेले आहे. परंतु महावितरणच्या कार्यपध्दती मध्ये कुठलाच फरक दिसुन येत नाही. तर याच्या संदर्भात कुठेतरी हा विषय गांभिर्याने घेणे गरजेचे आहे. याच्यामध्ये महानगरपालिकेच आर्थिक नुकसानही होते. रस्त्यात पोल आल्यामुळे अपघाताची धोकेही समोर येतात. तर या अनुषंगाने आपण काय करणार.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** अजुन ते पोल जर पडलं तर अजुन काही नुकसान होईल ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जिवीत हानी ही होऊ शकते ना. तर कायमस्वरुपी काही तरी तोडगा काढण्यात आला पाहिजे.किंवा महावितरण कंपनीला स्पष्टपणे असे निर्देश द्या की, महानगरपालिकेच्या अभियंत्याची एन.ओ.सी.(NOC) जो पर्यंत आपल्याला प्राप्त होत नाही. कारण काय होतो कालांतराने आपले रस्ते रुंदीकरण करण्याच्या संदर्भात आपण भुमिका ज्या वेळेला घेतो, तर यांनी उभारलेले पोल भर रस्त्यामध्ये येतात. आणि रुंदीकरण करण्याच्या वेळेला ते पोल शिफ्टींच्या प्रसंग येतो, त्यावेळेला त्यांची डिमांड नोट आपल्याला भरावी लागते. तर या संदर्भात काही तरी एक कायमस्वरुपी उपाययोजना निश्चित करणे गरजेचे आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** महापौरताई, शासनाचा एक जी.आर. आहे की, मला वाटते ते महापौर कार्यालयाचे पटवे साहेबांकडे सापडेल. तर तो जी.आर.च्या आधारे पालकमंत्र्यांच्या मंजुरीने एक महानगरपालिकेच्या आणि एम.ए.सी.बी.ची समिती गठीत करायची आहे. त्याच्यामध्ये १० नगरसेवक प्रत्येक प्रभागाचे प्रभाग अधिकारी, आयुक्त, उपायुक्त आणि त्या शासनाच्या जी.आर. प्रमाणे दर तीन महिन्याला त्याची बैठक घ्यायची आहे आणि हे प्रश्न जे काही शहराचे आहे ते सोडवायचे आहे तर माझी सभागृहाला विनंती आहे की, पुढच्या महासभेपर्यंत ही समिती स्थापन केली तर एम.ए.सी.बी. आणि शहरातील विषय मार्गी लागतील.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** महामार्गामध्ये आपल्या २.७२ कोटी चे टेन्डर होते. एल.ई.डी.लावायचे ते अजुन पर्यंत एल.ई.डी.चा प्रोसिजर, वर्कऑर्डर दिलेली आहे पण काम का चालु झालं नाही. माझ्या माहितीनुसार सार्वजनिक बांधकामवाले असे म्हणतात तुम्ही दोघी साईडला पोल टाकायला पाहिजे होते. डिव्हायडर टाकल्यामुळे ते आम्ही होऊ देणार नाही. त्या ठेकेदाराने जर दोघी साईटला टाकले तर त्याचा खर्च वाढेल. तर कुठपर्यंत चालणार आहे असे.

**मा.महापौर :-** नाही आपण महापालिकेने ठेकेदाराला पत्र दिलेले आहे. तसे आपण डिव्हायडरलाच पोल लावणार आहोत. तशी एन.ओ.सी. आपण त्यांना दिलेली आहे. फक्त फाऊंडेशनचे काम सद्या तेथे सुरु आहे. फाऊंडेशन झाल्यानंतर २-४ जुन पर्यंत ते पोल लावले जाणार आहे.

**श्री.महेश चौधरी :-** आयुक्त मॅडम आपल ही अभिनंदन करतो की, एक डॉक्टर म्हणुन आयुक्त आपल्याला मिळाले. त्याचा सर्वात जास्त आनंद आहे. आनंद व्यक्त करतांना मी आपल्याकडुन अपेक्षा ही व्यक्त करेल. आता गोराणे साहेबांकडे दवाखाने विभाग दिला आहे. आपण नक्कीच सर्व जण दवाखाने विभागाकडे चांगले लक्ष द्याल अशी अपेक्षा व्यक्त करतो. आता पाऊसाळा सुरु होणार साथीच्या आजारांची परत येण्याची शक्यता आहे. आपण सातीच्या आजारासंदर्भात काय उपाययोजना कराल याच्या संदर्भात पण मला माहिती हवी आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** सुनिल गोराणे साहेब आलेले आहे तेथे म्हणजे चांगलच काम होईल. आणि दवाखाने विभागासाठी आपले सभागृहाची चिंता संपलेली आहे गोराणे साहेब आहे त्यामुळे आपण रिलॅक्स आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** आणि ते मागे लागले पण आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** रिझल्ट चांगला मिळेल.

**श्री.महेश चौधरी :-** चांगला मिळेल अपेक्षित आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आणि ते शिवाजी नगरच प्रस्तुतीगृह चालु करा पहिले.

**श्री.महेश चौधरी :-** आणि जळगांव शहरामध्ये कमीतकमी दोन प्रस्तुतीगृह चालु व्हायला पाहिजे. अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. दुषीत पाण्याचा विषय आहे तो पण खुप गंभिर आहे. दुषीत पाण्यावर पण आपण गांभिर्याने विचार करावा.

**मा.महापौर :-** आता शिवाजीनगरचे प्रस्तुतीगृह सुरु होईल पहिले. आता प्रक्रिया सुरु झालेली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** बिल्कुल १००% होणार.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** सर्व प्रथम साहेबांचे अभिनंदन करायला पाहिजे. गोराणे साहबांचे ही अभिनंदन करतो. महिन्या भरापुर्वी मी आपल्याकडे २-३ पत्र दिलेले होते. त्याच्यापैकी एक पत्र आहे बेसमेंट विषयी कारवाई करण्याच्या संदर्भात महानगरपालिकेमध्ये भरपुर मिटींग झाल्या. त्याच्यानंतर त्याची सुनावणी झाली. आदेश देण्यात आले पण कार्यवाही अजुन करण्यात आलेली नाही. या ठिकाणी मी जी माहिती घेतली. या ठिकाणी बेसमेंटची यादी करतांना आपल्या संबंधीत विभागाने कुठल्याही प्रकारचा कॅव्हेट कोर्टात दाखल केलेले नाही. या गोष्टीचा फायदा घेऊन संबंधीत व्यक्ती कोर्टात जाऊन काही प्रकारचे त्यांनी स्टे मिळविलेले आहे. या बाबीमध्ये जे ही अधिकारी कर्मचारी ज्यांचा निष्काळजीपणा झाला असेल. त्यांच्यावर महानगरपालिका प्रशासनातर्फे कार्यवाही करण्याचे मी एक पत्र दिलेले आहे. आणि मी जी भुमिका घेतली जसा मी होता, वकील पॅनलची नियुक्ती, जेव्हा मी होतो मी पत्र दिलेले होते. ॲड.आनंद मुजुमदार यांची महासभेत बेकायदेशीर नियुक्ती झालेली आहे. आयुक्त साहेबांना जेव्हा मी भेटलो होतो कुलकर्णी साहेबांना, त्यांनी मला सांगितले की, कॅटेगीरी आहे. कॅटेगीरीचे धोरण किंवा एक वर्षाची मुदत यापैकी जो पहिले येईल तोपर्यंत त्यांना मुदतवाढ देण्यात येईल. मागच्या ५ ते ६ महिने झाले स्टँडींगचे सर्व विषय महासभेच्या पटलावर आणत असतांना वकील पॅनलचा किंवा प्रमुख विधी सल्लागारचा विषय आपल्या पटलावर का आला नाही. त्याच्या संदर्भात माहिती देण्यात यावी. तिसरा विषय महत्वाचा प्रभाग क्र. १ मध्ये सफाई कामगारांचा जे काही हाल आहे नागरीकांच्या समस्यापोटी गटारींचे आहे. प्रभाग क्र.१ मध्ये ४० कर्मचारी आहेत. गटार कामगारांचे प्रॉब्लम जो आहे. फक्त २ ते ३, २ ते ३ हजर राहतात. प्रशासनाला हे विचारायचे आहे की, या संदर्भात काय उपाययोजना करणार आहेत. या भागाबद्दल आपण काय करणार आहोत. आपण महानगरपालिकेचे जे ४०० कर्मचारी, ४०० कर्मचारी ठेकेदाराचे याची जर तुलना केली तर साधारणता ठेकेदाराला आपण ८०-९० लाख रुपये महिना देतो. महानगरपालिकेचे कायम कर्मचाऱ्यांचा पगार, महानगरपालिकेचे कर्मचाऱ्यांचा पगार ८०-९० लाख आहे. आणि हे जे कर्मचारी आहे ठेक्यावर घेतलेले त्यांचाच पगार ६०-६५ लाख होत आहे. मग महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना आपण पगार का देतो आहे. ८०-९० लाख रुपये ४०० कर्मचाऱ्यांवर खर्च करुन आणि सफाई कर्मचारी जे ठेक्याने घेतलेले आहे ते साफसफाई करतात, हे लोकं हजर नाही राहतात कायम कर्मचारी, या तिन मुद्दयांवर मला सभागृहाकडुन उत्तर पाहिजे.

**श्री.सुरेश सोनवणे :-** ताई अक्षरश: गटार मध्ये सडुन गेलेले आहे पडुन, आणि ५० पोल आहे ना ते गटार मध्ये सडुन गेलेले आहे की, जेव्हा वारावादळ आला ना ते केव्हा पडुन जातील ते सांगता येत नाही. कुलभुषणभाऊ पण २-३ वेळा बघुन आले. आणि दुसरा विषय असा आहे ताई. पिंप्राळा वार्ड क्र.१० मध्ये जो हुडको परिसर आहे त्या रोडाचे नळ हे अनाधिकृत असल्यामुळे त्यांना नळ कनेक्शन पण देता येत नाही. नळ तर अधिकृत आहे ना मग नळ कनेक्शन का देता येत नाही त्यांना. अमृतचे नळ देता येत नाही त्यांना.

**मा.महापौर :-** त्यांच्याकडे नळपट्टी पावती वगैरे किंवा ते दिलेले गेलेले नाही.

**श्री.सुरेश सोनवणे :-** त्यांच्याकडे आलेच नाही नळ, हे नगरपालिकेचे कर्मचारी त्यांच्याकडे आलेच नाही पावती घेऊन तर कोणत्या बेसवर भरतील ते. अधिकृत आहे ना मॅडम ते, आपण ज्यावेळेस तेथे इतरांना दिले, तर ते अधिकृत झाले ना. पिंप्राळा घरकुल आहे, शिवाजी नगर आहे, त्यांना पण कनेक्शन देण्यात यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्यांच्याकडे कनेक्शन आहे पण अधिकृत रित्या त्यांच्याकडे कुठल्याच पावत्या नाही. मग त्यांना नविन कनेक्शन प्रोव्हाईड करण्याच्या दृष्टीकोणातुन जे आपण २०००-२१०० रुपये घेतो आणि पाणीपट्टीचे स्लम आहे म्हणुन १००० रुपये घेतो, तर त्या रु.२००० च्या ऐवजी अश्या पध्दतीचा धोरण ठरवावे लागेल की, त्यांना सहज परवडेल अश्या पध्दतीने, तर त्या संदर्भात मी आपल्याशी चर्चाही केलेली होती. आपण म्हणाला होता की, त्यांना तसे एक धोरण ठरवुन त्यांना कश्या पध्दतीने दिलासा देता येईल. जेणे करुन आता ते अनाधिकृत रित्या वापरत आहे. कमीत कमी भविष्यात ते अधिकृत रित्या कनेक्शन घेऊन महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये ही भर पडेल. आणि त्या नागरीकांचा तो मार्गही मोकळा होईल.

**सौ.पार्वताबाई भिल :-** नळामध्ये जे पाणी असे दुषीत येत आहे. ते सगळयांनी आता येथे उपस्थित केले, ते असे टाक्या भरी भरीसन नागरीक दाखत आहे, आणि माझ्याकडे कमीत कमी ३० ते ४० महिला रोजच्या माझ्याकडे येत आहे. आणि जे ११.०० वाजता पाणी येत होते ते आता २.०० वाजता ३.०० वाजता येत आहे. आणि टाक्या पण भरल्या जात नाही. मी घडीघडी यांना फोन लावते तर काही काही दाखवल जात आहे त्याच्यात, अमृत योजना, मारुत्ती मंदीर भिलवाडा अमृत योजना जोडली पण तेथे अमृत योजनेचे पाईप टाकलेच नाही. बाकीचे पाणी बंद होऊन गेले, दोन सप्ताह झाले त्या लोकांना तसे, मी अमृतचे पाईप जोडायला लावले परत. तर ते टाकायला पाहिजे ते पाईप, अमृतचे पाईप नाही असे नाही तसे नाही. काही ऐवढया ठिकाणी अमृतच काम सोडुन दिलेले आहे. अजुन उडवाउडवीचे उत्तरे देतात. वार्डामध्ये मनमन तसा मटेरिअल पडलेल आहे. ट्रॅक्टरवाल्यांला फोन केला, साहेबांना फोन केला, माणसं नाही, टॅक्टर भरायला येत नाही. काय काय उत्तरे द्यायचे नागरीकांला,

**मा.महापौर :-** जळगांव शहरामध्ये बऱ्याच ठिकाणी असे घडलेले आहे. आणि प्रभाग क्र.११ मध्ये हे जास्ती प्रमाण दिसुन येत आहे. ते बघा तुम्ही. कारण कॉन्ट्रॅक्टर तेथुन मटेरिअल उचलत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** आपण द्या ना काय असेल उत्तर ते ?

**मा.आयुक्त :-** सगळया प्रश्नांचे उत्तरे एकाच वेळेला देते.

**मा.महापौर :-** थांबा सर्वांचे होऊन जाऊ द्या.

**श्री.कैलास सोनवणे :-** मला आश्वासन द्या, मला उत्तरे द्या देतांना, आणि मुजुमदारचा तुम्ही काय विषय होता ते.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** त्यांची मुदत संपली, वकील पॅनलची मुदत संपली.

**श्री.कैलास सोनवणे :-** ते प्रशासन पाहीन आणि महापौरताई पोकळेंची पण मुदत संपलेली आहे. आपले गटनेते आहे ते त्यांची पण मुदत संपलेली आहे. ते त्या विधी समितीचे ते होते ना तर ती कॅबीन अजुन ही त्यांच्याकडे आहे. तेथील फोनच बिल, तिथला पी.ए.चा खर्च, तिथले जे जे शिपाई असतील, तो सगळा खर्च यांच्याकडुन घ्यावा. याची मुदत संपल्यानंतरचा. रिकामे विषय आणता पोकळे साहेब आणि देता आम्हाला खड्डयात घालुन. मागे घनकचऱ्याचा विषय पण तसाच आणला, त्याचे पैसे भरावे लागणार आहे. किंमत वाढलेली आहे त्याची सांगा नितीनभाऊ भरावे लागणार आहे की नाही पैसे, नितीन भाऊ सांगा त्याचे पैसे भरावे लागतील की नाही आपल्याला, बिल्कुल तुमच्यामुळे तहकुब ठेवावा लागला तो विषय, आमच्या हिस्सेचे पैसे पण तुम्हाला द्यावे लागतील. बाकीचे भरायला सक्षम असतील, माझ्या हिस्स्याचे पैसे तुम्ही द्यायचे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** घनकचरा प्रकल्पामध्ये तसे काही घडणार नाही. तो विषय ज्या कारणासाठी तहकुब झालेला होता त्यावेळेचा, तो प्रश्न अजुन ही प्रलंबित आहे. मनपाने त्याच्यावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही केलेली नाही. त्याचे उत्तर मला महासभेकडुन आतापर्यंत भेटलेले नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** पैसे भरावे लागणार आहे. आयुक्त साहेब, अहो आयुक्त साहेब, हे पहिले चेक करा, यांची मुदत संपलेली आहे की नाही. आणि ती कॅबीन खाली करा, असे कोणीही कुठल्याही कॅबीन घेऊन राहतील का ? तेथील ए.सी.चा खर्च, टेलिफोनचा खर्च, पी.ए.चा खर्च, महापालिका ऐवढी श्रीमंत आहे का ? आणि हे नियमाच्या बाहेर कसे करु शकतात. याची चौकशी करा लवकर आणि ताब्यात घ्या ती कॅबीन, कोणत्या तरी अधिकाऱ्याला द्या ते.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** अप्पांच्या मागचा मी नगरसेवक आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, विधी समिती सभापतीला जर पियुन भेटत असेल, त्याचा फोन चालु असेल. तेथे शिपाई असेल. १००% ती वसुली तेथे व्हायला पाहिजे.आणि आता पर्यंत प्रशासनाने सभागृहाने या समित्या का निवडल्या नाही. या समितीची नेमणुक का केली नाही. हे का पेन्डींग पडलेले आहे हे सुध्दा सांगावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** यांची मुदत संपली तर यात कॅबीनचा विषय येतो कुठे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** हे सुध्दा प्रशासनाने मुदत संपलेल्या समित्यांना नोटीसा द्याव्यात. मुदत संपलेल्या समितीची मिटींग घ्यावी. आणि लवकरात लवकर ती सभापती निवड करावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** प्रशासन पाहिन काय करायचे ते.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** प्रशासनाने नोटीसा द्याव्यात आणि लवकरात लवकर निवड करावी.

**श्री.कैलास सोनवणे :-** आयुक्त मॅडम या मागणीचा पाठपुरावा तुमच्याकडे करेल मी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रश्न उत्तरांचा तास नव्हता हा, आपण एखाद दोन प्रश्नांना परवानगी दिलेली होती परंतु काय झाले. साधारणता सव्वा तास झाला आहे प्रश्न उत्तर सुरु आहे. शेवटी आज प्रश्न उत्तरांचा तासही नाही.

**मा.महापौर :-** ठिक आहे आता कोणीही प्रश्न मांडु नका. या ठिकाणी जी स्वच्छ संरक्षणची जी टिम आली होती. त्यांनी सर्व्हे केलेला होता. एस.आय.सुध्दा त्यांच्या सोबत होते. तर एस.आय. यांनी काय याबाबतचा निर्णय दिलेला आहे. शौचालयाच्या बाबतचा तो महासभेला अवगत करुन घ्यायचा आहे. त्याच प्रमाणे जो पर्यंत आप्पांच्या म्हणण्यानुसार जर स्वच्छता कमिटीने आपल्याला झिरो मार्क दिलेले असतील. तर या स्वच्छतागृहाबाबत आपल्याला निर्णय घ्यावा लागेल. जो पर्यंत याचा निर्णय महासभेसमोर येत नाही तोपर्यंत त्यांचे वेतनचे जे बिले आहेत ते अदा करण्यात येऊ नये. त्या संदर्भातली पुढील महासभेत पुर्ण माहिती सन्मा.सदस्यांना प्रशासनाने अवगत करुन द्यायची आहे. ७ व्या वेतन आयोगाच्या संदर्भात जी समिती तत्कालीन आपले आयुक्त साहेबांनी गठीत केलेली होती. त्या संदर्भात कुठपर्यंत कामकाज झालेला आहे. जर ती समिती काम करत नसेल तर त्यांना तसे कामाचे निर्देश त्यांना देण्यात यावे. आणि ७ व्या वेतन आयोगाचा लवकरात लवकर प्रोसिजरने ७ वा वेतन कर्मचाऱ्यांना मिळावा तो त्यांचा अधिकार आहे. या संदर्भात सुध्दा समिती गठीत करुन निर्णय लवकरात लवकर घेण्यात यावा. विद्युत व्यवस्था बाबतीत भरपुर अडचणरी आहेत. पुर्ण जळगांव शहरात रस्त्यात असलेले पोल, गटारी मध्ये असलेले पोल याच्या संदर्भात संपुर्ण सर्व्हे करुन आपण महावितरणला मागे एस.एस.पाटील साहेब होते. आपण मिटींग अरेंज करुन पुर्ण निर्देशाचा बंच त्यांना दिलेला आहे. परंतु त्या संदर्भात महावितरण कुठल्याही प्रकारे गांभिर्याने घेत नाही. या संदर्भात मला असे वाटते, पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक मिटींग आपण अरेंज करावी. आणि महावितरणला सुध्दा याबाबतचे निर्देश द्यावे. त्याच प्रमाणे घनकचरा प्रकल्पाकडे जो जाणारा रस्ता आहे. आपले वाहने तिकडुन जातात म्हणुन नागरीकांना तेथे त्रास होतो. तर आयुक्त मॅडमांशी आमची ज्या दिवशी चर्चा झाली. तर मनपा फंडातुन आपण तो रस्ता करणार आहोत. ती प्रोसिजर आहे शहर अभियंता यांनी सुरु करावी. दुषीत पाण्याच्या संदर्भात मला वाटते की, आपले लुले साहेब चांगले उत्तर देऊ शकतील. ते उत्तर त्यांनी द्यायचे आहे. नाला साफसफाईचा जो प्रश्न ताईंनी मांडलेला आहे. शेतकऱ्याच्या शेतातुन जे नाल्याचे पाणी आहे प्रवाहीत करण्याच्या संदर्भात आहे. तो थोडा वेगळा इशु आहे. मला वाटते की, आयुक्त साहेब आणि इंजिनिअर त्यांनी या ठिकाणी प्रत्यक्ष पाहणी करावी. आणि कायमस्वरुपी त्यावर तोडगा काढावा. कारण ती समस्या घेऊन नागरीक आपल्याकडे येत असतात. बाकी भोईटे नगर संदर्भात आपले आदरणीय पालकमंत्री यांनी निर्देश दिलेले होते की, आपण या संदर्भात देखील निर्देश दिलेले होते की, ज्याचे आपल्याला भुसंपादन करायचे आहे. त्यांना सुध्दा आपण बोलवु या आणि मध्यरेल वाल्यांचे अधिकारी आणि आपण एक त्याच्यावर सगळयांनी मिळुन डिसीजन घ्या की, किती भाग आपल्याला भुसंपादन करायचा आहे. त्याची मिटींग सुध्दा आयुक्त मॅडमांनी लवकरात लवकर लावावी. बाकी अमृतचे कामांच्या संदर्भात शहर अभियंता आणि पाणी पुरवठा यांना निर्देश देण्यात येत आहे की, जी जी अमृतची कामे बाकी आहे. ती अमृतची कामे लवकरात लवकर मार्गी लावावे. त्या संदर्भात अमृतवाल्यांना ही आपण निर्देश द्यावे. बाकी जी प्रशासकीय बाबी आहे त्यावर आयुक्त मॅडम आपल्याला माहिती देतील. आणि वॉटरग्रेसचा एक विषय आहे की, प्रत्येक प्रभागामध्ये ४०-४० सफाई कामगार आणि काही गटार कामगार आहे. परंतु प्रत्येक ठिकाणी ३ ते ४ गल्ल्या राहिलेल्या असतात. प्रभाग खुप मोठा आहे. मला असे वाटते की, वॉटरग्रेस वाल्यांची ४०, जर काही हजर नसतील लोकं तर त्या ऐवजी पर्यायी कामगार द्यावेत. पण ती संख्या पुर्ण करावी कारण आता कचऱ्याच्या समस्या आणि गटार साफसफाई बऱ्याच ठिकाणी होत नाही. गटारी नादुरुस्त झालेल्या आहेत. तर याकडे सुध्दा प्रशासनाने लक्ष द्यावे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्या ठिकाणी परमनंट कर्मचारी किती भाग करतात साफसफाई मॅडम.

**मा.महापौर :-** ती आपली महापालिकेची आहे. आणि एस.आय.लोकं जर त्यांना पाठीशी घालत असेल तर हे चुकीचे आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** काही कर्मचारी हक्काची, मेडीकल रजा टाकतात तर ते काम पेन्डींग पडते १०-१० दिवस. त्याचे काय करणर, त्याची साफसफाई कसे करणार. त्याच्यावर उपाय काय ?

**मा.महापौर :-** प्रशासनाने त्याची पर्यायी व्यवस्था करावी.

**मा.आयुक्त :-** मा.महापौर व सर्व सन्मा.सदस्य. सर्व प्रथम सर्वांचे आभार आपण नविन आयुक्त नियुक्ती झाल्याबद्दल अभिनंदन केले. जसे आपण अभिनंदन केले त्यानुसार आपले माझ्याकडुन बऱ्याच अपेक्षा देखील आहे की, चांगल्या प्रकारे काम होईल. कारण एक दिड वर्षापासुन मी अतिरिक्त आयुक्त म्हणुन काम पाहत आहे. त्यामुळे बऱ्यापैकी महानगरपालिकेच्या विषयांची जाणिव आहे. हा चार्ज घेतल्यानंतर सर्व प्रथम सगळया

नागरीकांचा जिव्हाळयाचा प्रश्न रस्त्यांचा होता.त्या अनुषंगाने सर्व रस्त्यांची माहिती घेतली.नंतर अमृत योजना, ड्रेनेज आणि सगळयात महत्वाचा स्वच्छता विभाग, या अनुंषगाने आपण सगळयांनी आता जे प्रश्न उपस्थित केले. नक्कीच हे अतिशय संवेदनशील विषय आहे. कारण नागरीकांना सगळयात अॅपरोचेबल पहाण्यासारखे ठिकाण म्हणजे सन्मा.सदस्यांचे घर असते. आणि एमीजेटली तक्रार घेऊन त्यांच्याकडेच जातात.त्यामुळे आपण जे संवेदनशील विषय मांडले, ज्या कडकडीने विषय मांडले, त्याच त्रिव्रतेने ते सोडविण्याचा प्रशासन नक्कीच प्रयत्न करेल. सर्व प्रथम पहिला जो प्रश्न आला होता सार्वजनिक शौचालयांच्या स्वच्छतेबाबत, तर तो तपासणी करुन नक्कीच कायद्यानुसार किंवा नियमानुसार काम होत नसेल तर त्यानुसार तपासणी करुन निर्णय घेण्यात येईल. आणि तो तातडीने घेण्यात येईल. त्यानंतर ७ वा वेतन आयोगाच्या अनुषंगाने आपली मान्यता झालेलीच आहे. एकदा फक्त समितीला फक्त सर्व्हीसबुकच्या अनुषंगाने स्केल तपासुन घेऊ द्या कारण पुन्हा ते वसुली करणे संयुक्तीक होणार नाही. म्हणुन आपल्याला त्या समितीच्या अनुषंगाने आपल्याला सर्व्हीसबुक तपासुन तो निर्णय घ्यायचा आहे. त्यानंतर शिवाजी नगर उड्डाणपुलाच्या बाबतीत बहुतांश माझ्या असे लक्षात आले की, जे जे विषय आपले पी.डब्ल्यु.डी.शी निगडीत आहेत. तर त्यामध्ये बऱ्याच ठिकाणी अशी वेळ येते की, हा मुद्दा नेमका कुणाचा आहे. तर त्यामध्ये नितीन लढ्ढा सरांनी जसे सांगितले, लाईटच्या बाबतीमध्ये नेमका कोणत्या निधीतुन आपल्याला तो घ्यायचा आहे. त्याचा निर्णय तातडीने घेऊन आपण त्याचा विचार करु निकाल लावु. जिना नाही, सांडपाणी जाण्याची व्यवस्था नाही. अटॅच रोड नाही. या विषयी मी पी.डब्ल्यु.डी.शी चर्चा करते. जर समजा आपल्याला पी.डब्ल्यु.डी.च्या निधीमध्ये हे बसविता येत नसेल. त्यांच्या निधीमध्ये बसविता येत नसतील. तर आपल्या मनपा मार्फत एकदा इस्टीमेट करुन बघु की, किती अमाऊंट होत आहे आणि मग सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन तेव्हा आपण निर्णय घेऊ की कोणत्या निधीतुन आपल्याला तो घेता येईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** एक विषय त्यातला राहिला आहे, शिवाजी नगरला शिवाजी महाराजांचा पुतळा आहे, तर अजुन पर्यंत त्याचे इस्टीमेटच बनविलेले नाही, फक्त डिझाईन ते टाऊन प्लॅनींगचे लोकं आलेले आहे आता साहेबांनी सांगितले, त्याला मागे सरकवुन त्याला उंच करुन त्याच ठिकाणी बसविण्यात यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्या पुलामुळे विठंबना होईल त्या पुतळयाची.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाही उंच करा पुलापेक्षा असे सांगितले आहे.

**मा.आयुक्त :-** सर त्याच्यामध्ये एक असे करु सर्व अधिकाऱ्यांची बैठक घेऊ आणि सर्व समावेशक विचार करुन त्यात निर्णय घेऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अधिकारी लोकांनी पाहणी केलेली आहे त्याची.

**मा.आयुक्त :-** तर अधिकारी आणि पदाधिकारी अशी एक बैठक घेऊ. त्यानंतर सर्वानुमते आपल्याला तो निर्णय घेणे शक्य होईल. त्यानंतर ४२ कोटीच्या बाबतीत आपल्या सगळयांना माहित आहे की, आपण शेवटीची जी ३७ कोटी प्रमाणे त्यांना कन्वीन्स केले होते काम करण्यासाठी. परंतु बऱ्याच ठिकाणी आपली टेस्टींग झालेली नाही. चांगले रस्ते करायचे मग ते पुन्हा फोडायचे ते संयुक्तीक नाही ना. म्हणुन त्यापैकी ४ आपण प्रायोरिटीने घेतले होते ४ पैकी २ प्रायोरिटीचे कामे कम्पलीट करुन घेतलेले आहे. ते मला वाटते आज काम सुरु होईल. आपली सर्व पदाधिकाऱ्यांची एक बैठक झाली होती. रस्त्यांच्या बाबतीमध्ये तर असे ठरले होते की, प्रायोरिटीने पहिले पाणी पुरवठा करुन घेऊ. कारण हा कायमस्वरुपी विषय आहे. म्हणुन आपण पाणीपुरवठा सुरु करत असतो मग रस्ते सुरु करतो. त्यानंतर अमृत योजनेच्या बाबतीत माझी जे बिल कॉन्ट्रॅक्टर आहे आपल्या डिपार्टमेंटची बैठक केलेली आहे. त्याच्यात असे लक्षात आले की, एम.जी.पी.मार्फत बऱ्याच त्रुटी आपल्या डि.पी.आर.मध्ये राहिलेल्या आहे. बऱ्याच डिझाईन आपल्याला दिल्या गेलेल्या नाही. अजुन ही आपला टी.आर.पाईपचे डिसीजन झालेले नाही. मी दोन तीन वेळा एम.जी.पी.च्या इंजिनिअरला बोलविले. परंतु २१ तारखेला जी इस्टीमेट कमिटी जी समिती आली होती त्यांची साक्षी आहे. त्यासाठी एम.जी.पी.चे इंजिनिअर तिकडे गेलेले आहेत. तेथुन आले की, मी एकदा त्यांच्याशी बैठक घेऊन अमृतचे जे जे पेंडींग वर्कस आहे आपले ते एकदा एकझॅमिन करुन घेऊ. आणि आता योगाने पाऊस येत आहे तर माझे असे प्लॅन आहे की, आपण झोन वाईस कॉम्पलीशन तयार करु अमृतच, कारण जेव्हा आपण कॅन्ट्रॅक्टरशी बैठक घेतली तर असे लक्षात आले की, इंजिनिअरकडे ज्या कनेक्शनच्या याद्या दिल्या जातात ते एक कनेक्शन इकडे तर एक कनेक्शन तिकडे, असे न करता जर आपण

झोन घेतला तर ते कम्पलीट होणे आपल्याला शक्य होणार आहे. तर आपण जुन पासुन झोनवाईज प्लॅनींग करु .जेणे करुन आपल्याला ते पटकन करुन घेता येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तो अत्यंत गंभिर रस्ता झालेला आहे. मोठया प्रमाणावर नागरी वस्तीची वाढ झालेली आहे. सगळे मोजमजुरी करणार तेथे वर्ग आहे. साधारणता सातत्याने गेले १५ दिवसापासुन त्या सगळया विषयावरती पाठपुरावा करत आहे. परंतु तो भाग शहरी भागापासुन जेथुन आपली पाईप लाईन गेलेली आहे. त्याच्यापेक्षा उंच असा तो भाग आहे. आणि त्याच्यामुळे तेथे पाणी पोहचत नाही. यापुर्वी तेथे एक उंच टाकी प्रस्तावीत करण्यात आलेली होती परंतु ग्रिन झोन असल्याकारणाने ती टाकी डिसकार्ट करण्यात आलेली आहे. आता एम.जी.पी.कडुन ड्रॉईंग जरी घेतली, सातत्याने माझे योगेश बोरोलेंशी ही बोलणे झालेले आहे. भांडारकरांशी ही बोलणे झालेले आहे. परंतु तेथे पाणी पुरवठा करणे आजच्या स्थितीला सुध्दा शक्य दिसत नाही. शेकडो नागरीक तेथुन माझ्या घरी येतात तेथे. माझा प्रभाग नाही परंतु आमचे संबधी सन्मा.सदस्य तेथील रोज पाठपुरावा करत असतात. तर ती समस्या अत्यंत गंभिर आहे. मोठया प्रमाणावर तेथे नागरीक बस्ती झालेली आहे. आणि अत्यंत गरीब परिस्थितीतली मंडळी आहे. आणि दुर्देव असे आहे की त्या भागामध्ये बोरिंगला पाणी सुध्दा लागत नाही. त्या ठिकाणी काही बोरिंगला कोचित पाणी लागते. परंतु संपुर्ण औद्योगिक परिसर असल्याकारणाने संपुर्ण केमिकलयुक्त पाणी त्याच्यातुन येते. आणि त्या सगळया लहान लहान बाळांच्या आंगांवरती त्या केमीकलचे रिॲक्शन होतात. तो विषय अत्यंत गंभिर असा आहे. आपण तातडीने त्याच्या वरती प्रॅक्टीकल लक्ष घालुन त्या भागातला पाणी पुरवठा कश्याप्रकारे सुरळीत करता येईल याच्या बाबत लक्ष घालणे गरजेचे आहे.

**श्री.नितीन बरडे :-** आता गुणवत्ते बद्दल आप्पा बोलले शौचालयाच्या याच्यात काम होत नाही. आपण साफसफाई बद्दल बोलतो, रस्त्यांबद्दल बोलतो की, गुणवत्तापुर्वक काम व्हायला पाहिजे. गटारी बद्दल बोलतो गुणवत्तापुर्वक काम व्हायला पाहिजे. आयुक्त मॅडम आपण जे शहरात गणेश कॉलनी ते ख्वाजा मियॉ, ईच्छादेवी ते डी-मार्ट आणि वाढीव भागात, पोलचे कामे हे आपण केलेले आहे, काही २५ कोटी मधुन, ७-८ कोटीचे कामे केलेले आहे. याची गुणवत्ता कोणी बघितली का ? पोल कशात गाडला गेला पाहिजे. त्या पोलला अर्थींग आहे का ? त्या पोलला किती कन्डक्टर ईस्टीमेटला घेतले, किती बसविले, आपण एम.ए.सी.बी. ला काही टक्केवारी देखभालीला दिलेली होती. सर्व गोलमाल करुन मॅडम बिले आलेले आहे. त्यात तुम्ही एकदा चौकशी करा. आपल्या अधिकाऱ्यांची चौकशी करा. तुम्हाला ते सापडेल, आज किती तरी बिले बाकी असतील, त्या पोलची तुम्ही चौकशी करा. तो सिमेंट मध्ये गाडलेला आहे का ? तो फक्त दगड मातीत गाडलेला आहे. त्याला जी आर्थिंग दिली पाहिजे ती अर्थिंग दिलेली नाही. त्याला किती कन्डक्टर घेतलेले आहे तेथे ते आर्धेच कन्डक्टर लावलेले आहे. आणि बिले पुर्ण आलेले आहे.हा खर्च आपण आपल्या महानगरपालिकेच्या आलेल्या निधीतुन केलेला आहे. काही २५ कोटी मधुन कामे आहे. काही इतर निधीतुन आहे. ७-८ कोटीचे पोलचे कामे आहेत. आपण गुणवत्ते बद्दल सर्वेच बोलत आहे. पण त्या पोलची गुणवत्ता कोणी चेक केली का ? कोणीच नगरसेवकाला माहित नाही. एकाही नगरसेवकाला माहित नाही ही गुणवत्ता. एक अर्थिंग वाचवली तर किती पैसे वाचतात तुम्ही बघुन घ्या मॅडम. आणि आपल्या अधिकाऱ्यांचे जे कामे झालेले आहे. २ वर्षापुर्वीचे काढा ते आणि त्यांची चौकशी करा.

**मा.आयुक्त :-** प्रकरणाची मी एकदा संचिका मागुन चौकशी करते. आपले बरेच मुद्दे झालेले आहे त्यामुळे सारांश करते. स्वच्छतेच्या बाबतीत जे विषय आलेले आहे की, कायम कर्मचारी सतत गैरहजर असतात. तर मी स्वत: सकाळी ६.०० ला त्यांची एकदा हजरी घ्यायला जाते. जे गैरहजर दिसत आहे त्यांना आपण एक नोटीस देऊन पुढील प्रशासकीय कार्यवाही करु या. ज्यांच्या वैद्यकीय सुट्टया आहेत. त्यांचे सिव्हील कडुन एकदा मेडीकल करुन घेऊ यात.जर ते पात्र येत असतील तर आपण लाट मध्ये कन्टीनिव करु नाही तर बंद करुन आपण भरती करु शकतो. या व्यतिरिक्त फक्त ऐवढेच सांगेल की, टेन्डर उशिराची मला तक्रार आता मिळालेली आहे.मागे नितीनभाऊ पण मला बोलले होते की, मॅडम टेन्डर खुप डिले होतात. मी जे ॲब्जर्व केलेले आहे या २० ते २५ दिवसांमध्ये फक्त ऐवढच सांगेल की, कर्मचारी संख्या आपल्याकडे खुप कमी आहे. त्यासाठी आपण आकृतीबंधाचा ही फॉलोअप करतो आहे. किंवा क्लास-४ चे आपण टेन्डर करण्याचा ही प्रयत्न करत आहोत. कारण की, लिमिटेड स्टाफ आहे खुप कमी इंजिनिअर्स आहे. ईस्टीमेट पण आपण त्यांच्याकडुनच करतो. तर मागे माझी सर्व सन्मा.सदस्यांशी चर्चा ही झाली होती. जर आपण कन्सलटन्टचा विचार करु शकतो का ? हा पण एक चांगला पर्याय असु शकतो. कारण ईस्टीमेट करण्यासाठी आपला जो इंजिनिअर्सचा वेळ वाया जात आहे. तो

आपण यांच्याकडुन करुन घेऊ शकतो. आणि गुणवत्ता तपासण्यासाठी किंवा मी जेवढे रोडची पाहणी केलेली आहे तर माझे असे लक्षात आले की, प्रत्येक डे ला आपला जे.ई. तेथे उपस्थित असला पाहिजे. त्यासाठी त्याला थोडा फ्री वेळ मिळाला पाहिजे. कारण आर्धा वेळ त्यांचा ईस्टीमेट करण्यातच जात आहे. त्यामुळे आपण सल्लागारांचा ही विचार करुन घ्यायला हरकत नाही. आणि ठेकेदाराचे मजुर कमी असतात. त्याला असे सांगेल, एक जरी मजुर कमी असला तर परहेड त्याला त्याच्या मागे रु.५०० दंड लावतो. आणि त्यांची फक्त ऐवढीच विनंती होती की आम्हाला ७.०० पर्यंत वेळ द्या. कारण आपली हजरी ६.१५ ला होत आहे. आणि त्यांचे बाहेरगावाहुन लेबर येतात. पण अजुन आपण त्यांना ती परवानगी दिलेली नाही. आणि ६.०० पर्यंत आपण हजेरी घेत आहोत. परंतु जेवढे लेबर कमी असतील त्यांचे त्या पध्दतीने आपण त्यांना रु.५००/- दंड लावतो. आणि ते इमिजिएटली उपलब्ध होत नाही. त्यासाठी अजुन काही पर्याय तयार करता येईल का आपण त्याचा विचार करत आहोत.

**सौ.सरिता नेरकर :-** बऱ्याच वेळा म्हणतात की, जे.सी.बी. खराब आहे, नाला साफ करायचा मशीन खराब आहे. त्याचे काय करायचे. कारण नागरीकांसमोर आम्हाला जावे लागते.

**मा.महापौर :-** नाला मशीन दुरुस्तीचा म्हणत आहे का तुम्ही ?

**सौ.सरिता नेरकर :-** तीन महिन्यापासुन बंद आहे. किंवा लाईट विभागाला विचारले,

**मा.महापौर :-** मी असे ऐकले की, मशीन दुरुस्तीच्या पलीकडे गेलेली आहे.

**सौ.सरिता नेरकर :-** आणि लाईट विभागाला जर विचारले तर ते म्हणतात की, तेथे आत मध्ये गाडी जात नाही म्हणुन थांबा. किंवा पाणी स्पलाय वाल्यांना विचारले तर ते म्हणतात की, जे.सी.बी. मिळत नाही. नागरीकांना असे सांगता नाही येणार ना आम्हाला.

**मा.महापौर :-** नाही, हे सगळे प्रॉब्लेम आपल्याकडे मागच्या मिटींग मध्ये आलेले आहे. परंतु आपण जर या महासभेत पाहिले तर आपण दुरुस्तीसाठी पण ठराव ठेवलेले आहे.

**सौ.सरिता नेरकर :-** महापौर साहेबा, आम्हाला वार्डात बिलकुल फिरता येत नाही आहे. बिल्कुल फिरता येत नाही.

**मा.महापौर :-** नविन वाहने सुध्दा आपण त्यात प्रस्तावीत केलेले आहे.

**सौ.सरिता नेरकर :-** अक्षरशः मी वार्डात जाणे बंद केले.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाला स्कॅलेटर घ्यावा मॅडम, ठराव झालेला आहे मागच्या वर्षी.

**मा.आयुक्त :-** काय.

**मा.महापौर :-** चला आता मला वाटते की, विषयांना आपण सुरुवात करावी. बराच वेळ झालेला आहे.

**श्री.मयुर कापसे :-** ताई, पिंप्राळा उड्डाणपुलाबाबत मॅडमांनी माहिती द्यावी.

**मा.आयुक्त :-** पिंप्राळा उड्डाणपुलाच्या अनुषंगाने बैठक झाली. त्यामध्ये ८१ नंबरचा जो प्लॉट आहे. तो मालक आपल्याला देणारच नाही. त्याचा फक्त टेन्थ भाग झाला आहे. त्यामुळे आपण तो एकझ्याक्ट चेंज करण्यासाठी रेल्वे वाल्यांना बोलविले होते. समजले त्यांना, ते करतील. उर्वरित जो प्लॉट आता भुसंपादन करायचा आहे. त्यामध्ये जो पाच भुसंपादनाची मागणी करत आहे मालक, आणि ॲकच्युली आपल्याला तीनच काढणे आहे. तर त्या अनुषंगाने आपल्याला तो निर्णय घ्यायचा आहे की, पाच प्लॉट भुसंपादन करायचे का तीन. तो आठ पंधरा दिवसांमध्ये निर्णय घेण्यात येईल.

**श्री.चेतन सनकत :-** महापौरताई, आपले कायम कर्मचारी ज्या ज्या ठिकाणी आहे. मी मागे एक पत्र दिलेले आहे, कलम ४४ मध्ये प्रश्न उपस्थित केलेले आहे. मला बाविस्कर साहेबांनी लेखी उत्तर पण दिलेले आहे त्याच्यावर. ते प्रश्न उत्तरे रेकॉर्डवर आलेले नाही. तर जे कर्मचारी रेकॉर्डवर कमी दिसत आहे आपल्याला त्याची वजे काय आहे त्याची एकदा साहेबांकडुन माहिती घेऊन घ्या. आणि जे मला लेखी उत्तर दिलेले आहे. त्याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख आहे की, ज्या दिवशी शासकीय सुट्टी असते. त्या दिवशी आपण कर्मचाऱ्यांकडुन काम करुन घेतो. तो विषय सर्व सदस्यांना समजुन सांगा. आणि सर्व लोकांमध्ये असे होत आहे गैरसमज की, कर्मचारी येत नाही. तो विषय काय आहे शासकीय सुट्टीच. ते सर्वांना समजुन सांगा, कारण ४० कर्मचारी असले तर सुट्टीच्या दिवशी तुम्ही त्यांना बोलवितात. मग दुसऱ्या दिवशी तुम्ही त्यांना सुट्टी भरुन देतात. मग क्लिअरली ते तर कमी राहणारच आहे रेकॉर्डवर. तो विषय काय आहे प्रशासनाने समजुन द्यावे सर्व सदस्यांना.

**नगरसचिव :-** विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात येत आहे. ततपुर्वी सन्मा.सदस्या सौ.सुरेखा नितीन तायडे यांचा आजचा अनुउपस्थितीबाबत रजेचा अर्ज आलेला आहे तो मा.महापौर महोदया यांनी मंजुर केलेला आहे. विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्रं:- १**) दि.२४/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या विशेष महासभेचे तसेच दि.२४/०३/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे व दि.३१/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या तहकुब विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढढा :-** कार्यवृत्त कायम करण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०१ सर्वानुमते मंजुर करण्यात यावा. मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्याअनुषगांने ठराव क्रं.८०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, दि.२४/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या विशेष महासभेचे तसेच दि.२४/०३/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता संपन्न झालेल्या सर्वसाधारण महासभेचे व दि.३१/०३/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता संपन्न झालेल्या तहकुब विशेष महासभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देणेत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल - ५४**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** २) मौजे जळगांव शिवार स.नं.२४७/३/अ ही म.न.पा.खुली जागा अखिल भारतीय श्री.स्वामी समर्थ गुरुपीठ यांना समाज उपयोगी कामासाठी देणेबाबत मा.उपमहापौर यांचेकडून आलेला प्रस्तावा संदर्भात मा.महासभा ठराव क्र.७७४ दि.२४/०३/२०२२ चे निर्देशानूसार प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** भाऊ, याच्यामध्ये आपण हा विषय मागच्या महासभेमध्ये तहकुब केलेला होता. परंतु त्यांची मागणी त्या ठिकाणी जी जागा आहे. तेथील जे जे सन्मा.सदस्य आहे त्यांनी ही त्या जागेची पाहणी केलेली आहे. तेथील लोकांना पण ते भेटलेले आहे. तेथील लोकांचे पण म्हणणे आहे की, आम्हाला स्वामी समर्थाचे बालसंस्कार केंद्रासाठी किंवा विविध कार्यक्रमांसाठी, उपक्रमासाठी जर ते जागा घेत असतील तर त्याच्यासाठी हरकत नाही. परंतु त्या ठिकाणचे जे जे सदस्य असतील, अध्यक्ष असतील, ते आयुक्तांनाही भेटायला येणार आहे. त्या ठिकाणचे जे महानगरपालिका सदस्य आहे त्यांना ही भेटणार आहे. आणि त्यांना कन्वीन्स करणार आहे. इतक झाल्यानंतर जर या विषयाला विरोध आला तर मला असे वाटते जी त्यावेळेस हा जो ठराव असेल किंवा ही जागा असेल. त्यांना जागेच्या बाबतीत निर्णय घ्यायला लावु तो पर्यंत मला असे वाटते की, हा विषय पुन्हा तहकुब ठेवुन प्रशासनाने किंवा त्या ठिकाणचे जे अध्यक्ष सदस्य असतील, जागेवरती पुन्हा एकदा त्या विषयाची चौकशी करुन नंतर या विषयावर निर्णय घ्यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तो पर्यंत हा विषय तहकुब ठेवा कारण कसे आहे. प्रशासनाची भुमिका त्याच्यामध्ये नकारात्मक आहे, कारण की, तो प्रताप नगर मधील स्वामी समर्थ केंद्राचा भाग आहे. आणि हा वाद काय आहे फार पुर्वीपासुन हा वाद सुरु आहे. कारण तेथे ॲड.अच्युतराव अत्रे राहतात. आता अच्युतराव अत्रे नाही, त्यांचे चिरंजीव आहे तेथे आणि तो कायदेशीर गलत आहे हे पुर्वीपासुन लढत आलेले आहे. परंतु सर्व सम्मानाने त्या भागातील रहिवाश्यांची जर कधी काही हरकत नसेल तर आपण त्याच्यावर विचार करु तो पर्यंत तहकुब करण्यात यावा.

**मा.महापौर :-** विषय क्र.०२ सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.महासभा ठराव क्र.७७४ दि.२४/०३/२०२२ नुसार, मौजे जळगांव शिवार स.नं.२४७/३/अ ही म.न.पा.खुली जागा अखिल भारतीय श्री.स्वामी समर्थ गुरुपीठ

यांना समाज उपयोगी कामासाठी देणेबाबत स्थानिक नागरीकांची हरकत नसलेबाबत प्रशासनाने स्थानिक नागरीक, पदाधिकारी यांचेशी चर्चा करावी व त्यानूसार नियमाप्रमाणे प्रस्ताव सादर करावा तोपर्यंत सदरचा प्रस्ताव तहकुब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते तहकूब**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ३) शासकीय आयुर्वेद रुग्णालय,जळगांव या रुग्णालयासाठी महानगरपालिकेची मेहरुण शिवारातील टी.बी.सॅनीटोरीयम ही जागा तात्पुरत्या कालावधीसाठी भाडेपट्टयाने देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.०३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अधिष्ठाता शासकीय आयुर्वेद रुग्णालय जळगांव यांचे कडील जा.क्र./शाआरुज/आस्था/रुग्णहित/इमारत/२२८/२०२२ दि.१६/०२/२०२२ च्या पत्रानुसार शासकीय आयुर्वेद रुग्णालय व सलग्नीत महाविदयालय जळगांव येथे सुरु करण्यास शासनाकडुन मान्यता मिळालेली असुन त्या रुग्णालयासाठी शासनाकडून मौजे चिंचोली, ता.जि.जळगांव येथे जागा निश्चीत करण्यात आलेली आहे. सदर जागेवरील बांधकाम प्रक्रिया चालू असून त्यासाठी काही कालावधी लागणार आहे. यास्तव सदर रुग्णालयासाठी सदर नियोजीत जागेवरील बांधकाम पुर्ण होऊन उपलब्ध होई पर्यंत पर्यायी जागेची व्यवस्था होणे बाबत विनंती केली आहे.

म.महासभा ठराव क्र.७७२ दि.२४/०३/२०२२ अन्वये ज.श.म.पा.च्या बंद असलेल्या शाळा, दवाखाने जागा तात्पुरत्या कालावधीसाठी देणे बाबत ठराव पारीत करण्यात आलेला आहे. त्याबाबत प्रमुख वैदयकीय अधिकारी यांनी टि.बी.सॅनेटेरीयम दवाखान्याची रिकामी जागा उक्त प्रस्तावीत शासकीय आयुर्वेद रुग्णालयासाठी देणेकामी म.न.पा.चे संबंधित विभागाचा अभिप्राय घेवुन मिळकत विभागामार्फत पूढील कार्यवाही करता येईल असे सूचीत केले आहे.

त्यानूसार नगररचना विभागाने पूढील प्रमाणे अहवाल दिलेला आहे, मेहरुण स.नं.४१८ व ४१९ पैकी मधील टी.बी.सॅनीटोरीयम ही जागा मंजुर विकास योजना (जुनी हद्द) नुसार अस्तीत्वातील सार्वजनीक व निमसार्वजनीक वापरा करीता दर्शविलेली आहे. मालकी हक्काच्या कागदपत्रानुसार (भुधारण पध्दतीनुसार) सदर जागा सरकारी असून भोगवटादार म्हणुन व्हाईस प्रसिडेंट म्युनिसीपल कमीटी जळगांव असे दर्शविलेले आहे.

सोबत जोडलेल्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे या जागेतील नर्सेस क्वार्टर व डॉक्टर्स बिल्डींग या इमारती मध्ये प्रभाग समिती क्र.०३ चे कार्यालय अस्तिवात आहे. तसेच क्वार्टर ब्लॉक पैकी पुर्व उत्तर कोपऱ्यातील सुरुवातीचे ५ ब्लॉक म.न.पा. वापरत (कुत्रे निर्बीजीकरण) आहे. वरील जागांचे क्षेत्र वगळता, उर्वरीत जागा व बांधकाम या बाबत भाडेपट्टा मुल्यांकन तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| एकुण जागेचे क्षेत्र | २६७४६.५६ चौ.मी |
| म.न.पा.वापराखाली जागेचे क्षेत्र (नर्सेस क्वॉर्टर/डॉ.बिल्डींग) | २५६४.१० चौ.मी |
| (५०.५०+१.३३.५०)X१X३०० = | २७६०० चौ.मी. |
| २०७ X ६८.६२ = १४२०२ चौ.मी | १३१९.६१ चौ.मी |
| पेशंट क्वॉर्टर ब्लॉक खालील क्षेत्र | |

३२००.५४/२८ ब्लॉक =११४.३०५X२२ ब्लॉक = २५१४.७१ चौ.मी.

डीस्पेंसरी ८८.०० चौ.मी

निव्वळ खुली जागा क्षेत्र २०२६०.१४ चौ.मी

खुल्या जागेवरील भाडेपट्टा २०२६०.१४ X ३३१० X ८% नुसार रु.५३६४८८५/- प्रती वर्ष

बांधीव ब्लॉक व डिस्पेंसरी यावरील भाडेपट्टा -

२६०२.७१ X २२१२० X ८% दरानुसार X ३०% = रु.१३८१७२६/- प्रती वर्ष आहे. वरील प्रमाणे भाडे बांधीव क्षेत्रावरील व खुल्या जागेवरील भाडेपट्टा प्रती वर्ष काढलेला आहे. तथापी या जागांपैकी खुली जागा अथवा बांधीव जागा अथवा किती क्षेत्र दयावयाचे आहे याबाबत प्रस्तावात नमूद नाही. याबाबत मिळकत व्यवस्थापक यांनी खात्री करुन भाडेपट्टयाने जागा देणे योग्य होईल.

वर नमुद केल्याप्रमाणे म.न.पा.च्या वापरात असलेली जागा व इमारती वगळता उर्वरीत क्षेत्रासाठी मुल्यांकन व भाडे निश्चीत केलेले आहे.

शासनाचे शिघ्रशिध्द गणक दरानुसार सदर जागेचे बांधीव इमारतीचे दर २२१२० प्रति चौ.मी आहे. सदरची इमारत ५० वर्षे पेक्षा जास्त जुनी आहे. त्यानुसार ७०% घसारा लक्षात घेता एका चौ.मी साठी बांधीव इमारतीचे भाडे रु.५३१/- मात्र प्रती चौ.मी प्रती वर्ष अपेक्षीत आहे. तसेच खुल्या जागेचे दर रु.२६५/- मात्र प्रती चौ.मी प्रती वर्ष आहे.

मिळकत व्यवस्थापक यांनी पूढील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे, शासकीय आयुर्वेद रुग्णालय,जळगांव तळमजला, शासकीय महिला रुग्णालय इमारत, मोहाडी रोड,जळगांव यांचेकडील जा.क्र./शाआरुज/आस्था/रुग्णहित/ इमारत/२२८/२०२२ दि.१६/०२/२०२२ चे पत्र प्राप्त झाले आहे. सदर पत्रात शासकीय आयुर्वेद रुग्णालयासाठी मौजे चिंचोली,जि.जळगांव येथे जागा निश्चित करण्यात आलेली आहे. सदरच्या जागेवरील बांधकामाची प्रक्रिया चालू असून त्यासाठी काही कालावधी लागाणार आहे. यास्तव या रुग्णालयासाठी सदर नियोजीत जागेवरील बांधकाम पूर्ण होऊन उपलब्ध होई पर्यंत या रुग्णालयासाठी जागेची पर्यायी व्यवस्था होणे अत्यंत आवश्यक आहे. करीता महानगरपालिका बंद झालेल्या शाळेची इमारत तात्पुरत्या कालावधीसाठी वापरास मिळणे बाबत विनंती केली आहे.

जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांनी म.महासभा ठराव क्र.७७२ दि.२४/०३/२०२२ अन्वये ज.श.म.न. पा.च्या बंद असलेल्या शाळा, दवाखाने जागा तात्पुरत्या कालावधीसाठी देणेबाबत मान्यता देण्यात आलेली असल्याने त्या अनुषंगाने दवाखाना विभागा मार्फत कार्यान्वीत मेहरुण शिवारात शिवाजी उदयानाचे परिसरात असलेले टि.बी. सॅनेटोरीयम दवाखान्याची जागा रिक्त असल्याबाबत प्रस्तावीत आहे.

त्याबाबत प्रमुख वैदयकीय अधिकारी यांनी टि.बी.सॅनेटोरियम दवाखान्याची रिकामी जागा उक्त प्रस्तावीत शासकीय आयुर्वेद रुग्णालयासाठी दयावयाची असल्यास सदर कामी मनपा शहर अभियंता व बांधकाम विभाग यांचा अभिप्राय घेवून पूढील कार्यवाही मिळकत व्यवस्थापक यांचे मार्फत करण्यात येईल असे सूचीत केले आहे.

शासकीय आयुर्वेद रुग्णालय व संलग्नित महाविदयालय जळगांव यांना टि.बी.सॅनेटोरीयम दवाखान्याची जागा नगररचना विभागाने निश्चित केलेले क्षेत्रफळ व भाडेदरानुसार देता येईल. टि.बी. सॅनेटोरीयम दवाखान्याच्या जागेत एकुण २८ ब्लॉक पैकी मनपा ताब्यातील बांधीव जागा (ब्लॉक) वगळता उर्वरीत २२ ब्लॉक व १ डिस्पेन्सरी तसेच खुली जागा एकूण क्षेत्रफळ २०२६०.१४ चौ.मी. (नगररचना विभागाने ठरवून दिलेले) मनपाचे ताब्यात आहे.

अधिष्ठाता शासकीय आयुर्वेद रुग्णालय जळगांव यांचे दि.१६/०२/२०२२ चे अर्जानुसार व नगररचना विभागाने ठरवून दिलेले दर बांधीव क्षेत्रासाठी रु.५३१/- चौ.मी. प्रतिवर्ष व खुल्या जागेसाठी

रु.२६५/- प्रति चौ.मी. वार्षिक याप्रमाणे भाडेदर ठरवून दिलेले आहे. सदर दरानुसार अधिष्ठाता शासकीय आयुर्वेद रुग्णालय जळगांव यांना आवश्यक असलेले बांधीव व खुलीजागा भाडेतत्वावर देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच उक्त दरानुसार होणारे भाडे ज्या अनुषंगीक मनपा मालमत्ता कर व मनपा इतर कर, शासकीय कर भरणा करणे आवश्यक राहील. उक्त अटी नुसार व म.न.पा.च्या इतर अटी व शर्तीनुसार म.महासभा ठराव क्रमांक ७७२ दि.२४/०३/२०२२ अन्वये तात्पुरत्या स्वरुपात भाडेतत्वावर देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ४) भाडेपट्टा मुदत न संपलेल्या व्यापारी संकुलातील गाळेधारकांनी केलेल्या अनधिकृतरित्या हस्तांतरणाबाबत गाळेधारकांकडून विहीत हस्तांतरण शुल्का व्यतिरिक्त दंड वसूल करणे संदर्भात धोरण ठरविणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. परंतु त्याच्यामध्ये नगररचनाने जी सुचना मांडलेली आहे. ती प्रत्येक हस्तांतरणची फी रु.२५०००/- माझी प्रशासनाला ही विंनती आहे. प्रत्येक हस्तांतरणाच्या वेळी, अनधिकृत हस्तांतरण झाले असेल.परंतु ते तीन वेळा झाले असेल किंवा दोन वेळा झाले असेल. त्यांना रु.२५०००/- एकाच वेळी आकारणी करण्यात यावी. आणि एकाच वेळी एक रक्कमी आकारणी करुन नियमानुसार जी आपली ट्रान्सफर फी आहे ती वसुल करण्यात यावी. दंड जो आहे तो एकाच वेळेला वसुल करण्यात यावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** पुढे मी जेव्हा ट्रान्सफर करेल तर रेग्युलर अर्ज करुन रितसर पैसे भरुन करुन घेणार. मग दंड फक्त एकाच वेळेस घ्यावे. बरोबर आहे.

**मा.आयुक्त :-** याच्यापुढचा मात्र जे होतील ते. म्हणजे १ जुन नंतर जर हस्तांतरण केले ए टु बी, बी टु सी तेव्हाही पास्टमध्ये जे झाले ते संपले, ते विसरुन जाऊ आपण.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कारण कसे आहे, त्यांचे जे हस्तांतरण शुल्क आहे. साधारणता त्या गाळे धारकांनी यापुर्वी सन २०१२-१३ पासुन वेळोवेळी हस्तांतरणची प्रक्रिया सुरु करणेबाबत विनंती केलेली आहे. परंतु महानगरपालिकाच त्याच्यावरती योग्य पध्दतीचे धोरण ठरवु शकली नसल्या कारणाने त्यांना कुठेतरी एखाद्याला खरच वास्तव्यामध्ये पैश्यांची अडचण असेल आणि त्या अडचणीच्या काळात त्यानी तो गाळा हस्तांतरण केला असेल. ती बाब जरी कायद्याला धरुन असली तरी त्या परिस्थितीला अनुसरुन त्यांनी तो निर्णय घेतलेला होता. म्हणुन तो आधीचा भुर्दंड न टाकता, रु.२५०००/- चा भुर्दंड एकच वेळी त्याच्यावर टाकला गेला पाहिजे. आणि नंतर जे आहे या संदर्भात एक डेडलाईन ठरवुन द्या. किंवा पुढच्या तिन महिन्यापर्यंत जे हस्तांतरण होतील. यापुर्वी जे एक वेळा, दोन वेळा, तीन वेळा म्युचवल अंडरस्टॅण्डींग मध्ये हस्तांतरण झाले असतील. त्यांना साधारणता पुढच्या तीन महिन्याची मुदत, या तीन महिन्यापर्यंत त्यांनी आपआपले हस्तांतरण प्रक्रियेमध्ये आपले प्रस्ताव दाखल करुन हस्तांतरण प्रक्रियेचा पण लाभ घ्यायला पाहिजे. अन्यथा या तीन महिन्यानंतर जे येतील त्यांना प्रत्येक हस्तांतरणाला रु.२५०००/-, रु.२५०००/- शुल्क.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तीन महिन्या ऐवजी सह महिने करा. एक तर बऱ्याच वर्षाचा पेन्डींग विषय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सहा महिन्याचा कालावधी ठरवुन द्या. सहा महिन्यापर्यंत जे कोणी हस्तांतरण करतील, त्यांना रु.२५०००/- दंडाची आकारणी होईल. सहा महिन्यानंतर जे येतील. त्यांनी जितक्या वेळेस हस्तांतरण केला असेल, तर प्रत्येक हस्तांतरणाला वेगवेगळे रु.२५०००/- लागतील.

**मा.आयुक्त :-** उपायुक्त महसुल याच्यात काही ॲड करायचे.

**मा.महापौर :-** त्याच अनुपालन करुन प्रशासनाने त्याची नोंद घ्यायची आहे. आणि विषय क्र.०४ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेचे भाडेपट्टा मुदत न संपलेले व्यापारी संकुलातील गाळयांचे गाळे हस्तांतरण (नाव बदल) शुल्क ठरविणेचे धोरण निश्चित करणेबाबत प्रशासनाकडुन सादर केलेल्या प्रस्तावानुसार महासभेने ठराव क्र.६३५ दि.१५/१२/२०२१ पारीत केलेला आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने कार्यवाही करणेसंदर्भात आयुक्त यांनी दि.३१/०३/२०२२ रोजी मान्यता दिलेली आहे.

तत्कालीन कार्यकारी कर अधिक्षक यांचे दि.२०/११/२०१३ रोजीच्या आदेशान्वये पुढील आदेशापावेतो हस्तांतरण (नाव बदल) प्रकरणांवर कार्यवाही करु नये असे आदेशित करण्यात आलेले होते, तसेच भाडेकरारनाम्यात “गाळेधारकाने प्रशासनाच्या पुर्व परवानगीशिवाय गाळा हस्तांतरण करु नये” असे निर्देशित केलेले आहे. तरी सुध्दा बहुतःश गाळेधारकांनी महानगरपालिकेच्या पुर्व परवानगी शिवाय परस्पर गाळा हस्तांतरण करुन इकडेस प्रस्ताव सादर केलेले आहे, व करीत आहे. परंतु महासभा ठराव क्रं.६३५ दि.१५/१२/२०२१ पारीत होईपावेतो, प्रस्तृत हस्तांतरण (नाव बदल) प्रक्रियेबाबत धोरण निश्चित नसल्याने गाळेधारकांनी महानगरपालिकेत सादर केलेल्या हस्तांतरण (नाव बदल) प्रस्तावावर कार्यवाही करण्यात आलेली नाही, असे असतांना देखील गाळेधारकांनी परस्पर गाळा हस्तांतरण करुन व्यवसाय सुरु केल्याचे आढळून येते. गाळेधारकांची सदरची कृती ही तत्कालीन न.पा. तसेच महानगरपालिकेच्या स्पष्ट व गर्भित अटी व शर्तीचे उल्लंघन करणारी आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८१ (ब)(१) (अ)(चार) चे उल्लंघन करणारी असल्याने संबंधीत गाळेधारकांस गाळयातून काढून टाकण्याचा आदेश का देण्यात येऊ नये, या आशयाची नोटीस व तद्नंतर आदेश देण्याची तरतूद आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ८१(ब)(६) नुसार ज्या गाळेधारकास पोट कलम (१), खंड (अ), उपखंड (एक) ते (चार) अन्वये कोणत्याही जागा सोडन जाण्याबद्दल जिला आदेश देण्यात आला असेल अशी व्यक्ती नोटीस बजावण्यात आलेल्या तारखेपासून एक महिन्याच्या आत किंवा आयुक्त जो अवधी मान्य करील त्या अवधीत थकलेल्या भाडयाची व कराची रक्कम आयुक्तास देईल किंवा यथास्थिती, तिने उल्लंघन केलेल्या अटी आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने पुर्ण करील किंवा अन्यथा पालन करील तर आयुक्त पोट कलम (३) अन्वये अशा व्यक्तीस काढून टाकण्याऐवजी (पर्वोक्त उल्लंघनाबद्दल नुकसानभरपाई किंवा भरपाई म्हणून कोणतीही रक्कम देणे असल्यास तिचा समावेश करुन) अशा कोणत्याही अटी असल्यास, त्या अटींवर पोट कलम (१) अन्वयेचा आदेश रद्द करील, आणि त्यानंतर अशी व्यक्ती तिच्यावर अशी नोटीस बजावण्यात आल्याच्या लगतपूर्वी ज्या अटींवर तिने जागा धारण केल्या असतील त्या अटींवर जागा धारण करण्याचे चालू ठेवील. असे नमूद आहे.

तेव्हा असे अनियमित हस्तांतरण नियमानुकूल करण्यासाठी, गाळेधारकांनी महानगरपालिकेच्या स्पष्ट व गर्भित अटी, शर्तींचे पुर्वोक्त उल्लंघन केल्याबाबत एकुण रु.२५,०००/-(पंचवीस हजार रुपये) मात्र दंड वसूल करुन, गाळेधारकांनी महानगरपालिकेत सादर केलेल्या हस्तांतरण (नाव बदल) प्रस्तावावर महासभा ठराव क्रं.६३५ दि.१५/१२/२०२१ अन्वये विहीत हस्तांतरण शुल्क आकारुन कार्यवाही करता येईल असे मत आहे. परंतु जर एका गाळयाचे एका पेक्षा जास्त वेळेस अनधिकृत हस्तांतरण झाल्याचे निर्देशनास आल्यास, अश्या परिस्थितीत सदर गाळयाच्या प्रत्येक अनधिकृत हस्तांतरणाकरीता रु.२५,०००/-(पंचवीस हजार रुपये) मात्र दंड वसूल केल्यानंतरच पुढील कार्यवाही करणे उचित राहील मात्र १ जून २०२२ नंतर अनधिकृत हस्तांतरण केल्यास उपरोक्त प्रमाणे दंड आकारुन

हस्तांतरण नियमित करण्याची सवलत लागू न करता, अशा गाळयावर अधिनियमातील तरतूदीनूसार कार्यवाही करण्यात येईल असे प्रशासनाचे प्रस्तावात नमूद आहे.

तथापी सभागृहात झालेल्या निर्णयानूसार जर एका गाळयाचे एका पेक्षा जास्त वेळेस अनधिकृत हस्तांतरण झाल्याचे निर्दशनास आल्यास, अश्या परिस्थितीत सदर गाळयास अनधिकृत हस्तांतरणाकरीता एकदाच रु.२५,०००/-(पंचवीस हजार रुपये) मात्र दंड वसूल करण्यात यावा तसेच याकरिता ६ महिनेपर्यंत मुदत देण्यात येत असून यानंतर प्रत्येक अनधिकृत हस्तांतरणाकरिता प्रत्येकवेळी रु.२५,०००/-(पंचवीस हजार रुपये) मात्र शुल्क वसूल करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ५) मा.महासभा ठराव क्र.४१३ दि.२६/०२/२०२१ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील सन २००१ पुर्वीचे अस्तित्वात असलेली बांधकामे महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ अंतर्गत नियमाकुल करणे कामी सन २०२१-२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती तथापि अजुनही बहुत:श भुखंड/अभिन्यास नियमाकुल करणे बाकी असल्याने गुंठेवारी विकास अधिनियम २००१ अन्वये भुखंड नियमानुकूल करणेस सन-२०२२-२३ अखेर पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा परंतु आपण ज्या गोष्टींना मुदतवाढ देतो, तर लोकांचीच एक मानसिकता होऊन जाते.

**मा.आयुक्त :-** शेवटची मुदतवाढ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि याच्या संदर्भात काय करा की, गुंठेवारीचे असे काही प्रभाग आहे. ते मुजकेच आहे खुप जास्तचे संपुर्ण शहरात गुंठेवारीचे प्रकरणे नाही. काही मेहरुण भागात असतील काही जळगांव शिवारात थोडे फार असतील. तर या भागांमध्ये थोडीशी जनजागृती करण्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेने तेथे फ्लेक्स लावण्यात यावे की, ही शेवटची मुदत आहे. आणि या मुदतीमध्ये जर कधी आपण आपले गुंठेवारीचे प्रस्ताव नियमित नाही करु शकले तर भविष्यात महानगरपालिकेकडुन मिळणाऱ्या सोई सुविधांपासुन आपल्याला वंचित राहवे लागेल.त्याचा गांभिर्य त्या भागातील नागरीकांना पटवुन द्यावे लागेल.

**मा.उपमहापौर :-** त्याच प्रमाणे नगरविकास विभागाने गुंठेवारी विकास समिती सन २०२१ अन्वये जे भुखंड आपण नियमित करणार आहोत किंवा त्या ठिकाणचे कुठले ओपनस्पेस असतील. त्याचा प्रत्येक ठिकाणी विचार करावा. जेणे करुन आपण गुंठेवारी विकास योजना मंजुर करतांना त्या ठिकाणच्या रस्त्यांना कुठेही बाधा होणार नाही किंवा ते रस्ते ले आऊटच्या पुढे जातांना त्या ठिकाणी कुठेही अडचण होणार नाही. अश्या पध्दतीने आपण सर्व काही त्याची चौकशी करुन मग तद्नंतर ते नियमाने करायचे. कारण काय आहे भाऊ काही काही ठिकाणी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** रस्ता पुढे जाऊन डिसकनेक्ट होऊन जातो.

**मा.उपमहापौर :-** हा डिसकनेक्ट होऊन जातो. त्याच्या पहिले पण झालेले आहे बऱ्याच ठिकाणी.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** या मध्ये सर्व सभागृहाने जर ठरविले, प्रशासनाने जर ठरविले की, आता जितके मोजके गुंठेवारी अधिकृत व्हायचे बाकी आहे. त्या ठिकाणचे महापालिकेने खर्च करुन टेक्नीकल पर्सन, टोटल त्याच्या मशिनी, कोणालातरी ठेका द्या किंवा काय प्रक्रिया, किंवा मॅन्युवली एक टोटल स्टेशन मशिन घेऊन एकदा त्यांचे लेआऊट आपण मंजुर करुन घ्या. म्हणजे आपल्या स्व:खर्चाने. आणि ज्या वेळेस जो परवानगीला येईल. पंतप्रधान आवास योजना मध्ये त्या लोकांना लाभ मिळत नाही. त्याला स्वत:चे घर बांधायचे आहे तर त्याला लोन मिळत नाही. तर त्याच्यामध्ये हाच एक पर्याय आहे की, ते लेआऊट आपण महापालिकेने सगळयानी सहा-एक

महिन्यात मंजुर करुन घ्यावे. जेणे करुन जेव्हा तो परवानगीला येईल. जो झालेला खर्च आहे आपला तो वसुल करु न घेण्यात येईल.

**मा.आयुक्त :-** केले आहे ना, पैसे देत नाही संबंधीत लोकंही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मॅडम मी काय म्हणतो, १००% नाही मिळणार, ७०% लोकं मी आजही तुम्हाला सांगतो की, तुम्ही केले तर एकदा मी काय म्हणतो, पैसे मिळणार नाही हा भाग जाऊ द्या. पण हा गुठेवारीचा विषय तर बंद होऊन जाईन की, आपला ले-आऊट मंजुर झालेला आहे. तेथे बिनशेती, विकास कामे काही तर होईन.

**मा.आयुक्त :-** एक समजा आपण करु शकतो, एखादा छोट रोटेशन घेऊन मग ते आकडा किती येतो. मग ते विचार करु. कारण काय होते जसे आपण पाणी पुरवठयाचे अनुभव घेतले, स्लमच्या लोकांना कनेक्शन दिले. आता ते येत नाही आपल्याकडे पैसे भरण्यासाठी. एकदा विचार करु त्याबद्दल आपण.

**श्री.नितीन लढ्ढा :-** खुप विचार केलेला आहे यापुर्वी.

**मा.आयुक्त :-** यस.

**मा.उपमहापौर :-** गुंठेवारी भुखंड नियमित करतांना, आता नविन दुरुस्ती केल्यामुळे त्याच्यामध्ये काही अडचण येत असतील किंवा काही सुधारणा झालेल्या असतील.त्याचा ही विचार करावा.

**श्री.राजेंद्र पाटील :-** महापौर महोदया, मी प्रशासनाचे अभिनंदन करेल की, त्यांनी प्रशासकीय प्रस्ताव गुंठेवारी संदर्भात आणला, मागच्या महासभेत मी हा प्रस्ताव दिलेला होता,प्रशासनाकडे व महापौर महोदयांकडे, परंतु तत्कालीन आयुक्त साहेब यांनी त्याच्यावर निर्णय न घेता, पुढच्या महासभेमध्ये आपण हा नविन प्रस्ताव चालेल किंवा मुदतवाढ देऊ वास्तविक तेव्हा मुदतवाढ दिली असती तर ती कन्टीनिव राहिली असती. त्याच्यामध्ये खंड केले, आणि मी आपला सर्वांचे अभिनंदन करतो आणि विशालभाऊंनी जो प्रस्ताव मांडला,आपणच जर की ते, मोजणी शिट वगैरे त्या भुखंडाची नाही. बरेचश्या, तर आपण आपला अधिकारी नेमुन किंवा एखाद्या एजन्सीला काम देऊन जर की, ते काम करुन घेतले, त्या ऐरिया मध्ये राहणारे लोकं जे आहेत स्लम ऐरियातुन आलेले जास्त लोक आहे. त्यांची ५०० फुट जागा असेल ७०० फुट जागा असेल.एक एका प्लॉट मध्ये ते तीन तीन नागरीक, तीन तीन कुटुंब त्या प्लॉट मध्ये रहिवास करतात. म्हणुन आपण जे अटीशर्ती आहे ज्या तांत्रिक अडचणी आहे. त्या सॉल होणार नाही आणि हा गुंठेवारी विषय असाच पेंडींग राहिल. म्हणजे पाहिजे त्या प्रमाणात आपल्याला प्रतिसाद मिळणार नाही नागरीकांकडुन. म्हणुन विशाल भाऊंनी मांडलेली सुचनांवर आपण विचार करावा. आणि एखादी एजन्सीला आपण काम देऊन ते मोजमाप करुन त्याला नियमित करुन घ्यावे अशी विनंती आहे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** तेथे अंडरग्राऊंड ड्रेनेज झालेले आहे, अमृतचे कनेक्शन झालेले आहे. पण ते गुंठेवारी नियमित केलेले नसल्या कारणाने त्यांना रस्ते आणि गटारीची सुविधा देण्यात येत नाही. आणि झाला ले-आऊटचा विषय, नागरीक तेथे येतात की, मला माझा पर्सनल प्लॉट मला एन.ए. करायचा आहे. पण ले-आऊटचा विषय जो आहे. त्याला कुठेतरी अतिरिक्त खर्चामध्ये त्याला ॲड करायला पाहिजे. त्याचा विचार करुन काही तरी धोरणात्मक ठरवा. परंतु हा विषय मला वाटतो की, योग्य आहे. या पध्दतीने जर केले तर मुदतीत होईल.

**मा.आयुक्त :-** सर आपण पुढच बघुन निर्णय घेऊ, कमीतकमी ५० ते १०० प्रस्ताव दाखल केल्याची माहिती द्या. जर जास्त प्रस्ताव आले तर जो निधी येईल. त्याच निधीतुन आपण सर्व्हे करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नगरसेवक तर त्यांच्याकडुन प्रयत्न करत असतात. पण ही बाब दुरुस्त आहे.

**श्री.चेतन सनकत :-** बाहेर आपल्यासाठी थांबलेले आहे, एक दोन मिनीट त्यांचे निवेदन स्विकारुन लेटर घेऊन घ्या. नाही तर त्यांना मिटींग संपल्यापर्यंत थांबावा लागेल.

**मा.आयुक्त :-** सर माझी आपणास हात जोडुन विनंती आहे की, जनरल बॉडी अनाऊंस्ड असते. त्यामुळे आपण असे करु नये. प्रथा पडेल, नका करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** चेतन भाई आपने भी लिया तो चलता है. चेतन भाई आपही निवेदन ले लो और आप आकर महापौर को दे दो.

**श्री.चेतन सनकत :-** उनकी अपेक्षा है इसलिए और आयुक्त मॅडम से उनको बात भी करनी है.

**श्री.सुनिल महाजन :-** सभा संपल्यानंतर.

**मा.महापौर :-** ही जी महासभा आहे. महासभेचे सगळे अधिकृत सगळा विषय हा महापौरांशी संबंधीत असतो सगळे निर्णय याठिकाणी महापौर घेत असता, त्यांना जर आयुक्त मॅडमांना काही निवेदन द्यायचे असेल तर त्यांनी ते महासभेनंतर द्यावे. सगळया झालेल्या सुचनांचे प्रशासनाने अनुपालन करायचे आणि विकास नियमानुसार २०२२ आणि २०२३ पर्यंत मुदतवाढ मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावाला सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८०८   पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील सन २००१ पुर्वीचे अस्तित्वात असलेली बांधकामे महाराष्ट्र गुंठेवारी अधिनियम २००१ अंतर्गत नियमाकुल करणे कामी मा.महासभा ठराव क्र.४१३ दि.२६/०२/२०२१ अन्वये आर्थिक वर्ष सन २०२१-२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. तथापि सदर मुदतीत गुंठेवारी अंतर्गत नियमानुकल करणाऱ्या भुखंडाचे/अभिन्यासाचे अजुनही बहुतःश भुखंड/अभिन्यास नियमानुकुल करणे बाकी आहे.

१) महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१३/०८/२००१ महारष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम प्रसिध्द झाल्याच्या तारखेपासुन लागु करण्यात आलेला आहे.

२) वरील अधिनियम अंमलात आल्यापासुन, आत अथवा नियोजन प्राधिकरण मुदत वाढवुन देईल अश्या मुदतीत नियमाधिन करणेसाठी अर्ज करता येईल, या प्रमाणे अट आहे. मात्र शासन परिपत्रक क्र./गुंठे १००३/४६०/प्र.क्र.७७ /नवि-३० दि.०९/०७/२००३ नुसार ३१/०३/२००३ नंतरही नियमाधीन करण्याची प्रक्रिया चालु ठेवणेबाबत निर्देश देण्यात आले आहे.

३) मा.महासभा ठराव क्र.१४८ दि.०६/०६/२०१९ अन्वये गुंठेवारी अधिनियम २००१ अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिकेकडे विहीत नमुनयाप्रमाणे प्रस्ताव सादर करतांना महानगरपालिकेचे जे आर्किटेक्ट, नोंदणीकृत इंजीनीअर असतील त्यांचेकडून हे काम नियमानुसार करुन घेणे बाबत मान्यता दिलेली आहे.

४) जळगांव महानगरपालिका महासभा ठराव क्र.४१३ दि.२६/०२/२०२१ अन्वये "गुंठेवारी नियमाकुल करणे कामी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाकरीता मुदतवाढ दिलेली होती "

गुंठेवारी अधिनियम २००१ मधील तरतुदीनुसार जळगाव शहर म.न.पा. हद्दीमधील उर्वरीत गुंठेवारी विकास जे अदयापपावेतो नियमानुकुल झालेला नाही असा विकास नियमानुकुल करणे गरजेचे असुन त्यामधुन मनपास आर्थिक उत्पन्न मिळु शकेल.

मा.प्रधान आवास योजनेची घरकुलासाठी अर्थसहाय्य प्राप्त होत असल्याने गुंठेवारी अंतर्गत मोठया प्रमाणात विचारणा होत आहेत. त्यामुळे गुंठेवारी विकास नियमीत करण्याची प्रक्रिया पूढील आर्थिक वर्ष सन २०२२-२३ अखेर पर्यंत मुदतवाढ देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

गुंठेवारी अधिनियमा अंतर्गत भूखंड नियमानुकुल करणेची नागरीकांना माहिती नसल्यामुळे नागरीकांकडून मुदतवाढीकरीता वारंवार मागणी होत असते याकरीता प्रशासनाने सदर भागांमध्ये माहिती फलक लावून नागरीकांना याबाबतची माहिती दयावी तसेच भूखंड नियमानुकुल करताना ओपनस्पेस, रस्ते यांची माहिती घेवून भूखंड नियमानुकुल करावे तसेच शासन नियमात काही बदल झालेला असेल तर त्याचा सुध्दा विचार करण्यात यावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ६) मंजुर विकास योजना (वा.ह) आव्हाणे गट नं.७६०/१ मधील आरक्षण क्र.२८,गार्डन बाबत, रिट याचिका क्रं.३९४७/२०२० मध्ये मे.उच्च न्यायालय मुंबई औरंगाबाद खंडपिठाने दि.२१/०२/२०२२ रोजी दिलेल्या निर्णयानुसार विहीत कालावधीत भूसंपादनाची प्रक्रिया पुर्ण करणेसाठी भूसंपादन खर्चास तसेच याकामी येणाऱ्या एकूण खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** भुसंपादनाचे प्रस्ताव या वेळेला या महासभेसमोर आलेले होते. साधारणता याच विषयाचे अनुषंगाने जवळपास यापुर्वी ३ लाख ठराव झालेले आहे. आरक्षण उद्यानाचा आहे. त्याला आरक्षणाच्या अनुषंगाने

त्यांना टी.डी.आर.देण्याच्या संदर्भात धोरण या महासभेने ठरविलेले होते. पंरतु जमिन मालक यांनी मोबदल्याच्या संदर्भातला हट्ट धरला.दुसऱ्यांदा ही निर्णय तसाच झाला, तिसऱ्यांदा ही निर्णय तसाच झाला.आता वास्तविक बघितले तर हे उद्यानाचे आरक्षण हे साधारणता ६८(८) क्षेत्रावरती आहे. आरक्षणची जागा जी आहे. निमखेडी रोडला असलेल्या कृषी विद्यापीठ आहे. त्या कृषी विद्यापीठाच्या मागील भागातील ती जागा आहे. आणि आज खुप अशी वस्ती तिथे झालेली नसली तरी भविष्यातल्या वस्तीचा विचार करता येईल.परंतु उद्यानाच्या आराखडयासाठी भुसंपादनाची प्राक्रम जी लागणार आहे. ती साधारणता माहिती घेतली असता ३ कोटी रुपयांचे जवळपास भुसंपादनाचा मोबदला अपेक्षित आहे. भुसंपादनाचा मोबदला आपण दिल्यानंतरही कायद्याने ट्रायब्युनलकडे हा विषय भुमालक घेऊन जात असतो. आणि ट्रायब्युनलमध्ये सुध्दा काही तरी वेगळा निर्णय होऊन महानगरपालिकेवरती अतिरिक्त बोझा या अनुषंगाने पडत असतो. तर या संदर्भात अश्या पध्दतीच्या उद्यानांची जागा किंवा प्रायमरी शाळेची जागा की, आपण बघतो आहे की, महानगरपालिकेच्या शाळा या ओसपडत चाललेल्या आहे. त्या ओसपडत चाललेल्या शाळांना आपण दुसऱ्या संस्थांना भाडयाने देतो. आणि कोट्यावदी रुपयाचा मोबदला महानगरपालिका या आरक्षणाच्या जागेवरती मोबदल्या स्वरुपात खर्च करत असते. हे तश्याच पध्दतीचे उद्यान आहे. उद्यान हे शहरासाठी आवश्यक आहे. परंतु ज्या ज्या मोठया ले-आऊट मधील ओपन स्पेसेस जी असतात. त्यांना सुध्दा आपण छोटी छोटी उद्याने म्हणुन विकसित करता येऊ शकतो भविष्यात. तर असा कोटयावधी रुपयांचा मोबदला महानगरपालिकेने चुकवायचा की, अश्या पध्दतीने हे आरक्षण व्यपगत होऊ द्यायचे.या संदर्भात सभागृहाने विचार करुन निर्णय घेण्याची ही वेळ आहे. कारण काय होते आपण प्रत्येक वेळी काही ना काही कारणाने राहतो. आणि पर्यायाने जमिन मालक जो आहे तो न्यायालयात जातो. न्यायालय महानगरपालिकेला हाच प्रश्न उपस्थित करते. आपण आरक्षण टाकुन १० वर्षाचा कालावधी झालेला आहे. जमिन मालकाने १२७ ची नोटीस आपल्याला दिलेली आहे. आणि त्यानंतर ही आपण जमिन अधिग्रन न करता आणि त्याला मोबदल्यापासुन वंचित ठेवुन किती दिवस त्याला ताटकळत ठेवणार. तर कुठेतरी ठोस निर्णय घेण्याची या वेळेला गरज आहे आणि सभागृहाने आप्पा त्याच्या संदर्भात काय निर्णय घ्यायला पाहिजे की, अश्या जमिनींचा मोबदला देण्याच्या संदर्भातला धोरण ठरवायचे असेल तर तश्या पध्दतीचे धोरण ठरवायला पाहिजे. किंवा मोबदला द्यायचा नसेल तर असे आरक्षण व्यपगत होतील. कोणी एका व्यक्तीने जर कधी या विषयाच्या संदर्भात चर्चा केली. तर असे वाटते त्याच्यामध्ये त्याचा काही आर्थिक स्वार्थ जुडलेला आहे का ? किंवा एखादा आरक्षण अश्या पध्दतीने व्यपगत होण्याच्या दृष्टीकोणातुन सभागृहाने भुमिका घेतली तर तसेही आरोप होतात की, जमिन मालकाकडुन कुठेतरी कोट्यावधी रुपये घेतले असतील, म्हणुन अश्या पध्दतीने आरक्षण व्यपगत होण्याच्या दृष्टीकोणातुन सभागृहाने सोईस्कर भुमिका घेतली असेल. परंतु अशी कुठलीच परिस्थिती नाही. यापुर्वी सुध्दा आरक्षणाच्या बाबतीत अनेकदा विषय सभागृहात आले. ज्या वेळेला भारतीय जनता पक्षाच येथे राज्य होते. त्यावेळेला सुध्दा त्यांनी ती भुमिका घेतली होती की, मोबदला महानगरपालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करता, त्यांना टी.डी.आर. ऑफर करण्याच्या संदर्भात भुमिका होती योग्य भुमिका होती. चुकीची भुमिका नव्हती. परंतु जमिन मालक टी.डी.आर. घेण्याच्या मनस्थितीत नसतो. या दृष्टीकोणातुन त्याच्यावरती कुठेतरी एक ठोस धोरण ठरविणे गरजेचे आहे म्हणुन माझी आप्पा या सभागृहाला विनंती आहे की, नेमके काय धोरण ठरवायला पाहिजे. जेणे करुन आरक्षणाचा मोबदला द्यायचा किंवा जमिन जी आहे तो कुठेतरी धोरणात्मक निर्णय घेऊन तो उच्च न्यायालयात कळवायला पाहिजे. कारण हे प्रकरण जे आहे ते न्यायालयात गेलेले आहे. आणि उच्च न्यायालयाचे अश्या पध्दतीचे महानगरपालिकेला निर्देश आलेले आहे की, नेमके याच्या वरती आपण काय धोरण ठरविणार.

**मा.उपमहापौर** :- भाऊ याच्या मध्ये मला असे वाटते, आपला टी.डी.आर.संदर्भात जो विषय होता. आता जी नविन शहराची विकास योजना जी आता लागु झालेली आहे. वेळोवेळी त्यामध्ये मला असे वाटते की, आता टी.डी.आर.च्या संदर्भातला जो रेशो असेल किंवा टी.डी.आर.च्या संदर्भातली जी अमाऊंट येईल.आपल्याला कुठल्याही धोरणाचा विकास करायचा असेल किंवा कुठलीही डेव्हलपमेंट करायची असेल, तर त्या ठिकाणी त्याला प्रिमियम करत होतो तर टी.डी.आर. हे  काही बंधनकारक नाही. जेव्हा एक भुखंडधारक असेल, भुखंडधारक विकसित करत असेल, त्याला टी.डी.आर.घेणे बंधनकारक नाही. मला असे वाटते पुन्हा नव्याने आपण संबंधीत मालमत्ताधारकांना टी.डी.आर.देण्याचे संदर्भात पुन्हा एकदा नोटीस देऊ.आणि त्याच्यावर मग काय निर्णय घ्यायचा ते आपण घेऊ किंवा मला असे वाटते त्याच्यावर आपण एक समिती गठीत करायची. त्या पुर्ण

समितीने, त्याच्यामुळे मला असे वाटते भाऊ की, ज्या वेळेला टी.डी.आर. देण्याचा विषय होता २०१९ मध्ये त्याच्यानंतर काही डी.सी.पी.आर. बदललेले आहे. नविन डी.सी.पी.आर.नुसार त्याला कोनाचे नव्याने टी.डी.आर.घेण्याच्या संदर्भामध्ये आपण त्याला कन्वीन्स करायला पाहिजे.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** दरम्यान या प्रस्तावामध्ये भुसंपादन करतांना, मान्यता, भुसंपादन खर्च किती येतो आहे काय येत आहे. हे आरक्षण मिळवुन किती दिवस झालेले आहे. त्याच्यानंतर या आरक्षणाची आपल्याला आवश्यकता आहे की नाही. असे स्पष्ट अहवाल प्रशासनाने देणे अपेक्षित आहे. त्यांनी असे सविस्तर अहवाल जर सादर केले, दर दहा वर्षाने आपले झोन बदलतात, भाऊंनी मांडलेली सुचना जी आहे ओपनस्पेस डेव्हलप करण्याची हा एक चांगला पर्याय आहे याच्यामध्ये. आपण ३-३, ४-४ कोटी अश्या ठिकाणी देणार, तर आपली प्रशासनाला विनंती आहे या ठिकाणी, प्रस्ताव येतात तेव्हा आम्हाला कळत नाही, किती खर्च येतो काय येतो. जागेचा खर्च काय आहे त्याचा स्पष्ट अहवाल आम्हाला द्या तर त्याचा निर्णय घ्यायला आम्हाला सोपे पडेल.

**श्री.अशोक करवंदे, सहा.संचालक :-** त्यातला आपण जी

**मा.उपमहापौर :-** साहेब, जागा किती आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ६८ हजार.

**श्री.अशोक करवंदे, सहा.संचालक :-** ६८ हजार आणि त्या ठिकाणी बरेचशे ले-आऊट मंजुर झालेले आहे आणि तेथे बांधकाम पण सुरु झालेले आहे. कृषी महाविद्यालय तेथे आहे. आणि तेथे जे आरक्षण आहे ते बगिच्याचे आहे. तर ते बदल करण्याचे काम आहे तर या ठिकाणी टी.डी.आर.चा प्रश्न उपस्थित होतो. टी.डी.आर. हे जमिनधारकाला घेणेसाठी मॅनडेटरी नाही कायद्याने, इच्छिक विषय आहे तो, तर त्यानी घ्यावा किंवा नाही घ्यावा. यापुर्वीही महासभेला हा विषय आला होता की, प्रत्येक वेळेस टी.डी.आर. मंजुर करुन घ्यावा असा महासभेने ठराव मंजुर केलेले आहे. त्याच्याच अगेन्स त्यांनी सांगितले की, मी टी.डी.आर. घ्यायला तयार नाही. आणि आपला जो विहित कालावधी होता जो २ वर्षाचा भुसंपादनाचा प्राप्त झाल्यानंतरचा, त्या कालावधीत सदरचा आरक्षण भुसंपादन झाले नाही. म्हणजे सदरचा आरक्षण हे कायद्याने आजच्या घडीपर्यंत झालेले नाही. मात्र असे असुन सुध्दा मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.२१/०२/२०२२.

**मा.आयुक्त :-** एक मिनीट, दि.२१/०२/२०२२ we have the time till that आपण त्यासाठी ट्राय करु. जर ते नाही म्हटले तर आपण पुढील विचार करु.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** याच्यामध्ये कोर्टाने स्पष्ट सांगितलेले आहे, Subtitle the land is allotted for the garden, the planning authority shall take care accuciation of the land for the period of one year म्हणजे तो पर्यंत विस्कृत जागा देणे आहे, त्यामुळे आपण आज ते निर्णय घेतला नाही तर ते चालले जाईल अश्या प्रकारचा आक्षेप न्यायालयाच्या आदेश मला न्यायालयाच्या याच्यात दिसुन येत नाही.मग आपण साहेब स्पष्ट अहवाल का पाठवत नाही आम्हाला, तुम्ही आम्हाला आता तोंडी सांगत आहे की, हे ३ कोटीचा आहे ४ कोटीचा आहे. मग आदेश का येत नाही याच्यासोबत, तुम्ही आम्हाला स्पष्ट सांगायला पाहिजे ना याच्यामध्ये, तुम्हाला हे सभेत घ्यायला काय अडचण आहे. या गोष्टी महासभेच्या पटलावर जे येतात विषय त्यात तुमचा अभिप्राय द्या.

**श्री.अशोक करवंदे, सहा.संचालक :-** पोकळे साहेब माझे डॉकेट जे आलेल आहे ना. डॉकेटमध्ये सगळे A to Z आलेले आहे त्याच्यामध्ये. याच्यात कुठलेही पहेली दाखविलेले नाही.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** मग खर्च का दाखविले नाही.

**श्री.अशोक करवंदे, सहा. संचालक :-** ऐका ना.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** असे आम्ही नेहमी खर्चाला मान्यता द्यायची.

**मा.उपमहापौर :-** आता १२७ ची नोटीस आपण सर्वांना दिलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो, आप्पा साहेब, म्हणजे पुन्हा एकदा तो टी.डी.आर.चा विषय जो आहे.

**मा.उपमहापौर :-** समजा भविष्यामध्ये महानगरपालिकेचा काही प्रोजेक्ट असेल, त्यासाठी आपण काही जागा शोधत आहे आणि आपल्याला जागा भेटत नाही, पण मला असे वाटते की, प्रशासनाकडे शासनाला आपण ती जागा मागतो आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नितीनभाऊ, तुम्ही जसे बोलले ना आता, त्याला एकदा परत करुन दिली.

**मा.उपमहापौर :-** विशालभाऊ, भविष्यात आपल्याला  त्याच्यात सविस्तर आणायची आहे. आज आपण शासनाकडे मागणी करतो आहे यासाठी. आपण जर सोईस्कर प्रस्ताव पाठविला त्याच्यावर तर जे आरक्षण असेल ते बदलविता येऊ शकते. आपल्याला त्याच्यामध्ये अजुन काही पर्याय असेल.

**मा.आयुक्त :-** युज नाही बदलता येतो. युज बदलता येत नाही.

**मा.उपमहापौर :-** प्रस्ताव पाठवुन बदलता येईल ना. प्रस्ताव आल्यानंतर आपण आपली प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर आपल्याला आरक्षण बदलता येईल ना त्याच्यावरती.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे. आपण प्रशासनाकडुन प्रस्ताव पाठवु शकतो.

**मा.उपामहापौर :-** भाऊ मला सांगा, त्या ठिकाणी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे की नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे, मला काय वाटते की, एक शब्द पुन्हा,

**मा.उपामहापौर :-** पुन्हा विचारा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्या संदर्भात जमिन मालकाला विनंती करण्यात यावी. जमिन मालक जर तयार झाला तर आनंदाची गोष्ट आहे. आणि जर नाही झाला तर सभागृहाला पुन्हा अवगत करु.

**श्री.कैलास सोनवणे :-** तुम्ही काय करा माहिती आहे का ? तुम्ही शिंदे साहेबांकडे जा. कारण महापालिकेचा आपला जो डिपार्टमेंट आहे तो इतका रिकामचोट म्हणजे सॉरी तुम्हाला नाही बोलत आहे मी. इतके रिकामे धंदे होतात त्या डिपार्टमेंट मध्ये, कालंतराने आपलेमुळे भांनगडी होतील तेव्हा रिक्वऱ्या निगतात. आपल्याला माहिती आहे की, काय काय रिक्वऱ्या अजुन निघालेल्या आहे. हे यांचा घनकचऱ्याचा विषय बाजुला ठेवा. तुमच बाजुला ठेवा. त्याच्या वैतिरिक्त पण अजुन निघालेल्या आहे रिक्वऱ्या. आणि तुम्हाला माहिती पण नाही. म्हणजे सन १९८८ पासुन ते निघालेल्या आहे ते रिक्वऱ्या. काही संबंध पण नाही. अध्यक्ष काय नगरसेवक पण नाही होते आम्ही. म्हणजे सन १९८८ ते २००१ पर्यंत रिक्वऱ्या निघालेल्या आहे. काय आता कुठुन भरणार. तेव्हा तर काही संबंध पण नव्हता सन १९९१ मध्ये काही संबंध नव्हता, तेव्हाच्या रिक्वऱ्या निघालेल्या आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे मला वाटते महापौरताई आपण या संदर्भातला हा ठराव करण्याचा असा निर्णय घेऊ या की, जमिन मालकाला पुनश: एकदा टी.डी.आर.घेण्याच्या संदर्भात पुन्हा एकदा प्रशासनाने विनंती करावी.याला धरुन जर कधी जमिन मालक तयार होत असतील. तर त्या पध्दतीचा निर्णय घेऊ. अन्यथा त्यांचा जे काही उत्तर येईल. पुढची महासभेमध्ये किंवा ज्या वेळेला त्यांचे उत्तर येईल.

**मा.उपमहापौर :-** कारण की भाऊं पुन्हा एकदा आपण त्याला विनंती करणार मालमत्ता धारकाला, त्यानंतर आपण निर्णय घेऊ. तहकुब ठेवायचे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही. निर्णयच घेऊन टाकु की, जमिन मालकाला पुनश: एकदा संदीग्ध प्रशासनाचा प्रस्ताव जो आपण दिलेला आहे. जमिन मालकाला पुनश: एकदा प्रशासनाने विनंती करावी. आणि जमिन मालकाचा जो काही उत्तर येईल. त्याच्या अनुषंगाने पुनश: त्याच्यावरती एकदा विचार करण्यात येईल.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हे जे प्रस्ताव येतात प्रत्येक वेळी महासभेपुढे, जे शासकीय प्रस्ताव येतात. नाल्यावरती भुसंपादनाचा प्रस्ताव आला, नंतर आप्पांनी सांगितले रिक्वरी आली तर आम्ही भरायचे का ? म्हणजे असे चुकीचे आपला शिवाजी नगर हुडको,

**श्री.कैलास सोनवणे :-** पिंप्राळा हुडकोच होत ते.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** पिंप्राळा का था ना? हे शिवाजी नगर हुडको मॅडम तेथे आपण घरकुल योजना राबविली.फक्त जी विहीर होती. फक्त त्या विहीरचे देणे बाकी होते. आज आपल्याला तेथे किती भुरदंड भरावा लागतो आहे. रिक्वरी आली तर हे सगळेच्या सगळे ऐवढे भरणार आहेत का ? अशी रिक्वरी आलेली आहे. आपणास निदर्शनास आणुन देतो. असे प्रस्ताव जर चुकीचे येत असतील. तर जे अधिकारी आहे त्यांची चौकशी करण्यात यावी. टी.पी. असो कलेक्टर ऑफिस पासुन न्यायालयात काही काहींचे तालमेल असतील. तर ही चौकशी करुन असे प्रस्ताव आपण किती प्रस्ताव हे केलेले आहे. आणि किती आपण पैसे दिलेले आहेत. त्याची ही चौकशी करा आणि खरोखर जे भुसंपादनाचे विषय आहे. ते करणे  आपल्याला आवश्यक होते का ते आरक्षण टाकणे ?

**मा.उपमहापौर :-** बरोबर आहे. भुसंपादीत केलेली ती जागा भौगोलिक दृष्टया योग्य होती का ?

**श्री.ईब्राहिम पटेल :-** आपले खुले भुखंड किती पडलेले आहेत. आपण शाळा बंद करतो आहे लोकांना देतो आहे. त्याचे आरक्षणाची ही चौकशी करा.

**मा.महापौर :-** भुसंपादन करते वेळेस संबंधीताला टी.डी.आर.घेण्यासाठी प्रशासनाने बोलवावे आणि त्याचा जो वाद असेल किंवा चर्चे अंती येणारा जो निर्णय असेल तो पुढच्या महासभेमध्ये ते सन्मा.सदस्यांसाठी पुन्हा महासभेत आणावा. आणि विषय क्र.६ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे. सविस्तर प्रस्ताव पुढच्या महासभेमध्ये सन्मा.सदस्यांना अवगत करुन द्यावा. विषय क्र.६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मंजुर विकास योजना (वा.ह) आव्हाणे गट नं.७६०/१ मधील आरक्षण क्र.२८,गार्डन बाबत, रिट याचिका क्रं.३९४७/२०२० मध्ये मे.उच्च न्यायालय मुंबई औरंगाबाद खंडपिठाने दि.२१/०२/२०२२ रोजी दिलेल्या निर्णयानुसार विहीत कालावधीत भूसंपादनाची प्रक्रिया पुर्ण करणेसाठी महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पहाता या जमिनीचे भूसंपादन कामी जमिन मालक यांना टी.डी.आर देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:- ५४** | **प्रतिकुल मते :- ००** | |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** | | |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** | | |

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ७) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० अ मधील तरतुदीनुसार मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरण्यातून सुट देणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौरताई, प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा. कारण सुट दिल्याने पहिल्यांदा ऐवढया मोठया प्रमाणावरती महानगरपालिकेच्या चारही प्रभागात घरपट्टी मध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाल्याची दिसुन येते. परंतु काय झालेले आहे की, अजुन सर्व्हेक्षणचे काम आणि बिल वाटपाचे काम त्याच्यामध्ये बऱ्याच नागरीकांच्या बऱ्याच काही तक्रारी येत आहे. त्या तक्रारींचा निपटारा होण्याच्या दृष्टीकोणातुन अजुन ही बरेच नागरीक जे आहे ते या सुविधेचा लाभ घेण्यापासुन वंचित आहे. कारण बिलच त्यांचे डिस्प्युटेड असल्या कारणाने अंतिम झालेला नसल्याने माझी आपणास विनंती आहे की, ३१ जुन पर्यंत पुन्हा मुदतवाढ देण्यात यावी. ही सभागृहाला विनंती आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** विनंती आहे की, वाढीव घरपट्टीचे जी आपण बिले दिलेली आहेत. तीन महिने चार महिने त्यांना आपण दंड लावुन दिलेला आहे. एकतर कर माणसाने भरला एप्रिलमध्ये १०% सुट घेवुन एप्रिल, मे, जुन म्हणजे जी ऑक्टोबर, नोव्हेंबर पर्यंत सुट होती. तो पर्यंत नागरीकांनी भरुन दिली. आणि त्याच्यानंतर आपण त्यांना नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी मध्ये वाढीवचे बिले दिले तिन महिन्याचे, आणि तिन महिन्याचे चार महिन्याचे जे काही वाढीव बिले दिले. त्याच्यावर त्यांनी दंड लावुन टाकला, हे जळगांव शहराचे लोकांवर थोडसे अन्यायकारक आहे. त्यालाही माझे म्हणणे असे आहे की, या तारखेमध्ये सुट देण्यात यावी.

**मा.महापौर :-** जळगांवच्या तत्कालीन नगरपालिकेमध्ये सुध्दा या गोष्टी आढळल्या आहे की नागरीक १०% रिबीटसाठी सुरुवातीलाच मालमत्ता कर भरतात. परंतु आपण त्यांना वाढीव जे कर नंतर दिलेले आहेत. आणि त्यावर आपण त्यांना रिबीट देत नाही.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** त्यांना संधी दिली पाहिजे ना.

**मा.महापौर :-** त्यावर आपण त्यांना रिबीट देत नाही आणि दंड सुध्दा आकारतो आहे. तर हे एक प्रकारचे चुकीचे लक्षण आहे. तर त्यावर सुध्दा आपण रिबीट द्यायला हवे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दंड आकारत नाही ताई.

**मा.महापौर :-** पण त्यावर आपण रिबीट सुध्दा देत नाही. रिबीट आपण त्यावर देत नाही ना.

**मा.आयुक्त :-** उपायुक्त महसुल याबद्दल डिटेल्स सांगुन द्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** दुसरा विषय आता चार दिवसा पुर्वीचा, रु.२५०००/- मागचे थकित आहे. आणि चालु वर्षाचे रु.२५०००/- आहे. तर ते पुर्ण रु.५००००/- भरायला तयार आहे. मी साहेबांशी पण फोन करुन बोललो होतो की, त्यांना सुध्दा १०% रिबीट मिळायला पाहिजे. शेवटी मालमत्ता करच आहे ते पण. साहेबांनी हो सांगितले पण तेथे प्रभाग अधिकारी किंवा कर्मचारी म्हणतात की, आम्हाला आदेश नाही. जर कोणी स्वत:हुन खुला भुखंड कर भरायला येतो आहे एप्रिल महिन्यात. आपल्या सुटच्या कालावधीत जर कधी तो येत आहे तर आपण त्याला

सुट दिली पाहिजे. अशी माझी सभागृहापुढे विनंती आहे. एकतर खुला भुखंड वसुल होत नाही. लोकं येऊन स्वत:हुन भरायला तयार आहे तर त्यांना आपण संधी दिली तर आपला वसुलीचे प्रमाण पण वाढेल.

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त (महसुल) :-** सर आपण त्या वाढीव रकमेवर आपण दंड लावलेला नाही. आणि मात्र त्याला रिबीट देता येणार नाही आपल्याला, कारण की, १४०(अ) मध्ये जी तरतुद आहे. ती मालमत्ता कर जर अगावु भरणा करत असेल मालमत्ता धारक तर त्यासाठी सुट देता येते. त्यामुळे आपण यावर्षी बिले फेब्रुवारी मार्च मध्ये दिलेले आहे. त्यामुळे तो कर अगावु भरलेला आहे असे म्हणता येणार नाही. कारण वर्षभरामध्ये पहिल्या ६ महिन्याचा जो कर आहे तो १ एप्रिल ला देय होतो आणि पुढचा जो ६ महिन्याचा कर आहे तो १ ऑक्टोबरला देय होतो. त्याच्या आधी जर भरणा झालेला असेल तरच ते अगावु भरणा झालेला आहे असे म्हणता येईल. त्यामुळे आपल्याला त्याला रिबीट देण्यात अडचण येईल.

**मा.महापौर :-** पण अगावु देयक त्यांना मिळालेले नाही तर ते अगावु कसे भरणार.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** त्यात नागरीकांचा काय दोष त्यांना संधी तर मिळाली पाहिजे ना. त्याला संधी मिळाली पाहिजे त्यात नागरीकांचा काय दोष.

**मा.महापौर :-** आपण धोरण आखायला हवे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नागरीकाला तुम्ही सुट पासुन वंचित ठेवतात असा त्याचा अर्थ निघतो. प्रशासनाने

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त (महसुल) :-** महानगरपालिका अधिनियमामध्ये आहे, ज्यावेळेस आपण त्यांना पहिले बिल दिले. त्याच्यावर पण आपण नमुद केलेले होते की, फेरमुल्यांकनाची प्रक्रिया सुरु आहे. याच्यामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपल्याला सुधारीत बिल देण्यात येईल. त्यामुळे हा ठरावीक बिल जर नंतर केले गेला असेल. त्यामुळे त्याला ते बिल ॲडव्हान्स भरता आले असते.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी तेच म्हणत आहे ना साहेब की, ती प्रक्रिया जर आपल्याकडुन उशीरा झालेली आहे तर त्याला नागरीकांनी का सफर व्हावा.

**श्री.प्रशांत पाटील, उपायुक्त (महसुल) :-** नाही, कायद्याच्या तरतुदीनुसार वर्षभरामध्ये एवढेच बिल सुधारीत करुन देऊ शकतात.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो ना साहेब पण त्याला १०% रिबीटची सवलत किंवा ५% रिबीटची सवलत ती पण मिळाली नाही. त्याला नाही मिळाली त्यानी एप्रिल महिन्यालाच भरुन दिले ऑलरेडी. कारण त्याला वाटले की, आपण भरुन राहिलो आहे. त्याला बिल न मिळता अगाऊ भरलेले आहे त्याने.

**मा.आयुक्त :-** कायद्यात तरतुद...

**श्री.नितीन लढ्ढा :-** काही तरी कायद्याला धरुन मार्ग निघत असेल तर तसा प्रयत्न करा. आग्रह नाही परंतु नागरीकांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोणातुन कायद्याची अडचण न येता मार्ग निघत असेल तर तेवढा विचार करावा.

**मा.आयुक्त :-** किती अमाऊंट निघेल ते, आणि मग सन्मा.सदस्यांसमोर मांडु ते.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** खुला भुंखडासाठी त्यालाही ही तरतुद लागु आहे तर त्याला ही सुट मिळेल.

**मा.आयुक्त :-** राईटींगमध्ये आदेश द्या सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना, विशाल भाऊ आपण राईटींगमध्ये आदेश देऊ या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** सर्व प्रभाग अधिकाऱ्यांना आदेश द्या राईटींगमध्ये.

**मा.आयुक्त :-** यस.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ३० जुन पर्यंत मुदतवाढ देण्यात यावी.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** ३० जुन पर्यंत मुदतवाढ करुन विषय क्र.७ ला सर्वानुमते मंजुरी देण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८१० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १४० अ मधील तरतुदीनुसार मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यत: पात्र असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर त्या प्रयोजनाकरिता बिलांत विनिर्दीष्ट केलेल्या दिनांकापुर्वी भरत असेल किंवा असा कर संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर तिला महानगरपालिका सर्वसाधारण आदेशाव्दारे निर्धारित करिल अश्या दराने

मालमत्ताकर भरण्यातुन सुट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्यांच्या वेगवेगळया वर्गाकरिता अशी सुट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील.

वरिल तरतुदींनुसार यापुर्वी महासभा ठराव क्र.३२१ दि.१३/०८/२००९ अन्वये

१. मालमत्ताकराचा संपूर्ण वर्षाकरिता दिनांक ३० एप्रिल पर्यंत पुर्ण भरणा केल्यास ७% रिबेट
२. अ) १ एप्रिल रोजी देय होणाऱ्या हप्त्याची रक्कम ३० एप्रिल पर्यंत भरणा केल्यास ५% रिबेट
   ब) १ ऑक्टोंबर रोजी देय होणाऱ्या हप्त्याची रक्कम ३१ ऑक्टोंबर पर्यंत भरणा केल्यास ५% रिबेट
३. देयकांत नमुद रक्कम देयक दिनांका पासुन भरणा केल्यास किंवा मागणी सुचना मिळण्यापुर्वी भरणा केल्यास ३% रिबेट अशा प्रकारे सुट देणेबाबत ठराव पारित करण्यात आलेला होता. तद्नंतर म.स्थायी समिती ठराव क्र.२१७ दि.१८/०२/२०१५ अन्वये,

एप्रिल महिन्यात मालमत्ताकराचा भरणा करणाऱ्या नागरीकांस ७% सुट देण्यात येते त्याऐवजी ८% सुट देणे बाबत प्रशासनाने सुचविले असता, त्याऐवजी सदरची सुट १०% करणे बाबत ठराव पारित करण्यात आला. तद्नंतर सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक म.स्थायी समितीकडे सादर करतांना आयुक्त यांनी खालील प्रमाणे सुट देणेबाबत प्रस्ताव सादर केला असता,

१. मालमत्ताकराचा संपूर्ण वर्षाकरिता दिनांक ३० एप्रिल पर्यंत पुर्ण भरणा केल्यास १०% रिबेट
२. ३१ जुलै पर्यंत मालमत्ताकराचा भरणा करणाऱ्या मिळकतधारकांना ७% रिबेट
३. १ ऑगष्ट ते ३१ ऑक्टोबर पर्यंत मालमत्ताकराचा भरणा करणाऱ्या मिळकतधारकांना ५%
४. १ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर पर्यंत मालमत्ताकराचा भरणा करणाऱ्या मिळकतधारकांना ३% रिबेट

स्थायी समिती ठराव क्र.४३४ दि.२८/०४/२०१६ अन्वये आयुक्त यांचे प्रस्तावांस मान्यता प्रदान केलेली होती.

आर्थीक वर्ष २०२१-२२ मध्ये मालमत्ताकराचे फेरमुल्यांकन करुन सुधारित मागणी देयकांचे वाटपाचे काम मार्च २०२२ च्या शेवटच्या आठवडयात करण्यात आलेले आहे. त्यामुळे मिळकतधारकांत सदर बिलांबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे. तसेच जवळ-जवळ २० वर्षानंतर फेरमुल्यांकन झालेले असल्याने मालमत्ताकरांत वाढ झालेली आहे. त्यामुळे सन २०२२-२३ साठी मालमत्ता कराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकतधारकांनी मालमत्ताकर व पाणीपट्टी कराचा भरणा दि.३१/०५/२०२२ पर्यंत केल्यास १०% सुट अनुज्ञेय करणे योग्य होईल त्यामुळे मालमत्ताकर व पाणीपट्टी कराच्या वसुली वर सुध्दा चांगला परीणाम होईल त्यामुळे सदर सुट अनुज्ञेय करणेस तसेच दि.०१/०६/२०२२ ते चालू आर्थिक वर्षाचे मागणी देयक बजाविल्यापासून १५ दिवसांत भरणा केल्यास ५% सुट अनुज्ञेय करता येईल. मात्र कराचा भरणा करणे कामी संबंधीत मिळकतधारकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड, प्रकरण आठ, कराधान नियम ४१ मधील तरतूदीनुसार थकीत करावर शास्तीची आकारणी करणे बंधनकारक आहे. असे प्रस्तावात नमूद केले आहे.

तथापी सभागृहात झालेल्या चर्चेनूसार मे.स्थापत्य कंपनी मार्फत करण्यात आलेल्या सर्वेक्षणात हरकतीवर निर्णय घेणे सुरु असल्याने व ज्या मिळकत धारकांनी अपील दाखल केले असुन त्यावर निर्णय झालेला नसल्याने असे मिळकत धारक १०% सुट पासुन वंचित राहू नये म्हणून सन २०२२-२३ साठी मालमत्ता कराचा आगाऊ भरणा करणाऱ्या मिळकतधारकांनी मालमत्ताकर व पाणीपट्टी कराचा भरणा दि.३०/०६/२०२२ पर्यंत केल्यास १०% सुट अनुज्ञेय करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच दि.०१/०७/२०२२ ते चालू आर्थिक वर्षाचे मागणी देयक बजाविल्यापासून १५ दिवसांत भरणा केल्यास ५% सुट अनुज्ञेय करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे मात्र कराचा भरणा करणे कामी संबंधीत मिळकतधारकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची ड,

प्रकरण आठ, कराधान नियम ४१ मधील तरतूदीनुसार थकीत करावर शास्तीची आकारणी करणे बंधनकारक आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ८) महिलांच्या नावे असलेल्या राहत्या निवासी मिळकतीस ५% अतिरीक्त सुट मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**मा.महापौर :-** आता याच्यात चर्चा करण्याची काही आवश्यकता नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** चर्चा करण्याची आवश्यकता कशी काय नाही. आता याच्यामध्ये महिला आणि पुरुषांच्या नावे समाईक असेल. प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.महापौर :-** शासनाकडुन तसा आदेश दिला गेलेला असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आलेला आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मी अभिनंदन करतो की, सभागृहाने मागणी न करता, आयुक्तांनी प्रशासकीय प्रस्ताव महापौरांकडे,प्रशासकीय प्रस्ताव सभागृहापुढे पहिल्यांदा सुटचा आला आहे. कोणी मागणी न करता. त्याच्यामुळे तुमचे सगळयांचे अभिनंदन.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मागणी करतांना मा.महापौरताईंची कल्पना होती की, महिला महापौर असल्याकारणाने आणि महिला आयुक्त असल्याकारणाने या शहराच्या महिलांना कुठेतरी न्याय देण्याचा त्यांचा एक प्रयत्न आहे. आणि चांगलाच असा प्रयत्न आहे. निश्चितपणे यातील फायदा जो आहे या घरपट्टीच्या अनुषंगाने सुध्दा होईल. स्वार्थातुन प्रमार्थ साधण्याचा जो एक प्रयोग आहे तो चांगला आहे. कमीत कमी काय होईल.त्याअनुषंगाने महिला आपल्या नांवावर घरपट्टी लवकर भरण्याच्या संदर्भात कारण महिलांकडुन पैसा लवकर सुटत नाही.

**मा.महापौर :-** आणि पुरुष सुध्दा महिलांच्या नांवावर घरे करतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सुनिल भाऊ ही धोक्याची सुचना तुमच्यासाठी आहे. घरी चालु देत नाही म्हणुन सभागृहात बोलुन घेता वहिणी.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८११ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.महापौर सो, सौ.जयश्रीताई सुनिल महाजन यांचेकडील पत्र जा.क्र./ज.श. म.न.पा./म.का./३७/ दि.१०/०५/२०२२ रोजी प्राप्त झालेले असून सदर पत्रात पूढील प्रमाणे नमुद आहे " देशात महिला सबलीकरणासाठी तसेच त्यांना समान हक्क/संधी उपलब्ध करुन देणेसाठी केंद्र शासन व राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाव्दारे विविध योजना जसे, मोफत शिक्षण, मातृवंदना, उज्वला योजनांतर्गत मोफत गॅस कनेक्शन तसेच महिलाच्या विशेष कार्याबद्दल विविध पुरस्कार देवुन त्यांना प्रोत्साहीत करीत आहेत. जळगांव शहरातील महिलांचे जिवनमान उंचावणे त्यांचा सन्मान वाढविणेच्या दृष्टीने जळगांव शहर महानगरपालिकेकडून देखील विविध योजना राबवित आहे. या अंतर्गत जळगांव शहर मनपा कडून देखील महिलांसाठी काही करांमध्ये सुट दिल्यास शहरातील महिलांकडे स्वत:च्या नावे असलेल्या हक्काच्या मालमत्ता उपलब्ध होवू शकते.

करीता आपणांस सुचित करण्यात येते की, उपरोक्त नमूद कारणास्तव जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे शहरातील महिलांच्या नांवे असलेल्या मालमत्तांच्या करांत किमान ५ टक्के सूट देणे संदर्भात धोरणात्मक निर्णय घेणेचा प्रस्ताव येत्या महासभेच्या पटलावर सादर करणे बाबत संबंधीतांना आदेश व्हावेत " असे नमुद आहे. तसेच सदर पत्रावर उपायुक्त महसुल यांनी प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ कडेस "त्वरीत कार्यवाहीस्तव" असे निर्देश दिलेले आहेत.

सदर पत्राच्या अनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदींचा विचार केला असता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १४० (अ) मध्ये खालील प्रमाणे नमुद आहे.

“१४०-अ.मालमत्ता कराची रक्कम आगाऊ भरण्यातून सूट.-

या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यत: पात्र असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर त्या प्रयोजनाकरिता बिलांत विनिर्दीष्ट केलेल्या दिनांकापुर्वी भरत असेल किंवा असा कर संपुर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर तिला महानगरपालिका सर्वसाधारण आदेशाव्दारे निर्धारित करिल अशा दराने मालमत्ताकर भरण्यातुन सुट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्यांच्या वेगवेगळया वर्गाकरिता अशी सुट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील.”

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील उक्त तरतुदीअन्वये महिलांचे नावे असलेल्या फक्त एका रहात्या निवासी मिळकतीस मालमत्ताकरात (राज्य शासनाचे कर वगळून) अतिरिक्त ५% सूट खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

१. महिलांच्या नावे असलेल्या मिळकती की ज्या सदर महिलेच्या राहत्या व निवासी आहेत.
२. भाडयाने दिलेल्या मिळकतीस तसेच अनिवासी वापराच्या मिळकतीस सदर सुट लागु राहणार नाही.
३. सदर मिळकतीवर कोणत्याही प्रकारची थकबाकी असता कामा नये.
४. शहरातील कोणत्याही फक्त एकाच मिळकतीवर सदर सुट देय राहील.
५. सदर मिळकतीचे मालकी हक्काचे कायदेशीर कागदपत्रे महानगरपालिकेकडेस सादर केल्यानंतर सदर सुट देय राहील.
६. सदर मिळकत ही केवळ महिलेच्या नांवे असावी ती संयुक्त रित्या पुरुष व महिला यांचे नांवे नसावी.

तथापी सन २०२२-२३ मध्ये आज पर्यंत खालील तक्त्यात नमुद मिळकतधारकांनी १०% सुटचा लाभ घेतलेला आहे.

| प्रभाग समिती क्रमांक | भरणा केलेल्या मिळकतधारकांची संख्या | भरणा केलेली रक्कम |
|---|---|---|
| १ | ४८१९ | ४४८४११८४ |
| २ | २६२१ | १९०९५३४१ |
| ३ | ३२४० | २६०६८३६२ |
| ४ | ५४९० | ४०३९२६१८ |
| एकुण | १६१७० | १३०३९७५०५ |

उक्त तक्त्यात नमुद मिळकतधारकांपैकी काही मिळकतधारक उक्त नमुद बाबींची पुर्तता करणारे असण्याची शक्यता असल्याने त्यातील पात्र मिळकतधारकांना वरिल सवलतीचा लाभ देणेस व त्यानुसार पुढील वर्षाच्या देयकात समायोजनास मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच सदर अतिरिक्त सुट फक्त कलम १४० अ नुसार दिल्या जाणाऱ्या १०% सुटचा कालावधी असेल त्याच कालावधीत देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ९) मनपा मालकीच्या मेहरुण स.नं.५०९ व पिंप्राळा गट नं.२६१ व २६० (पार्ट) येथे ८६१ घरकुल बांधण्याचा प्रस्ताव MHDC कडे हस्तांतरित करण्याबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जमिनी हस्तांतरीत करण्याच्या संदर्भातला हा प्रस्ताव आहे. यापुर्वी या सभागृहाने हे धोरण ठरविलेले होते. परंतु त्या धोरणाच्या अनुषंगाने म्हाडाने पुन्हा त्याच्यामध्ये आपल्याकडुन एक वेगळी मागणी केलेली आहे की, या जमिनींना विकसीत करण्याच्या दृष्टीकोणातुन लागणारा विकास शुल्क सुध्दा माफ करण्यात यावा. साधारणता विकास शुल्काच्या बाबतीत माहिती घेतली, तर साधारणता ३० ते ३५ लाख होते. परंतु मला या विषयालाच थोडेसा आक्षेप आहे. कारण याच्या संदर्भातला या जमिनी ज्यावेळेला विकसीत करण्याच्या

दृष्टीकोणातुन आपण म्हाडाकडे हस्तांतरीत करु. म्हाडा खाजगी बिल्डींगाच्या माध्यमातुन या घरकुलांचा डेव्हलपमेंट करेल. रेसिडेंशियल आणि कमर्शियल अश्या पध्दतीने त्या बिल्डींगची व्हॅल्युजी आहे ती पाहिली जाईल. परंतु हे सगळे करत असतांना त्याच्यात महानगरपालिकेला काय मिळणार. महानगरपालिकेला रेडीरेकनरच्यानुसार होणारी जी किम्मत आहे. तेवढीच फक्त महानगरपालिकेला मिळणार. आणि ती ही केव्हा मिळणार टप्प्या टप्प्याने, आज महानगरपालिकेने आपल्या मालकीच्या जमिनी या म्हाडाला विकसीत करण्याच्या संदर्भात हस्तांतरीत करायचे विकास शुल्कात प्रथमत: सुट द्यायची आणि विकासक त्या इमारतींचा विकास करेल. सुरुवातीला एक दोन कोटी काही तरी आपल्याला देईल. आणि जवळपास आपल्याला ३६ हप्त्यामध्ये एक एक कोटी प्रमाणे आपल्याला ती रक्कम जी काही तयार होईल. त्या पध्दतीने आपल्याला मिळेल. साधारणता या जमिनीचा जो प्रस्ताव आलेला होता. तो प्रस्ताव साधारणता काही १९ कोटीच्या जवळपास या जमिनीतुन मोबदला मिळेल.आता या दोघी व्यापारी रित्या कितपर्यंत योग्य नाही की, ज्या वेळेला आपण जमिनीचा भुसंपादन करतो. त्यावेळेला रेडीरेकनरच्या दुप्पट दराप्रमाणे पैसा आपण जमिन मालकाला देतो त्याच्यानंतर सुध्दा तो ट्रिब्युनल मध्ये जातो आणि वाढीव मोबदल्याची सुध्दा मागणी करतो. म्हणजे देतांना दोन हाताने द्यायचे आणि घेतांना एक हाताने घ्यायचे. अश्या पध्दतीचा तो प्रस्ताव आहे. आज या कोट्यावधी रुपये किमतीच्या बाजार भाव आज मला सांगा, जळगांवातली कोणत्याही भागातली जमिन रेडीरेकनरने महानगरपालिकेला खरेदी करायची असेल किंवा या सभागृहातल्या सदस्याला खरेदी करायची असेल. तर रेडीरेकनरच्या किमतीमध्ये कुठलीच जमिन मिळणार नाही. कारण रेडीरेकनर हे फक्त मुद्रांक शुल्क ठरविण्यासाठी केलेला एक नियम आहे. वास्तविक त्या जमिनीचे मुल्य त्याच्या किती तरी पटीने जास्त होत असते. तर मला वाटते हे अव्यवहारीक असा प्रस्ताव आहे. मला वाटते सभागृहाने अश्या पध्दतीचा प्रस्ताव मान्य न करता या जमिनींच्या बाबतीतले महानगरपालिकेचे आर्थिक हित कश्या पध्दतीने जोपासले जाईल. त्या दृष्टीकोणातुन प्रयत्न केले पाहिजे. जेणे करुन या कोटयावधी रुपयाच्या जमिनी ज्याचे आपण कोट्यावधी रुपये भुसंपादनाचे मोजलेले आहे. घरकुल योजना राबवायची असेल. शासकीय जमिन असेल शासकीय जमिनींवर महानगरपालिकेने आरक्षण प्रस्तावीत करावे आणि शासकीय जमिनींवरती आज जसे तांबापुरची जमिन आहे. ती शासकीय जमिन आहे. तश्या बाबतीत काही योजना असेल तर ती राबविली गेली पाहिजे कारण ती जमिन महानगरपालिकेने कुठलाच त्याच्या बाबतीतला मोबदला दिलेला नाही. परंतु या जमिनी कोट्यावधी रुपयांचा मोबदला देऊन आणि कालंतराने नाममात्र पैसा घेऊन हस्तांतरीत करणे हे कदापी योग्य नाही. तर मला वाटते की हे प्रस्ताव अमान्य करण्यात यावे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** माझी एक सुचना आहे. आमच्या मेहरुण भागातीलच जागा आहे. आपण त्यांना न देता म्हणजे आपण त्यांना दिली तर काहीच साध्य होणार नाही. तर ती जी जागा आहे फार मोठी जागा आहे. जर आपण ती जागा लिलावाने, ज्याची बोली जास्त आली, जनरल लिलाव काढले तर पैसे जास्त येतील. सुचना आहे. असे आपण मांडवली मध्ये म्हणतो की होऊन जाईल, तर डायरेक्ट लिलाव करण्यात यावा. जो जास्त बोली बोलेल समोरासमोर त्याला ती जागा द्यायची. म्हणजे कमीत कमी आपण कर्ज मुक्त ही होऊ आणि त्यामध्ये रस्तेचे आणि जळगांवचे धुळगांव म्हणुन नाव लौकिक झालेले आहे. ते पुसता येईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** ईबा भाई, वो भंगार बाजार की जागा तु लिलाव मे लेले यार. लिलाव मे लेले ना महापालिका को ज्यादा पैसे दे दे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** बिल्कुल, आप्पा आपला प्रस्ताव आहे महानगरपालिकेने मान्य करावा. लिलाव पध्दतीने जो जास्त पैसे देईल तो घेईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** सुचना माझी होती तुमचा विरोध होता. ऐकुन घ्या पुर्ण ऐकुन घ्या. तुम बोले, गरीब लोग है. असे तुम्ही म्हणत होते आणि त्या लोकांना तुम्ही चिथावणी देत होते. मी तुम्हाला आज ही सांगतो. तुम्हाला तुमचे बहुमत आहे. महापौर तुमच्या पक्षाचे आहे. तुम्हाला करता येत असेल तसे तर करुन टाका. माझा झालेला ठराव रद्द करुन टाका. करता येत असेल जर तुम्हाला, मी त्या वेळेस योग्य होता म्हणजे होते. आज तुमचे बहुमत आहे तुम्ही करुन पहा.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** नाही नाही, आप्पा,

**श्री.कैलास सोनवणे :-** ईबा भाई, तुमने क्या किया वो ठराव का चित्रीकरण कर के तुम्हारे मुस्लीम लोगो मे डाल दिया.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** किनोने, किसने किया.

**श्री.कैलास सोनवणे :-** किया है तुमने, तुमने व्हॅटसअप पे चॅटींग किया क्या क्या किया सब है मेरे पास मे. आणि तुम्ही काय केले माझी बदनामी करुन टाकली समाजामध्ये. हाला की मी माझ्या नियमाने होतो. आज तुम्ही त्याच भुमिकेशी आहे, आज तुम्ही माझ्या जागी आहे. मी जे बोललो होतो तेव्हा ते तुम्ही आज बोलत आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** त्या व्यक्तीचे नाव द्या टाकले असेल तर, त्यावेळेची भुमिका जी होती तांबापुरची फकटपुरा ते त्या जागा मालकाने जागा खाली करुन दुसरी जागा देणार होते.

**श्री.कैलास सोनवणे :-** इबा भाई एक मिनीट ऐकुन घ्या. वाद घालायचा नाही. वाद घालायचा नाही.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** सभागृहाची दिशाभुल करु नका ही.

**श्री.कैलास सोनवणे :-** दिशाभुल नाही, जे खरे आहे ते खरे आहे

**मा.महापौर :-** सर्व सन्मा.सदस्यांनी खाली बसुन घ्यावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** लिलाव केले तर जास्त पैसे येतील पण आपल्याला तसे करता येते का ते पाहुन घ्या पहिले.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हे महानगरपालिकेचे दुरदैव आहे की, अश्या जागांमुळे महानगरपालिकेचे जे आहे कोट्यावधी रुपये जे आहे ते अळकुन पडलेले आहे. आज मला सांगा खाजा मियाची जागा आहे. कोट्यावधी रुपयांची जागा आहे. मोठया प्रमाणावरती झोपडपट्टी होती. त्यावेळेला मोठी हिम्मत करुन आमचे आदरणीय नेते सुरेशदादा यांनी खुप मोठा विरोध केला, तेथे गोळीबार झाला दोन लोकं मृत्युमुखी पडले. ती जागा खाली केली गेली. आज ती जागेची परिस्थिती काय आहे. उलटपक्षी त्या जागेचा मक्तेदार आज उच्च न्यायालयात जाऊन उच्च न्यायालयातुन आर्बीट्रेशन अपॉईंट करुन आला. आर्बीट्रेशन अपॉईंटमेंट करुन आणल्यानंतर आर्बीट्रेटरकडे त्यांनी नुकसान भरपाईची रक्कम किती क्लेम केलेली आहे ताई ४२ कोटी रुपयाची नुकसान भरपाईची रक्कम क्लेम केलेली आहे.मी मा.आयुक्त महोदयांना लक्षात आणुन दिलेला आहे तो विषय की, येथे कुठेतरी आपली बाजु जी आहे ती कमजोर पडते. आणि कोटयावधी रुपयाची जागा आपल्या. अविकसीत पडुन राहतात.अश्या पध्दतीने न्यायालयीन खटले सुरु होतात. न्यायालयामध्ये आर्बीट्रेशन म्हणजे काय ? एक प्रकारे ठरवुन चाललेला खेळ असतो. कारण आर्बीट्रेशन मध्ये निवृत्त न्यायाधीश असतात आपण त्यांच्यावर आरोप करणे चुकीचे आहे. परंतु मोठया प्रमाणावरती आर्थिक विषय तेथे हाताळले जातात.महानगरपालिका संस्था या नात्याने कुठल्याही वाम मार्गाने पैसा तेथे ऑफर करु शकत नाही. परंतु जो कोणी समोरची व्यक्ती असते. त्याचा कोट्यावधी रुपयांचे हित त्याच्यामध्ये दडलेले असते. आणि तेथे लाखो रुपयांचा खेळ होतो. आणि अश्या बाबतीत बरेच निवाळे हे महानगरपालिकेच्या विरोधात जातात. आणि महानगरपालिकेवरती कोट्यावधी रुपयाचा कायदेशीर रित्या भुर्दंड हा पडत असतो. आणि कोट्यावधी रुपयाचा भुर्दंड महानगरपालिका ही सोसत असते. तर या बाबतीत ज्या ज्या काही आपल्या मालमत्ता अश्या आहे. कोट्यावधी रुपयाचे मालमत्ता आहे. सभागृहातील सर्व सदस्य २५-५० लाख रुपयाच्या कामासाठी आपसात भांडतात. रोज प्रशासनाशी भांडतात. २-२, ५-५ लाखासाठी प्रशासनाशी वेगळी मांग करतात. परंतु कोट्यावधीचे अश्या वेगळया मालमत्ता ज्या अत्यंत दुर्लक्ष पध्दतीने पडलेल्या आहे. यांच्याबाबतीत आयुक्त महोदया, आपण कॅनसंट्रेट करा. मी निश्चितपणे म्हणतो. या महानगरपालिकेला पुन्हा सोन्यासारखे दिवस यायला वेळ लागणार नाही. कारण या सगळया अनुत्पादीत पडलेल्या आहे. कोणी तरी त्याचा गैरवापर करत आहे. तर याच्यातुन कोट्यावधी रुपयाचा निधी आपण निर्माण करु शकतो. या शहराचे वैभव जे आहे ते पुन्हा प्राप्त करु शकतो. म्हणुन आपण कुठेतरी याच्या संदर्भात एक दोन जबाबदार अधिकाऱ्यांना नेमुन महानगरपालिकेच्या ज्या ज्या काही मालमत्ता असतील त्याच्या बाबतीत काही मालमत्तांवर आरक्षण असतील. ती आरक्षणे आज आपल्याला वाटत असतील की, ही आरक्षणे विकसीत करुन महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होणार नाही. तर असे आरक्षणाचे प्रस्ताव ३७ चे प्रस्ताव फेरबदलाचे प्रस्ताव आणा. सरकार आपले आहे. पालक मंत्री आपले आहे, नगरविकास मंत्री आपले आहे. अश्या पध्दतीने ३७ चे फेरबदलाचे प्रस्ताव करुन त्याची आरक्षणे बदलुन अश्या मालमत्त्याच्या माध्यमातुन कोट्यावधी रुपयाचे उत्पन्न या महानगरपालिकेला प्राप्त होईल. अश्या पध्दतीने काही नियोजन केले तर मी म्हणतो की, स्मार्ट नियोजन होईल.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्र.९ सर्वानुमते अमान्य करण्यात येत आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** हा ठराव अमान्य.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा ठराव अमान्य करावा. त्याच्या अनुषंगाने यापुर्वीचा जे धोरण ठरविलेले असेल आपण म्हाडाला देण्याच्या बाबतीतला, आता तर त्यांनी विकास शुल्क मध्ये सुट मागण्याच्या संदर्भात हा प्रस्ताव दिलेला आहे. तर तो जो मुळ प्रस्ताव आहे, तो मुळ ठराव सुध्दा अमान्य करण्यात यावा.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य नितीनभाऊंनी केलेल्या सुचनांचा प्रशासनाने अनुपालन करावे. आणि विषय क्र. ९ हा सर्वानुमते अमान्य करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८१२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा मालकीच्या मेहरुण स.नं.५०९ व पिंप्राळा गट नं.२६१ व २६० (पार्ट) येथे ८६१ घरकुल बांधण्याचा प्रस्ताव MHDC कडे हस्तांतरित करण्याबाबत महानगरपालिकेचे आर्थिक हीत पाहता प्रशासनाचा प्रस्ताव अमान्य करणेत येत आहे.

**सर्वानुमते नामंजुर**

| | | | |
|---|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:- ५४** | **प्रतिकुल मते :- ००** | |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** | | |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** | | |

**नगरसचिव :- विषय क्रं:-** १०) जिल्हयातील गावांची वस्त्यांची व रस्त्यांची जातीवाचक नांवे बदलुन नविन नावे देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांनी पर्याय दिलेले आहेत. त्यानुसार हे त्या भागातील नगरसेवकांना व रहिवाश्यांना विचारण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** सरसकट सगळे शहराचे रद्द करायचे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तसा शासनाचा निर्णयच आहे. शासनाचे धोरणच आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही निर्णय आहे परंतु आप्पांचे म्हणणे असे आहे. जो नगरसेवक त्या भागातील आहे त्यांना विचारण्यात यावे.

**मा.उपमहापौर :-** ज्या ठिकाणी महापुरुषांचे नावे दिले असतील, चौक असतील, रस्ते असतील, त्या ठिकाणी जर वाद नसतील तर मला वाटते त्या ठिकाणी बदलण्याची गरज नाही.

**मा.महापौर :-** जातीवाचक नांवे बदलवायचे आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाने जो पर्याय सुचविलेला आहे, जर तीन नावांचा पर्याय सुचविलेला असेल त्यापैकी दुसरे नाव बदलण्याच्या संदर्भात अंतिम करावा, त्या त्या भागातील नगरसेवकांनी, जे चार नगरसेवक असतील त्यांनी आणि स्थानिक नागरीकांनी विचार विनीमय करुन तशा सुचना प्रशासनाकडे द्याव्या. आणि प्रशासनाने तो निर्णय अंतिम करावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** आता काय आहे याच्यामध्ये टेक्नीकली, आता भिलपुरा असा भाग आहे, तेथे एकपण भिल समाजाचा कोणी राहत नाही तेथे पुर्ण मुस्लीम वस्ती त्या ठिकाणी आहे. तेथे एकलव्य सोसायटी आहे काही तरी, तर हे टेक्नीकली फॉल्ट आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही, आप्पा आता सोनवणी साहेबांनी जसे म्हटले, या पध्दतीने जर तुम्हाला, प्रशासनाने जी नावे सुचविलेली आहे या वैतिरिक्त स्थानिक नागरीकांनी वेगळे काही नांव सुचविण्याच्या संदर्भात, तर ते सुध्दा नाव आपण सुचवु शकतात.

**मा.महापौर :-** त्या ऐरिया मध्ये राहणारे नागरीक आणि त्या ऐरियातील नगरसेवक त्यांनी संग्नमताने कोणते नाव द्यायचे तसा आपण महानगरपालिकेकडे जर निवेदन दिले. तर त्या पध्दतीने आपण त्या ठिकाणाला आपण नाव देऊ शकतो.

**मा.आयुक्त :-** जाहिर प्रकटन करु आणि त्यामध्ये नागरीक आणि सन्मा.सदस्य यांचे सजेशन घेऊ. मेहतर कॉलनी आहे त्याला काय नाव द्याचे, भिलपुरा आहे त्याला काय नांव द्यायचे. त्या त्या सन्मा.सदस्यांच्या लेटरहेडवर घेऊ. ते देतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जो काही कायदा असेल त्याच्या अनुषंगाने स्थानिकपातडीवर आपल्याला करता येईल.

**मा.आयुक्त :-** जाहिर प्रकटन करुन जर कुठले नाव सुटले असेल, ते याच्यात येईल.

**मा.महापौर :-** विषय क्र.१० सर्वानुमते मान्य करण्यात येत आहे. मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८१३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णयास अनुसरुन जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील जातीवाचक वस्त्यांची व रस्त्यांची नांवे बदलण्या कामी सर्व्हेक्षण करण्यात आले असुन त्यानुसार मनपा क्षेत्रात जातीवाचक नावे असलेलया एकुण ५९ वस्त्या/गल्ली असल्याचे आढळुन आले आहे. शासन निर्णया नुसार राज्यातील अनेक शहरातील व ग्रामीण भागातील अनेक गावांची, वस्त्यांची व रस्त्यांची नावे जातीवाचक असल्याची बाब महाराष्ट्रा सारख्या पुरोगामी राज्याला भुषणवाह नसल्यामुळे राज्यात सामाजीक सलोखा व सौदार्य निर्माण होऊन राष्ट्रीय एकात्मता वृध्दीगत होण्याच्या दृष्टीने अश्या सर्व गावांची वस्त्यांची व रस्त्यांची नावे बदलुन अश्या जातीवाचक नावांऐवजी महापुरुषांची व लोकशाही मुल्यांशी निगडीत नावे देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्या अनुसरुन विभागीय आयुक्त यांच्या अधिपत्याखाली झालेल्या बैठकीत देण्यात आलेल्या निर्देशानुसार जळगांव शहर महानगरपिलका क्षेत्रातील जातीवाचक नावे असलेल्या वस्त्या व रस्त्यांची एकुण ५९ नांवे बदलुन त्या वस्त्यांना व रस्त्यांना महापुरुषांची व लोकशाही मुल्यांशी निगडीत नावे देण्यासाठी अस्तीत्वातील नावांची यादी व दयावयाच्या नविन नावांची सुची खाली नमूद केलेप्रमाणे असुन त्या सुचीतील नावे अथवा सन्मा.नगरसेवक सुचवतील ती नांवे तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार सदर नांवे अंतिम करताना स्थानिक नागरीकांचे मत जाणून घेवून तसेच यासंबंधी दैनिक वृत्तपत्रात जाहीर प्रकटन देवून त्यानूसार नागरीक, सन्मा.सदस्य सूचवतील त्यानूसार सदर परिसरातील जाती वाचक नावे असलेल्या वस्त्या, रस्ते व चौकांना नविन नावे देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच नविन नावांना शासनाच्या राजपत्रात प्रसिध्दी देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

| अ.नं. | प्रभाग क्र. | परिसराचे नांव | जाती वाचक वस्त्यांची नावे | एकुण संख्या | सुचविण्यात येत असलेली नविन नांवे |
|---|---|---|---|---|---|
| १. | ४,५ | नवि पेठ, जुने जळगांव, बळीराम पेठ, शनिपेठ, चौघुले प्लॉट व परिसर | मेहतर कॉलनी, गवळी वाडा, भिलपुरा, सोनार गल्ली, बोहरा गल्ली, खाटीक वाडा, मोची वाडा, मांग गल्ली, गवळी वाडा, कुंभार वाडा, मारवाडी गल्ली, भट गल्ली, बागवान गल्ली, बारी वाडा, तेली चौक, ब्राम्हण गल्ली, गुजराती गल्ली, इस्लामपुरा, जोशी वाडा, सोनार गल्ली तंटयाभिल सोसायटी. | २१ | गुरु नानक कॉलनी, श्रीकृष्ण नगर, आझाद चौक, संत नरहरी नगर, महात्मा नगर, ए.पी.जे.अब्दुल कलाम नगर, संत रविदास नगर, संत गोरोबा नगर, महाविर नगर, परशुराम नगर, भारत नगर, संताजी नगर, पेशवा नगर, जय जिनेंद्र नगर, सरदार वल्लभभाई पटेल नगर, टिपु सुलतान नगर, वासुदेव नगर, संत नरहरी नगर, एकलव्य सोसायटी. |
| २. | ०९ | पिंप्राळा गावठाण | धनगर वाडा, वाणी गल्ली, जोशी वाडा, धोबी वाडा, मोची वाडा, मुसलमान वाडा | ०६ | जय मल्हार नगर, एकता नगर, संत गाडगेबाबा नगर, लोकमान्य नगर, जयहिंद नगर |
| ३. | १० | पिंप्राळा परिसर | बारी वाडा, पिंजारी वाडा, कुंभार वाडा, भिल वाडा | ०४ | अशोक नगर, स्वराज्य नगर, श्रीराम नगर, महादेव नगर, पार्वती नगर |
| ४. | | हरिविठ्ठल नगर | तडवी वाडा, वडर वाडा, धनगर वाडा, भोईवाडा, भिलाटी | ०५ | सातपुडा नगर, बद्रीनाथ नगर, नवनाथ नगर, केदारनाथ नगर, विश्वनाथ नगर, अहिल्यादेवी नगर |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५. | १४ | तांबापुरा | गवळी वाडा, भिलाटी, कंजर वाडा, पटेल गल्ली, फकीर वाडा | ०५ | राधीका नगर, यशोदा नगर, नंदलाल नगर, शिव पार्वती नगर, तिरंगा नगर, विजय नगर, अभिमान नगर, आनंद नगर |
| | | पंचशील नगर | बौध्दवाडा, पिंजारीवाडा, भीलवाडा | ०३ | रमाईनगर, इनक्लाब नगर, संदेश नगर |

| अ.नं. | प्रभाग क्र. | परिसराचे नांव | जाती वाचक वस्त्यांची नावे | एकुण संख्या | सुचविण्यात येत असलेली नविन नांवे |
|---|---|---|---|---|---|
| ६. | १६ | सिंधी कॉलनी | नाथवाडा, कंजरवाडा, सिंधी कॉलनी, नविन जोशी कॉलनी | ०४ | गुरुनाथ नगर, गोविंद नगर, राधा स्वामी नगर, गोवर्धन नगर, इंद्र नगर, सिंधु नगर |
| ७. | ०१,०२ | शिवाजी नगर | पटेल वाडी, शिखवाल नगर, कुंभारवाडा | ०३ | स्वामी नारायण नगर, निसर्ग नगर, ब्रम्हपुरी नगर, गीरणा नगर |
| ८. | १७ | | बुनकर वाडा | ०१ | संत मीराई नगर |
| ९. | ०३ | जुने जळगांव खेडी | कोळी पेठ, मन्यार वाडा, बारी नगर | ०३ | रामायण नगर, पंडीत जवाहर नगर, पार्थ नगर |
| १०. | १८ | मास्टर कॉलनी | बौध्द वाडा | ०१ | संविधान नगर, गौतम नगर |
| ११. | १९ | सुप्रीम कॉलनी | वडर वाडा, कंजर वाडा, बौध्द वाडा (सिध्दार्थ नगर) | ०३ | रेणुका नगर, विदया नगर, गोमती नगर, स्वातंत्र नगर, बालकवी नगर, कांव्याजली नगर |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :- विषय क्रं:-** ११) महानगरपालिकेच्या विविध कामकाजासाठी TATA-HITACHI-Z-AXIS140H पोकलँड मशिन मनपा फंडा अंतर्गत खरेदी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा, मला वाटते याच्या आपण काही २१० ठेवलेले आहे.

**मा.आयुक्त :-** हो, २१० ठेवले आहेत.

**मा.उपमहापौर :-** २१० कॅपॅसिटी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** २१० कॅपॅसिटीचा आहे.

**मा.उपमहापौर :-** जास्त क्षमतेचा जास्त पावर घेईल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्यांच काय जे नादुरुस्त पडलेले आहे.

**मा.आयुक्त :-** दुरुस्त करु आपण.

**मा.महापौर :-** १४० चा जे आपल्या प्रस्तावात दिलेले आहे आणि २१० दोघांच्या संदर्भात आपण व्यवस्थित माहिती घ्यावी. मला वाटते २१० चा मेनटेनन्स सुध्दा खुप येतो. तर ते आपल्याला सुध्दा परवडणार नाही भविष्यामध्ये, कारण आपल्या शहरातील जितकी कामे आहे. ज्याच्यासाठी आपण हे पोकलॅन्ड युज करणार आहेत. तर हे जे १४० आहे हे योग्य आहे. जेव्हा हे कंपनीवाले चर्चा करायला आले होते, त्याची पुर्ण माहिती आपण लुले साहेब होते, अजुन लासुरे साहेब होते यांच्या सर्वांशी चर्चा करुनच आपण या १४० वर फोकस केलेला आहे. एकदा असे वाटते की, पुन्हा चर्चा करुन घ्यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही आपण हे धोरणात्मक निर्णय घेऊन टाकु. आपण आणि योग्य असेल त्या पध्दतीने ते घेण्यात यावा. म्हणजे घेणे आपण मान्य करुन घेऊ. फक्त १४० घ्यायचे की, २१० घ्यायचे हे आपण दोघांमध्ये आपसात चर्चा करुन त्याच्या संदर्भातली माहिती घ्या. जे महानगरपालिकेच्या दृष्टीकोणातुन चांगला असेल तो निर्णय घ्या.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया,

**मा.उपमहापौर :-** आपल्याला जो कचरा आहे ते बल्क प्रमाणात आहे. आणि त्या ढिगारावर जे जे.सी.बी. आहे. ते ऑलरेडी १४० च्या हॉर्सपावर मध्ये आता काम करीत आहे. मला वाटते १४० जी क्षमता ही पुर्ण नाही होणार. त्यामुळे आपल्याला जे २१० चे मशिन घ्यायचे आहे. त्याच्यापैकी आपले नाले सफाईचा काम त्याच्यामध्ये करु शकतो दर वर्षी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** कसे आहे महापौरताई जी काही टेक्नीकल गोष्टी आहे.

**मा.महापौर :-** काही टेक्नीकल बाबी त्यात आहे की, ते रोडावर चालु शकणार नाही. बरेच काही आहे. आपण अजुन याचा एकदा अभ्यास करु.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जे काही आपल्याला घ्यायचा आहे ते दोघांमधुन.

**मा.उपमहापौर :-** टेक्नीकल स्पेसिफीकेशननुसार.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदया, याच विषयाला धरुन विषय आहे. नाले स्केलेटर पण घेण्यात यावे. कारण नाला स्केलेटर हे ६ मिटरच्या रोडावर जात असतो.आणि मोठा जो जे.सी.बी. आहे तो मोठया रोडावर जात असतो. कारण लहान गल्ल्यांमध्ये मोठा जे.सी.बी. घुसणार नाही. मागे कैलास आप्पांच्या याच्यात तो ठराव सुध्दा पास झालेला आहे. चार नाले स्केलेटरचा परंतु त्याचावर काहीच प्रक्रिया झालेली नाही.दोन तरी घ्यावे जळगांव शहरासाठी, त्या नाल्या स्केलेटरचा खर्च करुन करुन एक नाला स्केलेटर आला असता. आता भंगार मध्ये पडलेला आहे ते. त्याचा पण विचार करण्यात यावा.

**मा.महापौर :-** विषय क्र.११ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८१४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.महापौर कार्यालयाकडील पत्र क्र.जा.क्र./जशमनपा/ म.का.१८/२०२१-२२ दि.१२/०४/२०२१ अन्वये जळगांव शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता बरीचशी विकास कामे कार्यपथावर असुन अनेक कामे प्रस्तावित आहेत. सदर कामी महानगरपालिकेकडे अदयावत अशा मशिनरीची आवश्यकता वारंवार भासत आहे. याप्रसंगी महानगरपालिकेस अश्या मशिनरी उदा.जे.सी.बी., पोकलँड मशिन भाडेतत्वावर उपलब्ध करुन घेवून कामे हाताळण्यात येत असतात. मात्र सदर मशिनरी वारंवार भाडे तत्वावर घेणे उचित वाटत नाही.

आरोग्य विभागाकडील मुख्य स्वच्छता निरीक्षक, सहा.आयुक्त (सार्व.आरोग्य) यांच्या मागणी प्रमाणे पोकलँड आव्हाणे शिवार येथे कामकाजाकरिता आवश्यक आहे. तसेच जळगांव शहरातील लहान, मोठे नाले साफ- सफाई करणे कचरा डंप करणे, वेस्ट मटेरियची उचल करणे कामी पोकलँड मशिनची आवश्यकता आहे.

वित्त आयोगाअंतर्गत निधी उपलब्ध न झाल्याने सदरचा प्रस्ताव प्रलंबित होता. मुख्यलेखाधिकारी यांचेकडील दिनांक ११/०५/२०२२ रोजीच्या अभिप्रायानुसार सन २०२२-२३ च्या भांडवली खर्च मनपा निधीतुन करावयाची कामे नविन वाहन फायर / आरोग्य वाहन खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत तरतूद रक्कम रु.०४.०० कोटी मात्रची तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार TATA-HITACHI-Z-AXIS140H पोकलँड मशिन मनपा फंडा अंतर्गत खरेदी करणे कामी येणारा रक्कम रु.५५,१३,७४६/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव :-** अशासकीय प्रस्ताव आहेत.

**नगरसचिव विषय क्रं. १२) :-** जळगांव शहर महानगरपालिकेतील सन्मा.सदस्य यांचेकडून मा.महापौर तसेच मा.विरोधी पक्षनेता,मनपा,जळगांव यांचेकडेस विविध विकास कामे करुन मिळणेबाबतचे प्रस्ताव प्राप्त झालेले असून सोबतचे यादीतील एकूण ०१ ते २०५ कामे विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेबाबत मा.महापौर, तसेच मा.विरोधी पक्षनेता,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.महापौरताई तुम्ही महापौर झाल्यानंतर कोटीच्या कोटी रूपयांचे विकास कामांच्या संदर्भामध्ये हे कागदावर सुरू आहे. मला काय वाटतं की हा जो प्रस्ताव आहे तो मान्य केल्याशिवाय काही पर्याय नाहीये. कारण मी एकटाच विरोध केला तर संपुर्ण सभागृह माझ्यावर तुटुन पडेल. पण मला वाटत अशा पध्दतीने आपण कोटी कोटी रूपयांचे प्रस्ताव मान्य करतो. याच्यामध्ये या शहरातील सामान्य जनतेच्या डोळयामध्ये आपण धुळफेक करतो असा एक मॅसेजही या जनसामान्यांमध्ये होतो. निश्चित ही जी सगळी कामे आहेत ही अत्यावश्यक आहे आणि योग्य आहेत या बदल्लही काही दुमत नाहीये. परंतू आपण काही वेळेला मागच्या महासभेमध्ये पाहीले आपल्या बजेटला तरतूद पण नाहीये ईतकी जी की जीतक्या कोटींचे प्रस्ताव आपण मान्य करतो. तर मला काय वाटत की आपण मान्य करूया मान्य करण्याच्या संदर्भात काही दुमत नाहीये. परंतू कामाचे निष्कर्ष आणि कामाच्या प्राथमिकता यासुध्दा विचारात घेणे गरजेचे आहे. कारण की हा मुद्दा सुध्दा मी लक्षात आणुन देतो सुनिलभाऊ माझ्या बाजुलाच बसलेले आहेत. मी परवाच सुनिल भाऊंच्या निदर्शनास आणुन दिले. सुनिलभाऊ विरोधी पक्ष नेता आहेत ताई महापौर आहेत आणि तुमच्याच प्रभागामध्ये म्हंटल प्रभाग क्रं. १५ सर्वे नं ५२३ पासुन ५२४ संत गुलाब बाबा नगर मध्ये , मोहम्मदीया नगरमध्ये ओपनस्पेस मध्ये पेव्हरब्लॉक बसविणे व बांधकाम करून सुशोभिकरण करणेकामी ७० लाख रूपये अजुन दुसरा विषय आहे सुनिलभाऊ यांच्या प्रभागातील व अजुन एक विषय आहे की जळगांव शहरातील विविध प्रभागातील नागरीकांना बसण्यासाठी सिंमेंटचे बाकडे पुरविणे. आता तुम्ही त्यांना रिकामे कराल का बाकडे टाकुन , काय होत की ज्यावेळेला आपण ४२ कोटी रूपयांचे अशा पध्दतीचे जे प्रस्ताव त्या ४२ कोटीमध्ये होते. त्याच्यात फक्त पुर्वीच्या भारतीय जनता पक्षाने मंजुर केले होते आणि फक्त राजकीय द्वेषापोटी त्यांना स्थगिती दिली होती अशातील मुळ हेतू नव्हता. त्यावेळी त्याबद्दल आपली भुमिकाही तीच होती की शहराच्या ज्या प्राथमिकता आहे की ज्या आहेत त्या रस्त्यांच्या आहेत आणि रस्त्यांच्या प्राथमिकता असतांना आपण अशापध्दतीने कोट्यावधी रूपये खर्च नाल्यांच्या संरक्षण भिंतींसाठी, त्या ओपनस्पेसला चेंनलिंग फेंसिंग लावण्याच्या संदर्भात, पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या संदर्भात अशा भुमिका घेत आहेत. तर मला वाटत या परिस्थितीला आज तरी योग्य वाटत नाही. आज संपुर्ण शहरामधील परिस्थिती आपण पाहा की कोट्यावधी रूपये आपल्याला पालकमंत्र्यांनी मंजुर केले. त्याच्यामधील काही भागामध्ये काम सुरू झालेले आहेत आणि कोट्यावधी रूपयांचे काम भविष्यात पाऊसाळयानंतर सुरु होतील. परंतू मला वाटत की अशा पध्दतीने , मा.महापौरताई अशा पध्दतीने प्रभागातील ज्याही नगरसेवकांच पेव्हर ब्लॉकचे , चेनलिंग फेंसिंगचे किंवा नाल्याला संरक्षण भिंतीचे अशा पध्दतीचे प्रस्ताव आल्यानंतर त्याला म्हणावे की एक दाखला घेवुन ये की तुझ्या प्रभागातील संपुर्ण रस्ते डांबरीकरण झालेले आहेत म्हणजे तुमच्या प्रभागात आता रस्त्यांचे काम शिल्लक नाहीत म्हणुन ते अशा पध्दतीचे प्रस्ताव देताहेत. ज्यावेळेला आपल्याकडील सगळया रस्त्यांची काम मार्गी लागतील त्यावेळी निश्चितपणे आपण त्यावेळेला निश्चितपणे आपण प्रायोरिटीने त्यावेळेला बघुया. तर माझी आपणांस विनंती आहे की अशा पध्दतीचे प्रस्ताव जरी आता या सभागृहाने मान्यही केले सगळीकडे काय होतय की असे प्रस्ताव आल्यानंतर अनिवड डेव्हलप्मेंट शहरात दिसतेय . म्हणजे काय होत की कॉक्रींटचे रस्ते प्रस्तावित केले जातात. कॉक्रींटच्या रस्त्यांना दुपटीपेक्षा जास्त खर्च हा केला जातो. त्या पध्दतीने त्या रस्त्यांची गुणवत्ता आपल्याकडे मेंटेन होत नाही. कॉक्रींटच्या रस्त्यांचे काम पाहातो आपण की तिथे की त्या पध्दतीने त्या कॉक्रींटच्या रस्त्यांना योग्य कुलींग होत नाही. कालांतराने त्याच्यावर केलेला खर्च हा पाण्यात जातो. नळाच्या कनेक्शनचे काम अद्यापसुध्दा बऱ्याच भागात राहीलेले आहे. काही प्लॉट रिकामे पडलेले आहेत. आता एका कॉलनीतील समजा १० ते १५ प्लॉट रिकामे पडलेले असतील. आज तो खुला भुखंड असल्याकारणाने तो मालक नळ कनेक्शन मागायला येत नाही म्हणजे खुलाभुखंडावर कुणी नळ कनेक्शन घेत नाही. परंतू उद्या जर आपण कॉक्रींट चा रस्ता तयार केला कालांतराने तिथे वर्षभराच्या आतमध्ये त्या खुला भुखंडावर इमारत बांधली गेली . तो नळ कनेक्शन मागेल आपल्या लाईन ज्या आहेत त्या सगळया कॉक्रींट रस्त्यांच्या खाली

आहेत. मग तशावेळेला तो रस्ता फोडला जातो आणि मग त्या रस्त्यावर केलेला लाखो रूपयांचा खर्च हा पाण्यात जातो. कारण त्या रस्त्याला फोडल्यानंतर पुन्हा त्याला पुर्वीसारखी बळकटी राहात नाही. तर मला वाटत की माझी पुन्हा या सभागृहाला विनंती आहे , मा. महापौर महोदया आपणांस विनंती आहे , मा. आयुक्त महोदयांनाही विनंती आहे की अशा पध्दतीचे अनावश्यक प्रस्ताव जे आहेत त्यांना प्राथमिक न करता ज्यांना प्राथमिकता जी आहे ती ठरवुन कालांतराने ज्यावेळेला आपल्याकडे मोठ्या प्रमाणावर शिल्लक निधी असेल त्यावेळेला त्या प्राथमिकतेचा विचार करण्यात यावा आणि हा जो प्रस्ताव पाठविलेला आहे तो मंजुर करण्यात यावा.

**मा.महापौर :-** अशासकीय प्रस्ताव आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौरताई

**श्री.दिलीप पोकळे :-** नितीनभाऊ , ईबाभाई दोनच मिनिंट आपल्याकडे जे सहा सहा मिटरचे जे रस्ते फोडलेले आहेत आता तर रस्ते जे आहेत पेव्हर ब्लॉक न करता रस्ते करण्यास काही हरकत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पुणे , पिंप्री चिंचवडने अशा पध्दतीच्या पेव्हर ब्लॉकच्या संदर्भात तिथल्या आयुक्तांनी एक निर्णय घेतला.

**मा.आयुक्त :-** सर आपण पण पेव्हर ब्लॉकचे रस्ते घेण्यात येऊ नये असे आपले इंजिनियर आणि सिटी इंजिनियरला आदेश देणार आहे आणि प्रस्तावित करु नका कोणीही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे याबाबत काही जास्त बोलण्यामध्ये काही अर्थ नाहीये. आता माझी यासंदर्भात मा.आमदार सन्मा.राजुमामांना ही विनंती आहे. कारण तो त्यांचा स्वेच्छा अधिकार आहे की त्यांनी त्यांचा निधी कशा पध्दतीने युटिलाईज करावा. कारण त्यांच्या आमदार निधीतीलही प्रस्ताव तश्या पध्दतीचे येतात.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यामुळे आहे ना छोटे टेंडर होतात आणि मोठे राहुन जातात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो आप्पा म्हणजे काय झाल आहे आप्पा

**मा.आयुक्त :-** आर. सी.सी चालत ना

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो आप्पा फक्त साईडच नाही पुर्ण ओपनस्पेसच पेव्हर ब्लॉक करून टाकतात.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ग्राऊंडच्या बाहेर चालले जात

**मा.आयुक्त :-** पुर्ण ग्राऊंड भरुन घेऊ नका, पाणी झिरपत नाही आणि आपलच नुकसान होत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सगळीकडे काय होत माहीती आहे का समजा आज माझ्या वॉर्डात एक कॉक्रींटचा रस्ता आला म्हणजे माझ्या प्रभागात एक कॉक्रींटचा रस्ता झाला आहे. आमच्या सन्मा सदस्यांनी माझ्या जोडीदारांनी तो प्रस्ताव टाकलेला असेल , परंतू इतका डोक्याला ताण झालेला आहे की शरद तायडेंची गल्ली सोडली

**श्री.कैलास सोनवणे :-** हो एकही फोर व्हिलर त्या गल्लीत जात नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि तिथे

**श्री.कैलास सोनवणे :-** एकही फोर व्हिलर त्या गल्लीत जात नाही आणि तिथल्या गल्ल्यांमध्ये

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि प्रशासनाची हाईट म्हणजे तिथे M ३० चा रस्ता प्रस्तावित केलेला आहे. आम्ही स्वत: तो कन्डक्ट करून त्याची कॉन्टींटी कमी करून त्या कॉन्टींटी मधुन दुसऱ्या चार गल्ल्या केल्या आणि त्याचा दुषपरिणाम काय झाला की आता तुमचा प्रभाग एकच आहे आमचा ५ म्हणजे वाटणीच्या हिशोबाने तो त्यांच्या घराजवळचा परिसर आहे. परंतू माझ्या घरारजवळचे नागरीका येवुन ते त्रास देतात ते म्हणतात की भाऊ शरदभाऊंच्या घराजवळचे रस्ते कशे झालेले आहेत. मग तशे आपले का करत नाहीत. म्हणजे काय होत की या गोष्टींतुन चेंज सुटतात. मग माझ्या प्रभागात झाले मग पोकळे साहेब म्हणतील की तुमच्या प्रभागात झाले मग माझ्या प्रभागात का नाही. आपली आर्थिक परिस्थिती आज तशी नाहीये की आपण कॉंक्रींटच्या रस्त्यावर इतक्या मोठ्या प्रमाणावर खर्च करू शकु. ज्या दिवशी या महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती चांगली असेल आपण पुर्ण शहर कॉंक्रींटींगच करून टाकु. त्यामध्येही काही वाद नाहीये. आज आपण आपली आर्थिक स्थितीचा विचार करता. त्या पध्दतीच नियोजन करण योग्य राहील.

**सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करीत होते.**

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** माझी विनंती अशी आहे पुन्हा की पेव्हर ब्लॉकचे रस्ते बनविण्यात येऊ नये जिथे फोर व्हिलर जात नाही. छोटे रस्ते आहेत तिथे पेव्हर ब्लॉकचे रस्ते करण्यात काहीच हरकत नाही.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो जे छोटे रस्ते असतील ते.

**ॲड.श्री.दिलीप पोकळे :-** आणि पुणे महानगरपालिकेने जर काही केले असेल असे निर्णय जर लागत असतील तर आणि पुणे महानगरपालिकेने जे केले आहे असे जे वेगवेगळे निर्णय आहेत तर ते मी पुढच्या महासभेत घेवुन येईल. कारण की आपल्याला ते धोरण ठरवावे लागेल. कारण तुम्ही डांबरी रस्त्याला पैसे देत नाही. सिमेंटच्या रस्त्यांना पैसे देत नाहीत. मग जर पेव्हर ब्लॉक मध्ये काम होताहेत जिथे मोठी वाहतुक नाहीये , मोठे वाहने जात नाहीत तिथे तर ते करण्यात काहीच हरकत नाहीये. तुम्ही धोरण ठरवा ना

**श्री.किशोर बाविस्कर :-** लहान रस्ते करण्यास काहीच हरकत नाहीये. भाऊ ३-३ मिटरचे रस्ते आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** जे छोटे रस्ते आहेना , ताई

**मा.महापौर :-** आप्पा बोला , बाकीच्यांनी शांत बसाव. बोला आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** माझ्या विषयामध्ये १६३ नंबर वर माझ नांव आहे कैलास सोनवणे नंतर चेतना चौधरी आणि चेतन सनकत मुकुंदाचे पण नांव आहे तर हे जे काम आहेत तर त्यामध्ये थोडा बदल आहे. भाऊ तुमच्या बोलण्यासाठी होईल ते आता आपले बळीराम पेठेतील तर ते सगळे कॉक्रींटचे रस्ते आहेत. हे मोठे मोठे रस्ते आहेत . म्हणजे ममुराबाद पासुन ते डायरेक्ट गफ्फारभाऊंच्या बाजुची जी गल्ली आहे तर तिथुन डायरेक्ट त्या मंदिरापर्यंत बळीराम पेठेच्या ज्या तिथपर्यंत अशा तिन गल्ल्या आहेत. तर त्या अमृत मुळे आणि याच्यामुळे पुर्ण खोदल्या गेलेल्या आहेत. त्या तिन आणि नंतर पुर्ण बागवान मोहल्ला असे भाग आहेत आणि काही जुन्या गावातील भाग आहेत. तर गुलाबभाऊंशी माझ बोलण झालेल आहे आणि याच्यामध्ये फक्त , गोराणेसाहेब दुरूस्ती करावी , तुम्हाला सगळ क्लियर लागत ना तर या प्रभाग क्र. ४ मध्ये ३ करोड रूपयांचे कॉंक्रींट रस्ते याच्यामध्ये करण्यात यावे. म्हणजे ॲड करण्यात यावे. तर ते करावे की अजुन काही बोलावे लागेल याच्याबद्दल.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदया,

**श्री.कैलास सोनवणे :-** ईबाभाई होणे तो दो, थोडा रूको ना , आता काय करायचे हे जे काम आहेत की नाही, तुम्ही ऐकल का पहिल्या पासुन माझ.

**नगरसचिव :-** बोला ना आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** हा याच्यामध्ये १६३ वर माझ नांव आहे. या विषयाच्या १६३ मध्ये तर याच्यामध्ये ३ करोड रूपयाचे कॉंक्रींटचे रस्ते वाढवुन देणे. ॲक्चुअली त्या ठिकाणी कॉंक्रींटचेच रस्ते आहे म्हणजे भालेराव साहेब होते आपले , पंडितराव कोल्हे त्यांच्या काळातील आहे. वामनदादा असतील म्हणजे हा जुना भाग झाला. तर माझ गुलाबभाऊंशी बोलण झाल आहे हे जे जुन गांव तर याच्यासाठी निधी देणार आहे. सुनिलभाऊ बरोबर आहे का , आपल जे बोलण झाल आहे तर डिपीडीसी तुन ते आपल्याला हे पैसे देणार आहेत.

**श्री.सुनिल खडके :-** हो , हो

**मा.उपमहापौर :-** किती नंबर आहे. किती नंबर सांगताहेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** १२ नंबर विषय चालु आहे ना आपला हा

**मा.उपमहापौर :-** हो १२ नंबर विषय चालु आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्याच्यामध्ये

**मा.उपमहापौर :-** आप्पा नंबर काहीतरी चुकतोय आपला

**श्री.कैलास सोनवणे :-** १२ नंबर विषय चालु आहे ना आपला हा १६३ दिलेला आहे ईथे

**मा.उपमहापौर :-** स्टेशन रोड , हॉटेल बॉम्बे ते शिवाजी नगर पुलापर्यंत

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही , नाही ते नाही

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही नाही १६३ वर हॉटेल बॉम्बे ते शिवाजी नगर पुलापर्यंत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** हे जे दिले आहे ना त्याच्यामध्ये प्रभाग क्रं. ४ मध्ये ठिकठिकाणी कॉंक्रींटचे रस्ते तयार करणे नावाच्या पुढे टाका हे फक्त एवढ ॲड करून घ्या. म्हणजे ते पैसे भेटो नको भेटो आपला ठराव तरी पाहीजे ठराव झाल्याशिवाय पैसे नाही भेटणार.

**मा.आयुक्त :-** सर्व सन्मा.सदस्यांना

**श्री.कैलास सोनवणे :-** मॅडम एक मिनिंट , हे जे पेव्हर ब्लॉकचा विषय आला ना जे छोटे रस्ते आहेत.

**मा.उपमहापौर :-** ६ मिटरच्या आतचे रस्ते

**श्री.कैलास सोनवणे :-** हो आणि जे ट्रॅक जे आहेत आपले ओपनस्पेसचे ट्रॅक जे मॉर्निंग वॉक साठी लागतात तर ते करायला काहीच अडचण नाहीये. ते करायला पाहीजे.

**मा.आयुक्त :-** सर्व सन्मा.सदस्यांना

**श्री.ईब्राहीम पटेल :-** महापौर महोदया, २७ तारखेला पालकमंत्र्यांनी मिटींगमध्ये डिक्लिअर केल की मी ६ तारखेनंतर डिपीडीसी मधुन जळगांव महापालिकेला निधी देणार आहे. तर आपण एक शिष्टमंडळ घेवुन पालकमंत्र्यांशी बोलु की जास्तीत जास्त निधी जर मिळवुन घेतला तर अजुन त्याच्यात भर पडेल. त्यांनी आम्हाला आश्वस्त केल की मी ६ तारखेनंतर महापालिकेला जास्तीत जास्त निधी देणार आहे. तर आपण केल तर मनपासाठी पुढे फायद्याचे होईल.

**मा.आयुक्त :-** अशासकीय प्रस्तावांमध्ये वाढ करायची असेल म्हणजे आता जस नितीनभाऊंनी एक्सप्लेन केल की प्रशासकीय प्रस्ताव ठेवा मा. महापौर मॅडमांकडे आपण प्रस्तावासाठी जेव्हा पत्र देतो तेव्हा आपण त्यामध्ये प्रशासनाचा अभिप्राय घेवुया कारण की बऱ्याच वेळा काही विषय असे येतात की ते प्रशासकीय दृष्टया वित्तीय असतात. मग काय होत की तो ठराव मंजुर झाला आहे आणि नंतर अशी परिस्थिती येते की जो प्रशासकीय दृष्टया इंम्लिपमेंट करता येवु शकत नाही. तो मग प्रत्येक वेळी आपण शासनाकडे विखंडनासाठी पाठविणे मग शासनाकडे आपली प्रतिमा चुकीची जाते की आपले सगळयात जास्त प्रस्ताव विखंडनासाठी येतात म्हणुन तर माझी अशी विनंती आहे की अशासकीय प्रस्ताव जर मा.महापौर मॅडमांकडे येताहेत तर प्रशासनाचा अभिप्राय घेवुनच आपणपटलावर घेवुया की जे शासकीय दृष्टया पॉसीबल असतील.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्याला फक्त आयुक्त महोदया प्रशासनाकडुन डॉकेट जे आहे ते वेळेवर येत नाही आणि महासभा निघाल्यानंतर प्रत्येक सभासदाला घाई असते आणि ती वाजवी घाई असते.

**मा.आयुक्त :-** त्याला एक सोल्युशन आहे सर आपण एक डेट फिक्स करूया सभेची मा.महापौर महोदया आणि सर्व मिळुन

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही ठिक आहे मा.महापौरांकडे पाठविल्यानंतर प्रशासनाने किती दिवसांत डॉकेट द्यायला पाहीजे याचा कुठेतरी निर्बंध आपण घालुन द्या.

**मा.आयुक्त :-** चालेल, चालेल

**श्री.नितीन लढ्ढा :-** तर मग ही परिस्थिती निर्माण होणार नाही.

**मा.आयुक्त :-** यस, यस

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे प्रत्येक विषयाला आपले मत मांडता येईल.

**मा.आयुक्त :-** फक्त एक की जी प्रकरण येतील त्यात आत्ताच पाहीजे, आत्ताच पाहीजे तस व्हायला नको .

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही , नाही

**मा.उपमहापौर :-** नाही मॅडम याला प्रशासनाकडे याला विकासकामांचे बरेच प्रस्ताव येतात ते अजुनर्यंत पेंडींग आहेत २०१८ पासुन ते आत्तापर्यंत येत नाहीये २०१८ चे

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो बरोबर

**मा.उपमहापौर :-** आता जे इंजिनियर आहेत , सन्मा सदस्य आहेत तर आपले प्रस्ताव येतात आणि अशासकीय प्रस्ताव त्याच्यामुळे याच्यात काही अडचण निर्माण होत नाही.

**मा.आयुक्त :-** नाही तस

**मा.उपमहापौर :-** आता आपल्या बजेट मध्ये तरतूद केली पाहीजे . समजा आता प्रशासकीय प्रस्ताव जे असतील आता समजा बजेट मध्ये १०० कोटींचे प्रस्ताव असतील. तर आता आपण समजा १०० प्रस्ताव तयार करावे लागतील. अशासकीय प्रस्ताव आपण यासाठी आणतोय विकास कामांचे जे आपण महानगरपालिकेचे जे अधिकारी आहे. निकष तपासुन ज्यांची गरज आहे असेच अशासकीय प्रस्ताव येत असतील.

**मा.आयुक्त :-** ठिक आहे निधी मागणीच्या बाबतीत विचार करू. कारण तो फिक्स नसतो ना म्हणुन ते आपण बाकीचे करू.

**मा.उपमहापौर :-** ठिक आहे.

**मा.आयुक्त :-** ठिक आहे आणि आयत्या वेळेचे जे प्रस्ताव आहे ते आपण देवु नये.

**मा.उपमहापौर :-** प्रशासनाकडुन बनवायला वेगवेगळया अडचणी येतील. बजेटची अडचण येईल. या अशासकीय प्रस्तावाचे निकष तपासुन त्यांनी पाठवावे.

**मा.आयुक्त :-** मा.उपमहापौर साहेबांच अस म्हणण आहे की आपण शासनाकडुन जी निधीची मागणी करतो. आता अशासकीय प्रस्ताव आहेत त्यासाठी हे प्रस्ताव अशासकीय होवू द्या. अस सरांच म्हणण आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** बरोबर आहे.

**मा.उपमहापौर :-** कारण की प्रशासकीय भाऊ जर आपण आता महासभेमध्ये १०० ते २०० कोटी रूपयांचे प्रस्ताव असतात. तर त्याच्याकरीता आपल्याला प्रशासकीय करण्यामध्ये बजेटमध्ये काही अडचण निर्माण झाली तर याच्यामधील जे निकष तपासुन जे योग्य ते असतील ते प्रशासनाने पाठवावे, आलेल्या दुसऱ्यांना दुय्यम स्थानी ठेवायचे असतील तर त्यांना तशा पध्दतीने प्रशासनाने ते प्रस्ताव पाठवावे.

**मा.आयुक्त :-** अशासकीय प्रस्तावांसाठी ईस्टिमेंटची घाई नको पाहीजे. असे भरपुर ईस्टिमेट आहेत की जे लेट होवुन जाते.

**श्री.नितीन बरडे :-** चुकीचा प्रस्ताव यायला नको.

**मा.आयुक्त :-** तेच सांगतीले त्यांनी हरकत नाही. हरकत नाही अस ठरल, ईस्टिमेट जे करू ना ते आपले इंजिनियरला प्रत्येक ईस्टिमेट करायला लावु.

**श्री.नितीन बरडे :-** आता इंजिनियर ला सांगीतले की नविन ईस्टिमेट रस्त्याच तयार करा. तर नविन रस्ता पाहीजे आता दोन महिने झाले तो प्रस्ताव झाला नाही. प्रस्ताव तयारच होत नाही लवकर

**मा.उपमहापौर :-** आता शासनाकडुन डिपीडीसीचा जो काही निधी आहे पालकमंत्री महोदयांचा आणि त्याच्यासाठी ठराव असेच पाहीजे असे काही कन्पोंशेसन नाहीये तिकडुन जिआर आहे. याच्यामध्ये आता पुढचा जो विषय आहे. आपला १८ नंबरचा विषय आहे त्याच्यामध्ये आपण काही ११ नंबर प्रभागात असतील ज्याकाही प्रभागाचे असेल ८ नंबर प्रभाग असेल जे काही प्रभाग असेल. त्याला शासनाच्या जिआर आणि ठराव पाहीजे मान्यता साठी ठराव असेच पाहीजे असे काही कंन्पोसेशन नाहीये. आप्पा विविध ठिकाणी करायचे आहे ना.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो विविध ठिकाणी असे टाका .

**मा.महापौर :-** प्रभाग क्रं. ४ मध्ये आप्पांनी सुचविलेल्या विविध ठिकाणी ३ कोटीचे रस्ते प्रस्तावित करावे.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्याच्यामध्ये भागाचे शब्द जर कधी टाकायचे झाले तर काट्याफाईल, बागवान मोहल्ला , जुनं गांव आणि इतर ठिकाणी

**मा.उपमहापौर :-** आप्पा ईस्टिमेट बनवतांना तशा पध्दतीने बनवा.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो

**मा.महापौर :-** ३ कोटी वाढ करण्यात यावी आणि त्याच प्रमाणे प्रभाग क्रं. १४ मध्ये विविध ठिकाणची रस्त्यांची काम सुध्दा यामध्ये वाढ करण्यात यावी.

**मा.महापौर , मा.उपमहापौर , सन्मा.विरोधीपक्ष नेता , मा.आयुक्त व नगरसचिव यांनी आपआपसांत चर्चा केली.**

**मा.महापौर :-** विषय क्रं. १२ मध्ये सन्मा.सदस्य आप्पासाहेबांनी सुचविलेले ३ कोटी आणि प्रभाग क्रं. १४ या मधील या ३ पत्रांचा समावेश करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. १२ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-** मा.महापौर महोदया मला सभागृहात बोलण्याची परवानगी देण्यात यावी.

**मा.महापौर :-** बोला, बोला साहेब

**नगरसचिव :-** सन्मा.सभागृहाला विनंती करतो की , विषय पत्रिकेवर जे विषय आहेत. त्याच्यावर निश्चितच सन्मा सभागृहाने निर्णय घ्यावा वेळोवेळी परंतू आयत्या वेळेचे जे आहे जे आर्थिक संदर्भातील विषय आहेत. ते विषय पत्रिकेवर येणे आवश्यक आहे. भविष्यात त्याच्यात आर्थिक अनियमितता होवू शकते. त्यामुळे मा.महापौर महोदया आपल्याला मी विनंती करतो विषयपत्रिकेवरील जे विषय आहेत.त्याच्यावर निश्चितच सभागृहाने निर्णय घ्यावे परंतू आर्थिक हिताशी जेही काही निर्णय असतील जेही प्रस्ताव असतील ते विषयपत्रिकेवर घेणे आवश्यक आहे धन्यवाद .

**मा.महापौर :-** पुढील महासभेपासुन आयत्या वेळेचे कुठलेही विषय घेतले जाणार नाहीत याची सर्व सन्मा. सदस्यांनी नोंद घ्यावी. विषय पत्रिकेवरील पुढील विषय घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८१५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेतील सर्व सन्मा.नगरसेवकांनी मा.महापौर तसेच मा.विरोधी पक्षनेता,मनपा जळगांव यांचेकडेस विकास कामांचे प्रस्ताव सादर केलेले असून ते विविध शासकीय योजनांतुन घेणेबाबत विंनती केलेली आहे. सदर विकास कामे जिल्हा नियोजन

मंडळ व राज्य शासनाच्या निधीतुन घेणेबाबत जिल्हा नियोजन मंडळातील, नागरी दलितेत्तर, नगरोत्थान, दलित वस्ती सुधारणा योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी योजना, नॅशनल क्लिन एअर प्रोग्राम निधी, नाविन्यपुर्ण इत्यादी तसेच राज्य शासनाच्या नगरविकास विभागातुन ही मुलभूत सुखसुविधा, नगरोत्थान, विशेष निधी, नाविन्यपुर्ण तसेच वैशिष्टयपुर्ण योजनेतुन कामे सुचविलेली असून त्यास मा.महासभेची मान्यता मिळणे कामी प्रस्ताव सादर केलेले असल्याने मा.महापौर व विरोधी पक्षनेता,मनपा,जळगांव यांनी सादर केलेल्या यासोबतच्या यादीतील अ.क्र.०१ ते २०५ विकास कामे उपरोक्त नमूद विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनूसार तसेच मा.पिठासिन अधिकारी यांनी सभागृहात दिलेल्या निर्देशानूसार १) सन्मा.सदस्य, श्री.कैलास नारायण सोनवणे यांनी सुचविलेल्या प्रभाग क्र.०४ मध्ये ठिकठिकाणी कॉक्रींटचे रस्ते तयार करणे २) सन्मा.सदस्य,श्री.राजेंद्र झिपरु पाटील व ३) सन्मा.सदस्य,श्री.सदाशिव गणपत ढेकळे यांचे पत्रामध्ये प्रभाग क्रं.१४ मध्ये सुचविलेली एकूण १२ कामे यासोबतच्या यादीतील पेज नं ०९ व १० मध्ये समाविष्ठ केलेले अ.क्र.०१ ते १३ विकास कामे उपरोक्त नमूद विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**महासभा क्र.**38 **महासभा ठराव क्र.** 815 **दिनांक** 30/05/2022

| अ.क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | ॲड.दिलीप पोकळे | 1 | प्रभाग क्र. 1 राजमालती नगर ते सत्सम पार्क (आव्हाणे शिवार) पर्यतच्या नाल्यास दोन्ही बाजुस संरक्षण भिंत बांधणे | 13000000 |
| 2 | 35600000 | | प्रभाग क्र. 1 दुध फेडरेशन मागील नाला ते गुप्ता फार्म हाऊस मागील बाजुपर्यत मोठी गटार बांधणे | 5000000 |
| 3 | | | प्रभाग क्र. 1 सिटी कॉलनी मधील मुख्य गटार हरिओम नगर पर्यत बांधणे | 7100000 |
| 4 | | | प्रभाग क्र. 1 लक्ष्मी नगर ते के.सी. पार्क पर्यत रोडचे दोन्ही बाजुस गटार बांधणे | 5000000 |
| 5 | | | प्रभाग क्र. 1 गुप्ता फार्म हाऊस मागील मोठी गटार बांधणे | 3000000 |
| 6 | | | प्रभाग क्र. 1 त्रिभुवन कॉलनी समोरील गटार बांधणे | 2500000 |
| 7 | सौ.कांचन सोनवणे | 2 | प्रभाग क्र. 2 पुंडलिक नामदेव मनपा कर्मचारी कांचन नगर यांचे घरापासुन ते नाना नन्नवरे, मिलिंद कोंडु यांचे मेहूणे यांचे घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 2000000 |
| 8 | 30700000 | | प्रभाग क्र. 2 हरिओम नगर मधील बाजीराव महीपत यांचे घरापासून ते हनुमान मंदीरा पर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 2000000 |
| 9 | | | प्रभाग क्र. 2 उज्ज्वल चौक, गणपती मंदीर ते दुर्गाबाई सोनवणे यांचे घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 1700000 |
| 10 | | | प्रभाग क्रं. 2 घरकुल कोपऱ्या पासुन ते प्रशांत चौका पर्यंत रस्ता डांबरी करण करणे | 7000000 |
| 11 | | | प्रभाग क्रं. 2 सदगुरु किराणा ते विनोद हिरामण पाटील यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे. | 2000000 |
| 12 | | | प्रभाग क्रं. 2 हरिओम नगर असोदा रोड प्रमोद सपकाळे वाशींग सेंटर पासुन हनुमान मंदीर ते श्री. पन्नालाल सोनवणे यांचे बंगला पर्यंतचा रस्ता कॉक्रीटी करण करणे. | 2000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 13 | | | प्रभाग क्रं. 2 श्री. संतोष सोनवणे (पैलवान) यांचे घरापासुन ते श्री. प्रभाकर मुकूंदा पाटील यांचे किराणा पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 2000000 |
| 14 | | | प्रभाग क्रं. 2 श्री. पांडुरंग सोनवणे (फोटोग्राफर ) यांचे घरापासुन ते संजय सोनवणे (पट्टया संजु ) यांचे घरापर्यंतचा रस्ता कॉक्राटीकरण करणे. | 2000000 |
| 15 | | | प्रभाग क्रं. 2 श्री. अनिल व्हॉलमन यांच्या घरापासुन ते सुधाकर दंगल सोनवणे यांच्या प्लॉट पर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 2000000 |
| 16 | | | प्रभाग क्रं. 2 श्री. अनिल व्हॉलमन यांच्या घरापासुन ते बहिणाबाई कॉलनी कोपऱ्यापर्यंतचा रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 2000000 |
| 17 | | | प्रभाग क्रं. 2 स्वामी नारायण मंदीर श्री. मधुभाऊ सपकाळे यांच्या घरापर्यंत श्री. राजगुरु यांचे घरापर्यंत गल्लीमध्ये रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 2000000 |
| 18 | | | प्रभाग क्रं. 2 श्री. देवराम बाविस्कर यांचे घरापासुन ते वाणी मंगलकार्यालय रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 1500000 |
| 19 | | | प्रभाग क्रं. 2 श्री. धनसिंग सोनवणे यांचे चक्की पासुन श्री. राजु कोळी यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटी करण करणे. | 1500000 |
| 20 | | | प्रभाग क्रं. 2 श्री. राजु ठाकुर यांचे किराणा दुकानापासुन श्री. संतोष मुकादम यांचे घरापर्यंत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 1000000 |
| 21 | श्री.नवनाथ दारकुंडे | 2 | वार्ड क्र. 2 मधील कंक यांचे घरापासून ते क्रांतीचौका पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 4030775 |
| 22 | 52223691 | | वार्ड क्र.2 मधील क्रांती चौक ते दालफड पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | 3983635 |
| 23 | | | वार्ड क्र.2 मधील शिवाजी नगर डि.बी. जैन दवाखान्यापासून ते शिवाजी नगर घरकुल पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | 7542477 |
| 24 | | | वार्ड क्र. 2 मधील शिवाजी नगर पासुन मुख्य रस्त्याला जोडणारे रस्ते डांबरीकरण करणे | 5040648 |
| 25 | | | वार्ड क्र. 2 मधील शिवाजी नगर श्री. जैन दवाखान्यापासून ते ममुराबाद रेल्वे पुलापर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | 12626156 |
| 26 | | | वार्ड क्र.2 मधील धनाजी काळे नगर विहीरीपासुन ते हनुमान सॉ मिल पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 3000000 |
| 27 | | | वार्ड 2 मधील क्षित्रीय मराठा समाज पासून ते अहील्याबाई होळकर बगीच्याच्या चारही बाजुस रस्ते डांबरीकरण करणे | 4000000 |
| 28 | | | वार्ड क्र.2 मधील श्री मोटर्स ते गोविंद पुरोहीत यांचे गोडावून पर्यंतचा रस्ता डाबरी करण करणे | 3000000 |
| 29 | | | वार्ड क्र. 2 मधील मकरा अपार्टमेन्ट पासुन ते राजवाडा ते कोन्हाकाई रोड़ा पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | 3000000 |
| 30 | | | प्रभाग क्र. 2 मधील सिमेप्रमाणे धनाजी काळे विहीरीपासुन आव्हाणे रोडपर्यंत रस्ता खडीकरण करणे | 4000000 |
| 31 | | | प्रभाग 2 मधील सिमेप्रमाणे चंदुपटेल यांचे लेआऊट पासून ते बंडुदादा यांच्या शेताच्या लेआऊट पर्यंत रस्ता खडीकरण करणे | 2000000 |
| 32 | सौ.रंजना सपकाळे | 3 | प्र.क्र.3 खेडी शिवार गट क्र. 2/1 शिव नगर रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |
| 33 | 26000000 | | प्र.क्र.3 दिनकर नगर मधील रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 2000000 |
| 34 | | | प्र.क्र.3 श्रीराम कॉलनी ते दशरथ नगर रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 6000000 |
| 35 | | | प्र.क्र.3 गोपाळपुरा जुना खेडी रोड ईच्छापुर्ती महादेव मंदीर परिसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 4000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 36 | | | प्र.क्र.3 खेडी शिवार गट क्र. 62/1/2/3 भगवान नगर मध्ये आरसीसी गटारी बांधणे. | 4000000 |
| 37 | | | प्र.क्र.3 खेडी शिवार गट क्र. 5/1, 5/2 समर्थ नगर मध्ये आरसीसी गटारी बांधणे. | 3000000 |
| 38 | | | प्र.क्र.3 खेडी शिवार गट क्र. 10 विनायक नगर मध्ये आरसीसी गटारी बांधणे. | 3000000 |
| 39 | श्री.प्रविण कोल्हे | 3 | प्रभाग क्र. 3 मध्ये विविध ठिकाणी हायमस्ट लॅम्प बसविणे | 3000000 |
| 40 | 6942370 | | प्रभाग क्र.3 स.नं. 119 मध्ये आरसीसी गटार बांधणे | 3942370 |
| 41 | सौ.मिनाताई सपकाळे | 3 | प्र.क्र.3 कावेरी हॉटेल लगत १८.० मी रस्त्यावर नाल्यावर पुल बांधणे व भराव करणे | 3152000 |
| 42 | 13537000 | | प्रभाग क्र. 3 मध्ये स.नं. 78/3+4 मध्ये आरसीसी गटार व डांबरी रस्ते करणे | 5200000 |
| 43 | | | प्रभाग क्र. 3 श्रावण नगर परिसरात डांबरी रस्ते करणे | 5185000 |
| 44 | श्री.दत्तात्रय कोळी | 3 | प्र.क्र.3 गट क्र. 103/3 दिनकर नगर मधील ओपन स्पेसमध्ये वॉल कंपाऊड करणे | 990000 |
| 45 | 15985000 | | प्र.क्र.3 गट क्र.102/1/2 दिनकर नगर मधील ओपन स्पेसमध्ये वॉल कंपाऊड करणे | 995000 |
| 46 | | | प्र.क्र.3 श्री.कैलास आप्पा सोनवणे यांचे घरापासुन ते असोदा रोड स्व.मोहन पहेलवान रिक्षा स्टॉप पर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 2500000 |
| 47 | | | प्र.क्र.3 हौसाबाई डोळे यांचे घरापासुन ते श्री.प्रताप मोहन कोळी यांचे घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे व रस्त्याच्या दोनही बाजुस आरसीसी गटारी बांधणे | 3000000 |
| 48 | | | प्र.क्र.3 श्री.धनराज रामा ते श्री.रविंद्र पंढरीनाथ सपकाळे यांचे घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे. | 2000000 |
| 49 | | | प्र.क्र.3 श्री.भगवान भावलाल कोळी ते श्री.पितांबर सपकाळे यांचे घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे. | 1500000 |
| 50 | | | प्र.क्र.3 श्री.सुरेश विश्राम कोळी ते विष्णु इंगळे यांचे घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 1000000 |
| 51 | | | प्र.क्र.3 श्री.दिलीप शामराव कोळी ते गोकुळ नामदेव कोळी यांचे घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 1100000 |
| 52 | | | प्र.क्र.3 श्री.प्रताप भिका सपकाळे ते अरुण गंगाराम साबदे यांचे घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 800000 |
| 53 | | | प्र.क्र.3 श्री.पुरुषोत्तम सोनवणे ते साई किराणा यांचे घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 1000000 |
| 54 | | | प्र.क्र.3 श्रीमती वंदनाबाई साळुंखे ते बारकु नथ्यु कोळी यांचे घरापर्यत रस्ता कॉक्रीटीकरण करणे. | 1100000 |
| 55 | श्री. चेतन सनकत | 4 | प्र.क्र.4 अंतर्गत गुरुनानक नगर येथे विविध ठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 5000000 |
| 56 | 15500000 | | प्र.क्र.4 अंतर्गत काट्याफाईल येथे विविध ठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 5000000 |
| 57 | | | प्र.क्र.4 अंतर्गत बळीराम पेठ येथे विविध ठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 3000000 |
| 58 | | | प्र.क्र.4 अंतर्गत गुरुनानक नगर,काट्याफाईल, बळीराम पेठ व इतर ठिकाणी 6 मिटर, 9 मिटर, 12 मिटर हायमस्ट पोल उभारणे. | 2500000 |
| 59 | श्री.मुकूंद सोनवण | 4 | प्रभाग क्र. 4 मधील शिवभक्त रिक्षा स्टॉप ( ममुराबाद रोड) पासून ते श्री. ज्ञानेश्वर चौधरी (हँड पम्पापर्यंत) रस्ता कॉंक्रीट करणे. | 2000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 60 | 10000000 | | प्रभाग क्र. 4 मधील श्री. मोहन आण्णा गवळी ( श्री कृष्ण मंदिर) ते शोभाई निवास पर्यंत रस्ता काँक्रीट करणे. | 2200000 |
| 61 | | | प्रभाग क्र. 4 मधील मायाक्का देवी मंदिर पासून ते श्री चेतन सनकत यांचे घरापर्यंतचा रस्ता काँक्रीट करणे. | 3200000 |
| 62 | | | प्रभाग क्र. 4 मधील दालफड, चंदनवाडी मधील रस्ता काँक्रीट करणे | 2600000 |
| 63 | सौ.दिपमाला काळे | 7 | प्रभाग क्र. 07 अंर्तगत हरेश्वर नगर, शिक्षकवाडी येथे गटार बांधणे | 1550000 |
| 64 | 8480000 | | प्रभाग क्र. 07 अंर्तगत चैतन्य नगर येथे गटार बांधणे | 1180000 |
| 65 | | | प्रभाग क्र. 07 अंर्तगत रामबाग कॉलनी, प्रोफेसर कॉलनी येथे गटार बांधणे | 1950000 |
| 66 | | | प्रभाग क्र. 07 अंर्तगत गंधर्व कॉलनी येथे नाला बांधणे | 1800000 |
| 67 | | | प्रभाग क्र. 07 अंर्तगत गणेश कॉलनी येथे गटार बांधणे | 2000000 |
| 68 | प्रा.डॉ.सचिन पाटील | 7 | प्र.क्र.7 गट नं. 59 शिव कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे | 4000000 |
| 69 | 27000000 | | प्र.क्र.7 गट नं. 54 शिव कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे | 6000000 |
| 70 | | | प्र.क्र.7 गट नं. 55 शिव कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे | 4000000 |
| 71 | | | प्र.क्र.7 गट नं. 60 शिव कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे | 7000000 |
| 72 | | | प्र.क्र.7 गट नं. 53 शिव कॉलनी मधील रस्ते डांबरीकरण करणे | 6000000 |
| 73 | सौ.सिमा भोळे | 7 | प्रभाग क्र. ०७ अंतर्गत स्टेट बँक कॉलनी, मित्रा नगर व गणेश कॉलनी भागातील विविध ठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 4900000 |
| 74 | 9800000 | | प्रभाग क्र. ०७ अंतर्गत बजरंग बोगदा ते झे पी कॉलनी व श्रीकृष्ण कॉलनी ठिकठिकाणी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 4900000 |
| 75 | श्री. मनोज चौधरी | 8 | प्रभाग क्र. 8मध्ये गट नं. 103 निमखेडी शिवार मधील धनश्री नगर रस्ते डांबरीकरण करणे. | 4560000 |
| 76 | 22962000 | | प्रभाग क्र. 8 मध्ये निमखेडी शिवार मधील गट नं. 26 चंदु आण्णा नगर मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | 5670000 |
| 77 | | | प्रभाग क्र.8मध्ये निमखेडी शिवार मधील गट नं. 102/२ जिवराम नगर मध्ये रस्ते डांबरीकरण करणे. | 3032000 |
| 78 | | | प्रभाग क्र. 8 मध्ये आव्हाणे शिवार गट नं. 345/1 प्लॉट नं. 1 पासून श्री. कंवरलाल प्रेमराज पाटील यांच्या घरापासून ते गट नं. 850 समर्थ हॉल व आव्हाणे शिवार प्लॉट नं. 11 पर्यंत खडीकरण करणे. | 2500000 |
| 79 | | | प्र.क्र.8 मध्ये गट नं.122 निमखेडी शिवार मधील वैशणवी पार्क व परिसरातील आरसीसी गटारी बांधणे (गट नं. 122/1/2/3) | 4700000 |
| 80 | | | प्र.क्र.8 मध्ये गट नं. 105 निमखेडी शिवार मधील श्री समर्थ कॉलनीतील रस्ते डांबरीकरण करणे | 2500000 |
| 81 | सौ.प्रतिभा देशमुख | 9 | प्रभाग 9 अंतर्गत मुक्ताई नगर ॲड. बोरोले यांचे घरापासून ते बेंडाळे नगर अशोक पाटील घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 2500000 |
| 82 | 58908000 | | प्रभाग 9 अंतर्गत मुक्ताई नगर जगताप यांचे घरापासून ते श्री पवार यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 2500000 |
| 83 | | | प्रभाग 9 अंतर्गत मुक्ताईनगर दत्त मंदीर परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे | 2500000 |
| 84 | | | प्रभाग 9 अंतर्गत मुक्ताईनगर ॲड. गावंडे यांचे घरापासून भागवत पाटील यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 2000000 |
| 85 | | | प्रभाग 9 अंतर्गत मुक्ताईनगर रुपसाधना ब्युटी पार्लर ते नरहरी मंदीरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 2000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 86 | | | प्रभाग 9 अंतर्गत गट नं. 25 निवृत्ती नगर संजय चव्हान यांच्या घरापासून ते उगले मॅडम ते सुनिल पाटील यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करणे | 2500000 |
| 87 | | | प्रभाग क्रं. 9 अंतर्गत शिवरोड गट नं. 24 महाजन यांच्या घरापासून ते सुकृती रोड पर्यंत डांबरीकरण करणे | 2200000 |
| 88 | | | प्रभाग क्र. 9 अंतर्गत गट नं. 20/3 राजेंद्र पाटील यांचे घरापासून ते भारंबे ते डिआर.चव्हाण यांचे घरापासून ते वैशाली देशमुख यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 1000000 |
| 89 | | | प्रभाग क्र. 9 अंतर्गत गट नं. 27 जितेंद्र प्रोव्हीजन ते राजु बाविस्कर से मंदाताई सोनवणे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 2000000 |
| 90 | | | प्रभाग क्र. 9 अंतर्गत गट नं. 30 अॅड. गावंडे यांचे परापासून ते भागवत पाटील यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 1700000 |
| 91 | | | प्रभाग क्र. 9 अंतर्गत गट नं. 76 शिरसोली स्ट्रील फॅक्टरी ते बाळासाहेब सैंदाणे व हर्षवर्धन कॉलनी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे | 3100000 |
| 92 | | | प्रभाग क्र. 9 अंतर्गत गट नं. 27 ऑक्सीजन पार्क से मंदाताई सोनवणे यांचे परापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 2000000 |
| 93 | | | प्रभाग क्र. 9 अंतर्गत गट नं. 31 मधील परिसरातील रस्ता डांबरीकरण करणे, | 3000000 |
| 94 | | | प्रभाग क्रं. 9 गट नं. 28 मुक्ताई नगर येथे कॉक्रीट गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 3000000 |
| 95 | | | प्रभाग क्रं. 9 गट नं. 23,22/1 निवृत्ती नगर येथे कॉक्रीट गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 2000000 |
| 96 | | | प्रभाग क्रं. 9 नं. 29,30 मुक्ताईनगर येथे कॉक्रीट गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 2000000 |
| 97 | | | प्रभाग क्र. 9 द्रोपदी नगर येथे कॉक्रीट गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे | 2000000 |
| 98 | | | प्रभाग क्रं. 9 गट नं. 24 निवृत्ती नगर ओपनस्पेस मध्ये चैनलीग फेन्सींग पेव्हर ब्लॉक बसविणे | 2000000 |
| 99 | | | प्रभाग क्र. 9 बेंडाळे नगर ओपनस्पेस मध्ये चैनलीग फेन्सींग पेव्हर ब्लॉक बसविणे | 1000000 |
| 100 | | | प्रभाग क्रं. 9 गट नं. 29 मुक्ताईनगर ओपनस्पेस मध्ये चैनलीग फेन्सींग पेव्हर ब्लॉक बसविणे | 2000000 |
| 101 | | | प्रभाग क्रं. 9 गेट नं. 30 मुक्ताई नगर ओपनस्पेस मध्ये चैनलीग फेन्सींग पेव्हर ब्लॉक बसविणे | 2000000 |
| 102 | | | प्रभाग क्रं. 9 गेट नं. 30 मुक्ताई नगर विविध ओपनस्पेस मध्ये ओपन जिम व खेळणी बसविणे | 1000000 |
| 103 | | | प्रभाग 9 निवृत्त नगर विविध ओपनस्पेस मध्ये ओपनजिम व खेळणी बसविणे | 1000000 |
| 104 | | | प्रभाग क्रं. 9 गट नं. 24 चौधरी गल्ली, शांताराम पाटील यांचे घरापासून ते चौधरी यांचे घरापर्यंत रस्ता डांबरी करण करणे | 2000000 |
| 105 | | | प्रभाग क्रं. 9 अंतर्गत गट नं. 35 डॉ. गोरख पाटील ते हिरे मॅडम याच घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 930000 |
| 106 | | | प्रभाग क्रं. 9 अंतर्गत गट नं. 32 बहीरम सर ते स.न. 34 बेडाळे ओपनस्पेस ते देशमुख यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 930000 |
| 107 | | | प्रभाग क्रं. 9 अंतर्गत गट नं. 34 गुरुदत्त गार्डन ते कृष्णा टेंट नविन कल्व्हेट पर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | 2048000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 108 | | | प्रभाग क्रं. 9 अंतर्गत गट नं. 28 मधील संजय पाटील यांचे घरापासुन ते बोरसे यांचे घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | 3000000 |
| 109 | | | प्रभाग क्रं. 9 अंतर्गत गट नं. 29, 30 मधील परिसरातील रस्ता डांबरीकरण करणे. | 3000000 |
| 110 | सौ.उषाबाई पाटील | 11 | प्रभाग क्र. 11 मध्ये पिंप्राळा गट क्र. 155 मध्ये आरसीसी गटार बांधणे | 1000000 |
| 111 | 16000000 | | प्रभाग क्र. 11 मध्ये पिंप्राळा गट क्र.139अ, 139ब व 128, 129 मध्ये रस्ते डांबरीकरण करणे | 15000000 |
| 112 | सौ.उज्ज्वला बेंडाळे | 12 | प्र.क्र.12 अंतर्गत श्रध्दा कॉलनी ते स्नेहल कॉलनी नंदनवन (कॉलनी) नगर येथील नाल्याला संरक्षण भिंत बांधणे | |
| 113 | सौ.ज्योती चव्हाण | 13 | प्रभाग क्रमांक 13 मधिल आर.टी.ओ. ऑफिस ते श्री. भास्कर महाजन यांच्या घरापर्यंत रस्ता नविन क्रॉक्रीटकरण /डांबरीकरण तथा रिपेरिंग करणे | 1000000 |
| 114 | 5900000 | | प्रभाग क्रमांक 13 मधिल श्री बाळासाहेब शिरसाळे ते लायन्स क्लब पर्यंत क्रॉक्रीट रस्ता रिपेअर करणे | 1000000 |
| 115 | | | प्रभाग क्रमांक 13 मत स.न. 445/2ब मधिल विठ्ठल मंदिर रविंद्र नगर मध्ये 2 रूम व जॉगींग ट्रक पेव्हर ब्लॉक बसविणे व मिनी हॉयमस्ट लॅम्प बसविणे. | 2500000 |
| 116 | | | प्रभाग क्रमांक 13 मंधित सर्व्हे नंबर 444 येथील ओपन स्पेस जागेवर (श्री. शेखर पाटील घरासमोर) पेव्हर ब्लॉक बसविणे | 500000 |
| 117 | | | प्रभाग क्रमांक 13 मधिल सर्व्हे नंबर 445 रविंद्र नगर मधिल ओपन स्पेस जॉगींग ट्रॅक, ओपन जिम, गेट बसविणे. | 900000 |
| 118 | सौ.सुरेखा तायडे | 13 | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं.456,457 रायसोनी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 18900000 |
| 119 | 91480000 | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं.459 रायसोनी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 21000000 |
| 120 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं.458 रायसोनी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 6510000 |
| 121 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं. 464 रायसोनी नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 5250000 |
| 122 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं. 451,452 संभाजीनगर, नित्यानंदनगर मधील 12 मी.डी.पी. रोड डांबरीकरण करणे. | 6820000 |
| 123 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं. 462 देवेंद्र नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 9975000 |
| 124 | | | प्रभाग क्र. 13 मधील मेहरुण स.नं. 463 देवेंद्र नगर, मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 13125000 |
| 125 | | | प्रभाग क्र. 13 मधील नागेश्वर कॉलनी भागातील मुख्य रस्ते डांबरीकरण करणे. | 9900000 |
| 126 | श्रीमती रेखा पाटील | 14 | प्रभाग क्रमांक 14 मधील मेहरुण सर्वे नं. 444 मधील रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 15000000 |
| 127 | 50000000 | | प्रभाग क्रमांक 14 मधील मेहरुण सर्वे नं. 270 मध्ये आरसीसी गटार बांधणे | 7000000 |
| 128 | | | प्रभाग क्रमांक 14 मधील मेहरुण सर्वे नं. 251 मध्ये आरसीसी गटार बांधणे | 4000000 |
| 129 | | | प्रभाग क्रमांक 14 मधील मेहरुण सर्वे नं. 271 मध्ये आरसीसी गटार बांधणे | 7000000 |
| 130 | | | प्रभाग क्रमांक 14 मधील मेहरुण सर्वे नं. 271 मधील ओपन स्पेस | 4000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | विकसित करणे | |
| 131 | | | प्रभाग क्रमांक 14 मधील मेहरुण सर्वे नं. 261 व 262 मधील ओपन स्पेस विकसित करणे | 1500000 |
| 132 | | | प्रभाग क्रमांक 14 मधील मेहरुण सर्वे नं. 269 मधील ओपन स्पेस विकसित करणे | 3500000 |
| 133 | | | प्रभाग क्रमांक 14 मधील मेहरुण सर्वे नं. 253/2 मधील ओपन स्पेस विकसित करणे | 1000000 |
| 134 | | | प्रभाग क्रमांक 14 मधील मेहरुण सर्वे नं. 266/1ब मधील ओपन स्पेस विकसित करणे | 2000000 |
| 135 | | | प्रभाग क्रमांक 14 मधील गायत्री नगर मधील ओपन स्पेस विकसित करणे | 5000000 |
| 136 | श्री.प्रशांत नाईक | 15 | प्रभाग क्र. 14 शिरसोली रोडवरील मुस्लीम समाज कब्रस्तानमध्ये भराव करुन पेव्हर ब्लॉक बसविणे | 5000000 |
| | 5000000 | | | |
| 137 | श्री.सुनिल महाजन | 15 | जळगांव मनपाने आवश्यक कामांसाठी पोकलॅन्ड खरेदी करणे | 6000000 |
| 138 | 166197853 | | प्र.क्र.18 मध्ये गट क्र.302/1 व 302/2 गृहकुल हौसींग सोसायटी मध्ये आरसीसी गटारी स्लॅब कल्व्हर्टसह बांधणे व रस्ता खडीकरणासह डांबरीकरण करणे | 20000000 |
| 139 | | | प्र.क्र.17 शांतीनिकेतन हौसींग सोसायटी मध्ये आरसीसी गटारी स्लॅब कल्व्हर्टसह बांधणे व रस्ता खडीकरणासह डांबरीकरण करणे | 7500000 |
| 140 | | | जळगांव शहरातील विविध प्रभागात नागरीकांना बसण्यासाठी सिमेंटचे बाकडे पुरविणे | 1000000 |
| 141 | | | प्र.क्र.10 प्रिपाळा शिवार गट क्र. 194/1/1 खुल्या जागेस कुंपन भिंत बांधणे, पेव्हर ब्लॉक बसविणे व विद्युत व्यवस्था करणे | 3500000 |
| 142 | | | महानगरपालिका प्रशासकिय इमारतीला बाहेरच्या बाजुने रंगकाम करणे | 5000000 |
| 143 | | | प्र.क्र.15 सर्व्हे नं.523,524 संत गुलाबबाबा कॉलनी व मोहम्मदीया नगर मधील ओपन स्पेमध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व बांधकाम करुन विकसित करणे व सुशोभिकरण करणे | 7000000 |
| 144 | | | प्र.क्र.14 मध्ये शिरसोली नक्याजवळ मुस्लिम कब्रस्थानमध्ये वॉचमन रुम, टॉयलेट ब्लॉकची व्यवस्था तसेच बोअरिंग करुन त्यावर विद्युत पंप बसविणे व मुरुम भराव करुन पेव्हर ब्लॉक बसविणे. | 2500000 |
| 145 | | | प्र.क्र.17 जुने जळगांव बालक्रिडा व्यायाम शाळा रस्ता डांबरीकरण करणे | 1900000 |
| 146 | | | प्र.क्र.17 जुने जळगांव बालक्रिडा व्यायामशाळा रस्त्याच्या दोन्ही बाजुस आरसीसी गटार बांधणे | 1100000 |
| 147 | | | प्र.क्र. 3 स.नं. 118/5 कॉक्रीट रस्ता करणे | 2100000 |
| 148 | | | प्र.क्र. 3 स.नं. 119 ते नशिराबाद रस्ता आरसीसी गटार बांधणे | 1600000 |
| 149 | | | प्र.क्र.9 मधील गट क्र. 2/2/1 मधील ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व ओपन जिम साहित्य पुरविणे व विकसित करणे | 2500000 |
| 150 | | | प्र.क्र.3 जळगांव शिवार स.नं. 94/1 मधील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे व आरसीसी गटार बांधणे | 7500000 |
| 151 | | | प्र.क्र.3 मध्ये जळगांव शिवार गट नं. 78/5/खुली जागा व गट नं. 78/3/4/अ/4/ब/खुली /जागा येथे आरसीसी कंपाऊंड वॉल व चेनलिंक फेन्सींग करणे | 3000000 |
| 152 | | | प्रभाग क्र. 14 मधिल स.नं. 250 हनूमान मंदीर परिसरात आरसीसी गटार बांधणे (25 टक्के मनपा निधी अंतर्गत) | 4000000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 153 | | | प्रभाग क्र. 14 मधिल स.नं. 274ब मधील रस्ते डांबरीकरण करणे (25 टक्के मनपा निधी अंतर्गत) | 3500000 |
| 154 | | | प्र.क्र.5 मधील आर्किट हॉस्पिटल ते बि.जे.मार्केट ते खंडवा कटपिस सेंटर पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे (100 टक्के मनपा निधी अंतर्गत) | 5000000 |
| 155 | | | प्र.क्र. 5 प्रभुदेसाई चौक ते रेल्वे लाईनचा रस्ता डांबरीकरण करणे (100 टक्के मनपा निधी अंतर्गत) | 2300000 |
| 156 | | | प्रभाग क्र. 11 मधील दत्त डिगंबर सोसायटी व गुलमोहर सोसायटी गट क्र. १५२/४/१+२, 151/1,152/2 मधील रस्ते डांबरीकरण करणे | 6282000 |
| 157 | | | प्रभाग क्र. 11 मधील पिंप्राळा गट क्र. 101 मुंदडा नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | 13590000 |
| 158 | | | प्रभाग क्र. 11 मधील पिंप्राळा गट क्र. 101/3 मुंदडा नगर मधील रोड साईडला आरसीसी गटार बांधणे | 8128000 |
| 159 | | | प्रभाग क्र. 5 जिल्हा परिषद चौक ते बळीराम पेठ रस्ता डांबरी करण करणे | |
| 160 | | | | |
| 161 | | | प्र.क्र. ५ मधील शाहू नगर हौसींग सोसायटी मधील रस्ते डांबरीकरण करणे | 15300000 |
| 162 | | | प्र.क्र. ५ मधील सि.टी.एस. नं. २११६ नेहरू चौक पितृछाया मधील रस्ता कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 163 | | | स्टेशन रोड हॉटेल बॉम्बे ते शिवाजी नगर रेल्वे पुला पर्यतचा रस्ता डांबरीकरण करणे | 4500000 |
| 164 | | | प्रकाश मेडिकल ते शिवाजी चौक व जुनी नगरपालिका ते लेले संकुल या दोन रस्त्यांना जोडणारे पुर्व पश्चिम पाच रस्ते डांबरीकरण करणे | 3800000 |
| 165 | | | शहर पोलिस स्टेशन ते डायमंड हॉल रस्ता व जुनी नगरपालिका ते लेले संकुल या दोन रस्त्यांना जोडणारे तीन पुर्व पश्चिम रस्ते व जिल्हा परिषद मागील रस्ता डांबरीकरण करणे | 3500000 |
| 166 | | | प्र.क्र.2 गणेश ठाकरे यांचे घरापासुन ते प्रकाश तायडे (टेलर) यांचे घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 1056384 |
| 167 | | | प्र.क्र.2 भागवत भाऊ ते श्रीराम चौक ते मनपा कर्मचारी नानाभाऊ यांचे घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 2467831 |
| 168 | | | प्र.क्र.2 स्वामी समर्थ केंद्र समोरील सुडेबाई चक्कीवाले (संपुर्ण एल पट्टा) रस्ता डांबरीकरण करणे | 1843552 |
| 169 | | | प्र.क्र.2 खंडु पाटील ते हिरामण गंगाराम सोनवणे यांचे घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 2451870 |
| 170 | | | प्र.क्र.2 सावित्री आजी यांचे घरापासून ते उज्व्वल चौका पर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 1154296 |
| 171 | | | प्र.क्र. 2 महेंद्र सोनवणे यांचे घरापासुन ते मधुसूदन सपकाळे यांचे घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 2527000 |
| 172 | | | प्र.क्र. 2 मनपा कर्मचारी पुंडलिक कोळी यांचे घरपासुन ते हिरामण गंगाराम सोनवणे यांचे घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 1896920 |
| 173 | | | प्र.क्र.2 स्वामी नारायण मंदीराची व गायकवाड ताई गल्लीतील व रतिलाल झेंडू सपकाळे यांची गल्ली व राजु कोळी यांची गल्लीत रस्ता डांबरीकरण करणे | 4100000 |
| 174 | | | प्र.क्र.2 विक्की सैंदाणे यांचे घरापासुन ते गोविंदा चौधरी यांचे घरापर्यत रस्ता डांबरीकरण करणे | 1900000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 175 | | | प्र.क्र.2 धन्नु भाऊ इंगळे यांची गल्ली व दोन्ही घरकुल परिसर, राजपुत 3 गल्ली व शिवशंकर नगर परिसरातील 3 गल्ल्या एस मुकादम यांची गल्ली व संदीप भाचा यांची संपुर्ण गल्ली व इतर परिसरात रस्ते कॉक्रीटीकरण करणे किंवा पेव्हर ब्लॉक बसविणे | 3700000 |
| 176 | सौ.रेश्मा काळे | 16 | प्र.क्र.16 ईश्वर कॉलनी मधील डॉ. सुरवाडे यांचे घरापासून ते अवधुत पाटील यांचे घरापर्यत आरसीसी गटार बांधणे | 2000000 |
| 177 | 12000000 | | प्र.क्र.16 रनछोडदास नगर येथे रस्ते डांबरीकरण करणे | 2000000 |
| 178 | | | प्र.क्र.16 रनछोडदास नगर येथे आरसीसी गटारी बांधणे | 2000000 |
| 179 | | | प्र.क्र.16 मध्ये एकता कॉलनी ते कासमवाडी येथे आरसीसी गटारी बांधणे | 2000000 |
| 180 | | | प्र.क्र.16 मध्ये एकता कॉलनी रस्ते कॉक्रीटीकरण करणे | 1000000 |
| 181 | | | प्र.क्र.16 मध्ये चोखामेळा ते लाठी शाळा पर्यत दोन्ही बाजुने आरसीसी गटार बांधणे | 3000000 |
| 182 | डॉ.विश्वनाथ खडके | 17 | प्रभाग क्र. 17 अंतर्गत अयोध्या नगर, लिलापार्क, गट नं. 136 मध्ये श्री. किसन मराठे यांच्या राजवळ गटर बांधणे | |
| 183 | 0 | | प्रभाग क्र. 17 अंतर्गत पांझरापोळ संस्थानापासून ते नाल्यापर्यंत गटर बांधणे | |
| 184 | | | प्रभाग क्र. 17 अंतर्गत जुना नशिराबाद नाका श्रीकृष्ण मंदिरासमोर नाल्यावर संरक्षण भिंत बांधणे | |
| 185 | | | प्रभाग क्र. 17 अंतर्गत सावित्री नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | |
| 186 | | | प्रभाग क्र. 17 अंतर्गत गट नं. 149, अशोक नगर येथील श्री. संतोष चौधरी यांच्या घरापासून ते अयोध्या प्रोव्हिजनच्या समोरील बाजूपर्यंत आर.सी.सी. गटार बांधणे | |
| 187 | | | प्रभाग क्र. 17 अंतर्गत मनोज वॉटर बाबा मोटर समोरील रस्ता डांबरीकरण करणे | |
| 188 | | | प्रभाग क्र. 17 अंतर्गत काळे पेट्रोल पंप ते श्री नवल पाटील / चौधरी यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे. | |
| 189 | | | प्रभाग क्र. 17 अंतर्गत हिरा पाईप ते मातृभूमी चौक पर्यंत गटर बांधणे व स्लेब कल्व्हेट बांधणे. | |
| 190 | | | प्रभाग क्र. 17 अंतर्गत लिला पार्क /सोपानदेव नगर/ सुदर्शन कॉलनी यामधील रस्त्याचे डांबरीकरण करणे | |
| 191 | | | प्रभाग क्र. 17 अंतर्गत गट नं. 141, बालाजी मंदिर रोड ते नाल्यापर्यंत गटार बांधणे. | |
| 192 | सौ.रंजना वानखेडे | 17 | प्रभाग के 17 मधील हनुमान नगर मधील हनुमान पराडाईस ते गार्गी पार्क पर्यंत डांबरीकरण रस्ता करणे (सर्वे नं. 57/58) व इतर रस्ते करणे | 4000000 |
| 193 | 17500000 | | प्रभाग क्र 17 मधील सर्वे सर्वे नं.39/1 मधील बापु सैंदाणे यांच्या घरापासुन ते माकोडे चक्की पर्यंत डांबरीकरण रस्ता करणे | 455000 |
| 194 | | | प्रभाग के 17 मधील देवराज अँटो गॅरेज ते सृजन क्लामेस पर्यंत डांबरीकरण रस्ता करणे | 545000 |
| 195 | | | प्रभाग क्र 17 मधील सिद्धी विनायक शाळा ते हनुमान नगर पुला पर्यंत डांबरीकरण रस्ता | 600000 |
| 196 | | | प्रभाग क्र 17 मधील सिध्दी विनायक शाळे पासुन ते भारूळे साहेबांच्या घरा पुढील भाग डांबरीकरण रस्ता करणे | 800000 |
| 197 | | | प्रभाग क्र 17 मधील सुर्यकांत लाहोटी यांच्या घरापासुन ते रेमंन्ड कॉलनी गेट व पुढील भाग डांबरीकरण रस्ता करणे | 600000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 198 | | | प्रभाग क 17 मधील सदगुरू नगर मधील विवीध ठिकाणचे डांबरीकरण रस्ते करणे (सर्वे नं.39/1,39/2, 42/1, 43 कौतीक नगर) | 3500000 |
| 199 | | | प्रभाग क्र 17 मधील हनुमान नगर सर्वे नं 57/58 व कौतीक नगर मधील सर्वे नं. 43 येथील आर.सी.सी. गटारी व कल्व्हेट करणे. | 2500000 |
| 200 | | | प्रभाग क 17 मधील सदगुरू नगर मधील आर. सी. सी. गटारी व कल्व्हेट करणे. | 3000000 |
| 201 | | | प्रभाग क्र 17 मधील स्वामी नारायण नगर मधील आर. सी. सी. गटारी व कल्व्हेट करणे. | 1500000 |
| 202 | इब्राहीम पटेल | 18 | प्रभाग क्र. 18 सर्वे नं. 20 रजा कॉलनी राहिलेला रस्ता खडीकरणासह डांबरीकरण करणे | 1000000 |
| 203 | 3000000 | | प्रभाग क्र. 18 सर्वे नं. 17 मधील रस्ते खडीकरणासह डांबरीकरण करणे | 2000000 |
| 204 | रियाज बागवान | 18 | प्र.क्र. 18 स.नं. 16 मुलतानी हॉस्पिटल मागील ओपन स्पेसमध्ये ओपन जिम साहित्य, पेव्हर ब्लॉकसह ट्रॅक बनविणे व कंपाऊंड वॉल बांधणे. | 4000000 |
| 205 | 8000000 | | प्र.क्र. 18 स.नं. 15 गणेशपुरी इकरा कॉलेज जवळ ओपन स्पेसमध्ये ओपन जिम साहित्य, पेव्हर ब्लॉकसह ट्रॅक बनविणे व कंपाऊंड वॉल बांधणे. | 4000000 |
| | 70,87,15,914 | | | 70,87,15,914 |

**मा.पिठासीन अधिकारी यांनी सभागृहात चर्चेच्या दरम्यान दिलेल्या निर्देशानुसार खालील कामांचे प्रस्ताव समाविष्ट करण्यात येत आहेत.**

| अ.क्र. | सन्मा.सदस्य/ सदस्या | प्र. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|---|---|
| 1 | कैलास सोनवणे | 4 | प्रभाग क्र.4 मध्ये बागवान मोहल्ला, काटयाफाईल, बळीराम पेठ, जुने जळगांव व इतर ठिक ठिकाणी कॉंक्रीटचे रस्ते तयार करणे. | 30000000 |
| 2 | सदाशिव ढेकळे | 14 | प्रभाग क्र.14 मधील मेहरुण स.नं.416 जिवन मोती सोसायटी परीसरातील रस्ते डांबरीकरण करणे. | 3889071 |
| 3 | | | प्रभाग क्र.14 मधील आदर्श नगर मेहरुण स.नं.438,439 मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 4211042 |
| 4 | | | प्रभाग क्र.14 मधील शिरसोली रोड वरील कब्रस्थान मधील पाथवे कॉक्रीटीकरण करणे. | 3196703 |
| 5 | | | प्रभाग क्र.14 मधील आदर्श नगर मेहरुण स.नं.436,437,444 मधील रस्ते डांबरीकरण करणे. | 9606454 |
| 6 | | | प्रभाग क्र.14 गायत्रीनगर शिरसोली रोड ते शिवाजी उदयान नाल्या पर्यंतचा नाल्यास रिटेनिंग वाल बांधणे व रोड क्रॉसिंगला स्लॅब टाकणे. | 6048906 |
| 7 | | | प्रभाग क्र.14 मेहरुण स्मशानभुमी मध्ये रस्ता कॉक्रीटीकरण, संरक्षण भिंत, विधी शेड, पेव्हींग ब्लॉक, टॉयलेट, बैठक व्यवस्था करणे. | 1 कोटी |
| | | | एकूण - | 36952176 |
| 8 | राजेंद्र पाटील | 14 | प्रभाग क्र.14 मधील मेहरुण स.नं.267,269 जकात सोसा.,व जय दुर्गा शाळा परीसरात रोड साईटने नविन | 7566000 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्वर्ट बांधणे. | |
| 9 | | | प्रभाग क्र.14 मधील मेहरुण स.नं.265,266 मध्ये रोड साईडने आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्वर्ट बांधणे. | 7261550 |
| 10 | | | प्रभाग क्र.14 मधील मेहरुण स.नं.251 मध्ये रोड साईडने आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्वर्ट बांधणे. | 7556500 |
| 11 | | | प्रभाग क्र.14 मधील मेहरुण स.नं.271,272 मध्ये रोड साईडने आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्वर्ट बांधणे. | 10265910 |
| 12 | | | प्रभाग क्र.14 मधील मेहरुण स.नं.274 मध्ये रोड साईडने आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्वर्ट बांधणे. | 6238910 |
| 13 | | | प्रभाग क्र.14 मधील आदर्श नगर मेहरुण स.नं.437 साईबाबा मंदीर परीसरातील रस्ते कॉक्रीटीकरण करणे. | 2192591 |
| | | | एकूण - | 4,10,81,461 |

**नगरसचिव विषय क्रं. १३) :-** शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.२६/नवि-१६ दि.११/०४/२०२२ अन्वये वार्ड क्र.५,११,१४ मध्ये महानगरपालिका क्षेत्रात शासनाने निश्चित केलेली ०४ कामांव्यतिरिक्त ०२ कामे मनपा २५ टक्के हिश्यातील व मनपा हिश्यातील १०० टक्के निधीतील ०२ कामे अशी एकत्रित ०८ कामांची निविदा प्रक्रिया राबविणे कामी मा.विरोधी पक्षनेता,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा परंतू त्याच्यात एक दुरूस्ती आहे की आलेल्या १४ व्या प्रभागाऐवजी प्रभाग क्र.११ मध्ये करणेबाबतचा बदल करण्यात यावा.

**मा.महापौर :-** प्रभाग क्रं. ११ पिंप्राळा गट नं.१०४ मधील ओपन स्पेसला चेनलिंग फेसिंग करून विकसित करणे. आपण प्रभाग क्रं. ११ मध्ये आहे आणि प्रभाग क्रं. १४ साठी प्रस्तावित केलेले असेल शासनाला आणि शासनाने आपल्याला प्रभाग क्रं. १४ साठी तो निधी मंजुर करून दिलेला आहे का

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही , नाही

**मा.महापौर :-** अस काही आहे का

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही , आपण मनपा हिश्श्याच काम प्रस्तावित केलेल आहे. हे काम ज्या हेड खाली मंजुर आहे त्या हेड खाली होईल.

**मा.आयुक्त :-** मी सांगीतले होते त्याप्रमाणे

**मा.महापौर :-** बर बर म्हणजे त्यात बदल नाहीये.

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही त्यात बदल नाहीये.

**मा.महापौर :-** बर

**मा.आयुक्त :-** मी तेच म्हणाले तुम्हाला

**श्री.नितीन लढ्ढा :-** मनपा फंडातील आहे

**मा.महापौर :-** ठिक आहे नितीनभाऊ यांनी दिल्याप्रमाणे कामात बदल करण्यात यावा आणि दिलेले काम हे त्यात समाविष्ट करण्यात यावे. विषय क्रं.१३ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८१६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.२६/नवि-१६ दि.११/०४/२०२२ अन्वये वार्ड क्रमांक ५,११ व १४ मध्ये महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सोईसुविधांचा विकास योजना अंतर्गत शासनाने रुपये ०२.८० कोटीचा निधी देणे बाबत शासन निर्णय पारित केलेला आहे, मात्र सदर शासन निर्णयात अट क्र.३ मध्ये प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्क्याचा शासनाचा व मनपा हिस्सा २५ टक्के राहणार आहे. मात्र अशी धारणा आहे कि, शासनाने ७५ टक्के प्रमाणे सदर योजने अंतर्गत रुपये ०२.८० कोटी निधी वितरीत करण्यास मान्यता देतांना रुपये ०२.८० कोटी ही ७५ टक्के रक्कम ही शासनाची राहील सदर निधी वितरीत करणेस शासनाने मान्यता दिलेली आहे व याव्यतिरिक्त २५ टक्के म्हणजेच रुपये ७५.०० लक्षची उर्वरीत कामे मनपा

निधीतील असतील या करीता शासन निर्णयात नमुद खालील ०४ कामांव्यतिरिक्त ०२ कामे मनपा २५ टक्के हिश्यापोटी व मनपा १०० टक्के निधीतील ०२ कामे करणेबाबत प्रस्तावात नमूद आहे.

मात्र सभागृहात झालेल्या चर्चेनूसार तसेच मा.पिठासिन अधिकारी यांचे निर्देशानूसार सन्मा.सदस्य, श्री.ललित विजय कोल्हे यांनी पत्राव्दारे सुचविलेल्या प्रभाग क्र.११,१४,०५ मधिल विकास कामे शासन निर्णयात नमुद खालील ०४ कामांव्यतिरिक्त ०३ कामे मनपा २५ टक्के हिश्यापोटी व मनपा १०० टक्के निधीतील ०२ कामे उपरोक्त नमूद विविध शासकीय योजनांच्या निधीमधून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**मनपा २५ टक्के निधीतील कामे**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.११ पिंप्राळा गट क्र.१०४/१ व मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग करुन पेव्हर ब्लॉक बसविणे (२५ टक्के मनपा निधी अंतर्गत) | ३१,५६.१५३/- |
| २ | प्रभाग क्र.११ मधिल १०२ मधील ओपन स्पेसला चेनलिंक फेन्सींग करुन पेव्हर ब्लॉक बसविणे (२५ टक्के मनपा निधी अंतर्गत) | ९,३७,६५२/- |
| ३ | प्रभाग क्र.१४ मधिल स.नं.२७४ब मधील रस्ते डांबरीकरण करणे(२५ टक्के मनपा निधी अंतर्गत) | ३५ लक्ष |

**तसेच याव्यतिरिक्त मनपा १०० टक्के निधीतुन खालील प्रमाणे नमुद कामांना मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

| | | |
|---|---|---|
| १ | प्र.क्र.५ मधील आर्किट हॉस्पिटल ते बि.जे.मार्केट ते खंडवा कटपिस सेंटर पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे.(१०० टक्के मनपा निधी अंतर्गत) | ५० लक्ष |
| २ | प्र.क्र.५ प्रभुदेसाई चौक ते रेल्वे लाईनचा रस्ता डांबरीकरण करणे(१०० टक्के मनपा निधी अंतर्गत) | २३ लक्ष |

**शासन निर्णय क्र.मनपा-२०२२/प्र.क्र.२६/नवि-१६ दि.११/०४/२०२२ अन्वये समाविष्ट असलेली कामे**

| | | |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.११ मधिल दत्त डिगंबर सोसायटी व गुलमोहर सोसायटी गट क्र.१५२/४/१+२, १५१/१,१५२/२ मधील रस्ते डांबरीकरण करणे. | ६२.८२लक्ष |
| २ | प्रभाग क्र.११ मधिल पिंप्राळा गट क्र.१०१ मुंदडा नगर मधील रस्ते डांबरीकरण करणे | १ कोटी ३५ लक्ष ९० हजार |
| ३ | प्रभाग क्र.११ मधिल पिंप्राळा गट क्र.१०१/३ मुंदडा नगर मधील रोड साईडला आरसीसी गटार बांधणे | ८१ लक्ष २८ हजार |
| ४ | प्रभाग क्र.५ जिल्हा परिषद चौक ते बळीराम पेठ रस्ता डांबरीकरण करणे | |

तसेच सदर कामी शासनाने निश्चित केलेली ०४ कामे वरील प्रमाणे २५ टक्के मनपा हिश्यातील ०३ कामे व १०० टक्के मनपा हिश्यातील ०२ कामे अशी एकत्रित ०९ कामांची निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**
**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**
**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १४) :-** महानगरपालिका आरोग्य विभागाकडील व्हॅक्युम एम्टीयर दुरुस्ती करणेबाबत मा.विरोधी पक्षनेता,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** तातडीने प्रस्ताव मान्य करण्यात यावा. हे वाहन बऱ्याच दिवसांपासुन उभे आहे. एकच व्हॅक्युम एम्टीयर आहे आपल्याकडे आज ही परिस्थिती आहे की नागरीक आपल्याकडे तक्रार घेवुन येतो परंतू व्हॅक्युम एम्टीयर दुरूस्त नाहीये. तर ही अत्यावश्यक सेवेतील वाहन जी आहेत ना याच्या संदर्भात वाहन विभाग जो आहे आपला तो अत्यंत कमकुवत झालेला आहे. म्हणजे त्या वाहनांसारखीच परिस्थिती त्या वाहन विभागाची झालेली आहे. काय आहे महत्वाची वाहने आहेत. म्हणजे आता परवाच्या दिवशी आमच्या प्रभागामध्ये जिल्हा परिषद चौकामध्ये एक ड्रेनेज चोकअप झाल ते करता आले नाही. त्या माणसांनी साधारणत: सकाळी ८ वाजेपासुन ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत जिवाच्या आकातांने ते मोकळे केले कारण त्याच्यात पाणी साठलेले आहे आणि त्याच्यात उतरू शकत नाही त्याच्या जिवाला धोका होवू शकतो. परंतू वाहन विभाग अशा पध्दतीने गांभीर्याने हे विषय हाताळत नाहीत. तरी कुठेतरी यांना सक्त सुचना द्याव्यात .

**मा.महापौर :-** खर तर वाहन विभागाने या तक्रारी आमच्याकडे आल्या आणि हा निर्णय घ्यावा लागला आणि याचा दुरूस्तीचा जो खर्च आहे. तो मोठया प्रमाणावर आहे म्हणुन हा प्रस्ताव ठेवण्यात आलेला नाही. तर याच्या पुढे अस होवू नये की दुरूस्ती खुप मोठ्या प्रमाणावर असते आणि मग हे आपल्याकडुन केल जात मग ते वाहन दुरूस्ती होत नाही.परंतू वाहन दुरूस्ती एकच मशिन असल्यामुळे हा विषय अत्यावश्यक आहे म्हणुन वाहन विभागाने सुध्दा हे लक्षात ठेवाव. एखाद वाहन नादुरूस्त झाल असेल तर तात्काळ त्याचा प्रशासकीय प्रस्ताव हा सादर करावा. विषय क्रं.१४ मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८१७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिकेकडे सदयस्थितीत शहरातील मलनिस्सारणासाठी फक्त एकमेव व्हॅक्युम एम्टीयर उपलब्ध असुन त्याव्दारे सदर कामकाज हाताळले जात आहे, मात्र सदर व्हॅक्युम एम्टीयर हे बऱ्याच दिवसांपासुन नादुरुस्त असुन बंद अवस्थेत आहे. परिणामी शहरातील मलनिस्सारणाचे कामकाज बंद असुन त्यामुळे नागरीकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

व्हॅक्युम एम्टीयरला आजरोजी १३ वर्षे इतका कालावधी पुर्ण झालेला असुन व्हॅक्युम एम्टीयरवर असलेला टँकही निकामी झालेला असुन सदर टँक नविन टाकणे तसेच इतर तांत्रीक कामे करणे आवश्यक आहेत. जळगांव शहरातील लोकसंख्या व क्षेत्रफळ पाहता उपलब्ध असलेले व्हॅक्युम एम्टीयर तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे. व्हॅक्युम एम्टीयर दुरुस्ती कामी येणाऱ्या पर्यायी खर्चास मनपा निधी अंतर्गत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १५):-** जळगांव शहर महानगरपालिकेत दिवसैंदिवस सेवानिवृत्त होणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांच्या संख्येसंदर्भात उपाययोजना करणेबाबत मा.विरोधी पक्षनेता,मनपा,जळगांव यांचेकडून आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांना मानधनावर घेण्याच्या संदर्भात मा.आयुक्त महोदया यांना प्राधिकृत करण्यात येत आहे की त्यांनी यासंदर्भात जे कोणी आपले कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असतील किंवा अधिकारी असतील त्यांचा पुर्वानुभव पाहाता. त्यांच्या कामाची गुणवत्ता पाहाता या सगळ्या गोष्टींचा विचार करून तातडीने निर्णय घेवुन अंमलबजावणी प्रशासनाने करावी.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं.१५ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८१८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की,शहरातील अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा व मलनिस्सारण कामांमुळे रस्ते खराब झालेले असल्याने पाणी पुरवठा योजनेचे कामे आता अंतिम टप्प्यात असल्याने शहरातील रस्ते व इतर विकास कामे वेग घेत आहे तसेच मागील दोन वर्ष कोरोनामुळे शहरातील विकास कामे बंद होती. सन २०२१ पासुन शासनाने कोरोना नियमावली शिथिल केल्याने शहरातील विकास कामे हाती घेण्यात येत आहे. मात्र गुणवत्तापुर्वक, दर्जेदार कामे करणे कामी आवश्यक असणारे अभियंते/अधिकारी/कर्मचारी हे जुन महिन्यात सेवानिवृत्त होत आहे, परिणामी सदर कामी महानगरपलिकेत अभियंता / अधिकारी/कर्मचारी यांची तीव्र टंचाई भासणार असून याचा कामकाजावर विपरीत परिणाम होणार आहे तसेच जळगांव शहर महानगरपालिकेचा आकृतीबंध अदयापही मंजूर नसल्यामुळे सरळसेवा भरती देखिल करणे शक्य नाही.

करीता उपरोक्त नमूद कारणास्तव जळगांव शहर मनपातील सेवानिवृत्त अभियंता/अधिकारी/कर्मचारी यांचा चांगल्या कामकाजाचा पुर्वानुभव पाहता त्यांना सेवेची संधी देवून मानधन तत्वावर सेवा देणेकामी महत्वाची कामे त्वरीत करुन घेणे कामी आवश्यकतेनूसार जळगांव शहर मनपातील सेवानिवृत्त अभियंता/अधिकारी/कर्मचारी यांना मानधनावर नियुक्त करणे कामी आयुक्त,जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव यांना प्राधिकृत करणेस व येणाऱ्या पर्यायी खर्चासही मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १६) :-** शिवाजी नगर, गेंदालाल मिल परिसरातील सि.स.नं.२६८६, म.न.पा.उर्दू शाळा क्र.१५ चे दक्षिणेकडील खुली जागा अलफैज फाऊन्डेशन,जळगांव यांना महासभा ठराव क्र.५३ दि.११/०३/२००८ अन्वये शाळा व इतर शैक्षणिक कोर्सेस चालविण्यासाठी दिलेल्या जागेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(ग) (चार) तरतुदीनुसार नाममात्र रु.१/- चौ.मी. प्रतीवर्ष दराने, ३० वर्षाच्या कालावधीकरीता भाडेपट्टा लावणेबाबत सचिव, अलफैज फाऊन्डेशन,जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** शासनाच्या मान्यतेस अधिन राहुन प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** आता अशा ज्या ज्या संस्था आहे ज्यांना आपल्या बंद पडलेल्या शाळा असतील , खुले भुखंड असतील किंवा विविध उपक्रमांसाठी दिलेल्या असतील तर त्यांनाही तशी कायदेशीर पध्दतीने अंमलबजावणी करून त्यांना ते म्हणजे इतर संस्थानाही ज्यांनी ज्यांनी मागणी केली असेल नाममात्र दराप्रमाणे तर ते देण्यात यावे.

**श्री.सुनिल महाजन:-** शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहुन देण्यात यावे.

**मा.महापौर :-** अलफैज फौंडेशनला दिलेली जी जागा आहे ही महापालिकेची जागा आहे ही ओपनस्पेस होती. ही आपण विकत घेतलेली जागा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** जागा महापालिकेचीच आहे. आपण त्यांना ती जागा दिली होती त्यांनी त्या जागेवर स्वखर्चाने इमारतही बांधलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ (ड) मध्ये तशी तरतूद आहे की शैक्षणिक प्रयोजनासाठी राज्य शासनाच्या पुर्व मान्यतेने अशा पध्दतीने जागा सवलतीच्या दरात देता येवु शकतील. तर याच्यासंदर्भात राज्य शासन जे धोरण ठरवेल जे भाडे ठरवेल त्याच्या अनुषंगाने आपल्याला तो निर्णय पुढे घ्यायचा आहे. आज आपण राज्य शासनाकडुन तशा पध्दतीच पत्र आलेल होत की यांनी राज्य शासनाकडुन तसा अर्ज केलेला होता व राज्य शासनाने सांगितले तसा धोरणात्मक निर्णय घेवुन तुम्ही तसा प्रस्ताव शासनाकडे पाठवावा. शेवटी धोरण हे राज्य शासन ठरवणार आहे. राज्य शासनाने दिली सवलत तर ती दिली जाईल. जर राज्य शासनाने नकार दिला तर प्रस्ताव रद्द होईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** भाऊ प्रशासनाकडुन प्रस्ताव यायला पाहीजे ना

**श्री.सुनिल महाजन :-** पत्र जे आले आहे ते प्रशासनाकडे पाठवु आपण

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हो मग प्रशासन, असे प्रस्ताव प्रशासनाकडुन प्रशासकीय प्रस्ताव आला पाहीजे अस म्हणण आहे माझे, अशासकीय प्रस्ताव आलेला आहे ना तो

**श्री.सुनिल महाजन :-** राज्य शासनाच्या पुर्व परवानगीनेच देवु अस टाकुन घेता आहे आपण

**श्री. नितीन लढ्ढा:-** आपण तो प्रस्ताव

**मा.महापौर :-** राज्य शासनाची परवानगी घेण्यासाठी हा प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठवावा. विषय क्रं. १६ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८१९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, अलफैज फाऊन्डेशन,जळगांव ही नोंदणीकृत सेवाभावी संस्था असून संस्थेस महासभा ठराव क्र.५३ दि.११/०६/२००८ अन्वये शिवाजी नगर, गेंदालाल मिल परिसरातील सि.स.नं.२६८६, म.न.पा. उर्दू शाळा क्र.१५ चे दक्षिणेकडील खुली जागा शाळा व इतर शैक्षणिक कोर्सेस चालविण्यासाठी करारनामा करुन जागेचा ताबा दिलेला आहे या जागेवर संस्थेने बांधकाम परवानगी घेऊन

बांधकाम ही केलेले आहे. बांधकाम केलेल्या जागेचा बदल होऊन ती जागा शैक्षणीक प्रयोजनासाठी राखीव करण्यात आल्याने शाळेची इमारत असलेली जागेचा महासभा ठराव क्र.१०११ दि.१८/०४/२०११ अन्वये करण्यात आलेला आहे.

अलफैज फाऊन्डेशन,जळगांव हि नोंदणीकृत सेवाभावी संस्था असुन संस्थेस दिलेल्या जागेस शैक्षणिक प्रयोजनासाठी नाममात्र भाडेपट्टा लावणे बाबत शासनास विनंती अर्ज दिलेला आहे, शासनास दिलेल्या निवेदनात शासनाने मुळप्रतीसह अधिनियमातील तरतूद नमूद करुन नियमानुसार महानगरपालिकेस प्रस्ताव सादर करणे बाबत दि.०५/०१/२०२२ रोजी पत्र दिले आहे.

जळगांव सि.स.नं.२६८६ जळगांव महानगरपालिकेच्या मालकीची शैक्षणिक प्रयोजनातील ८३६०.८७ चौ.मी. जागे पैकी २२८६ चौ.मी. जागा अलफैज फाऊन्डेशन,जळगांव या संस्थेस शैक्षणिक प्रयोजनासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७९(ग) (चार) तरतुदीनुसार नाममात्र रु.१/- चौ.मी. प्रतीवर्ष दराने, ३० वर्षाच्या कालावधीकरीता भाडेपट्टा लावणेसाठी सदरचा प्रस्ताव राज्य शासनाकडेस मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- महाजन सुनिल सुपडू**

**नगरसचिव विषय क्रं. १७) :-** महासभा ठराव क्र.६०४ दि.२०/०४/२०१० नूसार महानगरपालिका हद्दीतील रामानंदनगर घाटापासून ते काव्यरत्नावली चौक व त्यापूढील शिरसोली नाक्यापर्यंतच्या (सध्याचे डी-मार्ट) रस्त्यास "कै.कांताबाई भवरलाल जैन राज पथ" असे नांव देणेबाबत ठराव पारित झालेला आहे मात्र महासभा ठराव क्र.१८८ दि.०३/०८/२०१९ अन्वये सदर मार्गास राष्ट्र सेविका समिती आदय प्रमुख "वं.लक्ष्मीबाई केळकर पथ" असे नांव देणेबाबत ठराव पारित होवून त्यानूसार काव्यरत्नावली चौकातील दुभाजकावर राष्ट्र सेविका समिती आदय प्रमुख "वं.लक्ष्मीबाई केळकर पथ" असा फलक लावण्यात आलेला असून चुकीने लावण्यात आलेला फलक काढून घेणेबाबत निर्णय होणे कामी श्री.अनिल जोशी, व्हाईस प्रेसिडेंट (कार्पोरेट अफेअर्स), जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दि.०३/०८/२०१९ रोजीचा हा रद्द करून पुर्वीचा ठराव जो आहे महासभा ठराव क्रं. ६०४ दि.२०/०४/२०१० हा कायम करून त्या पध्दतीने कार्यवाही करण्याच्या कामास परवानगी देण्यात यावी.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** २०१० साली हा ठराव झालेला आहे आणि राष्ट्रसेविका समितीचा ठराव २०१९ मध्ये आपण केलेला होता. तर ही प्रशासनाची चुक आहे तर याच्यापुढे अस होवू नये. कारण जी नांव दिलेली आहे ही दोन्ही वंदनिय आहे आणि हे पहिल्या ठरावाला आपण महासभेनेच ठरवलेल होते. आपण महासभेनेच मंजुरी दिली होती आणि सर्वानुमते मंजुर झालेला आहे. दुसऱ्या वेळेसपण महासभेनेच मंजुरी दिलेली आहे आणि सर्वानुमते मंजुर झालेला आहे. तर अशा परिस्थतीमध्ये द्विधा परिस्थिती होते. दोनही आपल्याला वंदनिय आहे तर प्रशासनाची चुक आहे यात कोणत्याही नगरसेवकांची चुक नव्हती याच्यामध्ये सन्मा.सदस्यांची कोणाचीच चुक नसतांना असे प्रस्ताव येत आहे. तर हे प्रशासनाने काळजीपुर्वक बघुन घ्यावे. जेणेकरून जे नंतर फेस कराव लागत ते फेस कराव लागणार नाही आणि प्रशासनाला जे योग्य वाटेल तो निर्णय प्रशासनाने घ्यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे , म्हणजे पुर्वी जी नगरपालिका असेल किंवा आपली महानगरपालिका आपण कुठल्याही चौकाला किंवा कुठल्याही रस्त्याला किंवा कुठल्याही वास्तुला एकदा नामकरण केल्यानंतर आपण तो अपवादात्मक परिस्थितीत सुध्दा ते नामकरण बदलण्याच्या संदर्भात सुध्दा धोरण बदलत नसतो. ईथे कुठेतरी हे प्रशासकीय प्रस्ताव २०१९ ला आला आणि त्या अशासकीय प्रस्तावाला मान्यता मिळाली आणि त्याची अंमलबजाणी झाली ती चुक आहे. परंतू आता झालेली चुक सुधारण्याच्य दृष्टीकोनातुन त्यांचाही काही वाद नाहीये, आपलाही काही वाद नाहीये. जळगांव शहरामध्ये दुसरा मार्ग असेल तर त्यांचे नांव देण्याच्या संदर्भामधील सुध्दा भुमिका ज्यावेळेलाही येईल त्या पध्दतीने योग्य तो निर्णय होईल. तर आपण या पध्दतीने महासभा ठराव क्रं. ३८८ दि.०३/०८/२०१९ हा रद्दबादल करतोय आणि यापुर्वीचा महासभा ठराव क्रं. ६०४ दि.२०/०४/२०१० नुसार या रस्त्याचे नामकरण करण्याच्या संदर्भात मान्यता पुनश्च देतोय आणि तशा पध्दतीने प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा.महापौर :-** हा पुर्वी ठराव करण्यात आला त्यानंतर हा दुसरा ठराव करण्यात आला. तर आता हा अशासकीय आल्यामुळे हा सगळा गोंधळ निर्माण झाला आणि पुनश्च यापुढे कोणत्याही चौकाला , रस्त्याला नांव देण्यासाठी प्रशासकीय प्रस्तावच महासभेपुढे आले पाहीजे. जेणेकरून त्याची पुर्णपणे शहानिशा होईल आणि पुर्वी त्याठिकाणी नांव दिलेले आहे किंवा नाही त्यानंतरच ते महासभेपुढे घेण्यात येईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे. अगदी योग्य सुचना आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मा.महापौरताई आता हा विषय आलेला आहे आणि मागेपण एक असाच विषय झालेला आहे. आता उपमहापौर साहेब कुलभुषण भाऊंनी पण सांगीतल की संस्थेला जागा देण्याच्या संदर्भात असेल किंवा कोणत्या रस्त्याला नांव देण्याच्या संदर्भात असेल , चौकाला नांव देण्याच्या संदर्भात असेल, कोणती ओपनस्पेस दुसऱ्या संस्थेला देण्याच्या संदर्भात असेल. आपण मागे कोणती तरी एक ओपनस्पेस एका संस्थेला दिलेली होती. परंतू मी गेल्या आठ नऊ महिन्यांपासुन या विषयाचा पाठपुरावा करतोय. आपल्या महानगरपालिकेकडे कोणत्या रस्त्याला कोणाच नांव दिलेले आहे किंवा कोणत्या चौकाला कोणाचं नांव दिलेले आहे. त्याची यादी सुध्दा नाहीये. मी गेल्या आठ महिन्यांपासुन सांगतोय मी सुनिलभाऊंनाही चार दिवसापुर्वी बोललो की मी गेल्या आठ महिन्यांपासुन हेच सांगतोय भोसले साहेब असल्यापासुन की आपले जेवढे इंजिनियर आहेत. मी या सभागृहाला विनंती करतो. महापौरसाहेब , आयुक्त साहेब सगळयांना विनंती करतो की आठच दिवसांमध्ये सगळे ठिकाणी सगळयांना पाठवुन कोणत्या चौकाला कोणते नांव दिलेले आहे, कोणत्या रस्त्याला कोणते नांव दिलेले आहे. याची यादी तरी करून घ्या. कारण काय आहे पुन्हा प्रशासकीय प्रस्ताव जरी आणायच म्हंटल तर हे कोणत्या बेस लिहीतील की याला हे-हे नांव दिलेले आहे किंवा या चौकाला नांव दिलेले नाहीये. नाही दिलेले आहे कारण मी मा.खासदार उन्मेशदादांना , मा. आमदार राजुमामांना या शहराच्या सुशोभिमरणासाठी एक विनंती केलेली आहे की हे चौक आपण सुशोभिकरण त्यांचे नामकरण झाल्यानंतर त्यांचे सुशोभिकरण करून द्यावे. तर आता ख्वॉजामिया चौकाला माजी खासदार जे होते वाय.जी.महाजन सर जे अर्थतज्ञ होते त्यांचे नांव दिलेले आहे. त्यांच आता हे कुणालाच माहिती नाहीये. मी जात होतो तर मला माहिती आहे मी होतो तर सभागृहामध्ये बोललो , स्टेट बँकेजवळ डॉ. केशव प्रल्हाद फेगडेवारांचे नांव दिलेले आहे. पण आपल्या महापालिकेकडे त्यची यादी नसावी ही फार मोठी शोकांतिका आहे. ना त्याचे ठराव आहेत , नगरपालिका असतांना सुध्दा या शहरातील मान्यवर असतील ,राष्ट्रपुरुष असतील त्यांचे नांव दिलेले आहेत. तर आठ दिवसांमध्ये याचा सर्वे करून , सगळ्या डिपार्टमेंटला कामाला लावुन त्यांना आदेश देण्यात यावे मी या सभागृहाला विनंती करतो की आठ दिवसांमध्ये ती यादी तयार करून जाहीर करावी. जेणेकरून काही चुका असतील तर ते येवुन आपल्याला संपर्क तरी करतील की हा ठराव आहे. यापुर्वी ठराव झाला असेल किंवा काही असेल आणि यापुढे असे विषयाचे प्रशासकीय प्रस्तावच येवु द्यावे. अशी पण सभागृहाला विनंती सगळयांनी केलेली आहे. माझी पण विनंती आहे.

**श्रीमती.सरिता नेरकर :-** महापौर साहेब , पुण्यामध्ये एक वाडा होता तिथे मुलींची शाळा होती त्या शाळेला तेथील नगरसेविकेने त्या शाळेला सासुंचे नांव दिल गेल आणि फार मोठ युध्द तिथे झालेले आहे. कारण त्यांनी ठराव पास करून घेतला होता. पुणे महापालिकेत आत्ताच चालुच झालेले आहे असे.

**श्री.सुनिल महाजन :-** ताई पुणे महापालिकेचा काही विषय नाहीये.

**श्रीमती.सरिता नेरकर :-** तर महापौर साहेब ,

**मा.महापौर :-** तर ठराव रद्द करून

**श्री.नितीन लढ्ढा :-** महापौर ताई २०१९ चा रद्द करून २०१० चा कायम करण्यात यावा.

**मा.महापौर :-** २०१० च्या ठरावाची अंमलबजावणी करावी.

**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** दि.०३/०८/२०१९ ला झालेला ठराव हा रद्द करण्यात यावा आणि दि.२०/०४/२०१० चा ठराव हा मान्य करून विषय क्रं. १७ ला सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८२० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील काव्यरत्नावली चौकातील दुभाजकावर राष्ट्र सेविका समिती आदय प्रमुख संचालीका "वं.लक्ष्मीबाई केळकर पथ" असा फलक लावण्यात आल्याचे दिसून आले. कंपनीने याबाबत संबंधीत राष्ट्रसेविका समिती व प्रभागातील सन्माननीय नगरसेविका सौ.उज्वलाजी बेंडाळे आणि ॲड सौ.शुचिताजी हाडा यांचेकडे विचारणा केली असता असे लक्षात आले की, जळगांव शहर

महानगरपालिकेने आयत्यावेळेस महासभा ठराव क्र.१८८ दि.०३/०८/२०१९ रोजी ठराव पारित करुन व त्यावर अंमलबजावणी व्हावी या हेतुने शहर अभियंता यांनी दि.३१/०८/२०१९ रोजी राष्ट्रसेविका समिती यांना पत्र देवुन काव्यरत्नावली चौक ते रामानंद नगर घाटा पर्यंतच्या प्रमुख रस्त्याला राष्ट्र सेविका समिती आदय प्रमुख "वं.लक्ष्मीबाई केळकर पथ" असे नामकरण करण्यास विशिष्ट अटी व शर्तीवर परवानगी दिली असल्याचे समजले.

सदर रस्त्याला यापुर्वी कंपनीच्या प्रस्तावावर दिनांक २०/०४/२०१० रोजी तत्कालीन महापौर श्री.प्रदीप रायसोनी यांच्या अध्यक्षतेखाली व तत्कालीन आयुक्त श्री.रामनाथ सोनवणे यांचे उपस्थितीत महासभा ठराव क्रमांक ६०४ सर्वानुमते पारीत होवुन त्या अनुषंगाने महानगरपालीका हद्दीतील रामानंदनगर घाटापासून ते काव्यरत्नावली चौक व त्यापुढील शिरसोली नाक्यापर्यंतच्या (सध्याचे डी-मार्ट) रस्त्यास "कै.कांताबाई भवरलाल जैन राज पथ" असे नांव देणेबाबत मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. असे असतांना देखील महासभेने त्याच रस्त्यासाठी नव्याने ठराव पारीत केला. सदर ठराव पारीत करतांना त्यात शेवटी सदर रस्त्यास/मार्गास या पूर्वी नाव दिले आहे किंवा कसे याबाबत प्रशासनाने खात्री करुन घ्यावी. असे स्पष्ट नमूद केले असतांना मात्र प्रशासनाने याबाबत कोणतीही खात्री न करता प्रशासनाच्या वतीने काही अटी शर्तीवर नवीन नाव देण्याबाबत कार्यवाही करण्यास परवानगी दिली आहे.

सदरच्या ठरावाच्या अनुषंगाने संबंधित राष्ट्रसेविका समिती यांनी त्यांना देण्यात आलेलया शहर अभियंता यांच्या दि.३१/०८/२०१९ च्या पत्रातील अटी व शर्तींची कोणतीही पुर्तता न करता, कोणत्याही प्रकारची खात्री न करता काव्यरत्नावली चौकात फलक लावुन संभ्रम निर्माण केला आहे ज्यामुळे समाजात चुकीचा संदेश पसरविला जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही बाब अतिशय संवेदनशील असून त्याची त्वरीत दखल घेणे गरजेचे आहे.

सदर बाबतीत झालेली नजरचुक संबंधित राष्ट्रसेविका समिती यांच्या निदर्शनास आणून देवून यातुन काही आपसात सामंजस्याने मार्ग निघेल या प्रामाणिक हेतुने गेल्या एक महिन्यापासून प्रयत्न केला असता त्यातुन काहीही मार्ग निघत नसुन केवळ आपसात तेढ निर्माण होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. तरी याबाबत कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी महासभा ठराव क्र.१८८ दि.०३/०८/२०१९ रद्द करण्यात येत असून यापूर्वी पारित झालेल्या महासभा ठराव क्र.६०४ दि.२०/०४/२०१० नूसार महानगरपालिका हद्दीतील रामानंदनगर घाटापासून ते काव्यरत्नावली चौक व त्यापूढील शिरसोली नाक्यापर्यंतच्या (सध्याचे डी-मार्ट) रस्त्यास "कै.कांताबाई भवरलाल जैन राज पथ" असे नांव देणेबाबत ठराव कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. प्रशासनाने ठरावाच्या अनुषंगाने सत्वर कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १८) :-** खेडी गावठाण मध्ये महामार्गाजवळ प्रवेशव्दार कमान सिमेंट कॉक्रींटव्दारे आर.सी.सी.तयार करणे बाबत सन्मा.सदस्य,श्री.प्रविण रामदास कोल्हे यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.कैलास सोनवणे :-** मंजुर आहे. १८ पण १९ ,२० पण मंजुर आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** प्रशासनाने त्यामधील बाबी तपासुन घ्यावा आणि विषय क्रं. १८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८२१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, प्रभाग क्रमांक ३ खेडी गावठाण परिसरातील तमाम नागरीकांकडून महामार्गापासुन खेडी गावात प्रवेशाच्या ठिकाणी रिक्षा स्टॉप जवळ प्रवेशव्दार कमान सिमेंट कॉक्रींटव्दारे आर.सी.सी. तयार करुन त्यावर छत्रपती शिवाजी महाराज यांचे नावाने प्रवेशव्दार उभारणेची मागणी होत असल्याने सदर परिसरातील नागरीकांच्या मागणीनुसार प्रभाग क्रमांक ३ खेडी गावठाण येथिल रिक्षा स्टॉप

जवळ सिमेंट कॉक्रींटव्दारे आर.सी.सी प्रवेशव्दार कमान उभारणेस तसेच सदर प्रवेशव्दार कमानीवर “छत्रपती शिवाजी महाराज” यांचे नांव टाकणेस महानगरपालिकेच्या अटी-शर्तीस बंधनकारक राहून मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर ठिकाणी यापूर्वी प्रवेशव्दार उभारणेस तसेच प्रवेशव्दार कमानीस नांव दिले गेले नसल्याबाबत खात्री करुन कारवाई करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. १९) :-** स्व.अविनाश आचार्य यांना मरणोत्तर जळगांव रत्न, विशेष सरकारी वकील ॲड श्री.उज्ज्वल निकम यांना जळगांव रत्न, समाजसेवक स्व.गफ्फार मलिक यांना मरणोत्तर जळगांव रत्न पुरस्कार देणेबाबत मा.विरोधी पक्षनेते, महानगरपालिका, जळगांव यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा. आता आपण हा पुरस्कार देणार आहोत तर यांचे कार्य खुपच कौतुकास्पद आहे आणि याप्रमाणे यांना हा सन्मा सोहळा करण्याच्या दृष्टीकोनातुन प्रशासनाने योग्य वेळ व तारीख ठरवावी व तश्या पध्दतीच्या कार्यक्रमाचे आयोजन करून आणि हा सोहळा पार पाडुन यांना हा जळगांव रत्न पुरस्कार देण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८२२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरातील खालील नमुद विविध क्षेत्रातील सन्मानिय व्यक्ती यांनी सामाजिक, शैक्षणिक, राजकिय तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनिय कामगिऱ्या केलेल्या असून त्यामुळे जळगांव शहराचे नांव देशाच्या नकाशावर दिसून येत असून त्यामुळे जळगांव शहराचे नांव लौकिक झालेले आहे. करीता जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे स्व.अविनाश आचार्य यांना मरणोत्तर जळगांव रत्न तसेच विशेष सरकारी वकील ॲड.श्री.उज्ज्वल निकम यांना जळगांव रत्न व समाजसेवक स्व.गफ्फार मलिक यांना मरणोत्तर जळगांव रत्न पुरस्कार देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच विशेष सरकारी वकील ॲड.श्री.उज्ज्वल निकम यांना जळगांव रत्न पुरस्कार देणे कामी सन्मान सोहळा आयोजित करणे कामी प्रशासनाने नियोजन करुन पूढील कार्यवाही करावी.

| अ.नं. | नांव | तपशिल / क्षेत्र |
|---|---|---|
| १ | स्व.अविनाश आचार्य | जळगांव शहरात विविध समाजांसाठी सामाजिक कार्य केल्यामुळे त्यांना मरणोत्तर जळगांव रत्न पुरस्कार. |
| २ | विशेष सरकारी वकील ॲड.श्री.उज्ज्वल निकम | जळगांव शहरातील मुळ रहिवासी असून देशातील अनेक मोठमोठया तसेच राष्ट्रीय दहशतवादयांच्या खटल्यांमध्ये भारत सरकारतर्फे बाजू मांडून योग्य न्याय मिळवुन देण्याचे कार्य करीत असल्यामुळे त्यांना जळगांव रत्न पुरस्कार. |
| ३ | स्व.गफ्फार मलिक, समाजसेवक | जळगांव शहरात विविध समाजांसाठी तसेच अल्पसंख्यांक समाजासाठी सामाजिक कार्य केल्यामुळे त्यांना मरणोत्तर जळगांव रत्न पुरस्कार. |

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. २०) :-** मनपा मालकीची मेहरुण स.नं.१९३/१ सुप्रीम कॉलनी, ममता बेकरी रोड जवळील ओपनस्पेस येथे “उर्दु घर” साठी मनपाकडुन जागा मिळण्याबाबत मा.सभापती,प्रभाग समिती क्र.०३ सुन्नाबी राजु देशमुख यांनी दिलेल्या पत्रावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हा प्रस्ताव प्रशासनाकडुन येवु द्या. कारण कस आहे की ओपनस्पेस मध्ये अशा पध्दतीने "ऊर्दु घर" करीता जागा देणे आणि या व्यतिरीक्त कधी शासकीय जागा असतील तर तशा पध्दतीने त्याची तपासणी होणे गरजेचे आहे कारण ही योजना तशी राज्य शासनाचीच आहे. तर याचा सविस्तर प्रस्ताव जो आहे तो प्रशासनाने तयार करून महासभेसमोर पाठवावा.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २० याच डॉकेट बनवुन प्रशासनाने पुढील महासभेसमोर मान्यतेसाठी ठेवावा. तोपर्यंत विषय क्रं. २० हा सर्वानुमते तहकुब करण्यात येत आहे.

**नगरसचिव :-** स्थायी समितीचे प्रस्ताव आहेत.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८२३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा मालकीची मेहरुण स.नं.१९३/१ सुप्रीम कॉलनी, ममता बेकरी रोड जवळील ओपनस्पेस येथे “उर्दु घर” साठी मनपाकडुन जागा मिळण्याबाबत आलेला प्रस्ताव हा अशासकीय असल्याने यासंदर्भात प्रशासनामार्फत सविस्तर व परिपूर्ण माहिती येणे आवश्यक असल्याने प्रशासनाने सदर प्रकरणी सविस्तर प्रस्ताव पूढील महासभेत सादर करावा तोपर्यंत सदरचा विषय तहकूब करण्यात येत आहे.

**सर्वानुमते तहकूब**

| | | |
|---|---|---|
| **अनुकूल मते** | **:- ५४** | **प्रतिकुल मते :- ००** |
| **सूचक** | **:- लढ्ढा नितीन बालमुकुंद** | |
| **अनुमोदक** | **:- पाटील कुलभुषण विरभान** | |

**श्री.कैलास सोनवणे :-** नाही याच्यामध्ये दुरूस्ती आहे. ते सोडुन मान्य आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** स्थायी समितीचे ठराव मान्य आहेत.

**नगरसचिव :-** विषय क्रं. २१ , २२

**श्री.महेश चौधरी :-** महापौरताई मला बोलायचे आहे. जळगांव शहराचे लोक मोर्चे काढता आहे आणि तुम्ही तो विषय ऐकुन घेतला पाहीजे पहीले आता जो पाण्याचा रंग बदलतोय त्याचा खुलासा झाला पाहीजे येथे

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ अगोदरच खुलासा केला ना तुम्ही तेव्हाच सांगायला पाहीजे होते ना

**श्री.महेश चौधरी :-** आप्पा मी बोललो ना पहिले आप्पा

**श्री.कैलास सोनवणे :-** दुषित पाणी येत आहे तिथे आणि हे जे बोलाताहेत ना तो आमचाच भाग आहे आणि ते लोकं बसलेले आहेत त्या ठिकाणी तर त्यांना

**मा.महापौर :-** पाणी पुरवठयाचे लुले साहेबांना पाठवा ना तिथे

**श्री.कैलास सोनवणे :-** आम्ही घेवुन गेलो होतो लुले साहेबांनी सांगीतले समजावुन त्यांना

**श्री.महेश चौधरी :-** काय आहे त्याचा खुलासा करावा.

**मा.महापौर :-** म्हणजे नक्की पाणी कशामुळे दुषित येत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** उन्हामुळे दुषित येत अस त्यांच म्हणण आहे. तिन चार

**मा.महापौर :-** स्थायी समितीचे विषय झाल्यानंतर आपण या विषयावर चर्चा करून खुलासा घेवु.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो , हो स्थायी समितीचे विषय झाल्यावर घेवु चालेल. जे तिन चार विषय दुरूस्तीचे आहेत.

**नगरसचिव :-** विषय क्रं. २१

**श्री.कैलास सोनवणे :-** २१ मंजुर आहे , २२ पण दुरूस्तीचाच आहे. २२ , २३ व २४ दुरूस्ती आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.भाऊ २१ पासुन तर ३३ पर्यंत आहेत ते सगळे

**मा.महापौर :-** नाही दुरूस्ती आहे ना कोणत्या तरी विषयामध्ये दुरुस्ती आहे आप्पासाहेब

**श्री.कैलास सोनवणे :-** हो ना

**मा.महापौर :-** कोणत्या विषयात दुरूस्ती आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** २५ आणि २६

**व्यासपिठावर मा.महापौर , मा.उपमहापौर व नगरसचिव आपआपसांत चर्चा करीत होते.**

**नगरसचिव विषय क्रं. २१) :-** मनपा प्रशासकीय वाहन क्रं.एम.एच.१९ एम ०४३२ (टाटा इंडिगो) या वाहनाची दुरुस्ती करणेकामी येणारा एकूण रक्कम रु.४६,९९१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २१ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** २५ पर्यंत मंजुर आहे.

**मा.महापौर :-** एक मिनिंट आप्पासाहेब

**सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही.**

**मा.महापौर :-** विषय क्रं. २१ चालु आहे २१ वर बोलायचे आहे का आपल्याला नाही ना मग थांबा. विषय क्रं. २२ घेण्यात यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८२४ पारित करण्यात आला.**

मनपा प्रशासकीय वाहन क्रं.एम.एच.१९ एम ०४३२ (टाटा इंडिगो) या वाहनाची दुरुस्ती करणेकामी येणारा एकूण रक्कम रु.४६,९९१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

असा ठराव करण्यात येतो की, मनपा प्रशासकीय वाहन क्रं.एम.एच.१९ एम ०४३२ (टाटा इंडिगो) हे वाहन प्रशासकीय कामकाजाकरिता सन्मा.विरोधी पक्षनेता कार्यालयाकडे कार्यरत असून सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा वाहन क्रं.एम.एच.१९ एम ०४३२ (उत्पादीत वर्ष जानेवारी-२००९) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | Kit for DIA 200X134 Clutch Assy - 14L C -1 Nos | 11 | Assy. Horn K90 Low Tone-FIAMM Minda 1 Nos |
| 2 | Assy Clutch Cable RHD (M/S Remsons) -1 Nos | 12 | Assy.Horn K90 High Tone-FIAMM Minda -1 Nos |
| 3 | Front Brake Disc (20 THK) - Nos | 13 | Assy. ORVM With Blinker RH (Ele/OPR) Ficosa -1 Nos |
| 4 | Assy Front Strut LH (NON ABS) M/S Tennec -1 Nos | 14 | Assy. ORVM With Blinker LH (Ele/OPR) Ficosa -1 Nos |
| 5 | Assy Front Strut RH (NON ABS) M/S Tennec -1 Nos | 15 | Assy. W/W Unit W/O Motor Front DR RH (IFB) -1 Nos |
| 6 | Kit-Pad Assy - 1 Nos | 16 | Assy. W/W Unit W/O Motor Rear DR RH (IFB) -1 Nos |
| 7 | Indigo Front Sus Bush Kit -1 Nos | 17 | Assy Engine Mount - A -1 Nos |
| 8 | Inner Ball Joint (59 60 04 11)-2 Nos | 18 | Assy Engine Mount - **B** -1 Nos |
| 9 | Outer Ball JT-2 Nos | 19 | Assy Engine Mount - (C) -1 Nos |
| 10 | ANG. Contact BRG (Hub End)-2 Nos | 20 | All Labour Charges |

वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्/ मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.०७/०२/२०२२ प्रमाणे रक्कम रु.४६,९९१/- मात्र खर्च अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.४६,९९१/- मात्रचा कार्यादेश निर्गमित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. २२) :-** मनपा वाहन क्रं.एम.एच.१९ एम ९०४८ (फायर फायटर) या वाहनाची दुरुस्ती करणेकामी येणारा एकूण रक्कम रु.१५,७०१/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** विषय क्रं. २२ , २३ , २४ आणि २५

**नगरसचिव :-** विषय वाचतो भाऊ मी , २२ नंबर

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** गोराणे साहेब कस आहे २१ ते २५ हे सारखे विषय आहे

**नगरसचिव :-** नाही बरोबर आहे आप्पासाहेब पण कस आहे.

**सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही. तसेच व्यासपिठावर मा.महापौर , मा.उपमहापौर व नगरसचिव आपआपसांत चर्चा करीत होते.**

**मा.महापौर :-** विषय क्रं. २२ ते विषय क्रं. २५ हे सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर , मंजुर आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८२५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका वाहन क्रं.एम.एच.१९ एम ९०४८ (फायर फायटर) हे वाहन अग्निशमन विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत असून मा.महासभा ठराव क्र.७५० दि.१४/०२/२०२२ अन्वये रक्कम रु.२५,५४६/- मात्रच्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांना कार्यादेश निर्गमित करण्यात आला होता. प्रत्यक्षात दुरुस्तीचे कामकाज करत असतांना वाहनामध्ये क्लच, प्रेशर प्लेट नविन टाकणे आवश्यक होते.

| मनपा वाहन क्रं.एम.एच.१९ एम ९०४८ (फायर फायटर) (उत्पादीत वर्ष मे-२००७) | |
|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे |
| 1 | Clutch Disc 330 Dia (2 Rings) - 01 Nos |
| 2 | Clutch Cover Rel 330 Dia - 01 Nos |

वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे वाढीव दुरुस्तीची कामे नविन पार्टस्/ मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.१०/०२/२०२२ प्रमाणे रक्कम रु.१५,७०१/- मात्र खर्च अपेक्षित असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता वाढीव रक्कम रु.१५,७०१/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. २३) :-** मनपा वाहन क्रं.एम.एच.१९ सी.वाय.५८५७ (फायर फायटर) या वाहनाची दुरुस्ती करणेकामी येणारा एकूण रक्कम रु.१०,४२४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २३ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८२६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका अग्निशमन विभागाकडील वाहन क्रं.एम.एच.१९ सी.वाय.५८५७ (फायर फायटर) हे अग्निशमन विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत असून सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा वाहन क्रं.एम.एच.१९ सी.वाय.५८५७ (फायर फायटर) (उत्पादीत वर्ष-२०१९) | |
|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे |
| १ | सदर वाहनाची संपुर्ण वायरिंग, वायरलुम, फ्युज बॉक्स, सेन्सर चेक करणे आवश्यक आहे. |
| २ | सदर वाहनाची कॉम्प्युटरव्दारे स्कॅनिंग करणे आवश्यक आहे. |
| ३ | ब्रेक बुस्टर लिकेज असल्याने चारही ब्रेक बुस्टरचे डायफार्म प्लेट चेक करणे आवश्यक आहे. |
| ४ | इंजिन नोझल ओव्हरफ्लो नळी नविन टाकणे आवश्यक आहे. |
| ५ | इलेक्ट्रीकल हॉर्न बटन रिपेअरिंग करणे आवश्यक आहे. |

वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्/ मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडील प्रोफॉर्माइन्व्हाइस दि.०२/०२/२०२२ प्रमाणे रक्कम रु.१०,४२४/- मात्र खर्च अपेक्षित असुन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता रक्कम रु.१०,४२४/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. २४) :-** मनपा वाहन क्रं.एम.एच.१९ सी.वाय.१७५० (टाटा झेनॉन) या वाहनाची दुरुस्ती प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २४ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८२७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील वाहन क्रं.एम.एच.१९ सी.वाय.१७५० (टाटा झेनॉन) हे पाणी पुरवठा विभागात अत्यावश्यक सेवेत कार्यरत असून सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा वाहन क्रं.एम.एच.१९ सी.वाय.१७५० (टाटा झेनॉन) (उत्पादीत वर्ष मार्च-२०१८) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | Power Steering Fluid 1 Litre | 8 | Hose (Thermostat To Water Pump) -1 Nos |
| 2 | Bolt BS1/2/3/4 -2 Nos | 9 | Removal Overhaul And Reinstallation Of Mechanical Steering Gear Bos NP |
| 3 | Nyloc Nut M12X1.5 ISO- 10512-10ss8451-8c -2 Nos | 10 | Alternator Remove and Install NP |
| 4 | Split Pin 3.2X28 -1 Nos | 11 | Miscellaneous Activity Steering Gear Box Repairing Charges |
| 5 | Cotton Piece -1 Nos | 12 | Miscellaneous Activity Alternator Repairing Charges (Mahajan Siesel) |
| 6 | Assy. Water Pump (AL) -1 Nos | 13 | Water Pump |
| 7 | House (UCWL TO Thermostat) -1 Nos | 14 | -- |

वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्/ मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.२७/०१/२०२२ प्रमाणे रक्कम रु.१३,५५४/- मात्रचा खर्च असून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता रक्कम रु.१३,५५४/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. २५) :-** मनपा आरोग्य विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ एम ९२०० (मैला व्हॅक्युम) या वाहनाची दुरुस्ती करणेकामी येणारा एकूण रक्कम रु.१,४४,८३२/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २५ हा सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८२८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका आरोग्य विभागाकडील वाहन क्रं.एम एच १९ एम ९२०० (मैला व्हॅक्युम) हे एकमेव वाहन नागरिकांच्या मुलभुत सुविधेकरिता अत्यावश्यक सेवेते कार्यरत असून दि.०६/०५/२०२२ रोजी इंजिनमध्ये डिझेल उतरल्याने वाहन बंद झाले आहे. सदर वाहनाचे खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे स्पेअर पार्टस, मजुरीसह करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| मनपा वाहन क्रं.एम एच १९ एम ९२०० (मैला व्हॅक्युम) (उत्पादीत वर्ष-२००९) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| 1 | TMGO Diesel Engine Oil C114 Plus 15W40 - | 27 | Hex Nut M10X1 -2 Nos |
| 2 | Oil Filter Element Spinon BS2/3/4 -1 Nos | 28 | Thrust Washer 1.7 MM THK -8 Nos |
| 3 | Fuel Filter (FWS) Element Spinon BS2/3 -1 Nos | 29 | DRAG Link Assy |
| 4 | Set of 2516 Air Filter Element -1 Nos | 30 | Assy Bracket Steering GB Mounting -1 Nos |
| 5 | TMGO RA Oil 80W140 Long Life | 31 | Power Steering Fluid -1 Litre |
| 6 | Tata Genuine Coolant 5 LTR | 32 | Oil Filter Cartridge BS1/2/3/4 -1 Nos |
| 7 | TATA Genuine Coolant 1 LTR | 33 | Assy Suction Pipe -1 Nos |
| 8 | Assy.Center Bearing BS1/2/3/4 -1 Nos | 34 | Assy Suction Pipe -1 Nos |
| 9 | kit-Universal Joint BS1/2/3/4 -2 Nos | 35 | Assy Return Pipe -1 Nos |
| 10 | Hex Nut -1 Nos | 36 | Assy Hydraulic STG. Tank-Plastic BS1 -4 -1 Nos |
| 11 | Grease Pack 3 KG | 37 | Sintered Bush -2 Nos |
| 12 | Grease Pack 1 KG | 38 | Pressure Cap Surge Tank BS2 -1 Nos |
| 13 | Oil Seal Front Hub BS1/2/3/4 -2 Nos | 39 | Assy Thermostat 35DIA Bypass BS1/2/3/4 -1 Nos |
| 14 | Oil Seal Double LIP BS1/2/3/4 -2 Nos | 40 | Sub Assy Ball & Socket Joint Bib BS1-4 -1 Nos |
| 15 | Hub Outer Seal (110X128X9) BS1/2/3/4 -2 Nos | 41 | Assy Ball Joint RH Threads BS1/2/3/4 -1 Nos |
| 16 | Taper Roller BRG 565/562 BS1/2/3/4 -1 Nos | 42 | Assy Ball Joint BS1/2/3/4/6 -1 Nos |
| 17 | Taper Roller BRG 32308 BS1/2/3/4 -2 Nos | 43 | Brake Fluid (Dot 4)-500 ML |
| 18 | Taper Roller BRG 32214 BS1/2/3/4 -1 Nos | 44 | Assy Reserve Tank BS1/2/3/4 -1 Nos |
| 19 | Taper Roller BRG 33019 BS1/2/3/4 -1 Nos | 45 | H/L Bulb 100/90 24 V (P 43T Fitment) -4 Nos |
| 20 | Brake Lining Kit (STD) 410X180NA1707 BS1-6-4Nos | 46 | W/H Main (LPT1613/2515 697 BS-II LP) -1 Nos |
| 21 | King Pin STD BS1/2/3/4 -2Nos | 47 | Assy Battery Cable +VE-50 SQ.MM -1 Nos |
| 22 | Bush King Pin BS1/2/3/4 -4Nos | 48 | Assy Batt Cable +VE 50.mm2 -1 Nos |
| 23 | Taper Roller THRU BRG Normal BS1/2/3/4 -1 Nos | 49 | Bolt BS1/2/3/4 -8 Nos |
| 24 | Thrust Washer Upper Norr BS2/3/4 -1 Nos | 50 | Hex Nut M10X1 -8 Nos |
| 25 | Thrust Washer Lower STD BS1/2/3/4/6 -1 Nos | 51 | Cotton Piece -5 Nos |
| 26 | Cotter Pin -2Nos | 52 | All Labour Charges |

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रं.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२ मंत्रालय मुंबई दि.१७ एप्रिल २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका-१९७८ भाग-पहिला, उप विभाग - एक ते पाच प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारान्वये डिझेलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रति वर्ष ६०,०००/- मात्र वित्तीय मर्यादा निर्धारित केलेली आहे. जळगांव शहर महानगरपालिकेकडे मैला

व्हॅक्युम या प्रकारातील एकच वाहन कार्यान्वित असल्याने आरोग्य विभागाच्या कामकाजाची गैरसोय होवू नये म्हणुन सदर वाहनाची दुरुस्ती करुन कार्यान्वित ठेवणे आवश्यक आहे.

वर तक्त्यात नमुद केलेप्रमाणे दुरुस्तीची कामे नविन पार्टस्/ मजुरीसह करणे कामी अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.०७/०५/२०२२ प्रमाणे रक्कम रु.१,४४,८३२/- मात्र खर्च अपेक्षित असुन सदरचे दर बाजारभावाशी सुसंगत असून प्रस्तावित खर्च कमी किंवा जास्त होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार निविदा न मागविता अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांना रक्कम रु.१,४४,८३२/- मात्रचा कार्यादेश निर्गमित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. २६) :-** मनपा फंड अंतर्गत सन्मा.महापौर यांचेकरिता TATA कंपनीचे Tigor EV XZ+ 1 नग खरेदी करणेकामी येणारा एकूण रक्कम रु.१३,२७,१४०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** २६ ला माझी विनंती आहे की ईलेक्ट्रिक कार खरेदी करण्यात यावी.

**श्री.सुनिल महाजन :-** हो ईलेक्ट्रिकच आहे ती

**मा.महापौर :-** विषय क्रं. २६ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८२९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं.संकीर्ण/२०१६ प्र.क्र.२१५/उदयोग-४, मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.२४ ऑगस्ट २०१७ नुसार सन्मा.महापौर यांचेकरिता नविन वाहन खरेदी संदर्भात ४ वेळेस Bid प्रसिध्द करुन ही प्रतिसाद मिळालेला नाही. नविन शासकीय वाहन खरेदी धोरणाचा विचार करुन (पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचा GR) त्यास सुसंगत पध्दतीने फेर सादर करणे बाबत आयुक्त यांचे दि.०५/०१/२०२२ रोजी निर्देशानुसार खालील प्रमाणे प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं.एमयुएम २०२०/प्र.क्र.८८/नवि-१७ दि.३० जुलै २०२० नुसार "ड" वर्ग महानगरपालिकेचे महापौर व "अ" वर्ग नगरपालिकेचे अध्यक्ष यांच्याकरिता त्यांच्या पसंतीनुसार वाहन खरेदी मर्यादा रक्कम रु.१५ लक्ष निश्चित करण्यात आली आहे. तसेच मा.महासभा ठराव क्र.५४८ दि.१२/०८/२०२१ नुसार सन्मा.महापौर यांचेकरिता नविन वाहन खरेदी करणे कामी मान्यता प्राप्त झालेली आहे.

शासन निर्णय क्रमांकः मइवाधो-२०२१/प्र.क्र.२५/तां.क.४ मंत्रालय मुंबई दि.२३ जुलै २०२१, शासन निर्णय क्रमांकः मइवाधो-२०२१/प्र.क्र.२५/तां.क.४ मंत्रालय मुंबई दि.२९ डिसेंबर २०२१, शासन निर्णय क्रमांकः मइवाधो-२०२१/प्र.क्र.२५/तां.क.४ मंत्रालय मुंबई दि.०४ जानेवारी २०२२ व टाटा मोटर्स लि.मुंबई यांचेकडील दि.०९/०२/२०२२ रोजीचा प्राप्त ई-मेल नुसार मे.टाटा मोटर्स लि.मुंबई यांच्याकडील Ref.No.२२३ दि.०९/०२/२०२२ नुसार Special Government Price सह प्राप्त झालेले होते.

| Price Working in detail | Special Govt Price for one vehicle | |
|---|---|---|
| | Price for supply of Nexon EV XZ+ | Price for supply of Tigor EV XZ+ |
| | (In Rs)Per vehicle | (In Rs)Per vehicle |
| Grand Total : | 15,60,000/- | 12,89,000/- |
| TCS@ 1% | 15,600/- | 12,890/- |
| Price chargeable to th department | 15,75,600/- | 13,01,890/- |

वर नमुद Special Government Price नुसार सन्मा.महापौर यांचेकरिता Nexon EV XZ+ खरेदी कामी रक्कम रु.१५,७५,६००/- मात्रचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. परंतु दि.३० जुलै २०२० रोजीच्या शासन निर्णयात नमुद केलेनुसार "ड" वर्ग महानगरपालिकेचे महापौर यांचेकरिता वाहन खरेदी मर्यादा रु.१५ लक्ष इतकी निश्चित करण्यात आलेली असल्याने सदरचे वाहन हे रु.१५ लक्ष पेक्षा जास्त किंमतीचे असल्याने खरेदी करणे शक्य झाले नाही.

जा.क्रं./ज.श.म.न.पा./म.का./३४१-अ/२०२१-२२ दि.१०/०३/२०२२ नुसार मा.महापौर यांनी Tigor EV XZ+ (White Colour) हे वाहन घेण्यास पसंती दर्शविलेली असल्याने टाटा मोटर्स लि.मुंबई यांचेकडील दि.०९/०२/२०२२ रोजीचे प्राप्त झालेले Special Government Price नुसार Tigor EV XZ+ हे वाहन खरेदी कामी येणारा खर्च रक्कम रु.१३,०१,८९०/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. सदर कंपनीचे प्रतिनिधी यांचेशी भ्रमणध्वनीव्दारे संपर्क करुन अदायगी बाबत विचारणा केली असता सदर वाहनाचे दर किमान रु.२५,०००/- मात्रची वाढ झाल्याचे सांगीतले होते.

त्यानुसार टाटा मोटर्स लि.मुंबई कंपनीचे प्रतिनिधी यांचेशी भ्रमणध्वनीव्दारे झालेल्या चर्चेनुसार व त्यांचेकडील प्राप्त ई-मेल नुसार टाटा मोटर्स लि.मुंबई यांच्याकडील Ref.No.३१०, दि.१९/०३/२०२२ नुसार Special Government Price सह प्राप्त झाले आहे. त्याचा तपशिल खालील प्रमाणे :-

| Price Working in detail | Special Govt Price for one vehicle | |
|---|---|---|
| | Price for supply of Nexon EV XZ+ | Price for supply of Tigor EV XZ+ |
| | (In Rs)Per vehicle | (In Rs)Per vehicle |
| Grand Total : | 15,85,000/- | 13,14,000/- |
| TCS@ 1% | 15,850/- | 13,140/- |
| Price chargeable to th department | 16,00,850/- | 13,27,140/- |

तरी TATA कंपनीचे Tigor EV XZ+ या वाहनाची किंमत रक्कम रु.१३,२७,१४०/- मात्र इतकी झालेली असुन सदर खर्चामध्ये रक्कम रु.२५,२५०/- मात्र इतकी वाढ झालेली असल्याने वाढीव खर्चास मान्यता व एकुण खर्च रक्कम रु.१३,२७,१४०/- मात्रला म.महासभा ठराव क्रं.५४८ दि.१२/०८/२०२१ प्रमाणे आयुक्त यांनी दि.२३/०३/२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

तद्नंतर उपायुक्त(वाहन) यांनी दि.२३/०३/२०२२ रोजी खालील प्रमाणे

अ) विना निविदा खरेदी प्रक्रिया बाबत सक्षम प्राधिकरणाची मान्यता घ्यावी.

ब) अथवा निविदा प्रक्रिया GeM वर राबविण्यात यावी.

उपायुक्त(वाहन) यांनी निर्देशीत केलेनुसार खालील प्रमाणे खुलासा सादर करण्यात येत आहे.

महाराष्ट्र शासन, उदयोग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं.संकीर्ण/२०१६ प्र.क्र.२१५/उदयोग-४, मंत्रालय मुंबई ४०००३२ दि.२४ ऑगस्ट २०१७ चे शासन निर्णयामधील मुद्दा क्रं.८ मध्ये नमुद केलेप्रमाणे

अ) टाटा उत्पादीत कंपनीचे टाटा मोटर्स लि.मुंबई यांच्याकडील Ref.No.३१० दि.१९/०३/२०२२ नुसार Special Government Price नुसार TATA कंपनीचे Tigor EV XZ+ वाहन खरेदी पोटी एकुण खर्च रक्कम रु.१३,२७,१४०/- मात्रच्या खर्चास सक्षम प्राधिकरणाच्या प्रशासकीय मान्यतेअंती संबंधीत उत्पादीत कंपनीधारक टाटा मोटर्स लि.मुंबई यांना TATA कंपनीचे Tigor EV XZ+ हे वाहन खरेदी पोटी रक्कम रु.१३,२७,१४०/- मात्रचा पुरवठा आदेश देणेस हरकत नसावी असे मत आहे.

ब) GeM Portal वर तपासणी केली असता TATA कंपनीचे Tigor EV XZ+ हे इलेक्ट्रीक वाहन उपलब्ध नाही. तसेच महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन निर्णय क्रं.एमयुएम २०२०/प्र.क्र.८८/नवि-१७ दि.३० जुलै २०२० प्रमाणे मा.महापौर यांचेकरिता वाहन खरेदी मर्यादा रु.१५ लक्ष किमतीच्या आंत इतर कोणत्याही कंपनीचे इलेक्ट्रीक वाहन सदया स्थितीत उपलब्ध नाही.

दि.२४ ऑगस्ट २०१७ च्या शासन निर्णयामधील मुद्दा क्रं.८ मध्ये नमुद केलेप्रमाणे अधिकृत उत्पादीत कंपनीधारक टाटा मोटर्स लि.मुंबई यांचेकडून Special Government Price नुसार आलेले दर स्विकारण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदरच्या वर नमुद दराची वैधता दि.३१ मार्च २०२२ पावेतो असुन सदरचे दर दि.३१ मार्च २०२२ नंतर वाढण्याची शक्यता आहे असे संबंधीत कंपनीचे प्रतिनिधी यांचेशी भ्रमणध्वनीव्दारे झालेल्या चर्चेनुसार समजते. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२)(२) नूसार

निविदा न मागविता मनपा फंड अंतर्गत सन्मा.महापौर यांचेकरिता TATA कंपनीचे Tigor EV XZ+ 1 नग वाहन खरेदी प्रक्रिया राबविण्याकामी येणारा एकूण रक्कम रु.१३,२७,१४०/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. २७) :-** जळगांव शहरातील कोरोना व्हायरस (कोविड-१९) मृत पावलेल्या व्यक्तींचे मुस्लिम कब्रस्थान इदगाह ट्रस्ट यांनी दफनविधी केलेली असून दफनविधीसाठी करण्यात आलेल्या एकूण रक्कम रु.१,९४,२५०/- मात्र खर्चाची अदायगी करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.आयुक्त :-** विषय क्रं. २६ जो होता व्हेईकल घेण्याचा तर आपले जे नविन अधिकारी जॉईन्ड झालेले आहेत आणि आपल्या जुन्या गाड्या खुप खराब झालेल्या आहेत. तर खरेदी न करता मला वाटत काही दिवस म्हणजे ६ महिने भाडे तत्वावर वापरून बघाव्यात किती आणि मग कंपेरिटीव्हिटी करू आणि मग निर्णय घ्यावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** ओके ठिक आहे ना पण

**मा.आयुक्त :-** माझ तेच म्हणणे आहे गाड्या घ्याव्यात .

**सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही. तसेच व्यासपिठावर मा.महापौर , मा.उपमहापौर व नगरसचिव आपआपसांत चर्चा करीत होते.**

**मा.महापौर :-** विषय क्रं. २७

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो मंजुर आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २७ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८३० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहरात कोरोना व्हायरस (कोविड-१९) च्या प्रादुर्भाव पसलेला होता त्यावर जळगांव शहर महानगरपालिकेतर्फे उपाययोजना, उपचार सुरु होते. तसेच कोविड-१९ च्या रुग्ण बाधित होवून मृत्यु झाल्यास त्याचे शव त्यांच्या कुटूंबाना न देता परस्पर महापालिकेस त्यांचे अंत्यसंस्कार करावे लागत होते. कोरोनाचा वाढता प्रसार व जळगांव शहरात कोरोनाचा संसर्ग कमी व्हावा म्हणून जिल्हाधिकारी यांनी आयुक्त यांना सिव्हील हॉस्पीटल, खाजगी रुग्णालय, गोदावरी हॉस्पीटल येथून मयत व्यक्तींचे अंत्य संस्कार जळगांव येथील नेरी नाका स्मशानभुमीवर करणे बाबत आदेशीत केलेले होते. त्यासाठी येणारा खर्च सुध्दा महापालिकेस करावा लागत असल्याने प्रत्येक वेळेस अग्रिमधन घेवून समायोजन करणे शक्य नसून अपात्कालीन परिस्थिती लक्षात घेता ई-निविदा व दरपत्रक मगाविणे व या सर्व प्रक्रियेस लागणाऱ्या कालावधीत अंदाजपत्रक तयार करणेही शक्य नाही. कारण दैनंदिन किती प्रेत अंत्यसंस्काराकरिता येईल याबाबत पुर्वअनुमान लावणे शक्य नव्हते.

तसेच आयुक्त यांनी दि.०४/०९/२०२० रोजी दिलेल्या मान्यतेनुसार व प्रशासकिय आदेशाप्रमाणे नेरी नाका स्मशानभुमीवर कोविड-१९ (कोरोना) मुळे मृत पावलेल्या व्यक्तींचे अंत्य संस्कार करुन सदरचा खर्च करण्यात आलेला आहे.

परंतू मुस्लिम कब्रस्थान इदगाह ट्रस्ट यांनी दिलेल्या मागणी पत्रानुसार कोविड-१९ (कोरोना) मुळे मुस्लिम सामुदायीचे एकूण १११ व्यक्तींचे मृत पावलेले असल्यामुळे त्यांचे दफनविधी मुस्लिम कब्रस्थान इदगाह ट्रस्ट यांनी केलेले आहेत. तसेच त्यासाठी मुस्लिम कब्रस्थान इदगाह ट्रस्ट यांनी दफनविधीवर केलेल्या खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे दिलेला आहे.

कोविड-१९ (कोरोना) मुळे मृत पावलेल्या व्यक्तींची संख्या १११ असून लाकडी फळीचे, बरगे खोदकामांसाठी एकूण खर्च प्रती व्यक्ती रु.१७५०/- प्रमाणे X १११ एकूण रक्कम रु.१,९४,२५०/- मात्र आहे. जळगांव शहरातील कोरोना व्हायरस (कोविड-१९) मृत पावलेल्या व्यक्तींचे मुस्लिम कब्रस्थान इदगाह ट्रस्ट यांनी दफनविधी केलेली असून दफनविधीसाठी करण्यात आलेल्या एकूण रक्कम रु.१,९४,२५०/- मात्र खर्चाची अदायगी संसर्गजन्य रोगांचा प्रतिबंधक उपाय नियंत्रण या लेखाशिर्षाव्दारे करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. २८) :-** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या २५ कोटी अनुदानातुन शिल्लक ५ कोटी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहरात विविध ठिकाणी स्त्री पुरुषांकरीता शौचालय/मुतारी बांधणे कामी मक्तेदार श्री.गजानन इंन्टरप्राईजेस यांचे वाटाघाटी अंती निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दरास तसेच सदर कामी येणारा एकूण रक्कम रु.५३,४९,३०७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर आहे.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. २८ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहेत.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८३१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या २५ कोटी अनुदानातुन शिल्लक ५ कोटी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहरात विविध ठिकाणी स्त्री पुरुषांकरीता शौचालय/मुतारी बांधणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्र.पालीका/२/ईटपाल/२०२१/४/५३/२५६ दि.०८/०९/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.१२/१०/२०२१ च्या मान्यते अन्वये ई निविदा प्रसिध्द करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे परंतु सदर ई निविदा फॉर्म मधील अटी शर्ती दुरुस्त करणे नव्याने अटी शर्तींचा समावेश या कारणामुळे ई निविदा फॉर्म नविन तयार करण्यास विलंब झाल्यामुळे सदर कामांची ई निविदा प्रसिध्द करण्यास विलंब झालेला आहे. तसेच सन्मा.नगरसेवक यांनी एकत्रित निविदा करण्याची मागणी केली असता आयुक्त यांनी दि.०२/१२/२०२१ रोजी स्वतंत्र निविदा मागविण्याचे आदेशीत केले त्यानुसार उक्त कामाची ई-निविदा सुचना क्र.११४/०४ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्र.सा.बा./९४० दि.०८/१२/२०२१ चे पत्रान्वये दै.सकाळ राज्यस्तरीय या वर्तमान पत्रात दि.०९/१२/२०२१ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग परिपत्रक क्र.सीएटी-२०१७/प्र.क्र.८/इमा-२ दि.२९/०१/२०१९ अन्वये प्रथम मागणीवेळी दोनच निविदा प्राप्त झाल्यास नियमानुसार कार्यवाही करावी असे सुचित आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदा कागदपत्रांचे फोल्डर क्रं.१ उघडले असता मक्तेदार निखील कृष्णराज पाटील यांचे बिड कॅपसीटी नसल्याने त्यांना अपात्र ठरविण्यात आले असल्याने एकच निविदा पात्र असल्याने त्याच्याशी तुलना करता येत नसल्याने सदर कामाची फेर ई-निविदा आयुक्त यांनी दि.१४/०१/२०२२ रोजी मान्यता दिली त्यानुसार उक्त कामाची फेर ई-निविदा सुचना क्र.११९/०३ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्र.सा.बा./११९७ दि.१४/०१/२०२२ चे पत्रान्वये दै.सकाळ या वर्तमान पत्रात दि.१५/०१/२०२२ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०० (एकही नाही) ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या नाही. उक्त निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने तिसऱ्या वेळेस फेर ई निविदा करण्यास शहर अभियंता यांनी दि.१६/०२/२०२२ रोजी मान्यता दिल्यानुसार उक्त कामाची तिसऱ्या फेर ई निविदा सुचना क्र.१२७ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्र.सा.बा./१४८० दि.१६/०२/२०२२ चे पत्रान्वये

दै.लोकमत या वर्तमान पत्रात दि.१७/०२/२०२२ रोजी प्रसिध्द केल्यानुसार दिलेल्या मुदतीत ०२ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदा कागदपत्रांची छाननी केली असता मक्तेदार यांनी सर्व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केलेली असून मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदा रक्कम रु.४३६९६०६/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | निविदा रक्कमेवर ९.९९% जास्तीचे दराने | ४८०६१३०/- |
| २ | श्री.गजानन इंन्टरप्राईजेस | निविदा रक्कमेवर ८.८८% जास्तीचे दराने | ४७५७६२७/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार श्री.गजानन इंन्टरप्राईजेस यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेवर ८.८८% जास्तीचे दर सर्वात कमीचे आलेले आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने मक्तेदार यांना वाटाघाटीसाठी बोलविले असता मक्तेदार यांनी सदरचे काम निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दराने काम करण्यास लेखी समंती दिली आहे. मक्तेदार यांनी दिलेले दर हे दोन वर्ष जुन्या दरसूची नुसार असल्याने सदयाच्या दरसूची व बाजारातील दर पहाता १५ ते २०% वाढ झालेली असल्याचे कळविलेले आहे. निविदा दराची व चालू प्रचलित दराशी तुलना केली असता चालु प्रचलीत जिल्हादर हे ८.४६% जास्तचे येत असल्याने हे चालु जिल्हादर सुचिनिुसार १.४६% कमी येत असल्याने मक्तेदार श्री.गजानन इंन्टप्राईजेस यांनी वाटाघाटी अंती दिलेले दर स्विकारणे झाल्यास त्यानुसार सदर कामी रक्कम रु.४६७५४७८/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी., कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयलटी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | वाटाघाटी अंति ७% जास्तीचे दरा नुसार अपेक्षीत खर्च रक्कम | ४६,७५,४७८/- |
| ०२ | जि.एस.टी.१२% | ५,६१,०५७/- |
| ०३ | कामगार विमा ०.५०% | २३,३७७/- |
| ०४ | टेस्टींग चार्जेस | ८,२५०/- |
| ०५ | रॉयल्टी | ८१,१४५/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.:- | ५३,४९,३०७/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.५३,४९,३०७/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु.५०,००,०००/- मात्र मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत २५ कोटी निधीतुन व उर्वरीत रक्कम रु.३,४९,३०७/- मात्र मनपा निधीतून खर्च करणेस तसेच मक्तेदार श्री.गजानन इंन्टरप्राईजेस यांचे वाटाघाटी अंति निविदा रक्कमेवर ७% जास्तीचे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. २९) :-** मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहर महानगरपालिका १७ मजली प्रशासकीय इमारतीत व इतर मनपा मालकीच्या मिळकती ठिकाणी सुरक्षारक्षक पुरविणे कामी मक्तेदार रॅपीड सिक्युरिटी & लेबर सर्व्हिसेस जळगांव व मक्तेदार सत्यनारायण सिक्युरिटी फोर्स नाशिक दोन्ही मक्तेदारा यांचे वाटाघाटी अंती आलेल्या दरास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दोन मक्तेदार आहेत का

**मा.आयुक्त :-** दोघांचे सेम दर होते सर म्हणुन आपण सेम म्हणजे फिप्टी-फिप्टी काम देतोय.
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** असाच विषय मागच्या अतिक्रमण करीता होता तो रद्द करण्यात आला होता.
**मा.आयुक्त :-** सांगीतले आपल्याला
**मा.उपमहापौर :-** ते टेंडर रद्द करण्यात आले होते.

**सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही.**

**नगरसचिव :-** भाऊ
**श्री.दिलीप पोकळे :-** रस्त्याचा विषय असा आला तर देणार का अर्धा-अर्धा
**श्री.नवनाथ दारकुंडे :-** असा जर रस्त्याचा विषय आला तर देणार का तुम्ही
**श्री.दिलीप पोकळे :-** समजा आता रस्त्यांचे टेंडर निघाले आणि दोघांचे दर सारखे आले तर दोघांना देणार का तुम्ही
**श्री.कैलास सोनवणे :-** एक मिनिंट पोकळे साहेब , दारकुंडे साहेब तुम्ही वेगवेगळ सांगात आहेत. मागच्या वेळेलाच मक्तेदारांचेच म्हणणे होते की रद्द करा. पुर्ण आठवण आहे मला , मला पुर्ण आठवण आहे मक्तेदाराच म्हणण होत की रद्द करा हे टेंडर अस , अहो मक्तेदार गायब झाला आहे. हे खर आहे.
**श्री.दिलीप पोकळे :-** नाही नाही आप्पा
**श्री.कैलास सोनवणे :-** हो बिलकुल
**श्री.दिलीप पोकळे :-** हो जो वाटुन देत आहेत.
**श्री.कैलास सोनवणे :-** मी मागच्या वेळेसच सांगीतले होते.
**श्री.दिलीप पोकळे :-** मला हे सांगा की हा जो वाटुन देताहेत मक्ता
**श्री.कैलास सोनवणे :-** मी तुम्हाला बोलला पण होता की देवुन टाका त्यांना
**श्री.ईब्राहीम पटेल :-** रद्द करा ना , रद्द करा.

**सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही.**

**श्री.सुनिल महाजन :-** अहो पोकळे साहेब रद्द करण्यात यावा असे म्हणा.
**श्री.ईब्राहीम पटेल :-** नविन निविदा काढा अशी सुचना द्या.
**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव अमान्य करण्यात यावा व नविन निविदा काढण्यात यावी.
**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे. सन्मा. नितीनभाऊ यांनी
**श्री.विशाल त्रिपाठी :-** प्रत्येक वेळेला हा विषय येईल मग
**मा.महापौर :-** बोला तुम्हाला बोलायच आहे का काही बोला.
**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही नाही .
**मा.महापौर :-** विषय क्रं. २९ हा सर्वानुमते रद्द करण्यात येत आहे. अमान्य करण्यात येत आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** ताई एक मिनिंट मला एक माहिती द्या पहिले तुम्ही आता रद्द करत आहेत. तेव्हा पण रद्द केला. याचा चेहरा माहिती नाही तो काळा आहे की गोरा आहे , कोण आहे काय आहे. पण जर कधी पुढे नुकसान झाल. तर काय करणार
**श्री.सुनिल महाजन :-** अहो आप्पा अस काम कोणीच करू शकत नाही.
**मा.आयुक्त :-** संविदा आहे ती
**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही नाही संविदा नाहीये ती आलेल्या संविदेचा कागद कुठे आहे. कस काय हा स्टँडीगचा विषय चालु आहे सुनिलभाऊ तो प्रस्ताव आहे.

**सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही.**

**श्री.व्हि.ओ.सोनवणी, शहर अभियंता:-** संविदा आपल्याला करायची आहे ७३ (ड) नुसार
**श्री.कैलास सोनवणे :-** ठराव कुठे आहे त्याचा
**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही ७३ (ड) चा आहे तर हा विषय कसा काय आला ईथे मग संविदेचा अधिकार (ड) नुसार आयुक्तांना आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** ठराव झाल्यानंतर संविदा फक्त माहितीसाठी येते आणि मग
**श्री.व्हि.ओ.सोनवणी, शहर अभियंता:-** रक्कमेचा फरक आहे.
**श्री.कैलास सोनवणे :-** बर त्या अमाऊंटचा फरक आहे.
**मा.उपमहापौर :-** आप्पा २५ लाखांच्या खाली आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** कशाला पण तो मक्तेदार कोण आहे ते आपल्याला माहिती नाही. म्हणजे हे धंदे कशासाठी आहे. म्हणजे परत प्रशासनाला राबवायच , परत फिराफिर करून अॅड काढायची . तुमच्या स्वत:च्या वैयक्तिक स्वार्थासाठी हे नाही चालणार . अशा पध्दतीने नाही चालणार. तुम्हाला चुकीच काम करायच असेल . तुम्हाला चुकीच्या पध्दतीने काम करायच असेल तर करा मग

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आप्पा

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आप्पा मागचे ठेकेदार घ्यायचे ठेके तस झालेले आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** तसच होत हो ठेका गेला नाहीये.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आप्पा हे काय आहे मागच्या ठेक्याला तसच झाल आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** भाऊ मला सगळ माहिती आहे दिवसभर ना हे सगळे सोबत राहतात आणि त्यानिमीत्ताने ईथे फिरत राहतात.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** विषय आला आहे ना हा

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** सोबत राहता ते

**श्री.कैलास सोनवणे :-** मग आहे कोण हा परत एवढी प्रोसीजर करायची का

**श्री.विशाल त्रिपाठी :-** स्टॅंडींचे विषय आलेले त्याच्यामध्ये कलम ३५ अ प्रमाणे त्याच्यातील हा विषय क्रं.२९ आणि संविदा ७३ (ड) प्रमाणे म्हणजे मला तेच समजत नाहीये ना.

**श्री.सुनिल महाजन :-** आयुक्तांना अधिकार आहे तो राखीव आहे.

**श्री.व्हि.ओ.सोनवणी, शहर अभियंता:-** संविदाच करायची आहे २५ लाखाच्या आतचे अधिकार आयुक्तांना ७३ (ड) नुसार आहेत.

**श्री.दिलीप पोकळे :-** साहेब मग प्रस्ताव का येतात मान्यता घ्यायला.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** मग ईथे कुठे आले नाहीये ना की संविदा मंजुर करायची आहे.

**श्री.दिलीप पोकळे :-** माझा विरोध नोंदवा आणि मंजुर करा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** माझा विरोध नोंदवुन घ्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** संविदा कुठे आली आहे डॉकेटमध्ये कुठे म्हंटली आहे संविदा

**सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही.**

**मा.महापौर :-** मान्य करण्यात यावा. परंतु नविन प्रोसीजर करायची जर म्हंटल तर कारण की आपल्याकडे वेळ कमी आहे आणि पुन्हा हेच कराव. काही फरक पडत नाही. फिफ्टी फिफ्टी दिल्यानंतर

**श्री.कैलास सोनवणे :-** कोण आहे तो हे पण माहिती नाहीये त्याच नांव पण माहिती नाही. कोण आहे तर तो

**मा.उपमहापौर :-** जे काय करायच ते करा पण फक्त मान्य करा.

**मा.महापौर :-** आपल्याकडे कर्मचारी पण नाहीयेत.

**श्री.कैलास सोनवणे :-** हो आपल्याकडे कर्मचारीपण नाहीयेत ना. कर्मचारी अधिकारी करतात आणि आपण शेवटी नामंजुर करतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य पोकळेसाहेब आणि सन्मा.सदस्य नवनाथभाऊ यांचा या संदर्भात विरोध नोंदवुन बहुमताने विषय क्रं.२९ हा मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८३२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहर महानगरपालिका १७ मजली प्रशासकीय इमारतीत व इतर मनपा मालकीच्या मिळकती ठिकाणी सुरक्षारक्षक पुरविणे कामास आयुक्त यांनी दि.०३/१२/२०२० अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त,म.न.पा. यांचे दि.०८/१०/२०२१ च्या मान्यतेने उक्त कामाची ई-निविदा सुचना क्रं.९५ सन २०२१-२२ https://mahatenders.in वर प्रसिध्द करण्यात आली अशी ई-निविदा सुचना मनपा पत्र क्रं.सा.बा./७१९ दि.२६/१०/२०२१ चे पत्रान्वये दै.पुण्यनगरी (मुंबई, पुणे,नागपुर, जळगांव) या वर्तमान पत्रात दि.२७/१०/२०२१ रोजी प्रसिध्द केल्यानुसार संगणकाव्दारे निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०७ ई-निविदा सदर संकेतस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. त्यानुसार सदर कामाचे आलेल्या ०७ मक्तेदारांचे प्राप्त कागदपत्रांची छाननी केली असता मक्तेदार इगल सिक्युरिटी & मेनेजमेंन्ट सर्व्हिसेस जळगांव व श्री समर्थ

सर्व्हिसेस जळगांव यांनी कुठलाही खुलासा न देता कागदपत्र सुध्दा सादर न केलेले नसल्याने निविदा समितीच्या मान्यतेनुसार अपात्र ठरविण्यात आले आहे. उर्वरीत खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| निविदा धारकाचे नांव | न्य दक्षता सिक्युरिटी सर्व्हिसेस धुळे | सत्यनारायण सिक्युरिटी फोर्स नाशिक | शिवा सिक्युरिटी & लेबर सर्व्हिसेस जळगांव | रॅपीड सिक्युरिटी & लेबर सर्व्हिसेस जळगांव | विजय सिक्युरिटी लेबर & इनव्हेस्टीकेशन सर्व्हिसेस |
|---|---|---|---|---|---|
| एकुण सुरक्षा रक्षक ४४ | दरमहा प्रति सुरक्षा रक्षक रक्कम रु. १४३०७.४१०/- | दरमहा प्रति सुरक्षा रक्षक रक्कम रु. १७९८६.६६२/- | दरमहा प्रति सुरक्षा रक्षक रक्कम रु. १३२६८/- | दरमहा प्रति सुरक्षा रक्षक रक्कम रु. १८११६/- | दरमहा प्रति सुरक्षा रक्षक रक्कम रु. १३२५०/- |
| | ६२९५२६/- | ७९१४१३/- | ५८३७९२/- | ७९७१०४/- | ५८३०००/- |

वरील तुलनात्मक पाहता मक्तेदार विजय सिक्युरिटी लेबर & इन्व्हेस्टीकेशन सर्व्हिसेस,जळगांव यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा एकुण ४४ सुरक्षा रक्षकांसाठी दर महा रक्कम रु.१३२५०/- मात्र असे एकुण रक्कम रु.५८,३०००/- मात्रचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.५८३०००/- मात्र एका महिने करीता इतका खर्च अपेक्षित आहे. तथापी धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ व्दारा सहाय्यक कामगार आयुक्त यांचे कार्यालय जळगांव यांचे कडील पत्र क्र.जा.क्र.धुजिसुरमं/जळ/१२९२ दि.०५/०८/२०२१ प्राप्त दिनांक १२/११/२०२१ नुसार मासिक किमान वेतन १३१८९+प्रचलित अधिकभार ४२% म्हणजेच रक्कम रु.४८७६+३.२५% ई एस आय सी लेव्ही म्हणजेच रक्कम रु.५१ अशी एकुण रक्कम रु.१८११६/- मात्रचे दर निर्धारित केले आहे. परंतु उक्त कामी मक्तेदार विजय सिक्युरिटी लेबर & इन्व्हेस्टीकेशन सर्व्हिसेस,जळगांव यांचे एकुण ४४ सुरक्षा रक्षकांसाठी दर महा रक्कम रु.१३२५०/- मात्र असे एकुण रक्कम रु.५८३०००/- मात्रचे दर दिलेले आहे. म.सहाय्यक कामगार आयुक्त यांनी निर्धारित केलेल्या दराशी मक्तेदार यांनी दिलेल्या दरा बरोबर तुलना केली असता दर महा एका सुरक्षा रक्षका करीता रक्कम रु.४८६६/- मात्र दर कमी आलेले आहे.

परंतु किमान वेतन अधिनियम १९४८ चे कलम १२ नुसार कामगारांकरीता अधिसुचनेव्दारे जो किमान वेतन दर ठरविण्यात आला असेल त्या दरापेक्षा कमी नसेल असे वेतन विहीत करण्यात येईल अशा मुदतीत व शर्तीच्या अधिनतेने, प्राधिकृत असतील त्याखेरीज कोणत्याही रक्कम वजा न करता देईल असे नमुद असल्याने मक्तेदार रॅपीड सिक्युरिटी & लेबर सर्व्हिसेस जळगांव यांचे दर महा प्रति सुरक्षा रक्षक प्रमाणे १८११६/- मात्रचे दर सर्वात जास्त असले तरी सहा.कामगार आयुक्त तथा अध्यक्ष धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ (अंतर्गत जळगांव धुळे नंदुरबार जिल्हे) जळगांव यांचे कडून प्राप्त झालेल्या वरील पत्राप्रमाणे सदर प्राप्त दर हे किमान वेतन कायदयाच्या तरतुदी नुसार किमान ठरविण्यात आलेले दर आहेत. त्यामुळे या दरापेक्षा कमी रक्कमेचे दर स्विकारता येणार नाही. सबब सदर कामी निविदेत नमुद केल्याप्रमाणे किमान वेतन कादयानुसार निर्धारीत दर हे रॅपीड सिक्युरिटी & लेबर सर्व्हिसेस जळगांव यांचे दर महा प्रति सुरक्षा रक्षक प्रमाणे १८११६/- मात्रचे दर हे प्राप्त झालेले असल्याने स्विकारणे योग्य होईल असे मत आहे. उपरोक्त दर स्विकारावयाचे झाल्यास या कामी महानगरपालिकेस लागणाऱ्या ४४ सुरक्षा रक्षकांसाठी दर महा रक्कम रु.१८११६/- मात्र असे एकुण रक्कम रु.७९७१०४/- प्रती महा प्रमाणे १ वर्षासाठी रक्कम रु.९५६५२४८/- मात्रच्या खर्चास मंजुरीस्तव व प्राप्त दरास मान्यते करिता मनपा निविदा समितीची शिफारस होण्यापूर्वी सदर सहा.कामगार आयुक्त तथा अध्यक्ष धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ (अंतर्गत जळगांव,धुळे व नंदुरबार जिल्हे) जळगांव यांचे कडेस पत्र सादर करण्या संदर्भात निविदा समितीने दिलेल्या निर्णयात नमुद प्रमाणे सहा.कामगार आयुक्त तथा अध्यक्ष धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ (अंतर्गत जळगांव,धुळे व नंदुरबार जिल्हे) जळगांव यांचे कडेस पत्र क्रं.जशमनपा/प्रकल्प/६७ दि.१६/०२/२०२२ नुसार सुरक्षा रक्षक यांच्या दरातील ४२% अधिभार (लेव्ही) माफ होण्याकरीता पत्र सादर केले असता त्यांनी त्यांचे कडील पत्र क्रं.जा.क्रं./धुजिसुरमं/जळ/३६७ दि.०२/०३/२०२२ अन्वये आपल्या अस्थापनेस महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम १९८१ व योजना २०१२ अन्वये ४२% अधिभार (लेव्ही) भरणा करणे बंधनकारक असल्याचे कळविलेले आहे. त्यानुसार सदर कार्यालयात लेव्ही संदर्भात विचारणा

करण्याकरीता समक्ष विचारणा केली असता त्यांनी प्रचलीत दरासंदर्भात व त्यातील लेव्ही संदर्भात माहिती खालील प्रमाणे दिलेली आहे.

| अ.क्रं. | सुरक्षा रक्षक किमान वेतन | | |
|---|---|---|---|
| १. | मुळ किमान वेतन | | १०१७९.०० |
| २. | विशेष भत्ता | | १४३०.०० |
| ३. | घरभाडे भत्ता | ५% | ५८०.४५ |
| ४. | धुलाई भत्ता | | २००.०० |
| ५. | शैक्षणिक भत्ता | | ४००.०० |
| ६. | वाहन भत्ता | | ४००.०० |
| | | एकुण वेतन | १३१८९.४५* |
| ७. | ESIC लेव्ही | | ५१.०० |
| | | एकुण वेतन | १३२४०.४५* |
| | लेव्ही | ४२% | |
| १. | भविष्य निर्वाह निधी (P.F) | १२% | १३९३.०८ |
| २. | उपदान (Gratuity) | ४% | ४६४.३६ |
| ३. | बक्षिस पगार (Bonus) | ८.३३% | ९६७.०३ |
| ४. | अदा पगार | ३% | ३४८.२७ |
| ५. | रजा वेतन | १% | ११६.०९ |
| ६. | गणवेश भत्ता | ३% | ३४८.२७* |
| ७. | कामगार विमा | ३.२५% | ३७७.२९ |
| ८. | प्रशासकीय फी | ५% | ५८०.४५* |
| ९. | कामगार कल्याण निधी | १.५०% | १७४.१४* |
| १०. | आरक्षित निधी | ०.९२% | १०६.८०* |
| | | एकुण लेव्ही | ४८७५.७८ |
| | | एकुण वेतन | १८११६.२३ |

वर नमुद प्रमाणे सहा.कामगार आयुक्त तथा अध्यक्ष धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ (अंतर्गत जळगांव,धुळे व नंदुरबार जिल्हे) जळगांव या कार्यालयाकडून मिळालेल्या माहिती नुसार ४२% लेव्ही अंतर्गत अनुक्रमांक ०१ ते ०५ व ०७ शासकीय भरणा व सुरक्षा रक्षक यांना दयावयाचे भत्ते आहे. व अ.क्रं.०६, ०८ ते १० हे वर नमुद कार्यालयात भरावयाचे आहे. परंतु अ.क्रं.०६, ०८ ते १० भरणा करण्याकरिता सदर कार्यालयाचे नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. मात्र उक्त कामी निविदा सादर केलेल्या निविदा धारक हे वरील कार्यालयाचे नोंदणीकृत नसल्याने त्यांचे आलेल्या दरामधून वगळून दर निश्चित करणे आवश्यक असल्याने आलेल्या निविदा धारकांपैकी वरील कार्यालयातील निश्चित केलेले दराप्रमाणे आलेले दराची निविदा धारकास दर बाबत वाटाघाटीकरुन दर निश्चित करणे योग्य होईल.

तथापी सदरचे दर निश्चिती करण्याकामी आयुक्त सो यांच्या सोबत चर्चा केली असता चर्चेत मागील मंजुर दर तपासुन दर निश्चित करावे असे सुचित करण्यात आले. त्यानुसार खालील प्रमाणे मागील मंजुर दर व या निविदेव्दारे आलेले दर खालील प्रमाणे

| तपशिल | मागील मंजुर दर | या निविदाव्दारे आलेले नविन दर |
|---|---|---|
| सुरक्षा रक्षक यांना देय वेतन | ९३४४/- | १३१८९/- |
| लेव्ही ४२% | ३९२४/- | ४८७६/- |
| ESIC लेव्ही | ०.०० | ५१/- |
| एकुण | १३२६८/- | १८११६/- |

वर नमुद प्रमाणे दराची तपासणी केली असता दोन्ही दरांमध्ये लेव्ही समाविष्ठ करण्यात आलेला आहे. सदर लेव्ही संदर्भात सहा.कामगार आयुक्त तथा अध्यक्ष धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ (अंतर्गत जळगांव,धुळे व नंदुरबार जिल्हे) जळगांव या कार्यालयात विचारणा केली असता या कार्यालयात प्रायव्हेट सिक्युरिटी सर्व्हिसेस यांनी नोंदणी केली असल्यास गणवेश भत्ता, प्रशासकीय फी, कामगार कल्यान निधी, आरक्षित निधी यांची रक्कम या कार्यालयात भरणा करावा लागतो असे त्यांनी सुचित केले त्यानुसार प्राप्त निविदाधारक हे उक्त कार्यालयात नोंदणीकृत असल्याबाबत कुठलेही कागदपत्र सादर केलेले नसल्याने ते या कार्यालयात नोंदणीकृत नसल्याचे गृहीत धरुन उक्त त्यांनी सादर केलेल्या दरातील लेव्हीच्या रक्कमेतुन

१०.४२% वजा करुन दर निश्चित करणे योग्य होईल करीता ४२% लेव्ही मधुन १०.४२% वजा करुन ३१.५८% त्या अनुषंगाने खालील प्रमाणे दर निश्चिती होणे आवश्यक आहे.

| तपशिल | या निविदाव्दारे आलेले नविन दर |
|---|---|
| सुरक्षा रक्षक यांना देय वेतन | १३१८९/- |
| लेव्ही ३१.५८% | ४१६५/- |
| ESIC लेव्ही | ५१/- |
| एकुण - | १७४०५/- |

वर नमुद तक्त्यातील दर निश्चीत करण्याकरिता खालील प्रमाणे निविदा धारक यांना वाटाघाटीकरीता बोलविण्याबाबत निर्णय देण्यात येत आहे.

मक्तेदार रॅपीड सिक्युरिटी & लेबर सर्व्हिसेस जळगांव यांचे प्रतिमहा प्रति सुरक्षा रक्षक प्रमाणे रक्कम रु.१८१११६/- मात्र यांचे मा.सहा.कामगार आयुक्त तथा अध्यक्ष धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ जळगांव यांनी निश्चित केलेल्या प्रमाणे आलेले दर तसेच मक्तेदार सत्यनारायण सिक्युरिटी फोर्स नाशिक यांचे दुसऱ्या क्रमांकावर आलेले प्रतिमहा प्रति सुरक्षा रक्षक प्रमाणे १७९८६/- मात्रचे दर आलेले आहे. या दोन्ही मक्तेदार यांना दरा बाबत वाटाघाटीसाठी निविदा समितीने समक्ष बोलविण्याबाबत सुचित केल्यानुसार दोन्ही मक्तेदार यांना अनुक्रमे (१) पत्र क्र. जशमनपा/साबा/२५ दि.२५/०४/२०२२ (२) पत्र क्र. जशमनपा/साबा/२६ दि.२५/०४/२०२२ अन्वये दरा बाबत चर्चा व वाटाघाटीसाठी निविदा समिती यांचे समक्ष बोलविले असता दोन्ही मक्तेदार यांनी चर्चा व वाटाघाटी अंती सदरचे काम वरील तक्त्यात नमूद प्रमाणे प्रति सुरक्षा रक्षक प्रति महा रक्कम रु.१७४०५/- मात्रच्या दरात सुरक्षा रक्षक पुरविण्याचे काम करण्यास लेखी संमती दिलेली आहे. त्यानुसार खालील प्रमाणे अपेक्षीत खर्च आहे.

एकुण सुरक्षा रक्षक ४४X रक्कम रु.१७४०५/- प्रति सुरक्षा रक्षक प्रति महा प्रमाणे = एकुण रक्कम रु.७६५८२०/- प्रति महा

सुरक्षा रक्षक पुरविण्याकामी एका महिन्याकरीता रक्कम रु.७६५८२०/- X १२ महिने करीता एकुण खर्च रक्कम रु.९१८९८४०/- मात्रचा वार्षीक खर्च होणार आहे. त्याअनुषंगाने खालील नमुद ठिकाणी सुरक्षा रक्षक पुरविण्याचे आहे.

| अ.नं. | कामाचे ठिकाण | सुरक्षा रक्षक संख्या |
|---|---|---|
| १ | १७ मजली प्रशासकीय इमारत | ०५ |
| २ | आयुक्त बंगला | ०६ |
| ३ | हंजिर बायोमॅट्रीक | ०५ |
| ४ | टि.बी.एस.हॉस्पीटल वाहन व्यवस्था | १५ |
| ५ | जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्रं.०२ लाठी शाळे मध्ये | ०२ |
| ६ | MIDC भागात डिझेल पंपावर | ०३ |
| ७ | गिरणा पंपींग स्टेशनवर | ०६ |
| ८ | गेंदालाल मिल फायर ऑफिस जवळ पा.पु.ऑफिस गोडावून | ०२ |
| | एकुण :- | ४४ |

वर नमुद दोन्ही मक्तेदार यांनी वाटाघाटी अंती प्रति सुरक्षा रक्षक प्रतिमहा रक्कम रु.१७४०५/- मात्रच्या दरात काम करण्यास लेखी संमती दिलेली असल्याने ४४ सुरक्षा रक्षकांपैकी मक्तेदार रॅपीड सिक्युरिटी & लेबर सर्व्हिसेस जळगांव यांना वर नमूद अ.क्रं.०१,०४ व ०५ ठिकाणी एकूण २२ सुरक्षा रक्षक व मक्तेदार सत्यनारायण सिक्युरिटी फोर्स नाशिक यांना वर नमूद अ.क्रं.०२,०३,०६,०७ व ०८ या ठिकाणी एकूण २२ सुरक्षा रक्षक नियुक्त करणेस व वाटाघाटी अंती दोन्ही मक्तेदार यांनी दिलेल्या प्रति सुरक्षा रक्षक प्रतिमहा रक्कम रु.१७४०५/- मात्रच्या दरास व त्यानुसार येणाऱ्या वार्षीक खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सर्व कायदेशिर बाबी तपासून ठरावाची अंमलबजावणी करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ५२ प्रतिकुल मते :- ०२**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. ३०) :-** सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या बालवाडया मधिल शिक्षिका व मदतनिस यांना दि.०१/०६/२०२२ ते दि.३१/११/२०२२ पावेतो ६ महिन्याकरीता मानधनावर नविन नियुक्ती आदेश होणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** याच्यावर मला थोडासा खुलासा पाहीजे आहे.

**मा.महापौर :-** तो आता नाही होणार नंतर ११ महिन्याच्या वर झाली तर अडचण येईल.

**श्री.कैलास सोनवणे :-** ते मानधनावर काही अडचण नाही यायला पाहीजे.

**मा.महापौर :-** नाही येणार

**श्री.कैलास सोनवणे :-** मानधनावर पण

**मा.उपमहापौर :-** ११ महिन्यांच्या वर झाल्यावर

**श्री.कैलास सोनवणे :-** ठिक आहे त्यांची मागणी ६ महिन्यांची आहे ना मानधनावर ठिक आहे करा.

**मा.उपमहापौर :-** मागणी ६ महिन्यांची आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं.३० हा सर्वानुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८३३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका सेमी इंग्रजी माध्यमातील शिक्षिका २० व मदतनीस १० तसेच मराठी माध्यमातील बालवाडी शिक्षिका ९ व मदतनिस ९ यांना मानधन तत्वावरील नविन नियुक्ती आदेश दि.०१/०६/२०२२ ते ३१/११/२०२२ पावेतो देणेस महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधिल तरतुदीनुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे तसेच सदर कालावधीतील अंदाजीत मानधन खर्च रक्कम रु.२२,५०,०००/- मात्रचे खर्च महिला व बालकल्याण निधीतून करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. ३१) :-** म.न.पा.सि.स.नं.२१८३(जुनी नगरपालिकेची जागा) व सि.स.नं.१९३७(जुनी साने गुरुजी रुग्णालयाची जागा) या जागांवर वाहन तळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर दोन वर्षा करीता वाहनतळ चालवणे कामी निविदाधारक श्री.किरण शंकर भालोदर यांनी दिलेले सर्वाधीक दर स्विकारुन निविदाधारक यांचेशी संवीदा करुन कार्यादेश निर्गमीत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं.३१ हा सर्वानुमताने मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८३४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव महासभा ठराव क्र.७४६ दि.१४/०२/२०२२ अन्वये ज.म.न.पा.सि.स.नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) व सि.स.नं.१९३७ (जुनी साने गुरुजी रुग्णालयाची जागा) या जागांवर वाहनतळाची सुविधा पैसे भरा व वापरा या तत्वावर दोन वर्षा करीता वाहन तळ चालविणे कामी नविन नविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती.

उक्त नमुद ठरावा नुसार चार चाकी व दुचाकी वाहन तळ पार्कीग करीता वाहनधारक यांच्या कडुन दर पत्रकाप्रमाणे रक्कम रुपये वसुल करता येणार असल्याने जुनी नगरपालिका जागे वरील वाहन तळासाठी दोन वर्षा करीता अंदाजीत रक्कम रु.२१,००,०००/- मात्र व साने गुरुजी रुग्णालय जागा वाहन तळासाठी दोन वर्षा करीता अंदाजीत रक्कम रु.११,५०,०००/- मात्र प्रमाणे देकार निश्चीत करण्यात आलेली असून उक्त तळ बाबत दोन जागांकरीता स्वतंत्र ऑनलाईन निविदा प्रक्रिया दोन वर्षा करीता प्रसिध्द करण्यात आल्या होत्या.

सदर निविदा प्रक्रियेत ज.म.न.पा.सि.स.नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) ई-निविदा सुचना क्र.१४१ टेंडर २०२२_JCMCJ_७९०६५७_२ मध्ये एकुण ०८ निवीदा प्राप्त झाल्याने सदर निवीदा उपआयुक्त महसुल यांचे मान्यतेने दि.१३/०५/२०२२ रोजी निवीदेतील पहीला लिफाफा उघडण्यात आला. तसेच सि.स.नं.१९३७ (जुनी साने गुरुजी रुग्णालयाची जागा) ई-निविदा सुचना क्र.१४१ टेंडर आय.डी २०२२_JCMCJ_७९०६५७_१ मध्ये दोन निविदा प्राप्त झाल्याने त्यात नियमानुसार फेर निवीदा प्रसिध्दी करणेकामी दि.१३/०५/२०२२ रोजी उपायुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर निविदा प्रक्रियेत ज.म.न.पा.सि.स.नं.२१८३ (जुनी नगरपालिकेची जागा) ई-निविदा सुचना क्र.१४१ टेंडर २०२२_JCMCJ_७९०६५७_२ या निवीदेत एकुण ०८ निवीदा प्राप्त झाल्या पहिला लिफाफा उघडल्यानंतर त्यात सहभागी सर्व ०८ निवीदा धारक निवीदा समितीच्या छाननी अंती पात्र ठरवण्यात आले त्या नुसार लिफाफा क्र.०२ https://mahatenders.gov.in संकेतस्थळावर उघडण्यात आला त्यानुसार सर्व पात्र निवीदा धारक यांनी पुरविलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | निवीदा धारकाचे नांव | रक्कम रु. |
|---|---|---|
| १. | Deepak Uttaradhi | २८,२८,२८२/- |
| २. | Dipak Pandit Mali | २८,०१,१००/- |
| ३. | KIRAN SHANKAR BHALODKAR | ५७,००,०००/- |
| ४. | MS Ashok Enterprises | २४,२६,४११/- |
| ५. | New HindustanSecurity Services | २८,८२,८२८/- |
| ६. | RAPID SECURITY AND LABOUR SERVICES | ५१,४८,०००/- |
| ७. | RAVINDRA RAMDAS NICHIT | २५,५२,०००/- |
| ८. | SHREE GAJANAN ENTERPRISES | ५१,००,०००/- |

तुलनात्मक तक्ता पाहता एकुण ०८ निवीदा धारक यांचे पैकी श्री.किरण शंकर भालोदकर यांचे सर्वाधीक दर रु.५७,००,०००/- (H1) प्राप्त झालेले आहेत. सदरचे दर स्विकारणेसाठी निवीदा समिती व आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. त्या अनुषंगाने सदरचे दर स्विकारुन H निवीदा धारक श्री.किरण शंकर भालोदकर यांचेशी जळगांव शहर महानगरपालिकेच्या अटी-शर्तींची संवीदा करुन कार्यादेश निर्गमीत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव विषय क्रं. ३२) :-** जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ अंतर्गत मे.स्थापत्य कंन्स्लटन्टस् प्रा.लि. अमरावती या कंपनीस सन २०२२-२३ व सन २०२३-२४ साठी वार्षीक देखभाल दुरुस्तीच्या कामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्रीमती. रेखा पाटील :-** या विषयाला माझा विरोध आहे भाऊ.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताईंचा विरोध आहे.

**मा.महापौर :-** बोला ताई बोला.

**श्री.सुनिल महाजन :-** विरोध नोंदवुन बहुमताने मंजुर करुन घ्या.

**मा.उपमहापौर :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** विरोध घेतला.

**श्री.सुनिल महाजन :-** घेतला नोंदवुन घेतला.

**श्री.अश्विन सोनवणे :-** नोंदवता आहे बोलले आहे त्यांना बोला बोला तुम्ही.

**श्रीमती. रेखा पाटील :-** कस आहे घरपट्टीबद्दल शहरात लोकांची खुप नाराजी आहे. स्थापत्य कंन्सलटंट प्रा. लि. कंपनी नागरीकांचे चेहरे पाहुन घरपट्टी लावण्याचे कामे करते. यांच्याकडुन महानगरपालिकेचे कर्मचारी कंपनीचे कर्मचारी यांनी काही व्यवहार करून घरपट्टी कमी केली आहे. मध्यमवर्गीयांची कोणी दाद घेतली नाही याची सर्व ती चौकशी करायला हवी आणि तसेच वॉर्डातील नागरीकांना याच्या तक्रारी आहेत. अशा भरपुर

तक्रारी आहेत . तरी या संदर्भात मनपा ने लक्ष असु द्यावे. तरी मला या विषयाबाबत आयुक्तांकडे याचा मला विरोध आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताईंच्या सुचनांची नोंद करून घ्या.

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्य रेखाताई पाटील यांचा विरोध नोंदवुन बहुमताने विषय क्रं. ३२ हा

**श्री.विशाल त्रिपाठी :-** थोडसं मला बोलायच आहे ताई

**श्री.ईब्राहीम पटेल :-** ही जी संस्था आहे ती जे सर्वे करते आहे तर त्यांना थोडस हे करा कारण लोकांची ओरड येते आहे. ते पैसे घेवुन घरपट्टीची आकारणी करता आहे तर त्यांनाही थोडस हे करा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** घरपट्टीच्या संदर्भातील विषय आहे. बरोबर आहे ना , तर मला अस म्हणायच आहे की लोकांच्या चुका ज्या आहेत त्या चुका दुरूस्त करत नाही. आपल्या लोकांना पण चांगल्याप्रकारे सहकार्य करत नाही आणि मग परत नगरसेवकांना शिव्या खाव्या लागतात. कशासाठी म्हणजे ज्या काही सुधारणा आहेत भाऊ मै बहोत सफर हो रहा हु इसमे आता मला सांगा एकाची दुरूस्ती करून दिली मी आता तो म्हणतो की अमरावती वरून ती दुरूस्ती होवुन ते बिल येईल. आता समजा या संस्थेची मुदत या सभागृहाने वाढवुन दिली तर मग त्याला काय करायच आहे ऑनलाईनच तर मागवायच आहे दुरूस्त करून , हा विषय असा आहे आपले कर्मचारी सुध्दा आहेत तुम्ही त्यांना विचारा , आपल्या कर्मचाऱ्यांकडे गेले तर ते म्हणतात की आमच्या अखत्यारीत नाही तुम्ही त्यांच्याशी बोला, म्हणजे कम्युनिकेशन पाहीजे.

**श्री.ईब्राहिम पटेल :-** विशालभाऊ त्यांना किती मध्ये दिले आहे ते टेंडर

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आता ते पण मग सभागृहामध्ये तुम्हाला फेस पण कराव लागत सदस्यांना त्यांना भेटायला गेले तर ते म्हणता की हा नाहीये तो नाहीये. म्हणजे मी अजुन पण सांगतो मी पहिल्या दिवशी सभागृहामध्ये मिटींगचा एक विषय सभागृहामध्ये आलेला होता अजुनपर्यंत दुरूस्त झालेला नाही. एक वर्ष झाल जागेवरती पार्कीग आहे त्याच्या जागेवरती घर दाखविलेल आहे. मी स्वत: आयुक्त साहेबांना सांगीतले की तुम्ही सुध्दा चला आणि मी तुम्हाला त्याची दुरूस्ती साठी चा अर्ज दिला, सगळ दिल पण त्याच्यावर काहीच कार्यवाही अजुनपर्यंत , म्हणजे नागरीकांना पण सहकार्य आपल पाहीजे. पण अर्ज दिल्यावरती त्याला सॅटीफॅक्शन करत नाही. त्यांना आपण व्यवस्थित समजवुन सांगत नाही. आम्ही लोकांना समजावतो येवुन मी लोकांना भरायला लावले . आता एकाची रु.४००/- घरपट्टी होती त्याला ३० हजार आली मी म्हंटल तुम्हाला भरावी लागेल. कारण तुम्ही नविन घर बांधले आहे तुम्ही आकारणी केली नाही. तेही होत नाही एवढ आम्ही सहकार्य करतो पण घरपट्टी वाल्याला काहीतरी अटी शर्ती दंड वगैरे काहीतरी त्याच हे करा.कारण भरपुर लोकांच्या तक्रारी आहेत.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** नाहीतर ठेका रद्द करा.

**मा.उपमहापौर :-** विशालभाऊ बऱ्याच लोकांच्या तक्रारी आहेत.

**मा.महापौर :-** बऱ्याच भागातील नागरीकांच्या तक्रारी आहेत. स्थापत्य कंन्सलटंन्ट यांना तंबी देण्यात येईल.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही नाही तंबी द्यावीच लागेल.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** म्हणजे हा जो विषय आहे त्याच्याबाबत या ठेकेदाराने प्रशासनासोबत कधी चर्चा केली आहे का काय तक्रारी आहेत काय आहे काहीच नाही.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नागरीकांच्या तक्रारी टाकलेल्या आहेत त्या दुरूस्ती करण्यासाठी आपले विभाग , प्रभाग समित्यांला त्याच्या रावण्या करण्या पडता तर ते म्हणता तुम्ही पूर्तता करून घ्या. अशी परिस्थिती होवुन गेलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सन्मा.सदस्य यांनी मांडलेली स्थिती साहेब आपण मागच्या वेळेस पण यासंदर्भात बोललो या ही जी परिस्थिती आहे ही वास्तविक आहे

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आमचा विरोध नोंदवा आम्ही विरोध मध्ये आहे .

**श्री.नितीन लढ्ढा :-** सन्मा.सदस्यांची भुमिका ही होती की या तक्रारींचा निपटारा होण्याच्या संदर्भातुन त्यांच्याकडुन का होण गरजेच आहे. शेवटी सामान्य नागरीक किती वेळा येईल.त्यांना कुठेतरी योग्य पध्दतीने मार्गदर्शन मिळत नसेल. योग्य पध्दतीने वागणुक मिळत नसेल कालांतराने काय होत की जनक्षोभ होतो. म्हणुन संबंधित जी कोणी एजन्सी असेल त्यांना आपण त्यांच्या कर्मचाऱ्यांना तशा सक्त सुचना द्या आणि आपल्याकडे तक्रार आल्यानंतर कुठेतरी त्याची कालमर्यादा निश्चित करा. समजा आठ दिवसामध्ये तक्रारीचा

निपटारा होण गरजेच आहे. तर तो तुम्ही कालावधी ठरवा आणि आठ दिवस असेल तर आठ दिवस ठरवा म्हणजे सामान्य नागरीकांना ही एक माहिती जाईल की महानगरपालिकेमध्ये माझी तक्रारींची नोंद झाल्यानंतर आठव्या दिवशी मला याच्यातुन रिलीफ मिळेल किंवा जो काही असेल तो निपटारा होईल. अशा पध्दतीच्या आपण त्यांना सुचना द्याव्यात.

**मा.आयुक्त :-** सर याच्यामध्ये आपल अस आहे की याच्यामध्ये आपले डाटा एन्ट्री ऑपरेटर घेवुन ते दुरूस्ती करता येत का हे पाहु आणि नंतर आपण दुरूस्त करण्यासाठी ८ ते १० दिवसांच बंधनकारक करू आपले टॅक्स कलेक्टर आणि त्यांनाही यानुसार त्यांनी दुरूस्ती केलीच पाहीजे ७ दिवसांत व्हिजीट करावी आणि दुरूस्ती करावी. एक दोन दिवसांत आदेश देवु आपण

**मा.महापौर :-** विषय क्रं. ३२ ला कोणाचा विरोध नोंदवायचा आहे .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** एक मिनिंट एक मिनिंट

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आमचा विरोध आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आमचा विरोध

**मा.आयुक्त :-** सन्मा. सदस्यांना विनंती आहे की विरोध करण्याचा काही विषय नाही. कारण हे सगळ मेंटेंनन्स चे वर्क आहे आणि या सगळ्यांना करावच लागेल कारण की

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आमचा विरोध आहे.

**श्री.अश्विन सोनवणे :-** माझाही विरोध आहे याला .

**मा.आयुक्त :-** सन्मा सदस्यांना विनंती आहे सर हे मेंटेंनन्सचे वर्क आहे आणि हे आपल्याला करावच लागेल कारण की आपल्या कर्मचाऱ्यांना दुरूस्ती येत नाही प्रापर्टीची तर ती यांच्या मार्फतच करू शकतो आपण

**श्री.विशाल त्रिपाठी :-** एक मिनिंट आपण गेल्या दोन वर्षापुर्वी एक महापालिकेचा ठराव केलेला आहे की , कॉन्ट्रक्ट बेसिसवर कर्मचारी भरती करणे काय केले ते चांगले लोक येतील , नविन हुशार मुल मिळतील. कधीचा केलाय आपण महापौर ताई ईथे बसलेल्या आहेत. त्यांच्या कारकिर्दीत केला आहे. तिच परिस्थिती दवाखान्यात डॉक्टर लोक नाहीत. तिच परिस्थिती आपल्या महापालिकेत आहे. तिच परिस्थती इंजिनियर लोकांची आहे. तिच परिस्थिती लाईटला आहे , तिच परिस्थिती बांधकामला आहे. आपण का बर कॉन्ट्रक्ट भरत नाही मग आपण ठराव केलेला आहे.

**मा.आयुक्त :-** आपण कॉन्ट्रक्ट बेसवर याच्यासाठी भरत नाहीत की मी सुरूवातीला येतांना सांगीतल की आपला आकृतीबंध मंजुर नसतांना अशी कंत्राटी भरती सरळ सरळ फक्त ओपन पदांची नाही करू शकत. आपल्याला तशी पद फिक्स करावी लागतात. कंत्राटी पध्दतीने भरती करायची जरी झाली तरी आपल्याला बिंदुनामावली जी आहे ती मंजुर करावी लागणार ती आपली सेंक्शन नाहीये.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** आता आपले जे कर्मचारी पदाकरीता बसतात त्यांच्याकडुन करून घ्या.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** कस भरता येईल ते बघा आणि ते शासनाच्या ऐकुण याच्यानुसार बदल झालेल असेल काही असेल किंवा अजुन दुसऱ्या काही पध्दतीने हे असेल तर त्या पध्दतीने भरून नविन कर्मचारी लोक यायला तर पाहीजे. नविन हुशार मुल मिळतील आपल्याला का बर करत नाही हे मला कळत नाही.

**मा.आयुक्त :-** आपण दररोज माझ एकदा तरी मंत्रालयात फोन करते याच्याबद्दल आणि याच्यावर बोलण होत. मा.पालकमंत्री महोदय सुध्दा या गोष्टीचा फॉलोअप घेताहेत की लवकरात लवकर आपला आकृतीबंध मंजुर व्हावा. मी आपल्याला कॉन्ट्रॅक्ट बेसीसवर

**सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही.**

**श्री. दिलीप पोकळे :-** आपण आपल्या भांडार विभागाकडे मागणी दिली होती की ऑनलाईन पध्दतीने अद्यावत करणे , छपाई करणे , मागणी बिलांची छपाई करणे , म्हणजे आपण छपाईच पण काम करतोय का

**मा.आयुक्त :-** आपण नाही करत ती संस्था देते आपल्याला देते त्यांच्या सॉफ्टवेअर मध्ये

**श्री. दिलीप पोकळे :-** छपाई त्यांच्याकडुन येते का , प्रशासनाने सांगाव मला की छपाई त्यांच्याडुन होते का ? भांडार विभागाकडुन होते की छपाई त्यांच्याकडुनच होते का ते सांगा.

**मा.आयुक्त :-** आपण त्यांच्याकडुन

**मा.महापौर :-** एक मिनिंट आपण जर यांना कॅन्सल करायच म्हंटल तर पुन्हा नविन काम कोण करणार. स्थापत्य कडुन काढल्यानंतर पुन्हा ते काम कोण करणार , पुन्हा एक नविन एजन्सी नेमायची म्हंटली तर

**श्री. नितीन लढ्ढा :-** महापौर ताई याचा सगळ्यात मोठा परिणाम वसुली वर होईल.

**श्री. कैलास सोनवणे :-** भाऊ ईबाभाईच्या वॉर्डात किती कोटीचे काम मंजुर केले आता.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आप्पा एक पण नाही पालकमंत्र्यांनी दिलेले आहे.

**श्री. कैलास सोनवणे :-** मला कोणीतरी सांगा की या कामांचे शिल्पकार

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आप्पा पालकमंत्र्यांनी दिलेले आहे.

**श्री. कैलास सोनवणे :-** या कामाचे शिल्पकार अस एक बोर्ड आठवत आहे काहीतरी

**श्री. नितीन लढ्ढा:-** आप्पा

**श्री. कैलास सोनवणे :-** या कामाचे पैसे कुठुन येतील.या कामांना करोडो रूपये लागणार आहे ते पैसे कुठुन येतील.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** आप्पा पालकमंत्र्यांचा निधी आहे तो.

**श्री. कैलास सोनवणे :-** म्हणजे काही चुकीच करत असले ना आपण

**सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही.**

**श्री. कैलास सोनवणे :-** महापौरताई , महापौरताई याच्यामध्ये त्याने काय केलेल आहे ते तपासण्या याव.

**श्री. विशाल त्रिपाठी :-** बरोबर आहे.

**श्री.कैलास सोनवणे :-** म्हणजे त्याने काय चुकीच केल आहे ते तपासण्यात याव आणि हा विषय मंजुर करण्यात यावा. जे चुकीच आहे ते तपासण्यात याव

**श्री. विशाल त्रिपाठी :-** बरोबर आहे. याचा अर्थ हा आहे की सभागृहाला किती त्रास होतोय याची ही भावना या सभागृहापुढे येते आहे.

**श्री.सुनिल खडके :-** सगळ्यांना त्रास होतो आहे याचा

**श्री. कैलास सोनवणे :-** बरोबर आहे. सगळ्या सभागृहाला त्रास होतो आहे याचा

**श्री. विशाल त्रिपाठी :-** बरोबर आहे ना सगळ्या सभागृहाला त्रास होतोय याचा

**श्री. नितीन लढ्ढा :-** विशालजी एक सिधी बात है. म्हणजे मक्तेदाराच्या विरूध्द अशी ओरड आहे की घरपट्टी वाढली म्हणजे ही नागरीकांची ओरड आहे .

**श्री. कैलास सोनवणे :-** हो बरोबर आहे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** हो.

**श्री. कैलास सोनवणे :-** पहिलेच सांगीतले मी

**श्री. नितीन लढ्ढा :-** म्हणजे काय आहे. ती रक्कम कोणाच्या खात्यात येणार आहे महापालिकेच्याच का ती मक्तेदाराच्या खिश्यात जाणार आहे का , परंतू आपल म्हणण हे नाहीये मनपाला जर वाढीव रक्कम येत असेल म्हणुन लोकांची गळचेपी करा हे आपल धोरण नाहीये. जर कधी याच्यामध्ये कुठेतरी त्रुटी असतील आणि नागरीकांच्या तक्रारींच निरसण होण हे क्रमप्राप्त आहे. परंतू अशा पध्दतीने अशा प्रस्तावावरून महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या साधनांवर जर परिणाम होत असतील तर मी म्हणतो की आर्थिक रित्या महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने योग्य नाहीये आणि तक्रारी असतील निश्चितपणे मक्तेदाराला जो कोणी असेल त्याच्या विरूध्द सुध्दा कारवाई करायला पाहीजे. परंतू अशा पध्दतीने धोरणात्मक निर्णय घेतांना विचार करून निर्णय घेण्यात यावा.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** चुकीच्या पध्दतीने सर्वे करत आहेत आमच म्हणण ते आहे. म्हणजे काय केलेल आहे कस केलल आहे त्याला दुमत नाहीये.

**श्री. नितीन लढ्ढा :-** ईबाभाई

**श्री. ईब्राहीम पटेल :-** चुकीच्या पध्दतीने लोकांच एक्स्ट्रा मोजमाप करताहेत.

**श्री. नितीन लढ्ढा :-** डॉक्टरसाहेब मी काय म्हणतो

**श्री. ईब्राहीम पटेल :-** चुकीच्या पध्दतीने सेटलमेंट करुन घेता आणि आम्ही फक्त शिव्या खातो.

**श्री. नितीन लढ्ढा :-** चुकीच्या पध्दतीने सर्वेक्षण केले आणि घरपट्टी चुकीची लागली तर ती कुठे येणार आहे. ती मक्तेदाराच्या खात्यात जाणार नाही. ती महापालिकेच्या अकाऊंटलाच येणार आहे.

**मा.आयुक्त :-** सर मी आपल्या बोलण्यानुसार त्याच्यासोबत बोलण केल होत आणि ते समअप केले होत आम्ही पण मक्तेदाराने केल नाही ते सगळा पत्रव्यवहार केला होता पण आता आपण काय करणार .

**मा.महापौर :-** एजन्सीला बोलावुन त्यांची एक मिटींग अरेंज करावी व त्यांना सांगाव की ७ दिवसांच्या आंत नागरीकांच्या येणाऱ्या तक्रारी या सोडविल्या पाहीजे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** मॅडम मी शेड बांधलेले आहे. शेड म्हणजे पत्री शेड

**श्री. कैलास सोनवणे :-** ईबाभाई

**श्री. ईब्राहीम पटेल :-**शेड पत्री शेड आहे.

**श्री. कैलास सोनवणे :-** ईबाभाई कितना बडा होंगा वो शेड

**श्री. ईब्राहीम पटेल :-** ४ हजार होती डायरेक्ट २५ हजार केली त्यांनी

**श्री. कैलास सोनवणे :-** वाजवी घ्यायला पाहीजे.

**श्री. ईब्राहीम पटेल :-** याला काय आहे

**श्री. कैलास सोनवणे :-** ईबाभाई आता मी बोललो नाही मध्ये मी मक्तेदाराच्या बाजुने बोलत नाहीये मी स्वत: माझे दुकान आहे कोणत मार्केट आहे ते

**श्री. नितीन लढ्ढा :-** गोधडीवाला मार्केट

**श्री. कैलास सोनवणे :-** गोधडीवाला मार्केट मध्ये आहे. तेथे माझा मुलगा बसतो. तिथे त्यांनी डायरेक्ट भाडेकरू दाखवला आहे . म्हणजे मी भाड्याने दिली आहे अशी आकारणी केली आहे.

**मा.महापौर :-** नाही पण ते होवु शकत ना दुरूस्त करू शकतो ना

**श्री. कैलास सोनवणे :-** हो माझही तेच म्हणण आहे ना

**मा.महापौर :-** त्याच्यासाठी आपल्याला

**श्री. कैलास सोनवणे :-** हो मी सोनवणी साहेबांना सांगीतले आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** हेच म्हणण आहे आमचे वेळेवर दुरूस्त्या व्हायला पाहीजे.

**मा.महापौर :-** त्याच्यासाठी आपल्याला रितसर अर्ज द्यावा लागेल.

**श्री.व्हि.ओ.सोनवणी, प्रभाग अधिकारी :-** महापौरताई , आपल्याकडे मनुष्यबळ नाहीये म्हणुन आणि त्याच्यात संदर्भाचा हा विषय आहे आणि आता जी काही दुरूस्ती बाकी आहे आणि ते आपल्याला करणे क्रमप्राप्त आहे. म्हणुन आपण त्याला ते दिलेल आहे आणि तो बिल सुध्दा छापुन देणार आहे याच खर्चामध्ये त्यानंतर डिमांड रजिष्टर , वसुली रजिष्टर हे सगळ तो आपल्याला करून देणार आहे.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही पण याच्यामध्ये

**श्री.दिलीप पोकळे :-** भांडार विभागाला आपण छपाईच काम पण दिलेले आहे आणि याला दिलेल आहे ही तफावत काय आहे ती पाहीजे.

**श्री.व्हि.ओ.सोनवणी, प्रभाग अधिकारी :-** मक्तेदार बिलांचे काम तोच करतो कारण बिल अद्यावत छपाईचे असतात.

**मा.आयुक्त :-** त्याला आपण सांगु अद्यावत करणेसाठी आणि भांडारपाल यांना सांगुन देवु आपण

**श्री.दिलीप पोकळे :-** चालेल मॅडम

**श्री. कैलास सोनवणे :-** तेवढ करून घ्या मॅडम

**श्री.विशाल त्रिपाठी :-** नाही पण याच्यामध्ये अजुन एक महत्वाचा विषय आहे. जो घरपट्टी चा सर्वे झालेला आहे पुर्ण त्याचा पुर्ण डाटा आपल्या ताब्यात घ्या.

**मा.आयुक्त :-** नक्की नक्की

**श्री.विशाल त्रिपाठी :-** तो आपण घेतलेला नाहीये कारण ती आपली माहिती आहे ते टाकुन घ्या नाहीतर तो मोनोपॅली करून ठेवेल.

**मा.महापौर :-** याचा पुर्ण डाटा प्रशासनाने आपल्या ताब्यात घ्यावा आणि सन्मा.सदस्यांच्या भावना लक्षात घेता या एजन्सीला बोलावुन त्यांना नागरीकांच्या आलेल्या अडचणी लवकरात लवकर सोडविण्यात येतील याची टाईम लिमीट देवुन लवकरात लवकर ते काम करण्यात यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे .

**श्री.ईब्राहीम पटेल :-** लोकांच्या ज्या तक्रारी असेल त्याचा निपटारा लवकरात लवकर करा म्हणा.

**मा.महापौर :-** तेच सांगीतले ना आत्ता आम्ही

**सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही.**

**श्री.कैलास सोनवणे :-** मंजुर आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** मंजुर आहे.

**मा.महापौर :-** सर्वानुमते करायचा ना

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्या. रेखाताई पाटील आपला विरोध नोंदवायचा आहे का याला

**श्रीमती. रेखा पाटील :-** हो

**मा.महापौर :-** सन्मा.सदस्या. रेखाताई पाटील यांचा विरोध नोंदवुन बहुमताने विषय क्रं. ३२ हा मंजुर करण्यात येत आहे.

मा.पिठासीन अधिकारी तथा महापौर यांनी सन्मा.सदस्या श्रीमती रेखा चुडामण पाटील यांचे पत्र सभागृहात स्विकारून सदर पत्राची नोंद दि.३०/०५/२०२२ च्या कार्यवृत्तात घेणेबाबत निर्देश दिलेले असल्यामुळे सदर पत्राची नोंद खालील प्रमाणे घेण्यात येत आहे.

**प्रति,**

**मा.महापौर सो,**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव.**

**विषय :-** महासभा क्रं. ३८ दि.३०/०५/२०२२ विषय क्रं.३२ या विषयाबाबत हरकत.

**महोदय ,**

वरील विषयास अनुसरून आज रोजी घरपट्टी बद्दल शहरात लोकांची खुप नाराजी आहे. मे. स्थापत्य कन्सलटन्स (आय) प्रा.लि. या कंपनीने नागरीकांचे चेहरे पाहुन घरपट्टी लावण्याचे काम केले आहे. त्याच बरोबर मनपाचे काही कर्मचारी व कंपणीचे कर्मचारी यांनी काही मोठ्या व्यक्ती कडुन देवाण घेवाण करून घरपट्टी कमी केली आहे. मध्यमवर्गीयांची कोणतीही दाद घेतली गेली नाही. याची सर्व चौकशी करायला हवी. तसेच मागील नागरीकांच्या अजुन भरपुर तक्रारी आहेत, तरी म.न.पा ने याकडे दुर्लक्ष केले तर या करीता मला मा.हायकोर्ट यांच्याकडे तक्रार करावी लागेल या विषयास माझा विरोध आहे. त्या सर्व तक्रारींचा निपटारा होत नाही तोपर्यंत कोणताही देखभाल खर्च यांना देण्यात येवु नये.

**आपली**

**सही/-**

**श्रीमती.रेखा चुडामण पाटील**

**नगरसेविका , मनपा,जळगांव.**

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं.८३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका हद्दीतील संपुर्ण मालमत्तांचे (जमिन व इमारती) जी.आय.एस. प्रणालीव्दारे सर्वेक्षण करणे, संपुर्ण मालमत्तांचे संगणीकृत करमुल्य निर्धारण व कर आकारणी करणे कामी स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि. यांना इकडील आदेश क्र.ज.म.न.पा./प्र.स.क्र.०१ ते ०४ / २२५३ दि.०४/०१/२०१७ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे. दि.०४/०१/२०१७ च्या करारनाम्यात नमुद अटी व शर्तीच्या आधिन राहून दि.०४/०१/२०१७ पासुन सदर कंपनीने खालील प्रमाणे कामे केलेली आहेत. स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि.,यांचे दि.०३/०५/२०१८ चे पत्राचे अनुषंगाने तत्कालीन आयुक्त यांनी दि.०१/०४/२०१८ ते दि.३०/०९/२०१८ अखेर ६ महीने मुदतवाढ दिलेली होती. तद्नंतर पुन:श्च स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि.,यांचे दि.११/०६/२०१९ च्यापत्रानुसार त्यांनी अपेक्षील्याप्रमाणे दि.०१/१०/२०१८ पासुन दि.३१/०३/२०२० पर्यंत मुदतवाढ आयुक्त यांचे मान्यतेने उपायुक्त यांचेकडील पत्र जा.क्र./प्र.स.क्र.०१/६९४ दि.१९/०८/२०१९ अन्वये मुदतवाढ प्रदान केलेली आहे. तसेच स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि.,यांचे दि.२९/०४/२०२० चे पत्रानुसार ३१ मार्च २०२१ पर्यंत मुदतवाढ आयुक्त यांचे मान्यतेने उपायुक्त यांचे कडील पत्र जा.क्र./प्र.स.क्र.१/१०९१ दि.०३/११/२०२० अन्वये मुदतवाढ प्रदान केलेली आहे. व ३१ मार्च २०२२ पर्यंत मुदतवाढ आयुक्त यांचे मान्यतेने उपायुक्त यांचे कडील पत्र जा.क्र./प्र.स.क्र.१/११३४ दि.३०/०९/२०२१ अन्वये मुदतवाढ प्रदान केलेली आहे. तसेच प्रस्तुत प्रकरणी सन २०१९-२० अखेर पर्यंत वार्षीक देखभाल दुरुस्ती कामी स्थायी समिती ठराव क्र.१५५ दि.०४/०९/२०१९ अन्वये रक्कम रु.२,०८,६२,६३१/-मात्रचे खर्चापैकी यापुर्वी स्थायी समितीचे मान्यतेने रु.१,०७,९४,८१४/- मात्रचे खर्चास प्राप्त मान्यता रक्कम वजा जाता रक्कम रु.१,००,६७,८१८/- चे खर्चास मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच जादा प्रमाण करिता सन २०१९-२० साठी मिळकती

२२९९३Xरु.८३=रु.१९,०८,४१९/- मात्रच्या खर्चास स्थायी समिती ठराव क्र.२१९ दि.१०/०१/२०२० अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. सदर कामासाठी सन २०२०-२१ च्या अंदाजपत्रकांत रु.दोन कोटीची तरतुद केलेली आहे.

सन २०२०-२१ चे वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी

| | | |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्र.०१ | - | ३२१००X८३= २६,६४,३००/- |
| प्रभाग समिती क्र.०२ | - | २४०३९X८३= १९,९५,२३७/- |
| प्रभाग समिती क्र.०३ | - | २८४१७X८३= २३,५८,६११/- |
| प्रभाग समिती क्र.०४ | - | २४२१०X८३= २०,०९,४३०/- |
| एकुण - | | १०८७६६X८३= ९०,२७,५७८/- |

उपरोक्त प्रमाणे सन २०२०-२१ साठी वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी एकुण खर्च रु.९०,२७,५७८/- मात्र सदर खर्चासाठी सन २०२०-२१ च्या वार्षीक अंदाज पत्रकांत केलेल्या रु.दोन कोटी च्या तरतुदीमधुन खर्चास महासभा ठराव क्र.६८५ दि.१५/१२/२०२१ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. तसच सन २०२१-२२ च्या वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी एकुण मिळकती १२००००/- X ८३ = ९९६००००+ १८% जी.एस.टी = अपेक्षीत खर्च रु.१,१७,५२,८००/- सन २०२१-२२ च्या वार्षीक अंदाजपत्रकात केलेल्या रु.एक कोटी पंन्नास लक्ष च्या तरतुदीमधुन या खर्चास महासभा ठराव क्र.६८५/- दि.१५/१२/२०२१ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. सदर मान्यता घेतांना शासन निर्देशानुसार सेवा कर (G.S.T.) भरणे बंधनकारक होते. मात्र अनावधानाने वस्तु व सेवाकराची रक्कम सुटलेली आहे. तरी रक्कम सन २०२०-२१ वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी रु.९०,२७,५७८/- त्यास १८% वस्तु व सेवाकर रक्कम रु.१६,२४,९६४/- मात्र व सन २०२१-२२ वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी रक्कम रु.९९,६०,०००/- त्यास १८% वस्तु व सेवाकर रक्कम रु.१७,९२,८००/- अशी एकुण वस्तु व सेवा कर (G.S.T.) रक्कम रु.३४,१७,७६४/- मात्रच्या होणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच जळगांव शहर महानगरपालिका प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ च्या हद्दितील मिळकतींचे फेरमुल्यांकनाचे काम मे.स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि.,यांनी दि.३१/०३/२०२२ अखेर पूर्ण करुन नियमानुसार विशेष नोटीस छपाई करुन दिलेल्या होत्या त्यानुसार सुनावणी कामी आवश्यक ती स्टेशनरी सर्व प्रभाग निहाय पुरविलेली होती. सुनावणी अंती आक्षेप निर्णयानुसार फरकाची बिले देखील छपाई करुन प्रभाग निहाय संबंधीत प्रभाग समिती कार्यालयास पुरविलेली आहेत.

शहरातील चारही प्रभागातील खुला भुखंड विभागातील मागणी रजिस्टर उपायुक्त यांनी संगणकीकरण करणे कामी देणे बाबत दिलेल्या निर्देशानुसार मक्तेदार यांनी खालील प्रमाणे डाटा एन्ट्री करुन मागणी रजिस्टर व मागणी देयके पुरविलेले आहे.

सन २०२०-२१ चे खुला भुखंड वार्षीक देखभाल दुरुस्तीसाठी

| | | |
|---|---|---|
| प्रभाग समिती क्र.०१ | - | १०२२२X८३= ८,४८,४२६/- |
| प्रभाग समिती क्र.०२ | - | ६०२९X८३= ५,००,४०७/- |
| प्रभाग समिती क्र.०३ | - | १२२१६X८३= १०,१३,९२८/- |
| प्रभाग समिती क्र.०४ | - | ७८८९X८३= ६,५४,७८७/- |
| एकुण - | | ३६५३६X८३= ३०,३२,४८८/- |
| १८% जी.एस.टी - | | ५,४५,८४७/- |
| एकुण - | | ३५,७८,३३५/- |

पैकी महासभा ठराव क्र.६८५ दि.१५/१२/२०२१ अन्वये २००००० X ८३ = रक्कम रुपये १६,६०,०००/- ची मान्यता प्रदान केली आहे. उर्वरीत वाढीव भुखंड १६५३६ X ८३ = रक्कम रुपये १३,७२,४८८/- जी.एस.टी. रक्कम रुपये ५,४५,८४७/- अशी एकुण रक्कम रुपये १९,१८,३३५/- मात्र च्या होणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तथापी फेरमुल्यांकनांत काही मिळकतींच्या आकारणीत अर्जानुसार आवश्यक तेथे दुरुस्ती करणे आवश्यक असून जळगांव महानगरपालिकेतील कामकाजाचा अनुभव विचारांत घेता त्याकरीता पुढील दोन वर्षासाठी वार्षीक देखभाल दुरुस्तीचे काम हे स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि., यांनाच देणे योग्य होईल. त्यांचेशी दि.०४/०१/२०१७ रोजी झालेल्या करारनाम्यातील अट क्र.१३ (III) (G) Step ५ मध्ये नमुद दोन

वर्षासाठी म्हणजे सन २०२२-२३ व सन २०२३-२४ साठी देखभाल दुरुस्ती चे काम स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि.,या कंपनीस देणे तसेच सदर कामासाठी कंपनीशी केलेल्या करारनाम्यानुसार खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ. क्र. | सन | अपेक्षीत मिळकत संख्या | करारनाम्यानुसार दर | रक्कम | वस्तू व सेवाकर रक्कम | एकुण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०२२-२३ | १७०००० | ८३ | १४११०००० | २५३९८०० | १६६४९८०० |
| २ | २०२३-२४ | १८०००० | ८९.६४ | १६१३५२०० | २९०४३३६ | १९०३९५३६ |

सन २०२२-२३ ते सन २०२३-२४ पर्यंत देखभाल दुरुस्ती चे काम स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि., या कंपनीस देणेस तसेच उक्त प्रमाणे प्रत्येक वर्षी होणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तसेच जळगांव शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्र.०१ ते ०४ च्या हद्दितील मिळकतींच्या मालमत्ताकराचा भरणा सन २०२२-२३ करिता ऑनलाईन कर वसुली आज्ञावली अदयावतीकरण करणे, मागणी देयके तयार करुन छपाई करणे, मागणी व वसुली रजिस्टर छपाई करणे आवश्यक आहे. सदर एजन्सी कडून सदर बाबी या वार्षिक देखभाल दुरुस्ती अंतर्गत प्राप्त करुन घेणे आवश्यक असल्याने उक्त प्रमाणे ऑनलाईन आज्ञावली अदयावत करणे बाबत व साहीत्य पुरविणे बाबत मे. स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि., अमरावती या कंपनीस पत्र देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

मात्र सभागृहात झालेल्या चर्चेनूसार नागरीकांच्या फेरमुल्यांकनाबाबत हरकती आल्यास सदर हरकती ७ दिवसांत निकाली काढव्यात तसेच मनपा प्रशासनाने मे. स्थापत्य कन्स्ल्टन्टस् (आय) प्रा.लि., यांनी केलेल्या फेरमुल्यांकनाचा संपूर्ण डाटा महानगरपालिकेच्या ताब्यात घ्यावा.

**बहुमताने मंजुर**

**अनुकूल मते :- ५३ प्रतिकुल मते :- ०१**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान**

**नगरसचिव, विषय क्रं. ३३) :-** खालच्या पदावर पदावनत केलेल्या आदेशाबाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (४) नुसार श्री.गोपाळ मुरलीधर लुले, क.अभियंता,म.न.पा.जळगांव यांनी मा.महापौर यांचे मार्फत म.स्थायी समितीचे निर्णयास्त केलेल्या अपील अर्जावर निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य तो निर्णय घेण्यात यावा.

**मा.आयुक्त :-** प्रशासनातर्फे कार्यवाही करून , प्रशासनाकडुन आलेल्या अभिप्राया नुसार जे आहे त्या नियमानुसार

**श्री.कैलास सोनवणे :-** काय बोलले मॅडम

**मा.आयुक्त :-** सर याच्यावर प्रशासन

**नगरसचिव :-** प्रस्ताव मांडताहेत त्यांना मांडु द्या .

**मा.महापौर :-** बोला ताई

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्यामध्ये प्रशासनाने नियमानुसार जे अपिल त्यांचे आलेले अपिल ते आपल्याला वाटेल की नियमानुसार नाहीये तर निश्चितपणे तो आपण विखंडनाला पाठवु शकाल, परंतू ते उद्या रिटायर होणार आहेत. अपिलकर्ता जो आहे तो रिटायर होणार आहे कमीत कमी त्याला काहीतरी आपण द्यायला हवे की त्याला वाटेल मला काहीतरी मिळाले आहे फिप्टी फिप्टी का होईना, फिप्टी आम्ही दिला फिप्टी तुम्हाला द्यायचा आहे की नाही तुम्ही विचार करावा.

**श्री.कैलास सोनवणे :-** त्यांना पुर्वपदावर घेण्यात याव. कारण समजा मॅडम आहे, जे आपले अधिकारी असतात, शासकीय अधिकारी आपल्या शहरामध्ये तिन वर्षासाठी येतात आणि तेवढ्यापुरती आपल्या कर्मचाऱ्यांची ओळख होते समजा तर ते काही वाईट गोष्ट नाही. तुम्ही येतात पुढे तुम्हाला कुठल्या महापालिकेत किंवा कुठे जाणे, तुमचा पिरीएड जो असतो तो तिन वर्ष असतो. समजा आता कोणी दोन वर्ष, तिन वर्ष किंवा चार वर्ष कोणी जो जेवढा वेळ असतो तेवढी तुम्हाला त्याची ओळख होते. आत नितीनभाऊ झाले, सुनिलभाऊ झाले, नितीन बरडे आहेत, ललीतभाऊ आहेत, खडके आहेत, मी आहे आता येथे बरेच

आहेत. आम्ही या लोकांचे पुर्ण आयुष्य पाहीलेले आहे आणि त्याच्यामध्ये मी लुले साहेबांच पुर्ण आयुष्य मी पाहीलेले आहे. कधीही या माणसाने पलटुन विषय केला नाही किंवा कधी चुका केल्या अस मला माहिती नाही किंवा काय तसेच त्यांनी कुणाशी कधीही अशी अरेरावीची भाषाही केलेली नाहीये आणि सामाजिक दृष्टया किंवा तो आर्थिक सबळ किती आहे त्याच्यावर त्याचा स्वभाव अवलंबुन असतो. त्याचा समाज किती आहे या शहरात, या शहरात तुमचा समाज किती आहे किंवा तुमची प्रॉपर्टी किती झाली. याच्यावर तुमचा स्वभाव असतो. त्याचा परिणाम तुमच्या क्षेत्रावर होणार असतो. कोणी जातीच्या भरवश्यावर करत. कोणी ज्ञानाच्या भरवश्यावर करत परंतू त्या माणसाची ना काही जात आहे , ना समाज आहे काही नाहीये , ना आर्थिक दृष्टया पण तो काही नाहीये म्हणजे आम्ही त्यांची कौटुंबिक परिस्थिती पाहीली ना आम्ही म्हणजे त्यांच्या दोन मुलींचे लग्न बाकी आहे. ते जर बडतर्फ झाले असते तर त्यांचे म्हणजे प्राब्लेमच वाढले असते. त्यांचा मुलगा जो आहे त्याचा प्रॉब्लेम आहे. या सगळयांचा विचार केला पाहीजे आणि शेवटी त्यांनी आता त्यांचे दोनच दिवस बाकी आहेत. प्रामाणिक पणे त्यांनी त्यांची सेवा या महापालिकेत बजावली आहे. तर आमची विनंती राहील तुम्हाला की त्यांना माफ करण्यात याव आणि पुर्ववत पदावर घेण्यात याव. कारण तो सामुहीक गुन्हा काहीतरी होता आणि त्याच्यामध्ये बाकीचेही भरडले जातात. बाकीचेही आता समजा सहा जण आरोपी आहेत त्यामध्ये एकाचा फार मोठा दोष असतो काहींचा दोष असत नाही. असा तो गुन्हा आहे. तर मी विनंती करेल मॅडमांना जस आम्ही बोललो आणि ठरावपण मान्य करतो आम्ही आणि त्यांच अपिलही मान्य करण्यात याव आणि त्यांनी आम्हाला सांगीतल अशातील काही भाग नाहीये . आयुक्त साहेबांकडेही आम्ही जेव्हा गेलो होतो तेव्हापण आम्ही त्यांना बोललो की तुम्ही योग्य न्याय करा अन्याय करू नये अस आम्हाला वाटत एवढच बालेल मी. आता आपले सोनवणी साहेब आणि लुले साहेब यांचा आज शेवटचा दिवस आहे त्यांना भावी जिवनासाठी मी शुभेच्छा देतो.

**श्री.दिलीप पोकळे :-** योग्य तो न्याय देण्यात यावा.

**श्री.विशाल त्रिपाठी :-** आता हा जो प्रस्ताव आलेला आहे. तर हे भोसले साहेब जे आहेत तर आपल्याला न्याय द्यायचा असेल तर दोघांना सारखाच न्याय द्यावा लागेल ना तर देण्यात यावा. महापौरांचे आश्वासन पाहीजे आहे.

**श्री.सुनिल महाजन :-** चला, सुनिलभाऊ अहो, सुनिलभाऊ.

**नगरसचिव :-** डिक्लेअरेशन बाकी आहे महापौरांचे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ३३ च्या संबधित सर्व कागदपत्रांची प्रशासनाने शहानिशा करावी आणि विषय क्रं. ३३ सर्वानमुते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, श्री.गोपाळ मुरलीधर लुले, क.अभियंता,म.न.पा.जळगांव यांनी आपल्या महानगरपालिकेच्या संपूर्ण सेवाकाळात प्रामाणिकपणे काम केलेले असल्याने त्यांची संपूर्ण सेवाकाळातील चांगली वागणूक व त्यांचे चांगले काम पाहाता तसेच ते सेवानिवृत्त होणार असल्याने त्यांना त्यांचे पुर्व पदावर नियुक्त करणेस हरकत नाही. प्रशासनाने त्यांचे अपिल अर्जा संबंधित सर्व कागदपत्रांची शहानिशा करुन पूढील योग्य ती कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००**

**सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद**

**अनुमोदक :- पोकळे दिलीप बबनराव**

**नगरसचिव, विषय क्रं. ३४) :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.**

**श्री.नितीन लढ्ढा :-** केलेल्या सर्व संविदाची माहिती घेण्यात आली.

**मा.उपमहापौर :-** माझ अनुमोदन आहे.

**मा.महापौर :-** विषय क्रं. ३४ सर्वानुमते मंजुर करण्यात येत आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषगांने ठराव क्रं. ८३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१८९ दि.०७/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१६ स.नं.५१८ रणछोडदास नगर आर.सी.सी गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.रिकु उमाकांत चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा ६.२२% सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,३८,६६८/- मात्र खर्चाची संविदा.

२. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१९२ दि.१५/०३/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.०४ शनिपेठ मधील दालफळ परिसरात श्री.ओझा यांच्या घरापासुन ते श्री.तिवारी यांच्या घरापर्यंत रस्ता आर.सी.सी. गटार व स्लॅब कल्व्हर्ट तयार करणे कामी मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९८,७४४/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

३. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१९३ दि.१५/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.१६ स.नं.५१८ रणछोडदास नगर मध्ये डांबरी रस्ते तयार करणे कामी मक्तेदार श्री.विलास प्रभाकर पाटील यांचे वाटाघाटीअंती निविदा रक्कमेपेक्षा ५.४५% जास्तीचे सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२२,४४,२२५/- मात्र खर्चाची संविदा.

४. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१९४ दि.१६/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन अंतर्गत प्रभाग क्रं.०२ मध्ये चौघुले प्लॉट परीसरातील रस्ते व आसोदा रोडकडे जाणारा रस्ता पेव्हींग ब्लॉक बसवुन तयार करणे कामी मक्तेदार श्री.निलेश रमेश पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२०,००,०००/- मात्र खर्चाची संविदा.

५. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१९५ दि.१६/०३/२०२२ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.०९ मुक्ताईनगर पिंप्राळा गट नं.२८,३०,३२ व ३४ मध्ये खेळणी व ओपन जीम साहीत्य बसविणे कामी मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन,जळगांव यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१०,०१,२८५/- मात्र खर्चाची संविदा.

६. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./०१ दि.०५/०४/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.१५ मेहरुण सि.स.नं.४८६ मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.निलेश रमेश पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१९,४३,५४४/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

७. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./०२ दि.०७/०४/२०२२ अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते पॉटहोल मशिनच्या सहाय्याने दुरुस्ती करण्याकरीता इमल्शन डांबर पॅक डब्यात शासकीय दराने हिंदुस्थान कोलॅस प्रा.लि.मुंबई यांचे कडुन खरेदी करणे कामी येणारा रक्कम रु.२३,८७,५०२/- + रक्कम रु.१,६८,०२५/- असा एकूण रक्कम रु.२५,५५,५२७/- मात्र खर्चाची संविदा.

८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./०५ दि.१२/०४/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.०४ शनिपेठ मधील दालफळ परिसरातील मरीमाता मंदीर ते श्री.ओझा यांच्या घरापर्यंत कॉंक्रीट रस्ता तयार करणे कामी मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९७,२९४/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

९. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./०६ दि.१२/०४/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील वार्ड क्रं.१७ मधील गट नं.४०/०१,क श्री.स्वामी समर्थ केंद्र, अयोध्या नगर येथे पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.बालाजी इन्फ्रास्ट्रक्चर यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.८,६९,७००/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१०. प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./०८ दि.२१/०४/२०२२ अन्वये पा.पु.विभागा अंतर्गत वाघुर योजनेच्या १५०० मीमी ते ४५७ मीमी पी.एस.सी.पाईप लाईन तसेच एअर व्हॉल दुरुस्ती करणे कामी मक्तेदार श्री.संजय दिनेश

भोळे,जळगांव यांचे अंदाजित रक्कमेवर ३.५०% जास्तीचे दिलेले दर हे सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२३,३४,२४९/- मात्र खर्चाची संविदा.

११.प्रशासकीय आदेश क्र.विदयुत/०१ दि.०७/०४/२०२२ अन्वये मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत विदयुत विभाग यु.क्रं.०१ अंतर्गत वार्ड क्रं.०८ साई पॅलेस स्टॉपजवळ वैष्णवी नगर येथे १ हायमस्ट बसविणे व इतर ७ कामे करणे कामी मक्तेदार गार्गी इलेक्ट्रीकल्स ॲण्ड एन्टप्रायजेस,जळगांव यांचे निवेदेतील दर सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.५,३५,४७८/- मात्र खर्चाची संविदा.

१२.प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./१० दि.२९/०४/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील वार्ड क्रं.०४ राममंदिर चौक ते स्नेह चौक, विठ्ठल मंदिर (मठ गल्ली) पर्यंत रस्ता कॉक्रीटींग करणे कामी मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१९,९८,६६६/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१३.प्रशासकीय आदेश क्र.सा.बां./११ दि.२९/०४/२०२२ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.०८ मधील रेणुका नगर येथील प्लॉट नं.१० समोरील रस्ता कॉक्रीटींग करणे कामी मक्तेदार डी.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,९५,३६३/- मात्र खर्चाची संविदा.(मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१४.प्रशासकीय आदेश क्र./विदयुत/०२ दि.२९/०४/२०२२ अन्वये मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम सन २०२१-२२ अंतर्गत जळगांव शहरातील विदयुत विभाग यु.क्रं.२ व ४ मधील वार्ड क्र.१६ प्लॉट नं.२५ अन्नपुर्णा प्राव्हिजनमागे देविदास कॉलनी येथे १ हायमास्ट बसविणे व इतर आठ कामे करणे कामी लघुत्तम मक्तेदार/निविदाधारक भुषण इलेक्ट्रीकल्स,जळगांव यांचे निविदा रक्कमेइतकेचेच सर्वात कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.६,०२,००५/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

***अनुकूल मते :- ५४ प्रतिकुल मते :- ००***

***सूचक :- लढ्ढा नितीन बालमुकुंद***

***अनुमोदक :- पाटील कुलभुषण विरभान***

**सभागृहात सर्व सन्मा.सदस्य चर्चा करीत होते. त्यामुळे स्पष्ट आवाज ऐकू येत नाही.**

**श्री.कैलास सोनवणे :-** पाण्याचा विषय आहे थांबा थोड.

**श्री.अश्विन सोनवणे :-** खराब पाणी येत आहे.

**श्री.ईब्राहीम पटेल :-** चला लुले साहेब

**मा.महापौर :-** एक मिनीट

**श्री.सुनिल महाजन :-** चला लुले साहेब शेवटी शेवटी येऊन जा.

**मा.महापौर :-** बसा,

**श्री.कैलास सोनवणे :-** बसा खाली.

**श्री.गोपाल लुले, पाणी पुरवठा अभियंता :-** उन्हाळयाचे परत दिवस असल्यामुळे आपण जे फिल्टर प्लान्टवर ट्रिटमेंट करतो. त्याच्यानंतर दोन दिवसाआढ पाणी पुरवठा करतो. फिल्टर प्लान्ट या ठिकाणी पाण्याची टेस्ट वगैरे व्यवस्थीत आहे. नंतर ते पाणी विविध टाक्यांमध्ये पोहचविला जातो. नंतर गिरणा टाकीमध्ये ही पाहोचविला जातो. त्याठिकाणी आपण टॅप वॉटर मध्ये आपण टेस्टींग करत आहोत त्याचे नमुने सुध्दा योग्य आहे. त्याचे आपल्याजवळ लॅब्रॉटरी टेस्ट पण आहे. परंतु विषय असा आहे दोन दिवसाआढ पाणी पुरवठा करत असल्यामुळे उंच भागांमध्ये ज्या पाईपलाईन आहे. त्या पाईप लाईनी उन्हामुळे गरम होतात किंवा आज सी.आय.च्या पाईप लाईनींमध्ये जो पिवळया कलरचा शार तयार झालेला असतो. त्याच्यामुळे पाणी पाईप लाईनमध्ये थोडे दुषीत होतात.आणि आता ह्या दोन तीन दिवसापासुन तक्रार येत आहे की, सकाळी झालेला पाणी पुरवठा स्वच्छ असतो. पण दिड ते दोन दिवसानंतर त्या पाण्याला पिवळापणा सुरु होतो. आता याच्यावरती केमीकल दृष्टया मला काही सांगता येणार नाही. परंतु माझ्या टाकीवरचा आणि फिल्टरवरचा आणि गिरणा टाकीवरचा पाणी पुरवठा हा स्वच्छ आहे. पण दिड ते दोन दिवसानंतर पाणी ते बंदीस्त नसला तर कदाचित सुर्य किरणामुळे त्याला पिवळसरटपण आणि शेवाळ येऊ शकतात. हा माझा स्वत:चा अंदाज आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** दर वर्षी राहतो हा प्रॉब्लम.

**श्री.गोपाल लुले, पाणी पुरवठा अभियंता :-** आणि हा दर वर्षी असतो. माझ्या माहिती प्रमाणे २०१५ साली, २०१२ साली, त्यावेळेला मी पाणी पुरवठयातच होतो. तर त्यावेळेला आम्ही धरणाच्या अगदी शेवटच्या टोकाला पण त्यावेळेला धरणाची पातळी पण कमी होती.पण या वेळेला काय झाले आहे. या वेळेला धरणाची पातळी जास्त असुन पण उन्हाळा कडक आहे. ४७ डिग्री तापमान आपल्या गिरणा टाकीवर आणि फिल्टर प्लान्टवर मोजला गेला आहे. आणि यामुळे निव्वळ फक्त उन्हाळयाचा परिणाम आहे. आणि उन्हाळयाच्या दिवसामध्येच असा प्रॉब्लम येतो असा मागचा अनुभव आहे. त्यामुळे याच्या व्यतिरिक्त मी काही सांगु शकत नाही.

**मा.महापौर :-** नगरसचिवांनी राष्ट्रगीताला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांनी राष्ट्रगीतसाठी उभे राहावे ही विनंती.

**सही/-**
**(महाजन जयश्री सुनिल)**
**महापौर**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**